# १

## फ्रेंच राज्यक्रांती

**घटक रचना**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ फ्रेंच राज्यक्रांती कालखंडातील युरोप

१.३ फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

१.४ फ्रेंच राज्यक्रांतीचे मार्गक्रमण

१.५ क्रांतीची अखेर

१.६ फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम

१.७ सारांश

१.८ प्रश्न

१.९ संदर्भ


## १.० उद्दिष्टे

१) फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे समजून घेणे

२) फ्रेंच क्रांतीचा मार्ग जाणून घेणे

३) फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम तपासणे.

## १.१ प्रस्तावना

फ्रेंच राज्यक्रांती ही आधुनिक युरोपच्याच नव्हे तर आधुनिक जगाच्या इतिहासावर अमीट ठसा उमटवणारी घटना आहे. आधुनिक जगात महत्वाची असणारी मूल्ये लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता यांचा प्रकट आविष्कार फ्रान्स मध्ये फ्रेंच राज्यक्रांतीमुळे झाला. या क्रांतीनंतर जगात घडलेल्या महत्वाच्या घटनांवर फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव पडला होता. फ्रेंच राज्यक्रांतीने सरंजामशाही, राजेशाही, धर्माचा व्यक्तिगत आयुष्यातील हस्तक्षेप नष्ट केला होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर युरोप मधील राज्यव्यवस्था कमालीची बदलली. हा फरक इतका जास्त होता कि जग पुन्हा राज्यक्रांती पूर्व होऊ शकले नाही. फ्रेंच राज्यक्रांती पूर्वीची परिस्थिती आणण्याचा प्रयत्न युरोपमधील तत्कालीन सत्तांनी केला. परंतु ह्या क्रांतीच्या तत्वांनी त्या राष्ट्रांनासुद्धा कवेत घेतले.

## १.२ फ्रेंच राज्यक्रांती कालखंडातील युरोप

फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव संपूर्ण युरोपवर पडला होता. जी मूल्ये फ्रेंच राज्यक्रांतीने दिली त्या मुल्यांपासून धोका हा तत्कालीन राजकिय सरंचनेला होता. फ्रेंच राज्यक्रांतीचे महत्व



munotes.in

जाणून घेण्यासाठी तत्कालीन युरोपची स्थिती जाणून घेणे अत्यावश्यक ठरते.संपुर्ण युरोपमध्ये राजेशाही अस्तित्वात होती. इंग्लंड मध्ये मर्यादित स्वरूपात तर बाकी सर्व देशांत अमर्यादित राजेशाही अस्तित्वात होती. राजांवर कोणाचेही नियंत्रण नव्हते. त्यांच्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यवस्था ह्या नाममात्र उरल्या होत्या. वेगवेगळी राजघराणी युरोपमध्ये राज्य करत होती. सर्वसामान्य लोकांना कोणतेही हक्क अधिकार नव्हते. सरंजामशाही असल्यामुळें कुळांच्या शोषणावर ही व्यवस्था आधारित होती. नविन जलमार्गाचा शोध, वैज्ञानिक प्रगती आणि प्रबोधन युगा मुळे युरोपच्या आधुनिकीकरणास सुरुवात झाली होती. युरोपातील काही राष्ट्रांच्या वसाहती आशिया, आफ्रिका व अमेरीका खंडात  होत्या. या वसाहती यूरोपमधील राष्ट्रांच्या कच्चा माल मिळवण्याचे स्थान  व हक्काची बाजारपेठ होत्या. यातूनच औदयोगिक क्रांतीमुळे नवीन व्यापारी वर्ग उदयास आला होता. यासोबतच मध्यम वर्ग ज्यात शेतकरी, कामगार, व्यापारी यांचा समावेश होता की ज्यांना सत्तेमध्ये मात्र प्रतिनिधित्व नव्हते.

## १.३ फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे

**राजकीय कारणे:**

**अनियंत्रित हुकूमशाही:**

बुरबॉन घराण्याची सत्ता फ्रान्स मध्ये होती. या राजघराण्यातील सम्राट अनियंत्रित हुकुमशाही व सत्तेच्या दैवी सिद्धांताचा पुरस्कार करणारे होते. फ्रान्समधील राजाने लोकांच्या संमतीने नव्हे तर 'दैवी अधिकार' या सिद्धांताने राज्य करण्याचा दावा केला.  तो एक निरंकुश सम्राट होता आणि केवळ 'देवाला' जबाबदार हता. फ्रेंच सम्राटाला राज्य करण्याचा हक्क हा देवाने दिला आहे त्यामुळे तो कोणालाही जबाबदार नाही. त्याने घेतलेले निर्णय सर्वांना बंधनकारक असतील परंतू सम्राटावर कोणाचेही नियंत्रण असणार नाही अशा पद्धतीने राजावर कोणाचाही अंकुश नव्हता त्यामुळे राजाच्या लहरीवर राज्य चालत असे. १४व्या लुईच्या काळात फ्रान्स ने युद्ध निती अवलंबली होती त्यामुळे मोठ्या प्रमाणात खर्च हा युद्धावर होत होता. १६ व्या लुईने आर्थिक उधळपट्टीचे धोरण अवलंबले.

**राजघराण्याची उधळपट्टी व जनतेप्रती अनास्था :**

राजघराण्यातील लोक प्रचंड प्रमाणात उधळपट्टी करत असत. फ्रान्सची राजधानी पॅरिस होती मात्र सर्व निर्णय व्हर्सायच्या राजवाड्यातून  घेतले जात. व्हर्सायचा राजवाडा चौदाव्या लुईच्या काळात बांधला गेला होता व त्यास ३० कोटी रुपये खर्च आला होता. व्हर्सायच्या राजवाड्यात राजाचा अवाढव्य लवाजमा होता. राजाराणीच्या तैनातीला १५०० नोकर होते, तर राणीच्या खास तैनातीला ५०० नोकर होते. राजवाड्यात १८७५ घोडी व २१७ वाहने होती. राजाच्या पंक्तीला जवळजवळ ४०० अधिकारी जेवत असत. राजवाडयाचा वार्षिक खर्च १० कोटी फ्रैंक होता. फ्रेंच राजाचा दरबार युरोपात वैभवशाली म्हणून ओळखला जात असे. या दरबारात दोन हजार अमीर उमराव असत हे सर्व फ्रान्स मधील जनतेची व फ्रान्सची आर्थिक स्थिती खालावलेली असताना सुरू होते. त्यामुळे जनतेचा राजाविरुद्ध असंतोष वाढू लागला.

**अकार्यक्षम, भ्रष्ट व जुलमी शासन यंत्रणा:**

शासन यंत्रणेत शैक्षणिक पात्रता, गुणवत्ता विचारात न घेता नोकऱ्या दिल्या जात. शासन यंत्रणेतील महत्त्वाच्या जागा उमरावांसाठी राखून ठेवलेल्या होत्या. वशिल्याने महत्त्वाच्या जागेवर पोहोचलेल्या उमरावांच्या मुलांना व नातेवाइकांना राज्यकारभाराचे प्राथमिक ज्ञानही नव्हते. प्रत्येक प्रांताचा प्रमुख हा राज्यपाल होता, पण त्याला सल्ला देण्यासाठी मंडळ नव्हते. राजाने आपल्या सोयीनुसार देशाचे विविध भाग पाडले होते. त्या भागाचा प्रमुख 'गव्हर्नर' हा उमरावांपैकीच एक असे. सरकारी अधिकाऱ्यांचे अधिकार स्पष्ट न केल्यामुळे एकमेकांकडून एकमेकांच्या अधिकार क्षेत्रावर अतिक्रमण केले जाई. त्यामुळे कमालीचा गोंधळ उडे. अधिकाऱ्यांना निर्णयासाठी मध्यवर्ती सत्तेकडे विचारणा करावी लागे. सरकारी अधिकारी लोकांवर अन्याय, जुलूम व जबरदस्ती करीत.

**फ्रान्समधील न्यायव्यवस्था:**

न्यायालयीन क्षेत्रात कायद्यात सुसूत्रता नव्हती. राज्यातील कायदे अस्पष्ट होते. एका ठिकाणचे कायदे हे ठिकाणांहून भिन्न होते. कायदे हे लॅटिन भाषेत असल्याने सामान्य माणसाला ते समजत दुसऱ्या नसत. साध्या साध्या गुन्ह्यासाठी गंभीर स्वरूपाच्या शिक्षा दिल्या जात. उदा. हातपाय तोडणे, हाडे मोडणे, शिरच्छेद करणे. कोणत्याही व्यक्तीला विनाचौकशी तुरुंगात डांबले जाई. न्यायालयेही अनेक प्रकारची होती. उदा. शाही न्यायालय, लष्करी न्यायालय, धार्मिक न्यायालय, अर्थ न्यायालय वगैरे. पण या न्यायालयाचे अधिकार संदिग्ध असल्याने न्यायालयीन क्षेत्रात गोधळ होता. फ्रान्समध्ये क्रांतिपूर्व काळात ४०० कायदा पद्धती अस्तित्वात होत्या. या संदर्भात फ्रेंच तत्त्वज्ञ व्हॉल्टेअर म्हणतो, "फ्रान्समध्ये प्रवास करताना माणसाला जितक्या वेळा घोडी बदलावी लागतात तितक्या वेळा कायद्याच्या पद्धतीसुद्धा बदलतात. " कायदे संग्रहित केलेले एकही पुस्तक नव्हते. न्यायालयातील नोदणी पुस्तकात कायदे लिहिलेले असत. पण ते केवळ राजाने तयार केलेले असत. न्यायाधीशांनी जरी निर्णय दिला तरी तो क्वचितच अमलात आणला जाई. फ्रान्समध्ये दिवाणी किंवा फौजदारी खटल्यांसाठी कायद्याची एकच संहिता नव्हती. कायदा संहिताबद्ध करण्याचा प्रयत्नही झाला नाही. या एकसमानतेच्या अभावामुळे गोंधळ निर्माण झाला. न्यायप्रशासनाचा कारभार हा मनमानी होता कारण तो वादकांसाठी संथ आणि खर्चिक होता.

**परदेशी घटनांचा प्रभाव:**

फ्रेंच राज्यक्रांती पूर्वी इंग्लंड मध्ये रक्तहीन क्रांती झालेली यामध्ये पार्लमेंट चा विजय झाला होता त्यासोबतच आयर्लंडमध्ये राजसत्तेविरुद्ध तेथील जनतेने उठाव केला होता अमेरिकेत इंग्लंड विरुद्ध स्वातंत्र्य लढा सुरू होता याला फ्रेंच सत्तेचा पाठिंबा होता तेथून लढून आलेले फ्रेंच सैनिक या घटना पासून प्रभावित होते.

**सामाजिक परिस्थिती:**

फ्रेंच राज्यक्रांतीची कारणे आर्थिक व राजकीय असली तरीही फ्रेंच समाजरचना ही क्रांतीला तितकीच कारणीभूत होते कारण ही समाज रचना विषमतेवर आधारलेली होती. समाजातील मोठ्या वर्गाला सत्तेपासून वंचित ठेवल्या जात होते यामध्ये औद्योगिक

क्रांतीमुळे नवीन उदयास आलेला मध्यमवर्ग होता. हा वर्ग सुशिक्षित असल्यामुळे त्यांना आपल्या हक्काची जाणीव होती. त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायाची जाणीव या वर्गाला होती फ्रेंच राज्यक्रांतीची नेतृत्व या वर्गाने केली. तत्कालीन फ्रान्समध्ये तीन प्रमुख वर्ग अस्तित्वात होते. या वर्गांना इस्टेट असेही म्हणत.

**पहिला वर्ग:**

सरंजामदार, उमराव यांचा समावेश या वर्गात होतो. या वर्गाला मोठ्या प्रमाणात विशेषाधिकार होते या या वर्गाकडे मोठ्या प्रमाणात संपत्ती होती. सर्वात जास्त संपत्ती असूनही या वर्गावर कमीत कमी कर लागू होता. हा वर्ग कुळांना विना वेतन आपल्या शेतीवर राबवत होता त्यासोबतच प्रशासन व लष्करातील जागा या वर्गातील उमेदवारांना मिळत तसेच सरंजाम दाराच्या मुलीच्या लग्नाचा व शिक्षणाचा खर्च हा सामान्य लोकांकडून वसूल केला जाई. हा वर्ग मोठ्या प्रमाणात सामान्य जनतेचा शोषण करत होता. हा फ्रान्समधील प्रस्थापित वर्ग होता. या वर्गाला मोठ्या प्रमाणात उत्पन्न हे कुळाकडून मिळत असे. फ्रान्सच्या वेगवेगळ्या भागांमध्ये खानदानी लोकांना मिळणारे विशेषाधिकार आणि देय रक्कम खूप भिन्न होती. शेतकऱ्यांच्या पिकांच्या ठराविक भागावर श्रीमंत जमीनदाराचा हक्क असणे अगदी सामान्य होते. अधूनमधून तो त्याच्या घरासमोरून नेणाऱ्या मेंढ्या आणि गुरांवर टोल वसूल करू शकत होत

**दुसरा वर्ग:**

या वर्गात प्रमुख्याने धर्मगुरूंचा समावेश होत होता. फ्रान्समधील बहुसंख्य जनता ही कॅथोलिक या पंथाची होती. या वर्गामध्ये मात्र वरिष्ठ धर्मगुरू व कनिष्ठ धर्मगुरू असा भेद होता. यामध्ये वरिष्ठ धर्मगुरु कडे मोठ्या प्रमाणात संपत्तीची केंद्रीकरण झाले होते. वरिष्ठ धर्मगुरूंना सामान्य जनतेवर टाइथ नावाचा कर वसूल करण्याचा हक्क होता. त्यांना अनेक राजकीय व आर्थिक सवलती होत्या. धर्मगुरूंचा हा वर्ग करमुक्त सुद्धा होता सामान्यतः धर्मगुरूंनी ऐहिक सुखात कडे लक्ष न देता संन्यस्त वृत्तीने सामान्यांच्या जीवनाला धार्मिक बनवण्यासाठी मार्गदर्शन करणे अपेक्षित असते परंतु धर्मगुरू त्यांना नेमून दिलेली कार्य करत नसे हा वर्ग मोठमोठाले राजवाडे किल्ले बांधून व त्यासोबत तज्ञ ठेवून एखाद्या जमीनदार याप्रमाणे राहत होते याच वेळेस कनिष्ठ धर्मगुरू ची स्थिती मात्र दयनीय होती. फ्रान्समधील एकूण जमिनीच्या सुमारे २०% जमीन ही धर्मगुरूंच्या मालकीची होती आणि यावर कोणत्याही प्रकारचा कर नव्हता. धर्मगुरू मधील वरिष्ठ धर्मगुरु हे अमीर-उमराव या वर्गातून देतो ते तर कनिष्ठ धर्मगुरू हे सामान्यातून येत असत.

**तिसरा वर्ग:**

प्रत्येकजण जो धर्मगुरू किंवा कुलीन वर्गाचा नव्हता त्यांना थर्ड इस्टेटमधील मानले जात असे. या वर्गामध्ये सामान्य जनतेचा समावेश होत असे. यामध्येही तीन वेगवेगळ्या वर्गाचा समावेश होता. यात औद्योगिक क्रांतीनंतर उदयास आलेला मध्यम वर्ग की, ज्यामध्ये शिक्षक, वकील, साहित्यीक, डॉक्टर, व्यापारी यांचा समावेश होतो. दुसऱ्या वर्गात कामगारचा समावेश होता तर तिसऱ्या वर्गात शेतकरी व भुदासांचा समावेश होता. एकूण जमिनीच्या सुमारे २० टक्के इतकी जमीन या वर्गाकडे होती. परंतु सर्वात जास्त कर ह्या या

वर्गाला भरावा लागत असे शेतकऱ्यांना एकूण उत्पन्नाच्या ५५ टक्के उत्पन्न कर म्हणून द्यावे लागे. त्यासोबतच सामान्य लोकांना मिठावर कर द्यावा लागत असे. अमीर उमरावाच्या शिकारीमुळे पिकांची नासाडी झाली तरी तक्रार करता येत नसे. वर्षाकाठी गरज असो किंवा नसो तरीही त्यांना एका वर्षात सात पाऊंड मीठ विकत घेण्याची सक्ती होती. यासोबतच धर्मगुरूंना वेगळा कर सामान्य जनता देत असे. सर्वात कमी संपत्ती असतानासुद्धा सर्वात जास्त कर हा वर्ग भरत असे.

**प्रशासन व्यवस्था:**

फ्रान्समधील प्रशासन व्यवस्था हे गोंधळाची होते कोणत्याही प्रकारची एकवाक्यता या प्रशासनात नव्हती. नेमून दिलेले अधिकारी व त्यांचे कार्यक्षेत्र यांच्यामध्ये बऱ्याच वेळेस वाद-विवाद होत असून यामुळे सामान्य जनतेला नाहक त्रास भोगावा लागत असेल प्रशासकीय अधिकारी हे एकमेकांच्या कार्य क्षेत्रामध्ये हस्तक्षेप करत. अनियंत्रित राज्य सत्तेमुळे राजापर्यंत पोहोचू शकत असलेल्या वर्गालाच या व्यवस्थेचा फायदा होत असे.

**कर आकारणी:**

फ्रान्समध्ये अनेक प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर होते. या करांचा भरणा विशेषाधिकारप्राप्त वर्गाने टाळला होता. यामध्ये सरंजामदार व धर्मगुरू यांना करातून सूट होती.त्यामुळे तिसऱ्या वर्गावर(इस्टेटवर) बोजा पडला. या व्यतिरिक्त, श्रमात देय असलेला 'रॉयल कॉर्व्ही' कर होता. हा कर फक्त शेतकरी वर्गालाच लागू होत असे. मुख्य अप्रत्यक्ष कर म्हणजे मीठ कर, अबकारी कर, कस्टम ड्युटी, सरकारी तंबाखूची मक्तेदारी आणि राजेशाही क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न. राजा शिवाय धर्मगुरू सरंजामदार यांनाही सामान्य जनतेकडून कर वसूल करण्याचा अधिकार होता यामुळे सामान्य जनतेला एकाच वेळी अनेक वेगवेगळ्या पातळ्यांवर कराचा भरणा करावा लागे. करांच्या ओझ्याखाली फ्रान्समधील सामान्य जनता भरडली जात होती.

**विचारवंतांचे कार्य:**

फ्रान्स मधील विचारवंतांनी क्रांती पूर्वकाळात जगाला दिशा देणारे तत्वज्ञान मांडले या तत्त्वज्ञानाचा उपयोग आधुनिक जगातील लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता प्रस्थापित करण्यासाठी झाला. याच काळातील विचारवंतांनी सरकारचे स्वरूप कार्य काय असावे आणि कसे असावे याबद्दल आपली मते मांडली. त्यांच्या या कामगिरीने फ्रान्समधील क्रांतीला पोषक भूमी तयार केली. किंबहुना असे मानले जाते की विचारवंतांच्या योगदाना शिवाय फ्रेंच राज्यक्रांती ही फक्त एक सत्तांतर म्हणून राहिली असती. त्याला जगाच्या इतिहासात मिळणारे स्थान हे फ्रेंच राज्यक्रांतीने दिलेल्या आधुनिक मूल्यामुळे आहे. या विचारवंतांमध्ये प्रामुख्याने वॉल्टेअर, मॉन्टेस्क्यु, रुसो यांचा समावेश होतो

**मॉन्टेस्क्यु (१६८९-१७७५)**:

हे व्यवसायाने वकील असून त्यांना मानवी इतिहासाचा अभ्यास होता .वकील असल्यामुळे त्यांचे लेखन काळजीपूर्वक होते त्यामुळे त्यांनी सरकारच्या संविधानिक स्वरूपाचे समर्थन केले. त्यांच्यामते कायदा हा सर्वोच्च असला पाहिजे त्यांनी "स्पिरिट ऑफ लॉज "हा ग्रंथ



munotes.in

लिहिला या ग्रंथामध्ये त्यांनी सत्ता विभाजनाचा सिद्धांत मांडला या सिद्धांताच्या मते कार्यकारी मंडळ न्यायमंडळ आणि कायदा मंडळ या तिन्ही व्यवस्थांमध्ये सत्ता विभागली गेलेली असावी यामुळे कोणतेही एक व्यवस्था सर्वोच्च होऊ शकणार नाही असे त्यांचे मत होते त्यांच्यावर इंग्लंडच्या मर्यादित राजेशाही व संसदीय राजकारणाचा प्रभाव फ्रान्समधील न्यायव्यवस्था आणि राज्य व्यवस्था लक्षात घेता त्यांचे हे मत क्रांतिकारी ठरले.

**व्होल्टेअर (१६९४-१७७८) :**

अठराव्या शतकातील तर्क आणि सहिष्णुतेचा विचार केला असता व्होल्टेअरचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते यांचा त्याने आपल्या लिखाणातून फ्रान्समधील प्रस्थापित समाजावरचा हल्ला चढवला. यामध्ये फ्रान्समधील राज्यकर्ते, धर्मगुरू, प्रशासकीय अधिकारी यांचा समावेश होता. त्याने उपहासात्मक लिखाण केले. त्याचा विशेष राग धर्मगुरूंच्या दांभिकतेवर होता त्याने आपल्या लेखनातून कायद्यांमधील विसंगती स्पष्ट केली. त्यासोबतच न्याय पद्धतीतले दोष, राजाला मिळणारे अमर्याद अधिकार यावर टीका केली. त्याने 'कॅन्डिड' हे बोचरी टीका करणारे उपहासात्मक पुस्तक लिहिले. व्हॉल्तेअरने विविधांगी लेखन केले. आयुष्यभर त्याने स्वातंत्र्याची, बुध्दिप्रमाण्यवादाची कास धरली. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा व्हॉल्तेअरने पुरस्कार केला. ज्या विचारांच्या प्रस्थापनेसाठी व्होल्टेअर लढला, त्या विचारांनी युरोपियन संस्कृतीला एक नवीन दिशा दिली. व्हॉल्सेअर रूसोइतका लोकशाही वादी नसला तरी व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य त्याला मोलाचे वाटत होते. ख्रिस्ती धर्मसंस्थेच्या कारभारातील भ्रष्टतेवर त्याने जे कठोर, उपरोधिक व बुध्दिवादी हल्ले चढविले. त्याच्या या विचारांमुळे व त्याचा लिखाणामुळे तला अनेक वेळेस तुरुंगवास सहन करावा लागला. त्याच्या विचारांमुळे जागृतीचे एक नवे पर्व सुरू झाले. फ्रेंच राज्यक्रांती घडविण्यात त्याचे विचार कारणीभूत ठरले.

**जीन जॅक रूसो (१७१२-१७७८) :**

रूसोने सामाजिक करार ( Social Contract ) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्याने सांगितले की राजा हा कोणत्याही देवाचा अंश नाही. तो जमिनीवर देवाचा प्रतिनिधी सुद्धा नाही तर सामान्य जनतेनेच राजा व राज्य हे निर्माण केलेले आहे. राज्यामध्ये लोक हे सार्वभौम असतात. “राज्य म्हणजे राजा व लोक यांच्यात करार आहे राजाला सत्ता ही लोकांनी सोपवलेली आहे त्यामुळे राजाची कर्तव्य राजा पार पाडत नसेल तर अशा राजाला सत्तेवरून दूर करण्याचा हक्क जनतेला आहे यालाच ‘सामाजिक करार’ असेही म्हणतात.” त्याच्या या विचारांमुळे फ्रेंच राज्यक्रांतीला अनुकूल अशी पार्श्वभूमी तयार झाली. तत्कालीन फ्रेंच समाजात राजा हा ईश्वरी अंश आहे ही मान्यता प्रस्तावित होते यामुळेच राजा विरुद्ध कोणतेही पाऊल उचलणे हे देवा विरुद्ध जाण्यासारखे होते ही भिती जनतेच्या मनात होती. त्यांच्या भीतीला रुसोने आपल्या सामाजिक करार या ग्रंथातून दूर केले. यामुळे जनतेला त्यांच्यामध्ये असंतोष असणाऱ्या असंतोषाला दूर करण्याची प्रेरणा मिळाली. नेपोलियन बोनापार्ट च्या मध्ये जर रूसो जन्माला आला नसता तर फ्रेंच राज्यक्रांती घडली नसती यावरुन रुसोचे महत्व आपणास कळते.

**फ्रान्समधील आर्थिक दिवाळखोरी:**

१४व्या लुईने विनाकारण पैशांची उधळपट्टी केली. गोरगरीबावर कर लादून आर्थिक परिस्थिती सावरण्यास प्रयत्न केला. पण ते अशक्य झाले. राष्ट्रय कर्जाची रक्कम ४,४६,७४,७८००० लिए एवढे वाढले. या दिवाळखोरीतून फ्रान्सला वाचवण्यासाठी १६व्य लुईने तुर्गो (इ.स. १७७४-७६) नंतर नेकर (इ.स. १७७६-८१) असे अर्थमंत्री नेमले यांनी अर्थव्यवस्था सुधारण्याचा प्रयत्न केला. सरंजामदार व धर्मगुरुंच्या हक्कावर मर्यादा येऊ लागल्याने त्यांनी विरोध केला. नंतर कैलोन हा नवा अर्थमंत्री नेमला. त्याने वरिष्ठांची मर्जी सांभाळण्यासाठी वरिष्ठ वर्गाला पसंत पडेल तेच धोरण राबविण्याचे ठरवले. त्यानुसार त्याने नवीन कर्ज काढून व कर बसवून अर्थखाते सावरण्याचा प्रयत्न चालवला पण पॅरिसच्या पार्लमेंटने या गोष्टीस विरोध केला व कर बसवण्याचा व कर वाढविण्याच अधिकार फक्त लोकप्रतिनिधी मंडळास म्हणजेच इंस्टेट जनरलला आहे असे घोषित केले. लुईने त्यास विरोध केला. पण अखेर १७५ वर्षे न बोलवलेले पार्लमेंट त्याने इ. स. १७८९ जानेवारीमध्ये निवडणुका घेऊन ५ मे १७८९ रोजी इस्टेट जनरलचे व्हर्साय राजवाड्यात पहिले अधिवेशन भरेल असे सांगितले.

**अर्थव्यवस्थेची हाताळणी**:

टर्गोट (१७७४-१७७६): लुई सोळाव्याने टर्गोटला अर्थ नियंत्रक जनरल म्हणून नियुक्त केले.  राजाने सरकार आणि त्याचे शक्तिशाली टीकाकार यांच्यातील सलोखा म्हणून रद्द केलेली संसद पुन्हा स्थापन केली. टर्गोटचे वित्तविषयक विचार 'ना दिवाळखोरी, कोणतेही नवीन कर आणि कर्ज नाहीत' या वाक्यात सारांशित केले जाऊ शकतात. कठोर अर्थव्यवस्थेमुळे टर्गोटने खजिन्यासाठी ५५ बचतीचा परिणाम केला. तथापि, त्याच्या उदाहरणाचा सम्राटावर प्रभाव पडला नाही, उलट अनावश्यक खर्च चालूच राहिला. टर्गोटच्या उपायांमुळे त्याला विशेषाधिकारप्राप्त वर्गाच्या शत्रुत्वाचा सामना करावा लागला.

**नेकर (१७७६-१७८१):**

अनेक महिन्यांनंतर, लुई सोळाव्याने सर्वात प्रसिद्ध बँकर्स नेकरला फ्रान्सच्या आर्थिक जबाबदारीसाठी नियुक्त केले. त्याच्या प्रशासकीय सुधारणा चांगल्या होत्या, परंतु समस्येवर उपाय म्हणून ते फारसे पुरेसे नव्हते. नेकरचे अनेक मित्र होते, परंतु त्याचे अनेक शत्रूही होते. आपले स्थान बळकट करण्यासाठी त्याने आपल्या सार्वजनिक प्रशासनाचे तपशील तसेच राजाच्या खर्चाचे तपशील प्रकाशित केले. यामुळे त्याची लोकप्रियता कमी झाली आणि राजे बंधू, दरबारी इत्यादींनी हल्ला केला.

**कॅलोन (१७८१-८३):**

उत्तराधिकारी कॅलोन, एक उत्कृष्ट आणि अत्यंत हुशार आणि साधनसंपन्न व्यक्ती होता. आर्थिक व्याधींवरचा हा उपाय म्हणजे जनतेचा आत्मविश्वास पुनर्संचयित करणारा होता. त्यांनी अर्थव्यवस्थेला वाऱ्यावर फेकले आणि भांडवलदाराकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन सरकारची पत वाढवली. तथापि, चलनवाढ लवकरच सुरू झाली आणि भांडवलदाराचा आत्मविश्वास पुनर्संचयित करण्यापेक्षा अधिक वेगाने नाहीसा झाला. कॅलोनला शेवटी राजाने बडतर्फ केले.  तो इंग्लंडला पळून गेला.



munotes.in

**इस्टेट जनरल ५ मे १७८९:**

फ्रान्समधील दिवाळखोरीला वाचवण्यासाठी व पैसा मिळवण्यासाठी १६व्या लुईने जानेवारी१७८९ मध्ये निवडणुका घेतल्या आणि नवीन लोकसभा तयार केली. ५ मे १७८९ रोजी पहिले अधिवेशन व्हर्सायच्या राजवाड्यात भरवले. लोकसभेला विश्वासात घेऊन नवीन कर्ज व नवीन कर प्रजेवर लादता येतील या अपेक्षेने राजाने ही बैठक बोलवली.

लोकसभेत उमराव सभा, धर्मगुरू सभा, सामान्य लोकांचे प्रतिनिधित्व करणारी सभा असे तीन वर्ग होते. सामान्यांच्या सभागृहाने कोणताही ठराव मांडल्यास उमराव व धर्मगुरू सभा आपल्या बहुमताच्या जोरावर ठराव फेटाळून लावीत असत. त्यामुळे सामान्य जनतेला न्याय मिळत नसे. या लोकसभेत ६२१ सामान्यांचे प्रतिनिधी, २८५ उमरावांचे, ३०८ धर्मगुरुंचे सभासद असे १२१४ एकूण प्रतिनिधी या बैठकीला हजर होते.

**टेनिस कोर्टावरील शपथ २० जून १७८९ :**

राष्ट्रीय सभेचे सभासद बैठकीकरता २० जून १७८९ रोजी सभागृहात गेले. त्या वेळी राजाने प्रवेश करण्यास नकार दिला. त्यामुळे हे सभासद राजवाड्याजवळील टेनिस क्रीडांगणावर जमले. राष्ट्रीय सभेचा अध्यक्ष बेलच्या नेतृत्वाखाली आव्हान केले की, 'लोकांचे सार्वभौमत्व सिद्ध करणारी घटना तयार होईपर्यंत आपली एकजूट कायम ठेवावयाची अशी शपथ येथे घेतली. ही शपथ टेनिस कोर्टावरील शपथ' म्हणून प्रसिद्ध आहे.

## १.४ फ्रेंच राज्यकान्तीचे मार्गक्रमण

इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळातील घटना या क्रांतीच्या घडामोडी पुढीलप्रमाणे घडल्या. इ.स. १७८९ पासून राज्यक्रांतीला झाला तो इ.स. १७९५ मध्ये तिचा शेवट होऊन, प्रजासत्ताकाची घटना तयार केली.

इ. स. १७८९ मध्ये बोलाविलेल्या ईस्टेटस जनरलच्या बैठकीमुळे संपूर्ण देशभर उत्साहाचे वारे संचारले. ज्यांची आसने नष्ट होणार होती अशा वरिष्ठ वर्गोनाही ही बैठक म्हणजे सुवर्णसंधी वाटली. त्यांची समजूत अशी होती की, या बैठकीमुळे कनिष्ठ वर्गाकडून अधिक कर गोळा करणे शक्य होईल आणि ते काम आटोपले म्हणजे शासन व्यवस्थेत कसलाही बदल न करता एस्टेटस जनरल बरखास्त करता येईल. याउलट सामान्य जनतेच्या मनात या बैठकीने नव्या आशा व नव्या आकांक्षा निर्माण केल्या. बहुसंख्य जनतेला ईस्टेटस जनरल म्हणजे काय, तिचे स्वरूप, अधिकार व कार्यक्षेत्र काय ह्या विषयी काहीच माहिती नव्हती. पण आपले दैन्य दूर होईल, अन्याय दूर होईल ,सुखाचा व समृद्धीचा काळ निर्माण होईल असा वाटत होते. प्रत्यक्षात घडलेल्या गोष्टींनी दोघांचीही निराशा केली. पण या बैठकीने जगाच्या इतिहासाला नवे वळण देणाऱ्या फ्रेंच राज्य क्रांतीची बीजे रोवली.

**जनतेच्या मागण्या:**

फ्रान्समध्ये इंग्लंडप्रमाणे जनतेचे प्रातिनिधिक असे विधिमंडळ नव्हते. जनतेच्या असंतोषाला वाट करून देणारी सोय नव्हती. यामुळे हा असंतोष वाटत आणि अनेक वर्षे तो

धुमसत राहून त्याचा या वेळी स्फोट झाला. लोकांनी आपल्या प्रतिनिधींमार्फत ईस्टेटस जनरलच्या बैठकीसाठी आपल्या मागण्या सादर केल्या होत ह्या मागण्यांत क्रांतिकारक असे काहीही नव्हते. बहुतेकांनी राजाबद्दलची आपली मते व अपेक्षा व्यक्त केल्या होत्या.. पण त्याचबरोबर केवळ नव्या करांना मान्यता देण्यासाठी एस्टेट जनरलचे अधिवेशन उपयुक्त ठरणार नाही, तर शासनसंस्थेत महत्त्वाचे बदल ब आणले पाहिजेत व ह्या सुधारणांना सुरुवात एस्टेटस जनरलच्या बैठकीमधून सुरूवात व्हावी अशी त्यांची मागणी होती. सामान्य जनतेचे प्रतिनिधी हे बुद्धिवादी, तत्कालीन आणि व सामाजिक प्रश्नांविषयी माहिती असलेले आणि राजकीय सुधारणांविषयी आग्रही होते. पण त्यांची भूमिका सुधारणावादी होती.

**ईस्टेटस जनरलचा प्रारंभ:**

५ मे १७८९ या दिवशी ईस्टेटस जनरलच्या ऐतिहासिक अधिवेशनाला सुरुवात झाली. सर्व सभासदांनी इ. स. १६१४ मध्ये प्रचलित असलेले विशिष्ट वेशभूषा करून आले पाहिजे अशी सरकारी सूचना होती. या क्षुल्लक सूचनेवरूनदेखील राजा आणि सत्ताधारी वर्ग हा भूतकाळातच कसा रममाण झाला होता, हे लक्षात येते. धर्मगुरू आणि सरदार वर्गीचे प्रतिनिधी सरकारी सूचनेनुसार भडक व श्रीमंती पोषाखात हजर होते. सुरुवातीपासून जनतेच्या प्रतिनिधींना अगदी बाजूस टाकण्यात आले होते. त्यांना तेथे भाषणेदेखील ऐकू येऊ शकली नाहीत. राजाच्या भाषणात जनतेने मागितलेल्या सूचनांचा साधा नामोल्लेखदेखील नव्हता. राजांचे भाषण आटोपल्यावर राजा, आणि धर्मगुरू ह्यांनी सभागृह सोडले.

**राष्ट्रीय सभेची स्थापना**:

- लोकसभेच्या बैठकी नियमित भरवाव्यात, कायदे करण्याचा, करआकारणी मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार असावा व समाजातील सर्व वर्गावर समान कराची आकारणी व्हावी इ. मागण्या अधिवेशनात होत्या.आतापर्यंत उमराव व धर्मगुरू यांचे वेगळे तर थर्ड इस्टेटचे वेगळे अधिवेशन भरत. पण या वेळी तीन सभागृहाची संयुक्त बैठक व्हावी ते संयुक्त गृह असावे, अशी मागणी थर्ड इस्टेटने केली; परंतु त्यांना यश मिळाले नाही म्हणून ॲबेसिएस या क्रांतिकारकाने सर्वसामान्याचे प्रतिनिधी मंडळ हेच राष्ट्रीय मंडळ होय असे जाहीर करून १७जून १७८९ रोजी राष्ट्रीय सभा म्हणून जाहीर केली.

- १७ जून रोजी जनतेच्या प्रतिनिधींनी नॅशनल असेंब्ली निर्माण याचा आणि पूर्वीची वर्गाधिष्ठितरचना नष्ट करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानंतर राजाच्या हुकुमान्वये ह्या सर्व प्रतिनिधींना सभागृहातून हाकलून लावण्यात आले. हकालपट्टीनंतर सर्व प्रतिनिधींनी इतिहासप्रसिद्ध 'टेनिस कोर्ट शपथ घेऊन राज्यघटना निर्माण होईपर्यत कार्य करीत राहण्याचा आपला दृढनिश्चय व्यक्त केला.

munotes.in

**नॅशनल असेंब्लीला मान्यता:**

जनतेच्या प्रतिनिधींना अर्ध्यापेक्षा अधिक धर्मगुरूंनी आणि सुमारे ४७ सरदारांनी पाठिंबा दिला. या पाठिंब्यामुळे नॅशनल असेंब्लीला मान्यता देणे राजाला भाग पडले.राज्यक्रांतीतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. नॅशनल असेंब्लीला मान्यता देणे याचा अर्थ राजाची अमर्याद सत्ता संपुष्टात येणे असाच होता. जनतेच्या प्रतिनिधीनी ते केवळ निमूटपणे कर देणारे नागरिक नसून राष्ट्राचे विधिनियम करणारे आहेत हे सिद्ध केले. जनतेच्या सार्वभौमत्वाचा हा पहिला विजय होता. नॅशनल असेंब्लीने सरदार वर्गाचे खास अधिकार व सवलती नष्ट केल्या. स्थानिक स्वराज्य त्यांना स्वातंत्र्य दिले. चर्चची मालमत्ता जप्त केली, नवी न्याय्य करपद्धती सुरू केली. चलन उपयोगात आणले.

**स्फोटक परिस्थिती:**

नॅशनल असेंब्लीने देशाची राज्यघटना तयार करण्याचे काम हाती घेतले; पण अनेक अडथळे येऊन शेवटी तयार झालेली घटना प्रत्यक्षात येऊ शकली या वेळेपावेतो चळवळीची सूत्रे सुधारणावादी राजनिष्ठ अशा स्थितिप्रिय गटाच्या होती. या गटाच्या नेतृत्वाखाली फारशी प्रगती झाली नाही, आणि क्रांतिवादी चळवळीचे नेतृत्व आपल्याकडे घेण्याचा प्रयत्न केला. याच वेळी पॅरिसमध्ये अन्न कमतरता निर्माण होऊन जनतेचे दैनंदिन जीवन हलाखीचे झाले. नॅशनल असेंब्ली व्यतिरिक्त, स्वातंत्र्य आणि समानतेच्या आदर्शांनी प्रेरित झालेल्या फ्रान्समधील सामान्य जनतेने अन्यायाविरुद्ध उठाव करण्याचा निर्णय घेतला होता. १४ जुलै १७८९ रोजी हजारो लोक पॅरिसच्या रस्त्यावर जमले आणि त्यांनी बॅस्टिलच्या  कारागृहात प्रवेश केला.  त्यांनी कारागृहात प्रवेश करून कैद्यांना सोडले. निरंकुश राजेशाहीचे प्रतीक असलेल्या बॅस्टिलचा नाश झाला.  बॅस्टिलचा पतन हा फ्रेंच राज्यक्रांतीच्या इतिहासातील एक महत्त्वाचा खूण आहे. . राष्ट्रीय सभेने घटना तयार करण्याचे काम हाती घेतले राजाने सशस्त्र बळाचा वापर करण्याचा निर्णय घेतला. नेकरला अर्थमंत्रीपदावरून दूर केले. उद्धाम वर्तन पाहून संताप झालेल्या क्रांतिकारकांनी शहरात दंगेधोपे सुरु केले. १४ जुलै, १७८९ त्यांनी बॅस्टिल गुरुंगावर हल्ला करून तेथील गव्हर्नरला ठार मारले आणि कैद्यांची मुक्तता केली. राज्यक्रांतीला येथूनच प्रारंभ झाला. राजाविरुद्ध प्रजा असा स्फोटक संघर्ष सुरू झाला.

**राष्ट्रीय सभेचे कार्य (१७८९-९७९१):**

बॅस्टीनच्या पाडावानंतर क्रांतिकारकांना हुरूप आला. त्यांनी अमीर उमरावांच्या घरांवर हल्ले करून दहशत निर्माणाचे सत्र सुरू केले. या आंदोलनात सामान्य शेतकऱ्यांनी भाग घेऊन क्रांतीचे लोण ग्रामीण भागापर्यंत पोहोचवले. जुलै १७८९ मध्ये साध्या पावाचे भाव दामदुपटीने वाढले. फ्रेंच इतिहासकार लिफिव्हर यांच्या मते, 'पावाच्या किंमती स्वस्त असल्या तर सर्वसामान्य गरीब जनतेने हिंसक चळवळींचा मार्ग अवलंबला नसता आणि मग बुद्धीवादी चळवळींना (बुर्ज्वांना) सहजासहजी यश प्राप्त झाले नसते. राष्ट्रीय सभेने अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन फ्रान्सच्या प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणला.

अ) श्रीमंत उमराव, धर्मगुरु इत्यादी विशेष हक्क प्राप्त झालेल्यांचे हक्क रद्द केले.सर्वांना समान संधी उपलब्ध करून दिली.

ब) सर्व प्रकारच्या कायद्याचे संतुलीकरण करून योग्य व निःपक्षपाती न्यायदान करण्याची तरतूद केली.

क) जमीनदारी नष्ट केली. धर्मगुरु व जमीनदार यांच्याकडे असलेली हजारो एकर जमीन सरकारने ताब्यात घेतली.

ड) मानवी हक्कांचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. जाहिरनाम्यात मानवाच्या नैसर्गिक मलभूत हक्कांचा समावेश करून मुद्रण स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य इत्यादी महत्त्वाचे अधिकार नागरिकांन बहाल केले.

इ) नवीन राज्यघटना तयार करण्याचे कार्य हाती घेतले. ही राज्यघटना अत्यंत परिश्रमाने इ.स. १७९१ मध्ये तयार झाली.

ई) सर्वात महत्त्वाचे म्हणजे अर्थव्यवस्थेत सुधारणा करण्याचा प्रयत्न राष्ट्रीय सभेने केला. अनेक जाचक कर रद्द केले. गरिबांना करमुक्त करून श्रीमंतांवर कर लादले. राज्यकारभारात सुधारणा करण्यासाठी व त्यातील भ्रष्टाचार नाहीसा करण्यासाठी राज्यकारभाराची पुनर्रचना केली.

ऊ) धर्मगुरुंची सत्ता नाममात्र केली. चर्चवर नियंत्रणे बसविली. धर्मगुरुंनी राज्याशी एकनिष्ठ राहण्याविषयी शपथ घ्यावी असा दंडक बसवला. राष्ट्रीय सभेने अन्याय व विषमता मिटविण्यासाठी अनेक सुधारणा केल्या तरी नव्या गुंडगिरीचा व झुंडशाहीचा उदय झाला. काही धर्मगुरु देश सोडून गेले व त्यांनी प्रतिकांतीकारक कारवाया सुरू केल्या.

**राजा-राणीचे पलायन:**

जुलै १७८९ च्या क्रांतीनंतर फ्रान्सचा राजा सोळावा लुई आणि राणी यांना अपमान सहन करावा लागला. राजनिष्ठ लोकांना क्रांती रुचली नाही. त्यांनी शेजारच्या राष्ट्रात राजाश्रय घेऊन क्रांतिकारकांचा बिमोड करण्यासाठी गुप्त कारस्थाने रचली. याच सुमारास पॅरिसच्या स्त्रियांनी व स्त्रियांचा वेश परिधान केलेल्या पुरुषांनीही एक मोर्चा काढून राजा-राणी यांना व्हर्सायमधून पॅरीस शहरात येण्यास भाग पाडले. पॅरिसमधील राजवाड्यात या राजदांपत्याला नंजरकैदेत ठेवण्यात आले. यामुळे राज दांपत्याने २० जून १७९९ रोजी वेशांतर करून अन्य व्यक्तीसह ऑस्ट्रीयाला पळून जाण्याचा प्रयत्न केला. पण अयशस्वी ठरला. पुन्हा त्यांना पॅरिसमध्ये आणून नजरकैदेत ठेवले. राजाविषयीची निष्ठा बदलली. त्यामुळे 'रिपब्लिकन' या राजकीय पक्षाने लोकशाही गणतंत्र राज्याची मागणी केली.

**युद्ध व रक्तपात:**

राजा व त्याच्या हस्तकांनी केलेल्या गुप्त कारवायांमुळे क्रांतिकारकांना राजा हा क्रांतीच्या विरुद्ध असून क्रांती दडपण्याचा प्रयत्न करत आहे असे वाटू लागले हे सर्व राजाच्या हस्तकांचे कार्य आहे हे फ्रान्समध्ये कळले. क्रांतिकारकांनी राजा फितूर व देशद्रोही असल्याचे जाहीर केले. या सर्व घटनाक्रमाने फ्रान्समध्ये हिंसाचार,दंगली,रक्तपाताच्या घटना घडू लागल्या. फ्रान्समधील संतप्त जनतेने इ.स. १७९२ मध्ये राजवाड्यावर हल्ला केला. राजवाड्यातील संरक्षक व जनतेमधील युद्धात सुमारे पाच हजार लोक मृत्युमुखी

पडले. या क्रूर घटनेमुळे राजा भयभीत झाला व पुन्हा गुप्त ठिकाणी आश्रयास गेला. फ्रान्समध्ये लोकांची हत्या करण्यासाठी 'गिलोटिन' बसविण्यात आले होते. अटक केलेल्या व्यक्तींना लगेच कोर्टासमोर उभे करण्यात येई व ताबडतोब न्याय दिला जाई. गिलोटीन वर चढवत मृत्यूदंडाची शिक्षा देण्यात येई. राजावर देशद्रोहाचा आरोप ठेवून न्यायालयाचे नाटक रचण्यात आले. शेवटी इ.स. १७९३ मधील जानेवारीच्या २१ तारखेस सोळाव्या लुईस फासावर देण्यात आले. फ्रान्समधील राजेशाही नष्ट झाली. फ्रान्सची भूमी रक्तरंजित झाली होती. क्रांतिकारकांनी आपली जन्मभूमी गनिमांपासून मुक्त केली. प्रशिया, हॉलंड, स्पेन या राष्ट्रांनी फ्रान्सशी तह केला. इ.स. १७९५ मध्ये राजयंत्रणेत बदल होऊन नवे 'डिरेक्टरी' सरकार अस्तित्वात आले. त्यामुळे राज्यातील अंतर्गत परिस्थिती बदलली.

**राष्ट्रीय परिषदेचे कार्य (१७९२-९५):**

राष्ट्रीय परिषद अस्तित्वात येण्याच्या सुमारास म्हणजे सप्टेंबर १७९२ मध्ये जहाल क्रांतिकारकांनी राजेशाहीला अनुकूल असलेल्या अनेक लोकांची निर्दयीपणे कत्तल केली. ही कत्तल फ्रान्सच्या इतिहासात 'सप्टेंबर कत्तल' म्हणून प्रसिद्ध आहे. राष्ट्रीय परिषदेने मार्च १७९३ मध्ये सार्वजनिक सुरक्षा समिती नावाची बारा सभासदांची एक समिती नेमून तिच्याकडे सर्व कारभार सोपवला. या समितीने अधिकाररूढ होताच विरोधकांना उच्छेद करण्याचे धोरण स्वीकारले. हजारो लोकांना प्रतिक्रांतिकारकांना गिलोटीन नावाच्या यंत्राच्या सुरीखाली बळी दिले व 'संशयितांचा कायदा' पास केला. त्यामुळे रक्तपात वाढला. त्याचबरोबर राष्ट्रीय परिषदेने घटना तयार करण्याचे काम इ.स. १७९५ मध्ये पूर्ण केले. या घटनेनुसार पाच संचालकांचे एक मंडळ (Directory) देशाचा राज्यकारभार पाहिला व मंडळाला मार्गदर्शन करण्याचे काम द्विगृही कायदेमंडळ करील असे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे इ.स. १७९५ मध्ये संचालक मंडळाचा कारभार सुरू झाला. राष्ट्रीय परिषदेने आणखी मौलिक सुधारणा केल्या. राष्ट्रीय शिक्षणाची योजना आखून शिक्षण क्षेत्राच्या सर्व शाखांत आमूलाग्र बदल केले. वजनमापासाठी दशमान पद्धती (मेट्रीक) सुरू केली. आठवडा दहा दिवसांचा आणि महिना तीन आठवड्यांचा करण्यात आला. महिन्यांची नावे बदलण्यात आली ही नावे ऋतुचक्रानुसार आधारलेली होती. न्यायशाखेचे पुनरुज्जीवन केले व नवीन संहिता तयार केली. गुलामगिरी बंद केली. स्त्रियांना मालमत्तेच्या अधिकारांबाबत संरक्षण देण्यात आले. अशा कितीतरी सुधारणा राष्ट्रीय परिषदेने संक्रमण काळात केल्या.

**संचालक मंडळ:**

अधिकारारूढ होताच संचालक मंडळाला परकीय आक्रमणास तोंड द्यावे लागले. इंग्लंड व ऑस्ट्रीया यांनी युती करून फ्रान्सची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. अशा आणीबाणी प्रसंगी नेपोलियनचा उत्कर्ष झाला. या तरुण सेनापतीने ऑस्ट्रीयन सैन्याचा अनेक लढायात पराभव केला आणि राष्ट्राला संकटातून वाचवले. एवढेच नव्हे फ्रान्समधील अंतर्गत बंडाळी काढण्यातही त्याने यश मिळविले. मंडळातील पाचही संचालक फारसे कर्तबगार नव्हते. शिवाय मंडळाचा कारभारही भ्रष्ट झाला. त्यामुळे संचालक मंडळाविषयी जनतेमध्ये अप्रीती निर्माण झाली. नेपोलियनचे वर्चस्व वाढू नये म्हणून संचालकांनी त्याची रवानगी इजिप्तच्या मोहिमेवर केली. या मोहिमेत नेपोलीयनला अपयश आले; परंतु त्याच्या गैरहजेरीत इंग्लंड व ऑस्ट्रीया या राष्ट्रांनी पुन्हा फ्रान्सच्या सीमेवर हल्ले करण्यास सुरुवात केली. फ्रेंच

जनतेचा मंडळावरील विश्वास केव्हाच उडाला होता. इजिप्तवरून परत येताच नेपोलियनने या संधीचा फायदा घेतला व संचालक मंडळाचा शेवट करून कायदेमंडळही बरखास्त केले. अशाप्रकारे फ्रेंच राज्यसंस्कृतीवा शेवट लष्करी क्रांतीने (Coup de etat) झाला. ज्या तत्त्वांसाठी राज्यक्रांती होऊन पहिले गणराज्य स्थापन झाले ते फार काळ टिकले नाही. फ्रान्स पुन्हा हुकूमशाहीच्या तावडीत सापडला. फ्रान्समधील पहिले प्रजासत्ताक अवघ्या तेरा वर्षांनी म्हणजे इ.स. १८०४ मध्ये कोलमडून पडले. यावेळी फ्रान्सची सर्व सत्ता नेपोलियन या हुकूमशहाच्या हातात गेली.

## १.५ क्रांतीची अखेर

फ्रान्सने १४ जुलै १७८९ हा स्वातंत्र्यदिन म्हणून साजरा केला. १२ ऑगस्ट १७८९ रोजी नॅशनल असेंब्लीने "मानवांच्या हक्कांची घोषणा" स्वीकारली. हे घोषित केले की, "पुरुष जन्माला येतात आणि स्वतंत्र राहतात आणि अधिकारांमध्ये समान असतात." १७९१ च्या अखेरीस राज्यघटनेचा मसुदा तयार करण्यात आला. १७९२ मध्ये फ्रेंच राजेशाही संपुष्टात आली आणि स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या तत्त्वांचे पालन करणारे फ्रान्स प्रजासत्ताक बनले. हंगामी सरकार स्थापन करण्यात आले. १७९३ मध्ये, कार्यकारी अधिकार जेकोबिन्स नावाच्या कट्टरपंथी राजकीय गटाच्या हातात गेला. त्यांचा नेता रॉबेस्पियर होता. त्याने प्रजासत्ताकच्या हजारो "शत्रूंना" फाशी देण्याचे आदेश दिले. या 'दहशतवादाच्या राजवटीत' हजारो निरपराध (रॉबस्पीयर) लोकांनाही देशद्रोहाच्या संशयावरून गिलोटिनमध्ये डांबण्यात आले. लुई सोळावा आणि राणी मेरी अँटोइनेट यांनाही देशद्रोही म्हणून गिलोटिन वर चढविण्यात आले (१७९३). सम्राट लुई सोळावा आणि त्याची राणी यांना फाशी दिल्याने युरोपातील राजेशाही देशांना मोठा धक्का बसला. युरोपीय शक्तींनी फ्रान्सविरुद्ध युती केली (१७९३). फ्रान्समध्ये, रॉबेस्पीयरच्या मृत्यूनंतर, मध्यम नेत्यांनी जागा मिळविली. पाच संचालकांचा समावेश असलेल्या डिरेक्टरीने अधिकार वापरला (१७९५-१७९९). या काळात कार्यक्षम प्रशासनाच्या अभावामुळे फ्रान्समध्ये प्रचंड गोंधळ उडाला. युरोपियन युतीशी लढण्यासाठी आणि लोकांचा विश्वास संपादन करण्यासाठी संचालक नेपोलियनच्या लष्करी प्रतिभेवर अवलंबून होते. स्वतःला लोकप्रिय वाटून नेपोलियनने निर्देशिका उखडून टाकली. डिसेंबर १८०४ मध्ये, नेपोलियनने स्वतःला "फ्रेंचचा सम्राट" घोषित केले. प्रजासत्ताकतेचा कायदेशीर बुरखा उतरवला गेला.

## १.६ फ्रेंच राज्यक्रांतीचे परिणाम

फ्रेंच राज्यक्रांती ही केवळ स्थानिक घटना नव्हती. त्याचा परिणाम संपूर्ण युरोप आणि जगावर झाला. क्रांती 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' या तत्त्वांसाठी उभी होती. अशा प्रकारे १९ व्या शतकात या आदर्श, प्रेरित आणि युरोपियन आदर्शांवर आणि राजकारणावर प्रभुत्व मिळवले. जर जगातील सम्राटांच्या नशिबावर शिक्कामोर्तब केले तर. नॅशनल असेंब्लीद्वारे मनुष्याच्या हक्कांच्या घोषणेने या वस्तुस्थितीवर जोर दिला की सार्वभौमत्व लोकांमध्ये असते आणि कमी ही सामान्य इच्छाशक्तीची अभिव्यक्ती आहे.

**नेपोलियंनचा उदय:**

नेपोलियन फ्रेंच राज्यक्रांतीचे अपत्य मानला जातो या क्रांती नंतर नेपोलियनचा उदय झाला यानंतर त्याने पराक्रम गाजवून युरोपचा नकाशा पुनर्रचित केला यातूनच मूल्यांचा प्रसार वेगवेगळ्या देशात झाला.

**फ्रान्समधील निरंकुशतेचा अंत:**

हाऊस ऑफ बोर्बन हा फ्रेंच राजवंश आहे ज्याने फ्रान्सवर ४०० वर्षांहून अधिक काळ राज्य केले होते. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे त्याची कारकीर्द विस्कळीत झाली. १७९२ मध्ये फ्रान्समध्ये राजेशाही संपुष्टात आली आणि रिपब्लिकन सरकारच्या रूपाने बदलली गेली. क्रांतीदरम्यान, बोरबॉन राजेशाहीच्या रॉयल गार्डची जागा नॅशनल गार्डने घेतली, क्रांतिकारी सैन्य ज्याची भूमिका फ्रेंच क्रांतीच्या यशाचे रक्षण करण्याची होती. १७९३ च्या अखेरीस, नॅशनल गार्डमध्ये ७००,००० प्रशिक्षित सैनिक होते जे लोक आणि त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करतात.

**नेतृत्वात बदल**:

मध्यमवर्गाकडे राजकारण व राज्यकारभाराची सूत्रे आली. फ्रेंच राज्यक्रांतीने राजेशाही, सरंजामशाही व धर्मगुरूंचे प्राबल्य नष्ट केले. क्रांतिपूर्व याच वर्गाकडे राजकारणाची व प्रशासनाची सूत्रे होती. पण आता हा वर्गच नष्ट झाल्याने फ्रान्सची सत्तासूत्रे बौद्धिकदृष्ट्या जागृत असलेल्या मध्यमवर्गाकडे आली. हा

**फ्रान्समधील जमिनीच्या मालकीमध्ये बदल:**

फ्रेंच क्रांतीपूर्वी, शेतकरी त्यांच्या जमिनीवर आणि त्यांच्या मालकावर अवलंबून होता. दशांश हा चर्चच्या समर्थनासाठी कर म्हणून घेतलेल्या वार्षिक उत्पादनाचा एक दशांश होता. फ्रेंच राज्यक्रांतीदरम्यान हे दोन्ही कर रद्द करण्यात आले. फ्रान्सचा दोन तृतीयांश भाग शेतीमध्ये कार्यरत होता आणि हे कर रद्द केल्याने शेतकर्यांना मोठा दिलासा मिळाला. तसेच, क्रांतीच्या काळात चर्च आणि खानदानी लोकांच्या नियंत्रणाखाली असलेल्या मोठ्या इस्टेट्सच्या विघटनाने, ग्रामीण फ्रान्स प्रामुख्याने लहान स्वतंत्र शेतांची जमीन बनली. असे म्हटले जाऊ शकते की क्रांतीने राष्ट्राला "जमीनदारांचा शासक वर्ग" दिला होता.

**कॅथोलिक चर्चने आपले वर्चस्व गमावले:**

फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी, कॅथलिक धर्म हा फ्रान्समधील अधिकृत धर्म होता आणि फ्रेंच कॅथोलिक चर्च खूप शक्तिशाली होते. त्याच्या मालकीची सुमारे १०% जमीन होती. याला दशमांश देखील मिळाला, जो पाळकांच्या समर्थनासाठी कर म्हणून घेतलेल्या सामान्य लोकांच्या वार्षिक कमाईचा एक दशांश होता. या प्रबळ स्थितीतून, फ्रेंच कॅथोलिक चर्च क्रांतीदरम्यान जवळजवळ नष्ट झाले होते. त्याचे पुजारी आणि नन्स बाहेर काढले गेले, त्याच्या नेत्यांना फाशी देण्यात आली किंवा निर्वासित केले गेले, त्याची मालमत्ता राज्याद्वारे नियंत्रित केली गेली आणि दशमांश रद्द केला गेला.

**नवीन विचारधारा उदयास आल्या:**

एखाद्या विचारसरणीची व्याख्या सामाजिक आणि राजकीय संघटनेच्या सर्वोत्तम स्वरूपाची शिकवण म्हणून केली जाऊ शकते. फ्रेंच राज्यक्रांतीने विचारधारांना जन्म दिला. खरे तर विचारधारा ही संज्ञा क्रांतीच्या काळात निर्माण झाली. फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी, लोक साधारणपणे शतकानुशतके अस्तित्वात असलेल्या सरकारच्या स्वरूपात राहत होते आणि बहुतेक ठिकाणी ते राजेशाही होते. तथापि, फ्रेंच राज्यक्रांतीनंतर कोणतेही सरकार औचित्यशिवाय कायदेशीर म्हणून स्वीकारले गेले नाही. प्रजासत्ताकांनी राजेशाहीची बाजू मांडणाऱ्यांना आव्हान दिले. रिपब्लिकनमध्येही, काहींनी उच्चभ्रूंनी निर्देशित केलेल्या सरकारची वकिली केली तर काहींनी अधिक लोकशाही संरचना पसंत केली. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे राष्ट्रवाद, उदारमतवाद, समाजवाद आणि शेवटी साम्यवाद यासह अनेक वैचारिक पर्याय निर्माण झाले.

**मूलगामी विचारसरणीचा आत्मा:**

उदारमतवाद हे स्वातंत्र्य आणि समानतेवर आधारित राजकीय आणि नैतिक तत्त्वज्ञान आहे. फ्रेंच राज्यक्रांतीदरम्यान, "स्वातंत्र्य, समानता, बंधुता" या घोषणेसह वंशपरंपरागत अभिजात वर्गाचा पाडाव करण्यात आला आणि सार्वत्रिक पुरुष मताधिकार देणारे फ्रान्स हे इतिहासातील पहिले राज्य बनले. क्रांतीदरम्यान उदारमतवादाचा विजय दर्शविणाऱ्या दोन महत्त्वाच्या घटना घडल्या. पहिला म्हणजे ४ ऑगस्ट १७८९ च्या रात्री फ्रान्समधील सरंजामशाही संपुष्टात आली आणि पारंपारिक अधिकार आणि विशेषाधिकारांचा नाश झाला. दुसरे ऑगस्ट १७८९ मध्ये मनुष्य आणि नागरिकांच्या हक्कांच्या घोषणापत्राचा होता. या घोषणापत्राला उदारमतवाद आणि मानवी हक्क या दोन्हींचा पायाभूत दस्तऐवज मानला जातो. फ्रेंच राज्यक्रांतीच्या यशामुळे, १९व्या शतकापर्यंत युरोप, दक्षिण अमेरिका आणि उत्तर अमेरिकेतील राष्ट्रांमध्ये उदारमतवादी सरकारे स्थापन झाली. अशा प्रकारे उदारमतवादात क्रांती हा एक निश्चित क्षण मानला जातो.

munotes.in

**राष्ट्रवादाचा उदय:**

राष्ट्रवाद ही एक विचारधारा आहे जी राष्ट्राप्रती निष्ठा, भक्ती किंवा निष्ठा यावर जोर देते आणि या जबाबदाऱ्यांना इतर वैयक्तिक किंवा समूह हितसंबंधांच्या वर ठेवते. फ्रेंच क्रांतीने आधुनिक राष्ट्र-राज्याच्या दिशेने चळवळ सुरू केली आणि संपूर्ण युरोपमध्ये राष्ट्रवादाच्या जन्मात महत्त्वाची भूमिका बजावली. नेपोलियन बोनापार्टच्या नेतृत्वाखाली फ्रेंच सैन्याने प्रदेश काबीज केल्यामुळे, राष्ट्रवादाची विचारधारा संपूर्ण युरोपमध्ये पसरली. क्रांतीने केवळ फ्रेंच राष्ट्रवादावरच प्रभाव टाकला नाही तर युरोपीयन विचारवंतांवर त्याचा खोल आणि दीर्घकाळ प्रभाव पडला. यामुळे, राष्ट्रीय मुक्तीसाठी संघर्ष हा १९व्या आणि २०व्या शतकातील युरोपीय आणि जागतिक राजकारणातील सर्वात महत्त्वाचा विषय बनला.

**इतर देशांतील क्रांतींना प्रभावित केले:**

१८१५ च्या शांततेनंतरच्या दशकांमध्ये, अनेक युरोपीय देश सामाजिक संघर्षांनी ग्रासले होते कारण त्यांच्या लोकसंख्येने त्यांच्या राज्यांच्या बहुधा निरंकुश शासकांविरुद्ध त्यांचे हक्क सांगण्याचा प्रयत्न केला. यामुळे क्रांती युग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या काळाची

सुरुवात झाली, ज्या काळात युरोप आणि अमेरिकेच्या अनेक भागांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण क्रांतिकारी चळवळी झाल्या. यामध्ये १७९८ च्या आयरिश बंडाचा समावेश होता; हैतीयन क्रांती; प्रथम इटालियन स्वातंत्र्य युद्ध; १८४८ ची सिसिलियन क्रांती; १८४८ च्या इटलीमधील क्रांती; आणि लॅटिन अमेरिकेतील स्पॅनिश आणि पोर्तुगीज वसाहतींच्या स्वातंत्र्य चळवळी.

**युरोपमधील आर्थिक वाढ:**

फ्रेंच राज्यक्रांतीचा शेजारील देशांवर खोलवर परिणाम झाला. १७९० च्या दशकात फ्रेंच क्रांतिकारी सैन्याने आणि नंतर नेपोलियनच्या नेतृत्वाखाली बेल्जियम, नेदरलँड, इटली, स्वित्झर्लंड आणि जर्मनीच्या काही भागांवर आक्रमण केले आणि त्यांचे नियंत्रण केले. या प्रदेशांवरील फ्रेंच आक्रमणामुळे खानदानी, धर्मगुरू, गिल्ड आणि शहरी कुलीन वर्गाचे संरक्षण करणारे कायदेशीर आणि आर्थिक अडथळे दूर झाले. त्याऐवजी कायद्यापुढे समानतेचे तत्त्व स्थापित केले गेले. अशाप्रकारे क्रांतीने आर्थिक बदलाला विरोध करणाऱ्या कुलीन वर्ग आणि अभिजात वर्गाची शक्ती नष्ट केली. पुराव्यांवरून असे सूचित होते की ज्या भागात फ्रेंच लोकांनी कब्जा केला होता आणि ज्यात मूलगामी संस्थात्मक सुधारणा झाल्या त्या भागात अधिक जलद शहरीकरण आणि आर्थिक वाढ झाली, विशेषत: १८५० नंतर. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात नवीन आर्थिक आणि औद्योगिक संधींच्या आगमनामुळे अधिक आर्थिक वाढ झाली.

## १.७ सारांश

सुरुवातीच्या काळात राजेशाही हा शासन संस्थेचा एकमेव पर्याय मानले जात असताना तत्कालीन समाजाची रचना, विषमता आर्थिक पिळवणूक अन्याय व्यवस्था इत्यादी कारणामुळे जनतेने राजेशाही विरुद्ध विचारवंतांच्या पाठिंब्याने उठाव केला हा उठाव सुरुवातीला संसदीय असला तरी राजाच्या वागणुकीमुळे हा हिंसक बनला परंतु राजाच्या असहकाराच्या धोरणामुळे या या क्रांतीने राजाचा अंत घडवून आणला. फ्रान्स मध्ये लोकांची सत्ता स्थापन झाली. या क्रांतीने युरोपच्या इतिहासात अमिट ठसा उमटवला.अनेक इतिहासकार आता फ्रेंच राज्यक्रांती हा युरोपच्या इतिहासाला कलाटणी देणारा बिंदू मानतात. 'स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता' या प्रसिद्ध घोषणेने प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य आणि समान वागणूक मिळण्याचा हक्क सांगितला. संपूर्ण फ्रान्स आणि उर्वरित युरोपमध्ये क्रांतीचे परिणाम खूप मोठे होते. राजेशाहीचा अस्त, मध्यमवर्गाच्या वाढीसह समाजात होणारे बदल, राष्ट्रवादाची वाढ यासह अनेक नवीन घडामोडी घडल्या.

## १.८ प्रश्न

१) १७८९ च्या क्रांतीच्या पूर्वसंध्येला फ्रान्समधील परिस्थिती स्पष्ट करा.

२) १७८९ च्या क्रांतीपूर्वी फ्रान्समधील राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचे परीक्षण करा.



munotes.in

३) फ्रान्समधील १७८९ च्या क्रांतीच्या उद्रेकास सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती किती जबाबदार होती?

४) फ्रेंच क्रांतीचा मार्ग आणि परिणाम स्पष्ट करा

## १.९ संदर्भ


- कॅमेरून एवान अर्ली मॉडर्न युरोप,ऑक्सफर्ड,२००१
- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५
- डॉ.सौ. वैद्य, सुमन, आधुनिक जग, नागपूर, २००२.
- प्रा. दीक्षित, नी.सी., पाश्चिमात्य जग, नागपूर, जून २००५.
- कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९.


*****

munotes.in

# २

# नेपोलियन

**घटक रचना**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ पार्श्वभुमी
२.३ सैन्यातील कारकीर्द
२.४ सत्तेकडे वाटचाल
२.५ नेपोलियनचे अंतर्गत धोरण
२.६ परराष्ट्रीय धोरण
२.७ नेपोलियनचा पराभव
२.८ सारांश
२.९ प्रश्न
२.१० संदर्भ

## २.० उद्दिष्टे

- फ्रेंच राज्यक्रांती नंतरच्या फ्रान्समधील राजकीय स्थितीचा आढावा घेणे.
- नेपोलियन च्या राजकीय उत्कर्षाचा अभ्यास करणे.
- नेपोलियनच्या अंतर्गत धोरणाचे टीकात्मक परीक्षण करणे.
- नेपोलियनचे परराष्ट्रीय धोरनाचा युरोपवरील प्रभावाचा अभ्यास करणे.

## २.१ प्रस्तावना

फ्रेंच राज्यक्रांतीच्या तत्वाचा प्रसार करण्याचे कार्य नेपोलियनने केले.नेपोलियनने संपूर्ण युरोपभर ठसा उमटवला. एक इंग्लंड सोडले असता जवळपास सर्व युरोपियन राष्ट्रांना त्याने पराभूत केले होते त्यासोबतच त्याने युरोपच्या नकाशाची पुनर्रचना केले त्याला रोखण्यासाठी युरोपच्या महासत्तांना संयुक्त आघाडी खोलावी लागली. नेपोलियन ने केलेल्या नकाशातील बदलांना थांबवण्यासाठी व्हिएन्ना परिषदेचा सहारा घ्यावा लागला. त्यासाठी संयुक्त यूरोपची स्थापना करने भाग पडले. नेपोलियनचा उदय क्रांती मुळे निर्माण झालेल्या परिस्थीती मुळे झाला असल्यामुळें त्याला क्रांतीचे अपत्य असेही म्हणतात. परंतु क्रांतीच्या मूलभूत तत्वाच्या विरोधी कार्य त्याने फ्रान्स मध्ये राजेशाही स्थापना करून केले.

## २.२ पार्श्वभुमी

फ्रान्सच्या जवळ असलेल्या कॉर्सिका बेटावरील आजॉक्सिओ या गावी १५ ऑगस्ट १७६९ रोजी नेपोलियनचा जन्म झाला. इटालियन वंशात त्याचा जन्म झाला असला तरी कॉर्सिका बेट फ्रान्सने जिंकल्याने तो फ्रेंच नागरिक बनला होता. वयाच्या दहाव्या वर्षी काही श्रीमंत नातेवाईकांच्या ओळखीने ब्रिएत्र येथील लष्करी शाळेत त्याला प्रवेश मिळाला. उमराव घराण्यातील असूनही वडीलांच्या मृत्यूनंतर नेपोलियनचे लहानपण अत्यंत गरीबीत गेले. ब्रिएन येथील शिक्षणानंतर तो पॅरीसच्या सैनिकी विद्यालयात दाखल झाला. त्याला वाचनाची आवड निर्माण होऊन पुस्तके हीच मित्र बनली. रुसो, व्हॉल्टेअर, तुर्गो, प्लेटो, यांचे ग्रंथ वाचून काढले. १६ व्या वर्षी त्याचा अभ्यासक्रम पूर्ण होताच त्याला तोफखान्यामध्ये सेकंड लेप्टनंट नोकरी मिळाली. नेपोलियन फ्रान्सला आला असता फ्रेंच राज्यक्क्रांती सुरू होती. नेपोलियनचा भाऊ रॉबेस्पियरचा मित्र असल्यामुळे त्याचा जॅकोबिन पक्षाशी संबंध येऊ लागला. क्रांतीकारी सैन्याने नेपोलियनची नेमणूक तोफ खान्यावर केली .१७९३ मध्ये त्याने ब्रिटनच्या नाविक सत्तेला हादरा दिल्याने त्याची बढती ब्रिगेडियर जनरल या हुद्द्यावर झाली. १७९४ मध्ये रॉबेस्पियरचे पतन झाल्याने त्याच्याशी असलेल्या संबंधावरून नेपोलियनला तुरुंगवास भोगावा लागला परंतु पुराव्याअभावी त्याची सुटका झाली. यानंतर फ्रान्समध्ये नॅशनल कन्व्हेन्शनचे राज्य सुरू झाले. कन्व्हेन्शनला फ्रान्सचे प्रश्न सोडवण्यात अपयश आल्याने जनतेने उठाव केला तेव्हा नेपोलियनने कन्व्हेन्शनचे संरक्षण केले. दहशतवादी राजवटीच्या समाप्तीनंतर डिरेक्टरी स्थापन करण्यात आली. याच काळात नेपोलियनने जोसेफाईन या विधवेशी विवाह केला. नेपोलियनला डिरेक्टरीने सेनापतीपद बहाल केले. एका बाजूला फ्रान्समधील डिरेक्टरीची सत्ता अप्रिय ठरत असताना नेपोलियन आपल्या सैन्यातील कर्तृत्वामुळे लोकप्रिय ठरू लागला. फ्रान्समधील अराजक डिरेक्टरी दूर करू शकत नव्हती अशा काळात नेपोलियनची लोकप्रियता वाढत होती. याचा फायदा घेऊन नेपोलियन फ्रान्स सत्ताधिश बनण्याची स्वप्ने पाहू लागला.

## २.३ सैन्यातील कारकीर्द

**इटली व ऑस्ट्रियावरील मोहीम :**

क्रांतीचा प्रसार इतर राष्ट्रात होऊ नये व फ्रांन्समधील राजेशाहीची पुनर्स्थापना या हेतूने फ्रान्सविरुद्ध युरोपीय राष्टाचा संघ स्थापन झाला. डिरेक्टरीने फ्रान्सची सूत्रे हाती घेतल्यानंतर परकीयांशी चालू असलेल्या युद्धांच्या बाबतीत आक्रमक धोरण स्वीकारले. आस्ट्रियावर तीन बाजूने हल्ले चढविण्याची योजना आखली. तिसऱ्या सैन्याच्या तुकडीचे नेतृत्व नेपोलियनकडे होते. ऑस्ट्रियाचा सेनापती आर्चड्यूक चार्ल्स याने फ्रेंच सैन्याशी जोरदार मुकाबला केला. या मोहिमेमध्ये नेपोलियनने संयुक्त सैन्यांना एकत्र येण्याअगोदरच त्यांना वेगवेगळे गाठले आणि त्यांचा पराभव केला यामुळे त्याच्या कर्तृत्वाची छाप फ्रान्सचा सैन्यावर पडली त्याची रणनीती ऑस्ट्रीया व संयुक्तं संघावर भारी पडली. इ.स. १७९६ ते १७९७ या काळात नेपोलियनने इटलीविरूद्ध मोहीम केली. सर्वप्रथम आपल्या सैन्यात आत्मविश्वास निर्माण करून शिस्त निर्माण केली. १५ मे १७९६ रोजी सार्डीनियाच्या राजाने नेपोलियढे शरणागती पत्करली. इटलीच्या पूर्व भागातील लोंबार्डी हा प्रदेश



munotes.in

आस्ट्रियाच्या ताब्यात होता, इटलीतील अनेक राज्ये आस्ट्रियाच्या दबावाखाली होती. इटलीतील ताबा मिळवण्यासाठी आस्ट्रियाला पराभूत करणे जरूरीचे होते. आम या नदीच्या तीरावर झालेल्या लढाईत नेपोलियनने जे धाडस दाखवले त्यामुळे तो फ्रेंच सैन्याच्या गळ्यातील ताईत बनला. नेपोलियनने आस्ट्रियाला शरणागती घेण्यास भाग पाडले. ही मोहीम सुरू असतांनाच इटलीमध्ये इतरत्रही नेपोलियनच्य हालचाली सुरू होत्या. नेपोलियनच्या पराक्रमामुळे इटलीतील लहान लहान सत्ताधीश त्यास शरण गेले. नेपोलियनने स्वत:च्या इच्छेप्रमाणे प्रादेशिक पुनर्रचना करण्यास आरंभ केला. इटलीच्या या मोहिमेत असा एकही भाग राहिला नाही की, जेथे नेपोलियनचा हात फिरला नाही. तेथील जुनी राजेशाही नष्ट करून नवीन प्रजासत्ता निर्माण केली. इटलीतील नेपोलियनच्या पराक्रमामुळे नमते घेऊन आस्ट्रियाने फ्रान्सशी शांततेचा तह केला. या मोहिमेने फ्रान्सचा दरारा वाढला. डिरेक्टरीच्या अनागोंदी कारभाराच्या पार्श्वभूमीवर नेपोलियन हा फ्रान्स च्या जनतेमध्ये लोकप्रिय ठरला. त्यामुळे इटलीतील विजयश्री संपादन करून तो पॅरिसला परत आलो तेव्हा त्याचे जोरदार स्वागत झाले. नेपोलियनशी जनतेतील लोकप्रियता बघून सभासदांनी त्याचे स्वागत तर केले परंतु तो फ्रान्समध्ये राहिलास डिरेक्टरीच्या सत्तेला धोका होईल हे लक्षात घेऊन त्यांनी नेपोलियन ची रवानगी इंग्लंड च्या मोहिमेवर केली.

**इंग्लंडला शह - इजिप्त:**

फ्रान्सविरुद्ध एकजूट केलेल्या राष्ट्रांपैकी इंग्लंड हेच अजून सामर्थ्यशाली आणि युद्धोत्सुक होते. इंग्लंडचे नाविक सामर्थ्य प्रथम दर्जाचे होते. फ्रान्सजवळ भूदलाची कमतरता नसली तरी नाविक दल दुय्यम दर्जाचे होते. त्यामुळे इंग्लंडवर स्वारी करणे शक्य नव्हते. नेपोलियनने इंग्लंडऐवजी इंग्लंडच्या पूर्वेकडील साम्राज्यालाच काट शह देण्याचा व्यूह रचला. इजिप्तवर स्वारी करून तेथे फ्रेंच सत्ता स्थापन झाल्यास, तुर्कीचे साम्राज्य नष्ट करता येईल, किंवा भारतावर फ्रेंचांचे वर्चस्व प्रत्थापित करता येईल अशा दुहेरी हेतूने नेपोलियनने ईजिप्तवरील स्वारीस हात घातला.पिरॅमिडच्या लढाईत नेपोलियनने विजय मिळवून कैरो जिंकले. स्थानिक इस्लामधर्मी यांची सहानुभूती त्याने मिळवली. ईजिप्तवरील नेपोलियनचे वर्चस्व स्थिर होऊ लागले. इतक्यात नाईलच्या लढाईत नेल्सन या इतिहासप्रसिद्ध दर्यासारंगाच्या आधिपत्याखाली इंग्रज आरमाराने नेपोलियनच्या आरमाराचा निर्णायक पराभव केला. आरमारी सामर्थ्य उच्ची झाल्यामुळे लष्करी पुरवठा अशक्य होणार हे धूर्त नेपोलियनच्या लगेच लक्षात आले. इंजिप्तची स्वारी अशी फसल्यामुळे त्याच्या विशाल महत्त्वाकांक्षेवर पाणी पडले. ईजिप्तची स्वारी चालू असताना फ्रान्सची अंतर्गत परिस्थिती आणखी खालावली होती. या सर्व परिस्थितीत फान्सला परतणे श्रेयस्कर असे नेपोलियनने ठरविले.

**डिरेक्टरीची अखेर:**

फ्रान्समध्ये डिरेक्टरीचा अंमल इ. स. १७९५-१७९९ पर्यंत टिकला. डिरेक्टरी कोलमडून पडण्यासाठी प्रमुख अशी कारणे घडली अंतर्गत परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती. लाचलुचपत, वशिलेबाजी इत्यादींना ऊत आला होता. या राजवटीमुळे राजनिष्ठांचे समाधान झाले नव्हते. क्रांतीकारकांनाही या राजवटीचा कंटाळा आला होता. नॅबूफच्या नेतृत्वाखाली जनतेने या राजवटीविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला, पण तो दडपण्यात आला. राज्याचा खजिना सतत युद्धांमुळे रिकामा पडला होता. अन्याय्य करवसुली पुन्हा जोरात

सुरु झाली. हळूहळू का होईना फान्सच्या राजकारणात सैन्याचे महत्व वाढले होते. दहा लाखांपेक्षा अधिक असलेल्या खड्या सैन्यामुळे सेनापतीच्या विचारांना आणि धोरणांना मान देण्याखेरीज डिरेक्टरीला गत्यंतर उरले नव्हते. फ्रान्सविरुद्ध परक्या राष्ट्रांची पुन्हा एकदा नवी एकजूट निर्माण झाली, इटलीतून फ्रान्सची हकालपट्टी करण्यात आली. डिरेक्टरीच्या सभासदांचे कर्तृत्व सामान्य व नेतृत्व पांगळे होते. कर्तबगार, आणि मुत्सद्दी अशा नव्या दमाच्या राष्ट्रनेत्याची गरज निर्माण झाली होती.

## २.४ सत्तेकडे वाटचाल

फ्रेंच जनतेच्या एकमुखी पाठिंब्यामुळे नेपोलियनने नोव्हेंबर १७९९ मध्ये डिरेक्टरीची राजवट उलथवून सत्ता हस्तगत केली. लष्कराच्या मदतीमुळे नेपोलियनचा हा प्रयत्न यशस्वी झाला. एका दृष्टीने फ्रेंच राज्यक्रांतीचे पहिले पर्व येथेच संपले. अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध प्राणपणाने लढून निर्माण केलेली लोकशाही नष्ट होऊन तेथे सैन्यबळावर प्रस्थापित झालेली नेपोलियनची व्यक्तिगत हुकूमशाही सुरू झाली. नेपोलियनने मात्र हा बदल घडवून आणताना अतिशय मुत्सद्देगिरी दाखविली. नेपोलियनने डिरेक्टरीच्या ऐवजी तीन कॉन्सल्सची राजवट सुरू केली. नेपोलियन स्वतः चीफ कॉन्सल झाला. त्याची नेमणूक सुरुवातीस दहा वर्षांसाठी करण्यात आली. पूर्वीचे लोकनियुक्त विधिमंडळ नष्ट करून त्या जागी नेपोलियनने नवे विधिमंडळ निर्माण केले. नेपोलियनने निवडलेल्या सभासदांचे सीनेट आणि सीनेटने नेमलेल्या सभासदांचे चेंबर असे हे द्विगृही विधिमंडळ होते. नव्या घटनेनुसार लष्कराची सर्व सत्ता नेपोलियनने स्वतःकडे घेतली. या घटनेला नेपोलियनने जनतेच्या सार्वमताचा पाठिंबा मिळविला. डिरेक्टरीच्या अधःप्रतित राज वटीला कंटाळलेल्या लोकांनी नेपोलियनसारख्या यशस्वी सेनापतीला आनंदाने सत्ता बहाल केली. यामागे आणखी एक कारण होते. इंग्लंड, ऑस्ट्रिया व रशिया ह्या परकीय राष्ट्रांनी फ्रान्सवर आक्रमण केले

इ.स. १७९९ च्या बंडामुळे फ्रान्समधील संचालक मंडळाची (डिरेक्टरी) इतिश्री झाली आणि त्याजागी तीन जणांचे कार्यकारी मंडळ (कौन्सिल) स्थापन झाले. नेपोलिनन, ॲबे सिएस व डनूकॉस हे तीन सदस्य होते. डिरेक्टरीचा पाडाव झाल्यानंतर एका महिन्याच्या आत घाईने नेपोलिनला अनुकूल अशी राज्यघटना बनविण्यात आली. ना घटनेनुसार सिनेटतर्फे तीन कॉन्सुल्सची निवड दहा वर्षांसाठी करण्यात नेणार होती. त्यापैकी एकाला फर्स्ट कॉन्सुल ना नात्याने सर्वाधिकार असणार होते. नेपोलिनन फर्स्ट कॉन्सुल बनला. त्याने अधिकार हाती आल्यानंतर ॲबेसिएस व ड्यूकॉसची हकालपट्टी केली आणि आपल्या मर्जीतले दोन कॉन्सुल्स नेमले. कायदा करण्याचा तसेच मुलकी व लष्करी अधिकारी नेमण्याचा अधिकार नेपोलिनला देण्यात आले. इ.स. १८०२ मध्ये नेपोलिनने जनमताचा कौल घेऊन फर्स्ट कॉन्सुल पद कायमस्वरुपी त्याच्याकडेच राहिल नाची तरतूद करुन घेतली. इ.स. १८०४ मध्ये नेपोलिनने लोकांच्याच संमतीने स्वतःला फ्रान्सचा सम्राट घोषित केले.

इ.स. १७९९ ते १८०४ ना काळात फर्स्ट कॉन्सुल तर इ.स.१८०४ ते १८१४ ना काळात सम्राट म्हणून नेपोलिनने फ्रान्सचा कारभार केला. नेपोलियनने फ्रान्समध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा घडवून आणल्या.

## २.५ नेपोलियनचे अंतर्गत धोरण

**कायद्याचे संहितिकरण (नेपोलियन कायदे संहिता):**

नेपोलियनने केलेल्या महत्त्वाच्या अनेक सुधारणांपैकी विधिनियमांचे संहितीकरण ही सुधारणा अग्रगण्य ठरेल. कॉन्सुलपदी आरूढ होताच नेपोलियन फ्रांसमधील वकिलांना पाचारण करून प्रदीर्थ व परिश्रमानंतर इ.स मध्ये सिव्हिल कोडची स्थापना केली. यात फार सुधारणा केल्यानंतर तिचा स्वीकार करण्यात आला. हीच ती नेपोली सुप्रसिद्ध लिखित संहिता होय. या सहितेद्वारे नेपोलियनने एक "सार्वजनिक कायदा पद्धती लागू केली जी अतिशय क्रमबद्ध आणि सुसंगत होती. त्यामुळे कोणत्याही सामान्य माणसाला कायद्याचा अभ्यास करणे व त्याचा अर्थ लावणे सुलभ झाले. यामुळे जसे कायद्याचे सुलभीकरण झाले तसेच न्यायदानातील दिरंगाई टाळण्यात आली. कायद्यासमोर सर्वांचा दर्जा समान ठेवण्यात आला. क्रांतीच्या समतेच्या तत्वाचे वा सहितेत पालन करण्याचा प्रयत्न करण्यात आला.. ही कायद्याची संहिता इतकी सुलभ व स्पष्ट होती की युरोपमधल्या अनेक देशांनी तिचे अनुकरण केले. या सहितेद्वारे सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता, वारसा हक्काबाबत समानता, गुलामी व जमीनदारी प्रथेचा अंत इ. गोष्टी स्वीकारण्यात आल्या. ही संहिता लागू केल्यानंतर फ्रांसमधील स्त्रियांची स्थिती अधिकच खालावली असली व काही कठोर शिक्षा कायम करण्यात आल्या असल्या तरी या संहितेमुळे नेपोलियनला दिगंत कीर्ती लाभली आणि फ्रांसचाही लक्षणीय फायदा झाला. आजही फ्रांसमधील न्यायालयीन व्यवस्थेचा आधार हीच संहिता आहे.

**शैक्षणिक धोरण:**

प्रत्येक विभागात राष्ट्रीय प्राथमिक विद्यालये स्थापन करण्यात येऊन. ही जबाबदारी राज्यपाल, नायब राज्यपाल आणि मेयर यांच्यावर सोपविण्यात आली. ग्रामर स्कूल्स स्थापण्यात येऊन त्यात फ्रेंच भाषा, लॅटिन व प्राथमिक विज्ञान हे विषय अनिवार्य करण्यात आले. मोठ्या शहरात हायस्कूल्स स्थापण्यात येऊन सरकारद्वारे शिक्षक नेमण्यात आले.तांत्रिक शिक्षण व सैनिकी शिक्षण देणाऱ्या शाळा स्थापन करण्यात येऊन त्यांचे व्यवस्थापन सार्वजनिक संस्थांकडे सोपविण्यात आले. एका विश्वविद्यालयाची स्थापना करण्यात आली. ज्यातील पदाधिकाऱ्यांची नेमणूक प्रधान कॉन्सुल करीत असे. फ्रांसमध्ये कोणतेही विद्यालय सुरू करावयाचे असल्यास या विश्वविद्यालयाची संमती आवश्यक असे. पॅरिसमध्ये नॉर्मल स्कूलची स्थापना करण्यात आली. ही शाळा फ्रांसमधील सर्व खाजगी शाळातील शिक्षकांची नियुक्ती करीत असे. सर्व शाळामधून राज्याच्या प्रमुखाप्रति निष्ठा बाळगण्यावर भर दिला जाई. या सर्व शाळा चालविण्यासाठी प्रचंड धनाची आवश्यकता असे. त्या धनाच्या अभावी अनेक खाजगी शाळा चालविण्याची चर्चला परवानगी देण्यात आली.

**पॅरिसचे सौंदर्यीकरण:**

नेपोलियन हा हाडाचा सैनिक असला तरी रसिक होता. त्याची सौंदर्यदृष्टशं विलक्षण होती. बेकारांना काम देण्यासाठी त्याने पॅरिसच्या सौंदर्यीकरणाची योजना आखली आणि एका दगडात दोन पक्षी मारले. या योजनेअंतर्गत पॅरिसमध्ये प्रशस्त राजमार्ग बांधण्यात येऊन

त्यांच्या दोन्ही बाजूंना सावलीसाठी वृक्षांच्या रांगा लावण्यात आल्या. पॅरिसमधील लुव्हेर (Louver) वस्तुसंग्रहालयात रोम, इटली, स्पेन, बेल्जियम इ. देशातील अत्यंत दुर्मिळ वस्तूंचा संग्रह करण्यात आला. व्हर्सायचा राजवाडा म्हणजे जणू पृथ्वीवरील स्वर्गच होता. याच राजवाड्याच्या धर्तीवर रॅम्ब्युलेट, फाऊन्टनब्ल्यू, सेंट क्लाऊड या राजवाड्यांना सजविण्यात आले. त्याच्या या कार्यामुळे त्याच्याप्रति जनतेच्या मनातील श्रद्धा व आदर कित्येक पट वाढला.

**समतेचा पुरस्कार:**

नेपोलियनने सामाजिक विषमता निर्माण करणाऱ्या सर्व संस्था नष्ट करून सामाजिक समतेची स्थापना केली. नवनिर्मित समाजात सर्वांना समान अधिकार होते. नेपोलियन स्वतः मध्यम वर्गातील असूनही सर्वोच्च पदावर विराजमान होता. त्यामुळे उच्चपदे जन्माधिष्ठित नसून गुणाधिष्ठित आहेत ही गोष्ट सिद्ध झाली. क्रांतीकाळात फ्रांसमधून पलायन केलेल्या ४० हजार लोकांना फ्रांसमध्ये परत येण्याची व स्वतंत्र जीवन जगण्याची संधी देण्यात आली. नेपोलियन स्वतः कोणत्याही विशिष्ट राजकीय विचारांचा नसल्याने सर्वच राजकीय पक्षांप्रति त्याने पक्षपात विरोधी धोरण स्वीकारले व केवळ गुणवत्ता हाच एकमेव निकष मान्य करून गुणवंतांना प्रशासकीय सेवेतील संधी उपलब्ध करून दिल्या.

**सार्वजनिक बांधकामे:**

सतत चालू असणाऱ्या लढायांच्या दगदगीतून फ्रान्सचे वैभव वाढवण्याचा नेपोलियनने आटोकाट प्रयत्न केला. नगररचना आणि नगरसौंदर्य ह्या योजनांना त्याच्या काळात सुरुवात झाली. सार्वजनिक बांधकामांवर नेपोलियनने प्रचंड प्रमाणावर पैसा खर्च केला. यामुळे आर्थिक सुस्थिती निर्माण होण्यास मदत झाली. साऱ्या जगात आपल्या सौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेले पॅरिस शहर, तेथील भव्य रस्ते, मनोहर उद्याने, पुतळे ह्या सर्व गोष्टी नेपोलियनच्या सौंदर्यपूजक वृत्तीचे पुरावे आहेत. युद्धाच्या ने-आण तातडीने करता यावी यासाठी त्याने साऱ्या फ्रान्समध्ये उत्कृष्ट निर्माण केले. बेल्जियम, जर्मनी, इटली, स्वित्झर्लंड ह्या फ्रान्सच्या शेजारी राष्ट्रांना जाणारे राजमार्ग बनविण्यात आले. महत्त्वाच्या ठिकाणी पूल बांधण्यात येऊन वाहतुकीची व्यवस्था वाढविण्यात आणि पॅरिसमधील स्टॉक एक्स्चेंज आणि मॅडेलीनचे चर्च ह्या प्राचीन स्थापत्यशास्त्राप्रमाणे बांधलेल्या कलात्मक इमारती नेपोलियनच्याच योजनांचे फळ आहे.

**बेकारीनिवारण:**

कारागिरांसाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली.नेपोलियनने फ्रान्समध्ये कोणीही बेकार राहू नये यासाठी सतत खटपट केली. (चांभारांना काम देण्यासाठी दररोज पाचशे बुटांचे जोड तयार करण्याची आज्ञा त्याने दिली होती.) त्याप्रमाणे इतर कारागिरांच्या बेकारीबद्दल त्याने वेळोवेळी सूचना दिलेल्या आढळतात. चित्रकार, मूर्तिकार, संगीत-रचनाकार, गायक, स्थापत्यशास्त्रज्ञ इत्यादी विविध क्षेत्रांतील सर्वश्रेष्ठ अशा प्रत्येकी दहा व्यक्तींची यादी करण्यात यावी व त्यांना सरकारी आश्रय मिळावा असे त्याने फर्मावले.

**स्थानिक स्वराज्य:**

प्राचीन राजवट आणि क्रान्तीकारी फ्रान्स ह्या दोन्हींच्या अनुभवांच्या आधारे नेपोलियनने फ्रान्समधील स्थानिक स्वराज्य संस्थांची पुनर्घटना केली. तो सत्तेच्या केंद्री करणाचा पुरस्कर्ता असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभारदेखील सम्राट नियुक्त अधिकाऱ्यांच्या हाती सोपविण्यात आला. त्याने केलेली ही सुधारणा आजही कान्सच्या स्थानिक स्वराज्य संस्थांत टिकलेली दिसून येते.

**आर्थिक धोरण:**

फ्रांसच्या विशाल सेनेवर अवाढव्य खर्च होत असे. हा खर्च त्याने पराभूत राष्ट्रांकडून वसूल करण्याचे धोरण आखले. अंतर्गत कलह आणि परकीयांशी झालेल्या युद्धामुळे फ्रांसमधील उद्योगधंद्यांनी मान टाकली होती. संचालक मंडळाच्या कार्यकाळात तर फ्रांस आर्थिक दलदलीत गळ्यापर्यंत रूतला होता, नेपोलियनने राष्ट्रीय कर्ज फेडण्यासाठी स्वतंत्र कोष उभारला. जुन्या ऋणपत्रांच्या (Govt. Securities) जागी नवीन ऋणपत्र दिले. देशांच्या उत्पन्नात भर पडावी म्हणून उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्यात आले. दलदलीच्या प्रदेशाला कोरडे करून तेथे शेतीला प्रोत्साहन दिले. शेतीला पाणीपुरवठा व्हावा म्हणून संपूर्ण देशात कालवे व पाटबंधाऱ्यांचेजाळे पसरविण्यात आले. जुन्या बंदरांचा विस्तार आणि नवीन बंदरांची निर्मिती करून त्यांना व्यापारी जहाजांचे केंद्र बनविले. फ्रासचा व्यापार वाढावा म्हणून आयात मालावर भरमसाट कर लावण्यात आले. या सर्व सुधारणांमुळे पोटे खपाटी गेलेल्या फ्रेंच जनतेच्या चेहऱ्यावर झळाळी आली. देशाच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होऊन देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली.

**धर्माबाबत सामोपचाराचे धोरण:**

फ्रांसची बहुसंख्य प्रजा ही कॅथॉलिक पंथाची होती. नेपोलियनच्या पूर्वी शासन व कॅथॉलिक यांच्यातील मतभेद विकोपाला गेले होते. क्रांतीकारकांनी धर्मविरोधी धोरणाचा स्वीकार करून कॅथॉलिक पंथियांचा अतोनात छळ केला होता. हजारो धर्मगुरुना पदच्युत करून पोपशी संबंध तोडण्यात आले होते. या परिस्थितीत बदल करून नेपोलियन कॅथॉलिकांचा पाठिंबा मिळवू इच्छित होता.यासाठी त्याने सामोपचाराचे धोरण आखले. इ. स. १८०१ मध्ये नेपोलियनने पोप सातवा याच्याबरोबर एक करार केला.ज्यानुसार क्रांतीकारकांनी फ्रांसमधील कॅथॉलिकांच्या जप्त केलेल्या भूमिवरील स्वतःचा अधिकार पोपने सोडला व मोबदल्यात नेपोलियनने कॅथॉलिक धर्माला राज्यधर्माचा दर्जा दिला. पोपच्या अधिकारांना सीमित करण्यात आले. पादऱ्याची वानावे सरकारकडून पोपकडे संमतीसाठी पाठविण्यात येऊ त्यांना फ्रांसच्या घटनेप्रति एकनिष्ठ राहण्याची शपथ घ्यावी लागत असे. सरकार तिजोरीतून त्यांना पगार देण्याची व्यवस्था करण्यात आली.क्रांतीकाळात जप्त करण्यात आलेल्या जमीन व मालमत्तेचा काही भाग पादऱ्यांना परत करण्याचे नेपोलियनने आश्वासन दिले. फ्रांस सोडून गेलेल्या पादऱ्यांना फ्रांसमध्ये परत येण्यास परवानगी देण्यात आली. धार्मिक स्वातंत्र्याच्या धोरणाचा अंगीकार करण्यात येऊन प्रत्येकाला त्याच्या धर्माच्या संपूर्ण पालनाची मुभा देण्यात आली. क्रांतीकाळातील कॅलेंडर रद्द करण्यात येऊन जुन्या कॅलेंडरचा पुनः स्वीकार करण्यात आला. १४ जुलै आणि २२ सप्टेंबर हे प्रजासत्ताकाच्या स्थापनेचे दोन दिवस सोडून इतर सुट्टया रद्द करण्यात आल्या.वरील धार्मिक सुधारणांमुळे

नेपोलियनच्या समर्थकांची संख्या वाढली परंतु एक गोष्ट निश्चित आणि ती म्हणजे क्रांतीपूर्वकाळात धार्मिक क्षेत्रात असलेले अधिकार चर्चला पुन्हा प्राप्त होऊ शकले नाहीत. या सुधारणांमुळे चर्चची जागा राज्याने घेऊन धर्म हा राज्याच्या नियंत्रणाखाली आला.

## २.६ नेपोलियनचे परराष्ट्रीय धोरण

नेपोलियन बोनापार्ट हा अत्यंत महत्वकांक्षी होता. सम्राट बनल्यानंतर तर संपूर्ण युरोपचा स्वामी बनण्याची स्वप्न तो पाहू लागला. इ.स. १८०४ से १८९५ या काळात त्याने अनेक युद्धे केली, त्याचे परराष्ट्रीय धोरण है शांततेचे नसून आक्रमकतेचे होते हे पुढील घटनांवरून दिसून येते,

इजिप्त मोहीमेत असताना फ्रान्स विरुद्ध युरोपातील राष्ट्रांनी संघ स्थापन केला होता यात इंग्लंड, रशिया, आस्ट्रिया, प्रशिया, तुर्कस्थान, नेपल्स, पोर्तुगाल यांचा समावेश होता. सत्तेवर आल्यानंतर नेपोलियन या संघाविरद्ध मुत्सद्दीपणे आघाडी उघडली. सर्वप्रथम त्याने हा संघ तोडण्याचा प्रयत्न केला. यात त्याला यश येऊन रशियाला त्याने या संघाबाहेर काढले. त्यानंतर त्याने आस्ट्रीया विरुद्ध दोन बाजूने हल्ला केला.यात त्याला मोठ्या प्रमाणावर यश मिळाले व आस्ट्रियाचा पराभव झाला. यानंतर इंग्लंडविरुद्ध युद्ध सुरूच राहिले परंतु काही भागात फ्रान्स तर काही ठिकाणी इंग्लंडची सरशी होत होती .त्यामुळे त्यांनी अमिन्सचा तह केला. यामुळे नेपोलियनला अंतर्गत सुधारणा करण्यास वेळ मिळाला.

**इंग्लंडविरूद्धच्या संघर्षास सुरुवात:**

इ.स. १८०२ मध्ये इंग्लंड व फ्रान्स यांच्यात शांततेचा तह झाला होता. परंतु एक वर्षातच उभयतातील संबंध लागले. फ्रान्सच्या नौका हॉलंडच्या किनाऱ्यावर प्रभुत्व गाजवू लागल्या तसेच ब्रिटीश मालाची फ्रान्सकडून नाके बंदी होऊ लागली. ब्रिटनवर स्वारी करण्याचे नेपोलियनचे विचार लपून राहिले नाहीत. इजिप्त व भारतातील टिपू सुलतान सारख्या सत्ताधिशांशी ब्रिटीशविरोधी कारवाया करण्याच्या दृष्टीने त्याने संधाने बांधण्यास सुरवात केली. इंग्लीश खाडीत व भूमध्य समुद्रात फ्रेंच आरमाराच्या हालचाली सुरू झाल्या. नेपोलियनने १८०२ च्या अमीन्सच्या तहाचा भंग केला आहे असे जाहीर करून इंग्लंडने १६ मे १८०३ रोजी युद्ध पुकारले, नेपोलियनच्या महत्वाकांक्षेमुळे युरोपमधील सर्वच राज्याचे स्वातंत्र्य धोक्यात आले होते त्यामुळे ब्रिटनने मित्रसंघ स्थापन करण्याची हालचाल सुरू करताच त्यास रशियाने प्रतिसाद दिला. याआधीही दोनवेळा युरोपियन राष्ट्रांचे मित्रसंघ स्थापन झाले होते पण ते नेपोलियनला रोखू शकले नाही. आता १८०५ मध्ये तिसरा मित्रसंघ स्थापन झाला

**आस्ट्रिया व प्रशियाविरूद्ध कारवाई:**

तिसऱ्या मित्र संघातील इंग्लंडशी सागरी मुकाबला करण्याची नेपोलियनची तयारी नव्हती. रशियाचा प्रदेशही दूर होता म्हणून रशियाची मदत येण्यापूर्वीच अत्यंत त्वरेने तो आस्ट्रियावर चालून गेला. २० ऑक्टोबर, १८०५ रोजी आस्ट्रियाच्या सेनापतीने पूर्ण शरणागती पत्करली. २ डिसेंबर १८०५ रोजी ऑष्ट्रीय व रशिया यांच्या संयुक्त सैन्याशी झालेल्या लढाईतही नेपोलियनचा विजय झाला. आस्ट्रिया व प्रशिया यांना शह देण्यासाठी

१२ जुलै १८०६ रोजी नेपोलियनने ऱ्हाईनचा राज्यसंघ बनवला. ऱ्हाईन नदीच्या पूर्व किनाऱ्यावरील ६० लहान-लहान जर्मन संस्थानांचा या संघात समावेश केला व स्वतःला ऱ्हाईन राज्यसंघाचा संरक्षक म्हणून जाहीर केले व पवित्र रोमन साम्राज्य नष्ट झाल्याची घोषणा केली. मध्य युरोपमध्ये नेपोलियनचे वर्चस्व प्रस्थापित झाले. नेपोलियनने ऱ्हाईनचा राज्यसंघ निर्माण केल्यानंतर प्रशियाचा राजा तिसरा फ्रेडरिक विल्यम फारच अस्वस्थ झाला. इंग्लंडच्या तिसऱ्या मित्रसंघात प्रशिया नसला तरी नेपोलियनच्याविरूद्ध या मित्रसंघात सामील होण्याचा विचार प्रशिया करू लागला. दरबारातील युद्धखोर गटाच्या भरीस पडून प्रशियाच्या राजाने फ्रेंच सैन्य ऱ्हाईन नदीच्या पश्चिमेकडे न्यावे असा निर्वाणीचा खलीता फ्रान्सला पाठवला. नेपोलियनला हे आयतेच निमित्त मिळाले. व त्याने २५ ऑक्टोबर १८०६ रोजी बर्लिन शहरात फौजा घुसवल्या, प्रशियाला रशियाने मदतीचे आश्वासन दिले असल्याने प्रशियाने लगेच शरणागती स्वीकारली नाही.

**रशियावर आक्रमण:**

प्रशियाला रशियाने मदत करू नये म्हणून नेपोलियनने १८०७ मध्ये रशियाच्या दिशेने आक्रमण केले. फ्रिडलँड येथे रशियन सैन्य व फ्रेंच सैन्यात लढाया झाल्या. यावेळी रशियन सैनिक अत्यंत शौर्याने व चिवटपणारे लढले. जून १८०७ मध्ये फ्रिडलँडच्या लढाईत रशियाचा पराभव झाला त्यामुळे रशियाचा सम्राट झारने समझोत्याची भूमिका घेतली. उभय देशांमध्ये टिलसिट येथे तह झाला. या तहाने पश्चिम युरोप, इटली, जर्मनी या भागातील नेपोलियनच्या साम्राज्यास रशियाने मान्यता दिली, प्रशियाचे राज्य पूर्ण नष्ट करू नये, इंग्लंडविरूद्ध रशियाने मदत करावी या महत्त्वाच्या अटी होत्या. इतरही काही गुप्त करार झार व नेपोलियनमध्ये झाले. या तहाने नेपोलियनचे साम्राज्य शिखरावर पोहोचले.

**साम्राज्यविस्तार:**

१८०५ ते १८०७ या अल्पकाळात नेपोलियनने युरोपातील अनेक सत्तांना नमवले. फ्रान्सच्या मूळ राज्यात आस्ट्रियन नेदर्लंडस्, सेव्हॉय, नाईस, जिनोआ, डालमाशिया, क्रोशिया यांची भर पडली. फ्रान्सच्या ताब्यातील राज्याचे फ्रान्सच्या सीमेवर कडे निर्माण झाले. दक्षिणेच्या बाजूस स्पेन हे मित्रराष्ट्र व पूर्व सीमेवर ऱ्हाईनचा राज्यसंघ होता. हाईन राज्यसंघाचा नेपोलियन स्वतः संरक्षक होता. तो इटलीचाही राजा होता. हॉलंड, नेपल्स, वेस्टफालिया येथे त्यांचे भाऊ आणि ग्रैंड डची ऑफ वॉर्सा येथे मित्र राज्यावर होता. जर्मनीतील बादेन, बव्हेरिया, बुर्टेम्बर्ग सॅक्सनी यांना राज्याचा दर्जा नेपोलियनने दिला. डेन्मार्क, स्वीडन, आस्ट्रिया व प्रशिया यांना फ्रान्सचे मित्र बनणे भाग पडले होते, रशियाशीही मित्रत्वाचा तह झाला. संपूर्ण युरोप नेपोलियनपुढे झुकलेला असताना इंग्लंड मात्र नमले नव्हते.

**इंग्लंड विरुद्ध नाकेबंदीची योजना:**

इंग्लंडला पराभूत करण्याची नेपोलियनला घाई लागली होती. इंग्लंडच्या बलशाली आरमारामुळे ते शक्य नव्हते. म्हणूनच इंग्लंडची आर्थिक कोंडी करून त्यास नामोहरम करण्याचा त्याने निर्णय घेतला. २५ ऑक्टोबर १८०६ रोजी आपल्या वर्चस्वाखालील

प्रदेशाला उद्देशून त्याने एक जाहीरनामा काढला. त्यालाच कॉंटिनेंटल सिस्टीम असे म्हणतात. आर्थिक कोंडीच्या या योजनेत पुढील आदेश होते.

अ) फ्रान्स व फ्रान्सची मित्रराष्ट्र यांनी ब्रिटनशी किंवा ब्रिटनच्या वसाहतींशी व्यापार करू नये.

ब) ब्रिटन व ब्रिटीश वसाहती यांच्या गलबतांना फ्रान्समधील व फ्रान्सच्या मित्रराष्ट्रामधील बंदरे बंद करावीत.

क) जेथे जेथे ब्रिटीश माल किंवा ब्रिटीश जहाजे आढळतील तेथे त्यांचा नाश करावा. नेपोलियनच्या या आदेशांना प्रत्युत्तर म्हणून इंग्लंडनेही ऑर्डर्स-इन-कौन्सील हे आदेश जारी केले. फ्रान्स व फ्रान्सची मित्रराष्ट्र यांच्याकडून मित्र माल खरेदी करणार नाही, त्यांच्या जहाजांना कोणत्याही बंदरांमधून बाहेर पडू देणार नाही व तटस्थ राष्ट्राच्या जहाजांना युरोपच्या बंदरामध्ये जाऊ देणार नाही असे ब्रिटनने जाहीर केले. युरोपियन राष्ट्रांची प्रतिक्रिया फ्रान्स व ब्रिटन यांच्या परस्परांविरोधी जाहीरनाम्यांचा युरोपिय राष्ट्रांना अधिक त्रास झाला. ब्रिटनच्या व्यापाराचे नुकसान होत असले तरी जगभर त्यांची व्यापारी जहाजे फिरत होती. त्यांनी युरोपबाहेरील व्यापार चालू ठेवून परिस्थितीला निकराने तोंड दिले. युरोपीय राष्ट्रांना गरजेच्या अनेक वस्तू ब्रिटीश व्यापाऱ्यांमार्फत मिळत असत. राजकीय दडपणामुळे नेपोलियनचे आदेश काही काळ मानले गेले तरी आर्थिक कोंडीचे फटके सर्वसामान्य माणसाना लागले, उद्योगधंदे खालावले, व्यापार बसू लागला .त्यामुळे नेपोलियनच्या कॉटीनेन्टल सिस्टीमविरूद्ध प्रतिक्रिया व्यास सुरुवात होऊ लागली. त्यातून युरोपमध्ये अनेक लढाया झाल्या. पोर्तुगालने नेपोलियनचे आदेश मानण्यास नकार दिला, पोर्तुगालचा किनारा हा चोरट्या व्यापाराचे प्रमुख केंद्र बनला. हॉलंड हे व्यापारावर जगणारे राष्ट्र कॉन्टीनेटल सिस्टीम हॉलंडला स्वीकारणे अशक्य आहे असे सांगणाऱ्या हॉलंडचा राजा लुईला नेपोलियनने पदच्यूत केले.

**पोपशी संघर्ष:**

नेपोलियनने पोपबराबेर इ. स. १८०२ मध्ये करार केला. पण तो इ. स. १८०६ पर्यंत टिकला. इ. स. १८०४ मध्ये राज्याभिषेकावेळी आशीर्वाद घेतला. पण व्यापारी बहिष्कार योजनेला सहकार्य न देता पोप तटस्थ राहिला. त्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण झाला. नेपोलियनने पोपच्या राज्याचा भाग जिंकून घेतल्याने इ. स. १८०५ मध्ये पोपने नेपोलियनला धर्मबहिष्कृत केले. त्यामुळे नेपोलियनने पोपला तुरुंगात टाकले. या घटनेमुळे सर्व कॅथालिक लोकांच्या भावना दुखावल्या. त्यातून नेपोलियनविरुद्ध पवित्र युद्ध पुकारले. परिणामी कोणतेही सहकार्य न करता कॅथॉलिक राष्ट्रे नेपोलियनला धडा शिकवण्यास तयार झाले.

**पोर्तुगालशी युद्ध:**

नेपोलियनच्या व्यापारी बहिष्कार योजनेला पोर्तुगालने सहकार्य केले नाही. कारण पोर्तुगाल आर्थिकदृष्ट्या इंग्लंडवर अवलंबून असून त्याच्याशी व्यापाराशिवाय पर्याय नाही. व्यापार बहिष्कार पोर्तुगालवर लादण्यातून हे युद्ध उद्भवले. या युद्धाच्या वेळी नेपोलियनने स्पेनचे

सहकार्य मिळवले. नेपोलियनने आपला सेनापती ज्यूनॉट याच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठवले. फ्रेंच-स्पेन यांच्या संयुक्त फौजांपुढे टिकाव न लागल्याने पोर्तुगालचा राजा ब्राझीलला पळून गेला. या वेळी इंग्लंडने पोर्तुगालच्या मदतीसाठी आपला सेनापती सर ऑर्थर वेलस्लीच्या नेतृत्वाखाली सैन्य पाठवले. या सैन्याने फ्रेंच सैन्याचा व्हिमोरो, हेलेव्हेरा, व्हिमिटो इ. ठिकाणी पराभव केला.

**स्पेनविरुद्ध युद्ध:**

नेपोलियनने पोर्तुगालच्या युद्धाच्या वेळी स्पेनची मदत घेतली, पण पोर्तुगालचा पराभव होताच स्पेनविरुद्ध युद्ध पुकारले. दोघांत झालेले युद्ध त्याला द्वीपकल्पिय युद्ध असे इतिहासात म्हणतात. व्यापारी बहिष्कार योजना नीट अंमलात आणण्यासाठी स्पेनच्या राजा चार्ल्स चौथा याला फ्रान्समध्ये बोलवून कैद केले. स्पेन राजाने नेपोलियनला पोर्तुगाल युद्धात मदत केली व स्पेनमध्ये फ्रान्स सैन्य ठेवण्यास परवानगी दिली. त्यामुळे स्पॅनिश जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला.याचा नेपोलियनने फायदा घेऊन मुरबोन घराण्यातील चार्ल्स चौथा, पत्नी, मुलगा फर्डिनंड यांना भेटीस बोलवून बायोन या शहरात कैद केले. त्याच्या जागी स्पॅनिश गादीवर आपला भाऊ जोसेफ याला राजा म्हणून बसवले. यापूर्वी तो नेपल्सचा राजा होता. त्याच्या जागी आपला मेहुणा म्युगट याला गादीवर बसवले. हा अन्यायी जुलमी असल्याने स्पॅनिश जनतेने नेपोलियन विरुद्ध स्वातंत्र्ययुद्ध इ. स. १८०७ मध्ये पुकारले. त्यांच्या जुलै १८०४ मध्ये बेलेनची लढाई झाली. या लढाईत २ हजार फ्रेंच सैन्याचा पराभव झाला. जोसेफविरुद्ध सर्व स्पेनमध्ये बंड होऊन जोसेफचा पराभव झाला. हे नेपोलियनला कळताच २ लाख सैन्य घेऊन गेला. त्याने माद्रिद शहर डिसेंबर १८०८ मध्ये जिंकले. नेपोलियन फ्रान्समध्ये नाही हे पाहून ऑस्ट्रियाने फ्रान्सविरुद्ध युद्ध पुकारले. त्यामुळे स्पॅनिश मोहीम अर्धवट सोडून नेपोलियन पुन्हा फ्रान्समध्ये आला., स्पेनला मदत करण्यासाठी इंग्लंडही पुढाकार घेतला. ऑर्थर वेलस्लीच्या नेतृत्वाखाली ब्रिटीश सेनेने १९ जुलै १८०८ रोजी फ्रेंच सेनेचा दणदणीत पराभव केला. नेपोलियनच्या सेनेचा हा पहिला पराभव होता. याच काळात मध्य युरोपमध्ये ठिकठिकाणी उठाव होऊ लागल्याने नेपोलियन तेथील लढायात गुंतून पडला.

**आस्ट्रियाचा पराभव:**

नेपोलियनला स्पेनमध्ये माघार घ्यावी लागत आहे व जर्मन लोकही राष्ट्रीयत्वाच्या भावनेने पेटलेले आहेत हे पाहून आस्ट्रियाने १८०९ मध्ये नेपोलियनविरूद्ध युद्ध पुकारले परंतु नेपोलियनने स्वतः सूत्रे हाती घेऊन आस्ट्रियाचा पराभव केला. व्हिएन्नाचा तह होऊन आस्ट्रियावर जबरदस्त खंडणी आकारण्यात आली, त्यांच्या सैन्यात कपात केली तसेच नेपोलियनने आस्ट्रियाची राजकन्या मेरी लुइसी हिच्याशी विवाह केला

**रशियावरील अयशस्वी मोहीम:**

रशियाचा झार व फ्रान्सचा नेपोलियन यांच्यातही कॉंटिनेन्टलं सिस्टीममुळे वितुष्ट आले. कारण या सिस्टीममुळे रशियावर आर्थिक संकटे येऊ लागली. झारने नेपोलियनला प्रत्यक्ष विरोध केला नाही. परंतु ब्रिटनशी गुप्तपणे व्यापार चालू ठेवला. झार व नेपोलियन यांच्यातील तेढ विकोपास गेली. नेपोलियनने सहा लाख सेना घेऊन १८९१ मध्ये

रशियावर आक्रमण केले. रशियन सेनेने फ्रेंच सैन्याच्या वाटेवरील प्रदेश उध्वस्त केल्याने फ्रेंच सैन्याचे अन्न-पाण्याविना हाल झाले. मास्कोजवळ तुंबळ युद्ध होऊन १५ सप्टेंबर १८१२ रोजी विजयी नेपोलियन मास्कोत शिरला.रशियाने मात्र तह न करता छुपे युद्ध सुरू ठेवले, रशियन जनतेने अनेक ठिकाणी आगी लावल्या. नाईलाजाने नेपोलियन माघारी फिरला परंतु फ्रान्सपर्यंत येता येता उध्वस्त झालेला प्रदेश, प्रचंड बर्फाळ प्रदेश यामुळे अनेक फ्रेंच सैनिक मृत्यू पावले, अनेकांना अंधत्व आले, काहींनी आत्महत्या केल्या. १८ डिसेंबर १८९२ रोजी नेपोलियन पॅरीसला पोहोचला. या मोहिमेत नेपोलीयनचे मोठे नुकसान झाले

## २.७ नेपोलियनचा पराभव

इंग्लंडच्या पंतप्रधान लॉर्ड लिव्हरपुल याने युरोपीय राष्ट्रांमध्ये नेपोलियनविरुद्ध एकोपा निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्यातून इंग्लंड, रशिया, प्रशिया व स्वीडन त्यानंतर आस्ट्रिया यांचा चतुर्थ मित्रसंघ तयार झाला. मार्च १८९३ मध्ये प्रशियाच्या राजाने नेपोलियनविरूद्ध युद्ध पुकारले. रशिया व प्रशिया यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला. त्यानंतर आस्ट्रियाचाही पराभव केला. नेपोलियनने जिंकलेली ही शेवटची लढाई होय. त्याच्या सैन्यात पूर्वीचा जोम उरला नव्हता. त्याने फ्रान्सच्या दिशेने माघार घ्यावयास सुरूवात केली. १६ ऑक्टोबर १८९३ पासून तीन दिवस लिपझिक येथे मित्रसंघाच्या संयुक्त सेनेशी नेपोलियनचे युद्ध झाले या लढाईत त्याचा पूर्ण पराभव झाला. यानंतर नेपोलियनच्या साम्राज्याचा डोलारा एकदम कोसळला त्याची कॉटिनेन्टल सिस्टीम नष्ट होत गेली

**नेपोलियनचा सत्तात्याग व शेवट:**

फ्रान्समध्ये युरोपियन राष्ट्रांनी पुन्हा बुरबाँ घराण्याची राजवट लादल्यामुळे फ्रेंच जनता नाराज झाली. १८ व्या लुईने प्रतिगामी धोरण राबल्याने तर असंतोषात भरच पडली. याचवेळी नेपोलियन अचानक एल्वा बेटाहून निसटून फ्रान्समध्ये परतला. फ्रेंच सैन्य त्याला येऊन मिळाले. १८ वा लुई तर पळून गेला. या घटनेची गंभीर दखल युरोपीय सत्तांनी घेतली. युरोपिय मित्र संघाशी लढण्यासाठी नेपोलियनने ऑष्ट्रीयन नेदर्लंडची भूमी निवडली युरोपीय राष्ट्राच्या संयुक्त सेना फ्रान्सच्या पूर्व व दक्षिण बाजूने प्रचंड उत्साहात चालून गेल्या. ३० मार्च १८१४ रोजी परोस त्यांच्या हाती लागले. त्यामुळे नेपोलियनने सत्तात्याग केला. त्याच्या जागी १६ व्या लुईचा भाऊ कांद्र-द-प्रोव्हांस हा १८ वा लुई या नावाने गादीवर बसला. मित्रमंडळाने नेपोलियनला एलबा बेटाचे राज्य देऊन तनखाही देण्याचे मान्य केले. १८ जून १८१५ रोजी वॉटलू येथे लढाई होऊन यात नेपोलियनचा पूर्ण पराभव झाला. फ्रान्सपासून खूप दूर अंतरावर इंग्लंडच्या ताब्यातील सेंट हेलेना या बेटावर नेपोलियनचा मृत्यु झाला.

**नेपोलियनच्या पतनाची कारणे:**

नेपोलियन जगातील महान सेनानी पैकी एक असला तरी व्यक्तिगत कामगिरीला कुठ एक मर्यादा असते युरोपमधील वेगवेगळ्या राष्ट्रांमध्ये आपल्या नातेवाईकांची वर्णी तेथील

राजेशाही पदी लावले होते आणि यामुळे हे नवीन सत्ताधीश येथील जनतेमध्ये अप्रिय ठरत होते त्यामुळे त्यांचा नेपोलियनवर रोष होता त्यासोबतच नेपोलियनने सत्ता हस्तगत करण्यासाठी स्पेनमध्ये कटकारस्थाने रचले स्पेन ने त्याला मदत केली होती तरीही त्याने स्पेंनवर आक्रमणं केले. यामुळे त्यांच्या शब्दाला वजन राहीले नाहीत. इंग्लंड वरील आर्थिक बहिष्काराचे योजनेचा प्रचंड प्रभाव नेपोलियन वर होता ही योजना राबवणे अनेक युरोपीय राष्ट्रासाठी अशक्य होते परंतु काही काळ नेपोलियनच्या धाकामुळे त्यांनी चालवली परंतु अशक्य होताच त्यांनी छुप्या रीतीने व्यापार सुरू केला ही योजना इंग्लंडच्या नाविक दलामुळे अव्यवहार्य होती यामुळेच रशियासारख्या राष्ट्राने त्याला नकार दिला व नेपोलियनने रशिया वर आक्रमण केले या आक्रमणात नेपोलियनला मोठा फटका बसला. येथूनच त्याच्या पतनास सुरुवात झाली नेपोलियन ची यशस्वी होण्याचे एक कारण म्हणजे त्याने आपल्या विरोधकांना एकत्र येऊ दिले नाही परंतु इंग्लंड ने अंतिम समय विरोधकांमध्ये सुसूत्रतेचे धोरण ठेवले आणि नेपोलियनचा पराभव झाला.

## २.८ सारांश

नेपोलियन हा जगातील महान सेनानीपैकी एक होता. लष्करी मोहिमांची योजनाबद्ध आखणी, वायुवेगाने होणाऱ्या हालचाली व युद्धातील निर्णायक विजय यामुळे तो फ्रान्समध्ये अल्पावधीतच लोकप्रिय बनला तसेच अत्यंत मुत्सद्दी सम्राट होता. फ्रान्सची सरहद्द रहाईन नदीपर्यंत नेली. इंग्लंड सोडून सर्व राष्ट्रांचा पराभव त्याने केला. संपूर्ण युरोपच्या सरहद्दी बदलून टाकल्या याबद्दल इंग्लंड पंतप्रधान पिट म्हणाले होते, "युरोपचा नकाशा गुंडाळून ठेवा कारण तो आणखी दहा वर्ष तरी लागणार नाही." नेपोलियनच्या शौर्याबद्दल बोलतांना इंग्लंडन सेनानी वेलिंग्टन म्हणाला होता. "एकट्या नेपोलियनची रणांगणावरील उपस्थिती ही ४० हजार सैनिकांच्य उपस्थितीसारखी आहे." नेपोलियनने फ्रेंच जनतेचे स्वातंत्र्य जरी हिरावून घेतले असले तरी फ्रेंच जनतेच्यादृष्टीने तो राष्ट्रपुरुष होता. त्याची विधीसंहिता, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा आणि प्रचंड साम्राज्याची निर्मिती यामुळे फ्रान्सला वैभव व प्रतिष्ठा मिळवून दिली. त्याने प्रशासक या नात्याने फ्रान्सचा कायापालट घडवून आणला म्हणूनच तो आधुनिक फ्रान्सचा जनक होता. नेपोलियनचा उदय फ्रेंच राज्यक्रांतीतून झाला होता. म्हणून तो स्वतःला क्रांतीपुत्र म्हणवून घेई हे बऱ्याचदा अंगाने खरेही आहे. कारण त्याने क्रांतीपूत्र बनून फ्रान्सला संकटाच्या खाईतून वाचवले व क्रांती चिरायू केली. क्रांतीच्या कल्पना युरोपभर पसरवल्या. इटली व जर्मनीच्या प्रदेशांची पुनर्रचना करून भावी एकीकरणाचा पाया घातला. जर्मनीतील ३६० संस्थानांची संख्या कमी करून ३९ वर आणली. इटलीतही छोटी-छोटी संस्थाने नष्ट केली, सर्वत्र समतेची व लोकशाहीची बीजे रुजवली. परंतु त्याच्या दोषांमुळे व राक्षसी महत्त्वाकांक्षा यातूनच त्याचे पतन घडून आले.

## २.९ प्रश्न

१. नेपोलियनच्या सेनापती म्हणून कारकीर्दीचा आढावा घ्या.

२. नेपोलियनच्या अंतर्गत धोरणावर टीप लिहा.

३. नेपोलियनने केलेल्या आर्थिक सुधारणा लिहा

४. नेपोलियनच्या इंग्लंड विषयक धोरणाचा आढावा घ्या.

५. नेपोलियनच्या परराष्ट्र धोरणाचे टीकात्मक परीक्षण करा.

## २.१० संदर्भ


- कॅमेरून एवान अर्ली मॉडर्न युरोप,ऑक्सफर्ड,२००१
- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५
- डॉ.सौ. वैद्य, सुमन, आधुनिक जग, नागपूर, २००२.
- प्रा. दीक्षित, नी.सी., पाश्चिमात्य जग, नागपूर, जून २००५.
- कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९.


*****

munotes.in

# ३

# व्हिएन्ना काँग्रेस

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ व्हिएन्ना काँग्रेस

३.३ व्हिएन्ना काँग्रेसचे परिणाम

३.४ मेटरनिक युग

३.५ संयुक्तं युरोप

३.६ १८३०ची क्रांती

३.७ १८४८ची क्रांती

३.८ सारांश

३.९ प्रश्न

३.१० संदर्भ

## ३.० उद्दिष्टे

- नेपोलियनच्या पाडावानंतरची यूरोपातील राजकिय व्यवस्थेचा अभ्यास करणे
- व्हिएन्ना परिषदेच्या कार्याचा आढावा घेणे
- संयुक्त युरोप या व्यवस्थेच्या कामगिरीचा अभ्यास करणे
- नेपोलीयननंतरच्या फ्रान्समधील राजकीय स्थितीचा व क्रांतीचा अभ्यास करणे

## ३.१ प्रस्तावना

फ्रेंच राज्यक्रांती आणि नेपोलियन या दोन्ही घटनांमुळे युरोपच्या नकाशा बदलला होता नेपोलियनने काही काळासाठी इंग्लंड व रशिया वगळता बहुतांश बहुतांश युरोपवर सत्ता गाजवली या राष्ट्रांना पराभूत करत असतानाच तेथील सत्ताधाऱ्यांना हटवून त्याने आपल्या कुटुंबीयांची नेमणूक राजपदी केली. तसेच युरोपमधील राष्ट्रीय फ्रान्स स्पर्धा करतील इतके मोठे होऊ नये अशी व्यवस्था करण्यासाठी त्याने युरोपातील अनेक देशांचे नकाशे बदलले त्याचा अर्थ त्याने युरोपची पुनर्रचना केली या पुनर्रचित पुनर्रचित युरोपमध्ये फ्रान्स हा बलशाली राष्ट्र म्हणून राहील अशी त्याची अपेक्षा होती नेपोलियनच्या पाडाव करण्यासाठी युरोपातील राष्ट्रीय एकत्र आली यामध्ये फ्रान्स रशिया व इतर राष्ट्रांचा समावेश होता नेपोलियनचा एकत्र मिळून पराभव केला सहाजिकच या राष्ट्रांनी फ्रान्सचे वैभव तसेच राहू नये व फ्रान्स पुन्हा बलशाली होऊ नये याची काळजी घेण्यासाठी या विजयी राष्ट्रांनी युरोपच्या पुनर्रचनेच्या नावाखाली 'व्हिएन्ना काँग्रेस' भरविली.

## ३.२ व्हिएन्ना काँग्रेस (१८१५)

नेपोलियनने आपल्या सोयीप्रमाणे युरोपच्या राजकीय नकाशात फेरबदल केले होते. त्याने अनेक जुनी राज्ये संपुष्टात आणून नवनवीन राज्ये निर्माण केली होती. कोणताही प्रदेश आपल्याला वाटेल त्या राज्याला त्याने जोडला होता. अशावेळी नेपोलियनचा पराभव इ.स. १८१४ मध्ये केल्यानंतर त्याची रवानगी एल्बा बेटावर करण्यात आली. त्यानंतर युरोपची पुनर्रचना करण्यासाठी युरोपातील बड्या राष्ट्रांची ऑस्ट्रियाची राजधानी व्हिएन्ना येथे एक परिषद भरविण्यात आली. या परिषदेलाच 'व्हिएन्ना काँग्रेस' या नावाने ओळखले जाते.

युरोपची पुनर्रचना करण्यासाठी ऑस्ट्रिया, प्रशिया, रशिया, ब्रिटन, डेन्मार्क या राष्ट्रांनी व्हिएन्ना या ठिकाणी एक बैठक आयोजित केली. नेपोलियनने आपल्या आवश्यकतेनुसार युरोपच्या नकाशात बदल घडवून आणले होते. त्यामुळे अनेक राज्यांवर अन्याय झाले होते. ते दूर करणे गरजेचे होते. परिषदेत युरोपच्या पुनर्रचनेबद्दल चर्चा सुरू असतानाच नेपोलिनयन एल्बा बेटावरून सुटून फ्रान्समध्ये आला. त्याने पुन्हा शत्रूंचा बीमोड करण्यासाठी लष्करी तयार सुरू केली. अशा वेळी व्हिएन्ना परिषदेतील सर्व राष्ट्रे जागी झाली. नेपोलियनचा कायमचा पाडाव करण्यासाठी या राष्ट्रांनी पुन्हा एकजूट केली. शत्रुराष्ट्रांनी १५ जून १८१५ रोजी नेपोलियनचा वॉटर्लूच्या लढाईत कायमचा पराभव केला आणि पुन्हा व्हिएन्ना परिषदेचे कामकाज सुरू केले गेले.

**व्हिएन्ना परिषदेसमोरील आव्हाने:**

नेपोलियनने सर्व युरोप पादक्रांत केला होता. आपल्या सोयीने त्याने युरोपच्या नकाशात फार बदल केले होते. त्यामुळे युरोपचा चेहराच बदलून गेला होता. नेपोलियनचा पाडाव केल्यानंतर व्हिएन्ना परिषदेस युरोपात नेपोलियनच्या पूर्वीची स्थिती म्हणजेच 'जैसे थे' परिस्थिती निर्माण करावयाची होती. तसच राजकीय नकाशा बदलताना अनेक प्रश्नांची गुंतागुंत होती. नेपोलियनने युरोपच्या राजकीय नकाशात बदल केल्याने प्रदेशांची पुनर्रचना करणे हा महत्त्वाचा प्रश्न होता. बेल्जियम, हॉलंड, स्वित्झर्लंड, इटलीतील राज्ये यांच्या सीमा निश्चित करण्याची गरज होती. याशिवाय ह्या राज्यांना स्वतंत्र ठेवायचे की नाही याचा निर्णय परिषदेला घ्यायचा होता. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे युरोपात निर्माण झालेल्या क्रांतीकारी चळवळींचा बंदोबस्त करणे आवश्यक होते. जुन्या राजवंशांची पुर्नस्थापना करणे आवश्यक होतेनेपोलियनला मदत करणाऱ्या राजांना दंड काय करावा ही समस्या होती. जीत राष्ट्रांनी वैयक्तिकरीत्या निर्णय न घेता मधूनमधून राजकीय परिषदा घेऊन राजकीय निर्णय घेण्याचे ठरविण्यात आले. फ्रान्सने पुन्हा डोके वर काढू नये म्हणून तिच्या सीमेवर शक्तिशाली राष्ट्राचे कडे निर्माण करणे आवश्यक होते.

**व्हिएन्ना परिषदेला जमलेले प्रतिनिधी:**

या परिषदेत युरोपातील ९० मोठ्या व ५३ छोटया राजांनी सहभाग घेतला होता. या परिषदेवर इंग्लड, रशिया, प्रशिया व ऑस्ट्रिया या चार बड्या राष्ट्रांचे वर्चस्व होते. रशियाचा झार पहिला अलेक्झांडर, प्रशियाचा राजा तिसरा फ्रेडरीक विल्यम व ऑस्ट्रियाचा फ्रान्सिस हे प्रमुख राजे होते. इंग्लडचा प्रतिनिधी म्हणून परराष्ट्रमंत्री कॅसलरीघ व त्याचा सहाय्यक म्हणून ड्यूक ऑफ वेलिंग्टन उपस्थित होते. फ्रान्सचे प्रतिनिधीत्व तिलराँ याने केले. मात्र

या परिषदेवर खऱ्या अर्थाने प्रभाव ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर मेटरनिक याचा होता. राजेशाहीचा कट्टर समर्थक असलेला मेटरनिक क्रांतीच्या तत्त्वांचा तीव्र विरोधक होता. रशियाचा झार पहिला अलेक्झांडर फ्रान्सवर निर्बंध टाकण्याच्या विरोधात होता. ऑस्ट्रियाचा राजा फ्रान्सिस युरोपामध्ये जुनी व्यवस्था कायम ठेवावी या विचारांचा होता. कॅसलरीघने राष्ट्राराष्ट्रांमधील वाद सोडवून तडजोडीच्या मार्गाचा अवलंब केला. परिषदेतील राष्ट्रांच्या मतभेदाचा फायदा फ्रेंच प्रतिनिधी तिलराँ याने उचलला व फ्रान्सला कमीत कमी नुकसान पोहोचेल याची काळजी घेतली. या परिषदेत उपस्थित असणाऱ्या प्रत्येक राष्ट्राने आपापले स्वार्थ साधण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नांमध्ये कोणत्याही एक राष्ट्र जास्त बलशाली होणार नाही त्यासोबतच कोणत्याही एका राष्ट्राला जास्तीत जास्त फायदा होऊ नये याची काळजी हे प्रतिनिधी घेत होते. यामुळेच यांच्यातील हेवे दावे यांचा फायदा फ्रान्सच्या प्रतिनिधीला घेता आला. नेपोलियन च्या परत आक्रमणामुळे या परिषदेने फ्रान्स पुन्हा कधीही बलशाली होऊ नये म्हणून युरोपात फ्रान्स इतकेच बलशाली राष्ट्र निर्माण व्हावी अशी काळजी घेण्याचा प्रयत्न केला. ऑस्ट्रेलियाचा चॅन्सेलर मेटरनिक याने मोठी भूमिका निभावली किंबहुना युरोपच्या नकाशाला नेपोलियनने दिलेले रूप त्याने पूर्णपणे बदलण्याचा प्रयत्न केला नेपोलियनने जिंकत असताना फ्रान्स जास्तीत जास्त बलशाली व्हावा हे धोरण आखले तर मेटरनिकचे अगदी त्याउलट उद्दिष्ट होते फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला राष्ट्रवादी देणगी सुद्धा दिली यामुळे युरोपात वेगवेगळे राष्ट्रांमध्ये राष्ट्रवादी चळवळी सुरू झाल्या. या चळवळी धडपणे हा उद्देश मेटरनिकचा होता

**व्हिएन्ना परिषदेचे निर्णय:**

या परिषदेत नेपाली ने केलेल्या यूरोपच्या पुनर्रचनेस बदल फ्रान्स विरुद्ध घडलेल्या प्रमुख राष्ट्रांना फायदा मिळवून देणारे निर्णय घेण्यात आले. त्यात रशिया ऑस्ट्रेलिया इंग्लंड रशिया यांना वेगवेगळे प्रदेश मिळाले

**ऑस्ट्रिया:**

व्हिएन्ना कराराचा सर्वाधिक प्रादेशिक फायदा ऑस्ट्रियाला झाला. ऑस्ट्रियाने बेल्जियमवरील आपला हक्क सोडला. त्या मोबदल्यात लोम्बाडींचे सुपीक मैदान आणि व्हेनेशिया मिळाले. बव्हेरियापासून आड्रियाटिक समुद्राच्या पूर्ण किनाऱ्याजवळील इलिरियन प्रांत ऑस्ट्रियास देण्यात आला. इटालीतील पार्मा, मोडेना व टस्कनी या राज्यांवर हॅप्सबर्ग राजघराण्यातील व्यक्तींची नियुक्ती केल्यामुळे पर्यायाने या राज्यांवर ऑस्ट्रियाचे वर्चस्व निर्माण झाले. पार्मा राज्यावर नेपोलियनची पत्नी व ऑस्ट्रियन राजकुमारी मेरी लसी हिची नेमणूक केली. अनेक जर्मन संस्थानिकांचा एक राज्यसंघ तयार केला. अध्यक्षपद कायमस्वरूपी ऑस्ट्रियास देण्यात आले. अशा रीतीने प्रादेशिक लाभ झाल्याने ऑस्ट्रिया प्रबळ देश बनला.

**प्रशिया:**

प्रशियालासुद्धा 'व्हिएन्ना करारा'मुळे अनेक प्रांत मिळाले. ब्रिटन, रशिया व ऑस्ट्रिया या देशांनी प्रशियाच्या मागण्यांना विरोध केला होता; परंतु फ्रान्सला दुर्बल करण्यासाठी प्रशियाला बलाढ्य करणे 'व्हिएन्ना काँग्रेस'ला आवश्यक वाटत होते; म्हणून प्रशियाला बराच

लाभ मिळाला.प्रशियाकडून नेपोलियनने जे प्रदेश जिंकून घेतले होते, ते सर्व प्रशियाला परत दिले गेले. स्वीडनमधील पोमेरेनियाचा भाग, सॅक्सनीचा दोन पंचमांश भाग, वेस्टफालियाचा संपूर्ण भाग, हाईन नदीच्या तीरावरील बराच प्रदेश व पोलंडमधील पोसेन हे प्रदेश ऑस्ट्रियाला मिळाले. 'व्हिएन्ना काँग्रेस'च्या तरतुदींचा बराच फायदा प्रशियास झाला. अल्पावधीतच ते एक औद्योगिकदृष्ट्या संपन्न राष्ट्र बनले. बलाढ्य प्रशियाकडेच जर्मन एकीकरणाचे नेतृत्व चालून आले व त्याच्याच नेतृत्वाखाली एकीकरण पूर्ण झाले.

**रशिया:**

नेपोलियनचा पराभव करण्यात रशियाचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे रशियन राजा झार आलेक्झांडर पहिला याची काँग्रेसमध्ये प्रतिष्ठा वाढली होती. परिणामी त्याच्या अपेक्षाही वाढणे साहजिक होते. युरोपचा मुक्तिदाता म्हणूनच त्याच्याकडे पाहिले जात होते. त्यामुळे रशियाला पाहिजे असलेले सर्व प्रदेश प्राप्त झाले. पोसेन प्रांत व ऑस्ट्रियाच्या ताब्यात असलेला प्रदेश सोडून पूर्ण पोलंड रशियाला देण्यात आले. स्वीडनपासून जिंकलेली फिनलँड व तुर्कांपासून जिंकलेले बेसारेबिया व आग्नेयकडचा तुर्की प्रदेश रशियाच्याच ताब्यात ठेवण्यात आले.

**ब्रिटन:**

नेपोलियनच्या ऱ्हासाची सुरुवात टाकलेल्या आर्थिक बहिष्काराच्या अपयशी योजनेमुळे झाली होती ब्रिटनचे संपूर्ण जगभर वसाहती होत्या त्यामुळे त्यांना युरोपमधील भूप्रदेश मिळवण्यात रस नव्हता. नेपोलियनला शेवटपर्यंत ब्रिटनने टक्कर दिली. नेपोलियने ब्रिटनची आर्थिक कोंडी करून नामोहरम करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. ब्रिटनमुळेच नेपोलियनचे युरोपवर सत्ता गाजविण्याचे स्वप्न हे केवळ स्वप्नच राहिले. 'व्हिएन्ना करारा' नुसार ब्रिटनला बरेच प्रदेश मिळाले. सेंट लुसिया, माल्टा व मॉरिशस ही बेटे फ्रान्सकडून जिंकून घेतली होती. ती ब्रिटनकडे कायम ठेवली. सिलोन, केप ऑफ गुड होप, गयाना व त्रिनिनाद बेटे यांचाही ताबा ब्रिटनला दिला. त्यामुळे ब्रिटनचे वर्चस्व उत्तर समुद्र भूमध्यसागर व हिंदी महासागरावर निर्माण झाले.

**जर्मनी:**

जर्मनीबद्दल निर्णय घेताना जर्मनीत धर्म, वंश, भाषा व संस्कृतीच्या कारणास्तव लोक एकत्र येणार नाहीत याची त्याने काळजी घेतली. या परिषदेने जर्मन विषयक पुढील निर्णय घेतले. जर्मनीत ३९ राजांचा एक राज्यसंघ बनवण्यात आला. या राज्यसंघाचे अध्यक्षपद ऑस्ट्रीयाकडे व उपाधयक्षपद प्रशियाकडे ठेवण्यात आले. जर्मनीचे सम्राट पद प्रशियाला देऊ केले. जर्मन राष्ट्रसंघाची एक पार्लमेंट असेल व या पार्लमेंटमध्ये लोकांच्या प्रतिनिधीऐवजी ३९ राज्यप्रमुखांचे प्रतिनिधी असतील. संघीय व्यवस्थेचे सम्राटपद प्रशियाकडे व पार्लमेंटचे अध्यक्षपद मात्र ऑस्ट्रीयाकडे अशी विचित्र व्यवस्था व्हिएन्ना काँग्रेसने करून ठेवली होती. अर्थात मेंटर्निकचा यामागे उद्देश स्पष्ट होता. प्रशियाच्या इच्छेनुसार एखादा क्रांतीकारी कायदा झाला तर कायद्यावर अंतिम सही ऑस्ट्रीयाची असल्यामुळे ऑस्ट्रीया नकाराधिकार वापरू शकत होता. त्यामुळे संघीय पार्लमेंटमध्ये एखाद्या विषयावर फक्त चर्चा करता येई. विधेयक पास करता येई. परंतु अन्तिम निर्णय

मेटर्निकने स्वत:कडे राखून ठेवला होता. जर्मनीच्या बाबतीत मेटर्निक कसा सावधपणे वागत होता हे यावरून दिसून येते.

युरोप मधील एकीकरणाच्या चळवळी दडपून टाकणे हा उद्देश असल्यामुळे त्यांनी इटली व जर्मनीचे एकीकरण होऊ नये अशाप्रकारे वेगवेगळ्या प्रदेशांची पुनर्रचना केली यासोबतच या परिषदेने नेपोलियन मुळे सत्ता गमावलेल्या राजवंशाची पुनर्स्थापना केली यामध्ये ऑस्ट्रियन होहेनझार्लन घराणे नेपोलियनला मदत करणाऱ्या राष्ट्रांना शिक्षा देण्याचा निर्णय या परिषदेत घेतले त्यामुळे त्या राष्ट्रांकडून काही प्रदेश काढून घेतले गेले यामध्ये डेन्मार्कचा समावेश होतो.

व्हिएन्ना परिषदेने केलेली पुनर्रचना व शांतता टिकविण्यासाठी युरोपातील बड्या सत्तांनी वारंवार एकत्र यावे असा ठराव करण्यात आला. यामुळे युरोप मध्ये अनेक काही काळासाठी संवाद निर्माण झाला या सत्तांनी आपले हित संबंध पुढील काही काळ या माध्यमातून टिकवून ठेवले.

## ३.३ व्हिएन्ना परिषदेचे परिणाम

या परिषदेत घेतलेल्या निर्णयाने युरोपमधील राष्ट्रीयत्वच्या चळवळी दडपण्याचा प्रयत्न झाला इटली व जर्मनी यांच्या एकीकरणामध्ये अडथळा उभा राहिला परंतु या चळवळीमुळेच पुढे या परिषदेतील निर्णय कुचकामी ठरले. या परिषदेने युरोपमधील लोकशाहीच्या वातावरणात अडथळा उभा करण्याचा प्रयत्न केला राजेशाही स्थापन करण्याचा प्रयत्न केला परंतु आधुनिक राष्ट्रवादामुळे हे प्रयत्न सुद्धा कुचकामी ठरले.या परिषदेत लहान राष्ट्रांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्यात आले. मोठ्या राष्ट्रांचा स्वार्थ पूर्ण करण्यासाठी सिध्दांताबाबत तडजोड करण्यात आली. पुढील शंभर वर्षात युरोपात लहान लहान संघर्ष झाले मात्र मोठे युध्द झाले नाही. या परिषदेचे आणखीन एक यश म्हणजे ह्या परिषदेने आंतरराष्ट्रीय सहकार्याचे युग निर्माण केले. युरोपच्या पुनर्रचनेशिवाय 'व्हिएन्ना काँग्रेस'ने अनेक जनहिताची कार्ये केली. जगात चालत असलेला गुलामांचा व्यापार तत्काळ बंद करण्यात यावा, हा उठाव काँग्रेसने मंजूर करून टाकला. त्यामुळे हॉलंड, फ्रान्स, स्पेन, ब्रिटन व पोर्तुगाल यांसारख्या अनेक देशांनी आपल्या देशात गुलामगिरीच्या प्रथेवर कायद्याने बंधन घातले. समुद्रात चालत असलेली चाचेगिरी नष्ट करण्याचे कार्य काँग्रेसने केले. काँग्रेसच्या हुकूमावरून ब्रिटनचा सेनापती लॉर्ड एक्समाऊथ याने सागरी लुटारूंच्या ठाण्यावर (अल्जेसिअर्स) हल्ला करून त्याचा विध्वंस केला. अशा रीतीने 'व्हिएन्ना काँग्रेस ने जरी अनेक चुका केलेल्या असल्या, तरी मानवाच्याया दृष्टीने 'कॉन्सर्ट ऑफ युरोप' (संयुक्त युरोप) ची स्थापना महत्त्वपूर्ण ठरली.

**युरोपची संयुक्त व्यवस्था (१८१५ ते १८२२) (Councert of Europe):**

नेपोलियन बोनापार्टची रवानगी युरोपबाहेर असलेल्या सेंट हेलेना बेटावर केल्यानंतर विजयी राष्ट्रांनी फ्रान्सला शरण येण्यास भाग पाडले. या. इतके करूनसुद्धा 'व्हिएन्ना काँग्रेस'ने निर्माण केलेली व्यवस्था टिकेल, असा विश्वास नेपोलियनचा धसका घेतलेल्या बड्या राष्ट्रांना वाटत नव्हता. 'व्हिएन्ना काँग्रेस'ने घेतलेल्या निर्णयाची कायमची अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच फ्रान्समध्ये व पर्यायाने युरोपीय देशांत पुन्हा होऊ नये

म्हणून क्रांतितत्त्वाचे उच्चाटन करण्यासाठी युरोपीय राष्ट्रांची एखादी कायमस्वरूपी संघटना असावी, या हेतूने 'संयुक्त युरोप'ची संकल्पना पुढे आल

व्हिएन्ना परिषदेत घेतले निर्णय घेतलेला निर्णय आणि व्यवस्था याची काटेकोर पालन झाले पाहिजे परंतु यासाठी एखादी आंतरराष्ट्रीय व्यवस्था असावी अशी कल्पना होती त्यामध्य व्हिएन्ना परिषदेने युरोपची पुनर्रचना करताना ठिकठिकाणी प्रतिक्रियावादी राजवटी निर्माण केल्या पण ही व्यवस्था कायम टिकेल याची खात्री वाटत नव्हती. युरोपमधील शांतता टिकवून ठेवणे या राष्ट्रांना महत्त्वाचे वाटत होते. त्यातूनच 'पवित्र संघ' (Holy Alliance) व चतु:संघ (Quadruple Alliance) या संघांचा उदय झाला. या संघांनी युरोपमध्ये जी व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला ती 'संयुक्त युरोप' या नावाने ओळखली जाते. ही व्यवस्था साधारणपणे इ.स. १८३० पर्यंत टिकली.

**मेटरनिक युग (Era of Metternich):**

मेटरनिक हा ऑस्ट्रियाचा पंतप्रधान होता. चतु:संघावर त्याचेच प्रभुत्व होते.तो प्रतिगामी व प्रतिक्रांतिकारी विचारांचा होता. त्यामुळे चतु:संघाचे स्वरूपही प्रतिगामीच राहिले. व्हिएन्ना परिषदेने केलेली युरोपची पुनर्रचना कायम टिकविण्यासाठी या संघाने आटोकाट प्रयत्न केला. एकराष्ट्रीयत्वाच्या चळवळी व क्रांती सैन्याच्या जोरावर चतु:संघाने मोडून काढण्याचा प्रयत्न केला. या संघाचा प्रेरक होता मेटरनिक. हा एकराष्ट्रीत्व, लोकशाही, व्यक्तिस्वातंत्र्य शांतताभंग होईल म्हणून त्याने या नव्या कल्पनांचे युरोपात बीजारोपण होणार नाही, याची दक्षता घेतली. मेटरनिकने चतु:संघाच्या माध्यमातून युरोपात प्रतिगामी चळवळी दडपण्याचा सपाटा चालविला. त्याच्या या कार्यामुळे त्याला युरोपच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान निर्माण झाले. इ.स.१८१५ पासून १८४८ पर्यंत युरोपवर मेटरनिकच्या धोरणाची छाप पडली असल्यामुळे या कालखंडाला 'मेटरनिक युग' म्हणून युरोपच्या इतिहासात ओळखले जाते.मेटरनिक अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कर्ता होता. फ्रेंच क्रांतीतून उदयास आलेल्या कल्पना युरोपला हानिकारक असल्याचे त्याचे मत होते. अशा प्रतिगामी विचारांमुळेच त्याने युरोपातील बड्या देशांची दंडेलशाही निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याने युरोपीय राजकारणात बदल घडवून आणण्यासाठी चतुःसंघाचा उपयोग केला.

**पवित्र संघ:**

रशियाचा राजा झार अलेक्झांडर पहिला याच्या प्रेरणेतून ‘पवित्र संघ' अस्तित्वात आला.धर्माचा आधार या संघाच्या स्थापनेसाठी घेण्यात आला होता. म्हणून हा संघ 'पवित्र संघ' म्हणून ओळखला जातो. अलेक्झांडर हा स्वप्नाळू, ध्येयवादी आणि गूढवादी होता, म्हणूनच त्याने पवित्र संघाची कल्पना युरोपीय राष्ट्रांपुढे मांडली. फ्रेंच राज्यक्रांती ही ख्रिश्चन धर्माच्या तत्त्वाविरुद्ध आहे. त्यासाठी त्या क्रांतीचा प्रसार रोखला पाहिजे, असे त्याचे मत होते. या संघात ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया होते. पवित्र संघाची तत्त्वे प्रत्यक्षात आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला नाही. ब्रिटन या करारापासून दूर राहिला. युरोपमध्ये स्वतःची सत्ता वाढविण्याचा झारचा प्रयत्न आहे अशी अनेकांच्या मनात शंका होती.२६ सप्टेंबर १८१५ रोजी या संघाच्या उद्देशाची घोषणा केली गेली. ख्रिश्चन धर्मातील तत्त्वानुसार युरोपीय देशांनी परस्पर व्यवहार करावा आणि आपल्या देशातील प्रजेस मुलाप्रमाणे वागवावे, असे ठरविण्यात आले.धर्म हाच या संघाचा मूलभूत पाया होता. अनेक युरोपीय देशांनी या संघात

प्रवेश केलेला असला, तरी त्यांना यामध्ये आवड नव्हती. या संघाचा रशिया एकटाच देश होता. या संघाची ध्येये प्रत्यक्षात अमलात आणणे कठीण होते.पवित्र संघ लोकप्रिय होऊ शकला नाही. अलेक्झांडरच्या मृत्यूबरोबर (१८२५) पवित्र संघाचेही अस्तित्व संपुष्टात आले.

### चतु:संघ:

युरोपात शांतता निर्माण करण्यास व 'व्हिएन्ना काँग्रेस'च्या निर्णयाची अंमलबजावणी युरोपातील राज्यांनी आपले प्रश्न चर्चा करून सोडवावेत व एकमेकांमध्ये सहकार्य प्रस्थापित करावे या दृष्टिने ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर मेटरनिक याने एक योजना मांडली. त्यानुसार २० नोव्हेंबर १८१५ रोजी रशिया, प्रशिया, ऑस्ट्रिया व ब्रिटन यांच्या स्वाक्षऱ्या होऊन चतु:संघ अस्तित्वात आला. मेटरनिकच्या आधी अशा प्रकारची योजना इ.स. १७९१ मध्ये ऑस्ट्रियाचाच चॅन्सेलर कॉनित्झ याने माडली होती. युरोपमधील राज्यांचा संघ बनविण्याची ती कल्पना होती. मात्र त्या योजनेला पाठिंबा मिळाला नाही मेटरनिकने मांडलेली योजना जास्त व्यवहार्य ठरली. मेटरनिकने ही कल्पना युरोपियन देशांपुढे सादर केली. तिचा पुरस्कार ब्रिटन, रशिया, प्रशिया व ऑस्ट्रिया या देशांनी केला. २० नोव्हेंबर १८१५ रोजी या योजनेवर वरील राष्ट्रांनी शिक्कामोर्तब केले. एक्स्लाशापेलच्या परिषदेनंतर फ्रान्सही या संघात सामील झाला. त्यामुळे या संघाला संयुक्त युरोपचे स्वरूप प्राप्त झाले. युरोपातील प्रश्न परस्परांशी चर्चा करून सोडविणे, 'व्हिएन्ना करारा' चे रक्षण करणे, परस्परांत मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे व फ्रान्सच्या सत्तेवर नेपोलियनच्या वंशातील कोणीही येणार नाही याची दक्षता घेणे, ही चतु:संघाची उद्दिष्टे होती. युरोपातील शांततेचा भंग होऊ नये यासाठी त्यावर योजना करण्यासाठी चतु:संघ हा परिषदांचे आयोजन करणार होता. हा संघ खरे म्हणजे राष्ट्रसंघ व युनोची जननीच मानावा लागेल. या संघाने परस्परांतील समस्या शांततेने सोडविण्याचा पाया घातला. पण, या संघाच्या रूपाने युरोपात मेटरनिकची हुकूमशाही निर्माण झाली.केला; परंतु त्याचे प्रतिगामी विचार अधिक काळ टिकणे कठीण होते. एक्स्लाशापेलचीपरिषद, ट्रोपाऊची परिषद्, लागबेकची परिषद व व्हेरीनाची परिषद संपल्यानंतरसंयुक्त युरोपची व्यवस्था (मेटरनिक पद्धत) संपुष्टात आली.

मेटरनिकने मांडलेल्या या योजनेत रशिया प्रशिया, ऑस्ट्रिया व ब्रिटन ही चार राष्ट्र सहभागी झाल्याने त्यास चतुःसंघ हे नाव पडले. युरोपमध्ये शांतता राखणे, व्हिएन्ना परिषदेतील निर्णयांची अंमलबजावणी करणे, युरोपियन देशांच्या सीमा मजबूत करणे व त्यांच्या आर्थिक–सामाजिक समस्या सोडवणे, एखाद्या राज्यातील शांतता धोक्यात आल्यास इतर राज्यांनी हस्तक्षेप करणे, युरोपमध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करण्यासाठी वेळोवेळी परिषदा घेणे इत्यादी उद्दीष्टे ठरविण्यात आली. या व्यवस्थेच्या आधारे युरोपिय सत्ता व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेल्या प्रतिगामी राजवटींचे रक्षण करू शकत होत्या व उदारमतवादाला दडपू शकत होत्या. ब्रिटन चतुःसंघाची इतर तत्त्वे मानण्यास तयार होते मात्र कोणत्याही राज्यात अंतर्गत क्रांती झाल्यास ती दडपण्यासाठी हस्तक्षेप करण्याच्या विरोधात होते. इ.स. १८१८ ते १८२२ या काळात चतुः संघातर्फे 'संयुक्त युरोप'च्या चार परिषदा झाल्या. हा काळ 'परिषदांचा काळ' म्हणूनही ओळखला जातो. या परिषदांवर मेटरनिकच्या व्यक्तिमत्वाचा व विचारांचा ठसा उमटला होता. मेटरनिकने अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केला आणि लोकशाही व एकराष्ट्रीयत्वाच्या

चळवळी दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. संयुक्त युरोपच्या अंतर्गत एक्स-ला-शापेलची परिषद (१८१८), ट्रोपोची परिषद (१८२०), लैबॅकची परिषद (१८२१) व व्हेरोनाची परिषद (१८२२) अशा चार परिषदा झाल्या.

**एक्स्लाशापेलची काँग्रेस (१८१८):**

चतु:संघाची पहिली परिषद एक्स्लाशापेल येथे इ.स. १८१८ मध्ये भरली. परिषदेसमोर फ्रान्ससंबंधी महत्त्वाचा प्रश्न होता. फ्रान्सचा राजा अठरावा लुई याने पॅरिसच्या द्वितीय तहानुसार आचरण केले होते, तसेच 'व्हिएन्ना करारा'प्रमाणे युद्धखंडणी दिली असल्यामुळे दोस्त राष्ट्रांनी फ्रान्समधून आपले सैन्य काढून घेतले. फ्रान्सलाही चतुःसंघात प्रवेश दिला. त्यामुळे चतुःसंघाचे स्वरूप बदलले आणि त्या ठिकाणी संयुक्त युरोपची स्थापना झाली. या परिषदेत फ्रान्ससंबंधी अनेक निर्णय घेण्यात आले. फ्रान्सशी करण्यात आलेल्या इ.स.१८१५ च्या पॅरिसच्या दुसऱ्या तहाने युद्धखंडणी लादली होती. युद्धखंडणी पूर्णपणे देईपर्यंत दोस्त राष्ट्रांचे सैन्य फ्रान्समध्ये ठेवले होते. फ्रान्सने संपूर्ण युद्धखंडणी दिल्यामुळे दोस्त राष्ट्रांच्या सैन्यासंबंधी व फ्रान्ससंबंधी विचारविनिमय करण्यासाठी वरील परिषदेचे आयोजन करण्यात आले. फ्रान्समधून सर्व सैन्य काढून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. फ्रान्सला चतु:संघात प्रवेश देण्यासंबंधीही या परिषदेत चर्चा झाली. फ्रान्ससंबंधी सर्वांगीण दृष्टिकोनातून विचार करून व लेखी करार करूनच त्यास चतुःसंघात प्रवेश द्यावा, असे ब्रिटन व ऑस्ट्रियाने मत मांडले; तर रशियाने पवित्र संघाची पद्धत सुचविली. शेवटी ऑस्ट्रिया व ब्रिटनचे मत मान्य करण्यात येऊन फ्रान्सला चतु:संघात प्रवेश दिला. त्यामुळे चतु:संघाचे मूळ स्वरूप बदलून त्यास 'संयुक्त युरोप'चे स्वरूप प्राप्त झाले. (३) गुलामांचा व्यापार बंद करण्यात यावा, अशी सूचना ब्रिटनने केली; परंतु या सूचनेस पाठिंबा न मिळाल्याने कोणताच निर्णय घेतला नाही.. (४) भूमध्यसागरातील चाचेगिरी नष्ट करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाविक दल भूमध्यसागरात ठेवावे, असे रशियाने सुचविले; परंतु आंतरराष्ट्रीय नाविक दल आपल्या नाविक दलास प्रतिस्पर्धीच होई, तसेच रशियाचा भूमध्यमहासागरात शिरकाव होईल, या भीतीने ब्रिटनने या योजनेस विरोध केला. त्यामुळे चाचेगिरी सुरूच राहिली. (५) अलेक्झांडर पहिला या रशियाच्या राजाने युरोपीय देशांच्या सीमा कायम ठेवल्या जातील आणि प्रत्येक देशाच्या राजाच्या सार्वभौमकरण्यात येईल, असा ठराव मांडला; परंतु तो ठराव ब्रिटनच्या विरोधामुळे संमत झाला नाही. (६) नॉर्वे व डेन्मार्कबरोबर केलेल्या कराराचे'पालन स्वीडनने न केल्यामुळे याबाबतचा जाब तेथील राजाला विचारण्यात आला. आपल्या राज्याची राज्यव्यवस्थासुधारण्याचा आदेश मोनॅकोच्या राजाला देण्यात आला. अशा रीतीने संयुक्त युरोपच्या सदस्य राष्ट्रांत मतभेद आहेत, ही गोष्ट पहिल्याच वरील परिषदेत दिसून आली.

**ट्रोपाऊची परिषद (१८२०):**

संयुक्त युरोपची दुसरी परिषद इ.स. १८२० मध्ये ट्रोपाऊ या ठिकाणी झाली. स्पेन व नेपल्स या ठिकाणी झालेल्या उठावाची चिंता मेटरनिकला वाटू लागल्यामुळे त्यासंदर्भात विचार करण्यासाठी ही परिषद आयोजित केली होती, नेपालियन बोनापार्टने स्पेनच्या राजाला अटक करून तेथे आपला भाऊ जोसेफ याला सत्तेवर बसविले. त्यामुळे स्पॅनिश जनतेने स्वातंत्र्ययुद्ध पुकारले. स्वातंत्र्ययुद्धातील विजयानंतर इ.स.१८१२ मध्ये जनतेने

फ्रान्सच्या १७९१ च्या धर्तीवर एक घटना तयार केली; परंतु नेपोलियनच्या पाडावानंतर इ.स.१८१५ मध्ये भरलेल्या 'व्हिएन्ना काँग्रेस' ने स्पेनचा राजा फर्डिनंड सातवा याला पुन्हा स्पेनच्या गादीवर बसविले. फर्डिनंडने १८१२ ची राज्यघटना रद्द करून प्रतिगामी धोरणाचा अवलंब केला. लोकांना तुरुंगात डांबण्यात आले. त्यामुळे राजाविरोधी देशात असंतोष पसरला. अमेरिकेतील स्पॅनिश वसाहतींनीसुद्धा स्पेनविरुद्ध बंड केले. या बंडाचा बीमोड करण्यात स्पेनला यश आलेले नव्हते. परिणामी देशातील वातावरण तंग झाले आणि इ.स. १८२० मध्ये स्पेनमध्ये लष्करी उठाव झाले. कॅडीझ या ठिकाणी कर्नल रिगो याने, तर उत्तर स्पेनमध्ये जनतेने उठाव केले. हे बंड यशस्वी झाल्यामुळे 'व्हिएन्ना काँग्रेस च्या निर्णयाला तडा गेला. फर्डिनंड सातवा याने इ.स.१८१२ ची घटना मान्य केली.स्पेनप्रमाणे नेपल्स या ठिकाणीसुद्धा राजाविरुद्ध क्रांती झाली. "व्हिएन्ना काँग्रेस' ने इटालीत अलहान-लहान राज्ये निर्माण करून त्यावर ऑस्ट्रियाचे वर्चस्व कायम ठेवले होते. नेपल्सच्या गादीवर बुर्बोन घराण्यातील फर्डिनंड पहिला यास बसविले होते. त्याच्या दडपशाही धोरणामुळे व भ्रष्ट राज्यकारभारामुळे लोकांत असंतोष पसरला. स्पेनमध्ये क्रांती होताच नेपल्सच्या लोकांनीसुद्धा बंड केले. त्यांनी स्पेनमधील इ.स.१८१२ च्या घटनेच्या धर्तीवर राज्यघटना लागू करण्याची मागणी राजाकडे केली. परिस्थिती पाहून राजानेही नेपल्सला उदारमतवादी राज्यघटना लागू केली . स्पेनमधील क्रांती दडपण्यासाठी रशियाने आपले सैन्य पाठविण्याची तयारी दाखवली. मात्र त्यामुळे रशियाचे महत्त्व वाढणार होते. परिणामी रशियाच्या सूचनेला इतर सत्तांनी मान्यता दिली नाही. मेटरनिकच्या मते एका राष्ट्राने कारवाई करण्यापेक्षा संयुक्त युरोपने करावी. इतर समस्यांपेक्षा नेपल्समधील बंडाचा विचार करणे निकडीचे होते. परिणामी ट्रोपौ येथे संयुक्त युरोपची परिषद बोलावण्यात आली.इटलीमध्ये ऑस्ट्रियाचे हितसंबंध गुंतलेले असल्याने ऑस्ट्रियानेच नेपल्समधील क्रांतीदडपावी असा प्रस्ताव परिषदेत मांडण्यात आला. नेपल्समधील बंडामुळे ऑस्ट्रियाच्या ताब्यातीललोम्बार्डी व व्हेनेशिया तसेच ऑस्ट्रियन राजवंशाच्या ताब्यात असलेल्या पार्मा, मोदेना, टस्कनी या राज्यांमध्ये अशांतता निर्माण होण्याची शक्यता होती. ऑस्ट्रियने स्वतःच्या जबाबदारीवर कारवाई करावी यास ब्रिटनने संमती दिली. अशी कारवाई संयुक्तपणे करण्यास ब्रिटनचा विरोध होता. मेटरनिकच्या मते व्हिएन्ना परिषदेने निर्माण केलेली व्यवस्था बदलण्याचा कोणत्याही देशात प्रयत्न झाल्यास संयुक्त युरोपने शांततेच्या मार्गाने किंवा लष्करी मार्गाने कारवाई करावी. मेटरनिकच्या या धोरणाला रशिया व प्रशियाचा पाठिंबा मिळाला. संयुक्त युरोपचे सर्वसाधारण धोरण म्हणून मेटरनिकने एक ठराव म्हणजेच "प्रोटोकॉल ऑफ ट्रोपो" संमत करून घेतला. हा ठराव असा होता: 'युरोपमधील कोणत्याही देशात क्रांती होऊन युरोपला धोका निर्माण झाल्यास "संयुक्त युरोपच्या" सभासद देशांनी सैन्य पाठवून क्रांती नष्ट करावी. या ठरावामुळे अंतर्गत हस्तक्षेपाचा हक्क मान्य करण्यात आला. ब्रिटनने ठरावाच्या विरूध्द मत दिले.

### लैबॅकची परिषद (१८२१):

नेपल्सपाठोपाठ उत्तर इटलीतील पिडमाँटच्या राज्यात क्रांती होऊन उदारमतवाद राज्यघटनेची मागणी करण्यात आली. पिडमाँटचा राजा पहिला इमॅन्युअल याने राज्यत्याग केला व आपला भाऊ चार्लस फेलिक्स यास गादीवर बसविले. मात्र चार्लस फेलिक्स राज्यात हजर नसल्याने त्याची जबाबदारी चार्लस आल्बर्ट याने सांभाळली व त्याने लोकांची उदारमतवादी घटनेची मागणी मान्य केली या पार्श्वभूमीवर लैबॅकची परिषद भरली

नेपल्सचा राजा पहिला फर्डिनंड याने या .परिषदेला हजर राहून क्रांती मोडून काढण्याची विनंती परिषदेला केली. लैबॅकच्या परिषदेने नेपल्समधील क्रांती दडपण्याची ऑस्ट्रियाला परवानगी दिली. या परवानगीचा फायदा घेऊन ऑस्ट्रियाने नेपल्समधील उठाव मोडून काढला. तसेच ऑस्ट्रियाने पिडमाँटमधील क्रांतीसुध्दा दडपून टाकली. नेपल्समध्ये पुन्हा पहिला फर्डिनंड व पिडमाँटमध्ये चार्लस फेलिक्स यांची अनियंत्रित राजवट प्रस्थापित झाली..

**व्हेरोनाची परिषद (१८२२):**

या परिषदेसमोर ग्रीकांनी तुर्की राजवटीविरूध्द पुकारलेल्या बंडाळीचा व स्पेनमधील बंडाळीचा प्रश्न होता. मार्च १८२१ मध्ये ग्रीकांनी तुर्कस्थानच्या राजवटीविरूध्द बंड पुकरले. ग्रीक लोक हे युरोपीय लोकांचे धर्मबांधव असल्याने पवित्र संघाचे सभासद म्हणून त्यांना मदत करणे आवश्यक आहे अशी रशियाची भूमिका होती. ऑस्ट्रियाने ज्याप्रकारे नेपल्स व पिडमाँटमध्ये कारवाई केली त्याप्रमाणे आपल्याला ग्रीसच्या बाबतीत कारवाई करता यावी अशी रशियाची मागणी होती. मात्र त्यामुळे रशियाचे बाल्कन भागात वाढणारे वर्चस्व ऑस्ट्रिया व ब्रिटनच्या हितसंबंधाना धोका पोहोचविणारे होते. दरम्यान स्पेनच्या बुरबाँ वंशीय राजाने फ्रान्सचा बुरबाँ वंशीय राजा अठरावा लुई याच्याकडे स्पेनमधील बंडाळी मोडून काढण्यासाठी मदतीची मागणी केली. फ्रान्सच्या राजाने 'संयुक्त युरोप'कडे अशी कारवाई करण्याची परवानगी मागितली. इ.स. १८२२ मध्ये या प्रश्नांचा विचार करण्यासाठी व्हेरोना येथे परिषद भरवण्यात आली. दरम्यान कॅसलरीघच्या मृत्यूनंतर ब्रिटनचा परराष्ट्रमंत्री म्हणून कॅनिंगची नेमणूक झाली होती. तो एकंदरीत संयुक्त युरोपच्या परिषदांच्या विरोधात होता. तसेच सुरूवातीपासून ब्रिटन कोणत्याही राज्याच्या अंतर्गत प्रश्नांत हस्तक्षेप करण्याच्या धोरणाच्या विरूध्द होता. व्हेरोनाच्या परिषदेत ग्रीक स्वातंत्र्यलढ्याचा मुद्दा विचारात घेण्यात आला नाही. तसेच ब्रिटनचा विरोध असतानाही फ्रान्सला स्पेनमध्ये सैन्य पाठविण्यास परवानगी देण्यात आली. परिषदेच्या निर्णयानुसार पुढे फ्रान्सने आपले सैन्य स्पेनमध्ये घुसवून अनियंत्रित राजेशाहीविरूध्दचे बंड मोडून काढले. उदारमतवादी राज्यघटना रद्द केली. परिषदेने स्पेनच्या संदर्भात आपले मत विचारात घेतले नाही म्हणून ब्रिटनने 'संयुक्त युरोप मधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. परिणामी 'संयुक्त युरोप'चे संघटन कोसळले संयुक्त युरोपची अखेर:ब्रिटन संयुक्त युरोपमधून बाहेर पडला तरी हे संघटन पूर्णपणे संपुष्टात आले नाही.

इ.स. १८२३ मध्ये 'संयुक्त युरोप'ने आपले लक्ष स्पेनच्या दक्षिण अमेरिकेतील वसाहतींच्याबंडाकडे वळविले. परंतु अशा कोणत्याही कारवाईस ब्रिटनने आपल्या आर्थिक हितसंबंधापायी तसेच अमेरिकेनेही विरोध केला. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष मन्रो यांनी "युरोपमधील कोणत्याही सत्तेने अमेरिका खंडातील राजकारणात हस्तक्षेप केल्यास ते कृत्य शत्रुत्वाचे मानले जाईल" अशी घोषणा केली. या तत्त्वाला 'मन्रो सिध्दान्त' असे म्हणतात. अमेरिकेच्या या रोकठोक भूमिकेमुळे व ब्रिटनच्या सागरी सामर्थ्यामुळे 'संयुक्त युरोप'ला स्पेनच्या वसाहतींतील बंडाबाबत कोणतीही कारवाई करता आली नाही. ग्रीस - तुर्कस्थान प्रश्नावर विचार करण्यासाठी रशियाच्या झारने जानेवारी १८२५ मध्येसेंट पीटर्सबर्ग येथे 'संयुक्त युरोप'ची परिषद बोलावली. या परिषदेत सहभागी होण्यास ब्रिटनने नकार दिला. या परिषदेत कोणताही महत्त्वाचा निर्णय झाला नाही. ग्रीस तुर्कस्थान प्रश्न आपल्यामनाप्रमाणे

सोडवू असे रशियाच्या झारने जाहीर केले.अशारीतीने चर्चा, विचारविनिमय करून युरोपचे प्रश्न सोडवण्यास तसेच अंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करण्याचे प्रयत्न करणारी 'संयुक्त युरोप' ही संघटना येथे संपली

## ३.५ संयुक्त युरोप

**संयुक्त युरोपचे मूल्यमापन:**

नेपोलियन बोनापार्टच्या अस्तानंतर युरोपात निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीनुसार 'संयुक्त युरोप'चा उदय झाला होता. संयुक्त युरोपवर खऱ्या अर्थाने ऑस्ट्रियाचे म्हणजेच मेटरनिकचे वर्चस्व होते. युरोपातील क्रांती दडपून टाकण्यासाठीच मेटरनिकने संयुक्त युरोपचा उपयोग करून घेतला. बड्या राष्ट्रांतील सत्तास्पर्धा चालविल्यामुळे इतर सदस्य राष्ट्रे नाराज होणे साहजिक होते. या सदस्य राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणात मतभेद अस्तित्वात होतेशेवटी अशा मतभेदांमुळेच संयुक्त युरोपचा घात झाला. मेटरनिक दुसऱ्या देशांच्या अंतर्गत राज्यकारभारात लष्कर हस्तक्षेप करीत असे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात याचवेळी अमेरिकेच्या उदय झाला होता यामुळे संयुक्त यूरोपच्या कार्याला आळा बसला संयुक्त युरोप ही व्यवस्था युरोपातील शांतता कायम करण्यासाठी व संयुक्त सैन्याचा वापर बड्या राष्ट्रांचा हितच हितासाठी करणारी व्यवस्था होते या व्यवस्थेमुळे युरोपला आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्व कळाले यामुळे सहकार्याचे युग सुरू होण्यास मदत झाले या तत्त्वावर मुळेच आपण संयुक्त व्यवस्थेला लीग ऑफ नेशन किंवा संयुक्त राष्ट्र संघाचे सुरुवातीचा किंवा प्राथमिक अवस्थेतील अवतार असेही म्हणू शकतो या व्यवस्थेने युरोपमध्ये कोणतेही मोठे युद्ध होणार नाही याची काळजी घेतली आणि हेच त्यांचे सर्वात महत्त्वाचे यश म्हणता येईल.

## ३.६ १८३० ची क्रांती

फ्रेंच राज्यक्रांती राजेशाहीच्या विरोधात झाले या राज्यक्रांतीने सुरुवातीस राज घराण्यावर विश्वास दाखवला परंतु हळु घडलेल्या घटनांनी त्यांचा राजेशाही वरचा पूर्ण विश्वास उडाला शेवटी तेथे प्रजासत्ताकाची स्थापना झाली परंतु त्यानंतर आलेल्या नेपोलियनने या प्रजासत्ताकाची अखेर केली त्याने स्वतःचे एक हाती सत्ता स्थापन केले नेपोलियनला पाठिंबा असला तरीही फ्रान्सच्या जनतेच्या मनात राजेशाही विरुद्ध असंतोष अस्तित्वात होताच नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपीय राष्ट्रांनी फ्रान्समध्ये पुन्हा राजेशाही सत्तेची स्थापना केली आणि त्यातही त्यांनी फ्रान्समधील बुर्बोन राजवंशातील अठराव्या लूईला सत्तेवर बसवले. परंतु या अगोदर पर्यंत फ्रान्समध्ये ज्याप्रकारे निरंकुश सत्ता अस्तित्वात होती कशाप्रकारे आता राजेशाही अस्तित्वात येऊ शकत नव्हती प्रजेला आपले हक्क व अधिकार कळालेले होते त्यामुळे राजा हा अनियंत्रित नव्हता परंतु नवीन सत्तेवर आलेल्या सत्ताधीशांना हे फ्रान्सच्या जनतेचे रूप नवे होते यातूनच १८३०ची क्रांती घडली

**कारणे:**

फ्रान्समधील राजकीय गट: या काळात फ्रान्समध्ये अनेक राजकीय गट निर्माण झाले होते. त्यात कट्टर राजसत्तावादी गट प्रमुख होता. हे लोक बुरबॉं राजसत्तेचा अभिमान बाळगत होते व अनियंत्रित राजसत्तेचे पाठिराखे होते. त्यांचे वर्णन 'राजापेक्षाही राजनिष्ठ' असे केले जात असे. उमरावांचे गेलेले वैभव पुन्हा मिळवून देण्याचा त्यांच्या प्रयत्नांमुळे सामान्य लोक त्यांच्याविषयी साशंक होते. दुसरा गट मवाळमतवादी राजसत्तावादी लोकांचा होता व हे लोक नवीन परिस्थितीशी जुळवून घेणारे होते. तिसरा उदारमतवाद्यांचा गट होता. त्यांचा नियंत्रित राजसत्तेला पाठिंबा असला तरी जनतेला जास्त अधिकार असावेत अशी त्यांची मागणी होती. तर प्रजासत्ताकवादी गटाला राजेपद नको होते. त्याचप्रमाणे बोनापार्टिस्ट गटाला नेपोलियनच्या घराण्याला पुन्हा सत्तेवर आणायचे होते व फ्रान्सने युध्दाच्या मार्गाने प्रतिष्ठा मिळवावी असे वाटत होते. या सर्व गटांना सांभाळताना १८ व्या लुईला कठीण जात होते. मात्र त्याचे धोरण मवाळ होते.

**फ्रान्समधील अस्थिरता व हिंसाचार:**

अठराव्या लुईच्या काळात उदयास आलेल्या वेगवेगळया पक्षांच्या आडमुठ्या धोरणामुळे राजाला राज्य करणे कठीण झाले. कडव्या राजसत्तावादी पक्षाने बोनापार्टिस्ट अनुयायांवर तुफान हल्ले चढविल्यामुळे देशात दहशतीचे साम्राज्य पसरले. यालाच 'श्वेत दहशत' या नावाने ओळखले जाते.

**राजा व पार्लमेंट मधील संघर्ष:**

राजाला पाठिंबा देणाऱ्या मंत्रिमडळावर अविश्वास ठराव दाखल करण्यात आला .हा ठराव संमत झाला असतानाही राजाने मंत्रीमंडळाची हकालपट्टी करण्याएवजी पार्लमेंटची बरखास्त केली आणि नवीन निवडणुकीच्या घोषणा केल्या यामुळे राज्याच्या हेतूवर शंका येऊ लागल्या

**जुलै १८३० चे वटहुकूम:**

जुलै १८३० मध्ये निवडणूका होऊन राजाच्या विरोधी गटांना पूर्वीपेक्षा साठ जागा जास्त मिळाल्या. तरीही राजाने मंत्रीमंडळ बरखास्त केले नाही. त्याबद्दल उदारमतवादी गटाने निषेध व्यक्त केला. राजाने विधिमंडळ व राज्यघटना उलथवून टाकण्याचा निर्धार केला. २५ जुलै १८३० रोजी राजाने चार वटहुकूम जारी केले. त्यानुसार

I सरकारच्या परवानगीशिवाय वृत्तपत्रांच्या प्रकाशनावर बंदी घालण्यात आली.

II. नुकत्याच झालेल्या निवडणूका रद्द करून विधिमंडळ बरखास्त करण्यात आले.

III. निवडणूक कायद्यात बदल करण्यात येऊन मतदारांची संख्या एक लाखाहून पंचवीस हजारांवर आणण्यात आली.

IV. नवीन निवडणूकांच्या तारखा जाहीर करण्यात आल्या.

**जुलै १८३० ची क्रांती:**

२५ जुलैच्या वटहुकूमांमुळे जनतेची स्वातंत्र्य रद्द करून अनियंत्रित राजेशाही प्रस्थापित करण्याचा राजाचा विचार स्पष्ट झाला. राजाला वटहुकूमांच्या परिणामांची कल्पना नव्हती. दुसऱ्या दिवशी पत्रकारांच्या प्रचाराने पॅरिसमधील जनतेने उठाव केला. रस्त्यात ठिकठिकाणी अडथळे निर्माण करण्यात आले. क्रांतिकारक समित्यांची स्थापना करण्यात आली. फ्रेंच जनतेने स्वयंस्फूर्तीने केलेल्या या उठावाचा फायदा प्रजासत्ताकवाद्यांनी घेतला. सैन्याने लोकांवर गोळ्या झाडण्यास नकार दिला. २९ जुलैला नॅशनल गार्ड उठाव वाल्यांना येऊन मिळाले. क्रांतीचा जोर वाढत गेला. अखेर ३१ जुलैला आपल्या नातवाला गादीवर बसवावे ही मागणी करून दहाव्या चार्लस्ने राज्यत्याग केला व तो इंग्लंडला पळून गेला. चार्लस्च्या सत्तात्यागानंतर जुलैच्या क्रांतीचा शेवट झाला.चार्लस्च्या सत्तात्यागानंतर जुलैच्या क्रांतीचा शेवट झाला. राजाने नेमलेला वारस फेटाळण्यात आला. प्रजासत्ताकाची स्थापना करावी अशी काही क्रांतिकारकांची मागणी होती. मात्र राजेशाहीची समाप्ती केल्यास प्रमुख युरोपीय सत्तांचा रोष ओढवण्याची शक्यता होती. इंग्लंडसारखी घटनात्मक राजेशाही निर्माण करण्याचे ठरविण्यात आले व ऑर्लेआं घराण्यातील लुई फिलीप यास फ्रान्सच्या राजेपदावर बसविण्यात आले.

**क्रांतीचे परिणाम:**

**प्रजेचे सार्वभौमत्व :**

१८३० च्या क्रांतीने फ्रान्समध्ये हे जाहीर झाले की फ्रान्समधील राजाची सत्ता ही प्रजेची इच्छा नियंत्रित करेल फ्रेंच राज्यक्रांती हा एक अपघात नसून तो विचारपूर्वक घडून आलेली क्रांती आहे या या क्रांतीने फ्रान्समधील व युरोपातील राजसत्तेला संदेश दिला की जनता ही सार्वभौम असते. सामाजिक करारा चे पालन राजा करत नसेल तर त्याची सत्ता उलटवण्याचा अधिकार जनतेला आहे हे फ्रान्सचा जनतेने दाखवून दिले.

**लुई फिलीपचे मवाळ धोरण:**

८३० च्या क्रांतीनंतर लुई फिलीप याला फ्रान्सच्या राजेपदी बसवण्यात आले जनतेचे हेच लक्षात घेऊनच सत्ता चालवावी लागते हे या क्रांती नंतर कळाले त्यामुळे किमान सुरुवातीस त्यांचे धोरण मवाळ होते त्याने राजसत्ता अनियंत्रित राबवण्याचा प्रयत्न केला नाही.

**राजेशाही समर्थक कडव्या गटाचा अंत:**

फ्रान्स मध्ये भाषण, लेखन व धार्मिक स्वातंत्र्य बहाल करण्यात आले. जनतेच्या इच्छेनुसारच राजा राज्य करील, हे तत्त्व आता सर्वमान्य होऊन राजाची हुकूमशाही राजवट संपुष्टात आली. त्यामूळे जहाल आणि कडव्या राजसत्तावादी पक्षाचा शेवट झाला.

**इतर देशातील क्रांतीना प्रेरणा:**

फ्रान्समधील क्रांति युरोपातील देशांना क्रांतीची प्रेरणा दिली यात बेल्जियम इटली पोलंड जर्मनी इत्यादी राष्ट्रातील चळवळींचा समावेश होतो

**बेल्जियममधील क्रांती:**

'व्हिएन्ना काँग्रेस'ने फ्रान्सभोवती प्रबळ राष्ट्रांची एक साखळी तयार केली होती. फ्रान्सच्या उत्तरेस बेल्जियम व हॉलंड या दोन भिन्न पंथीय राज्याचे एकीकरण करून नेदरलँड नावाचे एक राष्ट्र तयार करण्यात आले; परंतु हॉलंडमधील डचांची भाषा, संस्कृती, धर्म इतिहास याबाबतीत बेल्जियमशी भिन्नता होती. अशी भिन्न परंपरा व जीवनरूढी असणारी दोन राज्ये एकत्र नांदणे अशक्य होते. बेल्जियमच्या जनतेने स्वातंत्र्यासाठी लढा सुरू केला. हॉलंडचा राजा विल्यम याच्याविरुद्ध उठाव करून राजाच्या लष्कराचाही पराभव केला आणि बेल्जियमच्या गादीवर बेल्जियम सॅक्से कोबर्गचा ड्यूक लिओपोल्ड यास बसविण्यात आले. बेल्जियमने ४ ऑक्टोबर १८३० रोजी स्वातंत्र्याची घोषणा केली. ब्रिटनचा परराष्ट्रमंत्री लॉर्ड पामर्स्टनच्या पुढाकाराने लंडन या ठिकाणी जुलै। १८३१ मध्ये युरोपातील बड्या देशांची परिषद भरविण्यात आली. या परिषदेत बेल्जियमच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्यात आली. बेल्जियम हा इ.स. १९१४ पर्यंत अशा रीतीने बेल्जियमने सर्वप्रथम 'व्हिएन्ना करारा' ला खिंडार पाडले. पावली.

**जर्मनी व इटलीतील चळवळी:**

इ.स. १८३० च्या क्रांतीचे पडसाद जर्मन प्रदेशात उमटले. ब्रन्सवीक, हॅनोव्हर, हेस्स कॅसल, सॅक्सनी, बव्हेरीया, दुर्टेम्बर्ग इत्यादी राज्यांमध्ये जनतेने चळवळी सुरू करून राज्यकर्त्यांकडे उदारमतवादी राज्यघटनांची मागणी केली. सुरूवातीला मेटरनिकने जर्मन राज्यांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे काही जर्मन राज्यात उदारमतवादी राज्यघटना मान्य करण्यात आल्या. पुढे मेटरनिकच्या दबावाखाली या जर्मन राज्यांनी जनतेला दिलेल्या सुधारणा काढून घेतल्या. इ.स. १८३० च्या क्रांतीचे पडसाद इटलीमध्ये उमटले. कार्बोनारी या गुप्त संघटनेच्या पुढाकाराने मध्य इटलीतील पार्मा, मोदेना व पोपची राज्ये येथील प्रजेने चळवळ सुरू केली. पण ऑस्ट्रियन सेनेने हे उठाव मोडून काढले व जुनी व्यवस्था पुन्हा प्रस्थापित केली.

**पोलंडमधील उठाव:**

व्हिएन्ना परिषदेच्या निर्णयानुसार पोलंडचा बराचसा भाग रशियाला देण्यात आला होता. ऑस्ट्रिया व प्रशियाला काही भाग मिळाला होता. रशियाच्या ताब्यातील पोलंडच्या प्रदेशात झार पहिला अलेक्झांडरच्या काळात काही प्रमाणात स्वायत्तता देण्यात आली होती. मात्र पहिल्या अलेक्झांडरच्या मृत्युनंतर रशियाचा झार बनलेल्या पहिला निकोलस याने पोलंडच्या प्रदेशात पुन्हा अनियंत्रित सत्ता गाजवण्यास सुरूवात केली. फ्रान्समधील जुलै १८३० च्या उठावाच्या यशाची बातमी कळताच पोलिश जनतेने वॉर्सा येथे रशियाविरूध्द उठाव केला. हा उठाव अल्पावधीत पोलंडच्या इतर भागात पसरला. पोलंडने स्वातंत्र्य जाहीर केले. रशियाने उठाव दडपण्यासाठी सैन्य पाठवले. पोलिश जनतेला फ्रान्स व ब्रिटनकडून मदत मिळाली नाही. रशियन सैन्याने पोलिश जनतेचा उठाव मोडून काढला व पोलंडचे स्वातंत्र्य पूर्णपणे नष्ट केले.

## ३.७ १८४८ ची क्रांती

१८३०च्या क्रांतीने फ्रान्समध्ये फिलिप यांची सत्ता स्थापन करण्यात आली होती. ही सत्ता मर्यादित राजेशाही या स्वरूपाची होती. त्यांच्यावर संसदेचे नियंत्रण होते परंतु सुरुवातीस उदारमतवादी असणारा लुई फिलिपी हा राजा आता अमर्याद सत्ता गाजवण्याचा प्रयत्न करू लागला त्याच्या धोरणामुळे फ्रान्स फ्रान्सचे अर्थव्यवस्था डबघाईस आली. त्याच्यावर फ्रान्समधील वेगवेगळे गट नाराज होऊ लागले त्याच्या परराष्ट्र व अंतर्गत धोरणांचा परिणाम म्हणून फ्रान्समध्ये १८४८ मध्ये क्रांती झाली या क्रांतीने लुई फीलीपला सत्तेवरून काढून टाकल्या गेले.

**क्रांतीची कारणे:**

**फिलिपचा एकतंत्री राज्यकारभार:**

सत्तेवर आल्यानंतर लुई फिलिपने संसदीय शासनपद्धतीप्रमाणे राज्य केले जाईल, असे जाहीर केले; परंतु त्याला सर्वसत्ताधीश होण्याची इच्छा होती. अंतर्गत सर्व शत्रूचा बंदोबस्त केल्यानंतर त्याने आपल्या तंत्रानुसार राज्यकारभारास सुरवात केली. राजाचे त्याच्या एकतंत्री राज्यकारभारामुळे अनेकदा मंत्र्यांशी खटके उडाले. त्यामुळेच लुई अप्रिय झाला.

**राजाचा सुधारणांना विरोध:**

लुई फिलिपने राजकीय व सुधारणा करण्याचा प्रयत्न केला नाही. त्याचा मुख्यमंत्री गिझॉँ हा प्रतिगामी होता. देशात अधिक सुधारणा घडवून आणू नये, असे केल्यास धोका होईल, असे त्यास वाटत होते. त्यामुळेच त्याने कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठी कोणतेही कायदे केले नाहीत. मतदान पात्रता वाढविली नाही. थोडक्यात, गिझा आणि फिलिप या दोघांचाही पुरोगामी धोरणास सक्त विरोध होता. त्यामुळे देशात कोणत्याही सुधारणा झाल्या नाहीत, म्हणूनच फ्रेंच लोकांना गिझॉँ आणि फिलिपीचा वीट आला होता. त्यामुळे क्रांतीसाठी पोषक वातावरण निर्माण झाले.

**फिलिपचे परराष्ट्र धोरण:**

फिलिपचे परराष्ट्र धोरण होते. त्याच्या मिळमिळीत व नाकर्तेपणाच्या धोरणामुळे लोकांत असंतोषाची लाट पसरली. त्यामुळे १८४८ क्रांती झाली. लुई फिलिप हा भित्रा व स्वार्थी होता. ब्रिटनबरोबर वितुष्ट नको म्हणून त्याने मुख्यमंत्री थिअर्सची उचलबांगडी केली. नेपोलियन च्या काळात परराष्ट्र धोरणामुळे फ्रान्स ची प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात वाढले होते फ्रेंच नागरिकांना त्याची जाणीव होते त्यामुळे त्यांना फीलिपचे परराष्ट्र धोरण पसंत पडले नाही.

**कामगारवर्गातील असंतोष:**

औद्योगिक क्रांतीमुळे देशात अनेक नवनवीन कारखाने उभारण्यात आले, तसेच समाजात कामगारवर्गाचा उदय झाला. फिलिपीने कामगारांच्या स्थितीत सुधारणा करण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. उलट कामगारांवर दडपशाही करून त्यांच्या संघटना निर्माण होऊ नये, यासाठी अनेक कायदे मंजूर केले. त्यामुळे हा कामगारांमध्ये असंतोष पसरला.

**क्रांतीचे मार्गक्रमण:**

सुरुवातीस उदारमतवादी असलेला लुई फिलीप आता अनियंत्रित सत्ताधीश बनला होता. तो मूख्यमंत्री गिझाँच्या मार्फत आपली सत्ता राबवत होता. या अनियंत्रित सत्तेला व परराष्ट्रीय धोरणाला कंटाळून फ्रान्समधील जनतेने गिझाँविरूध्द निदर्शने करण्यास सुरूवात केली. जनतेचा असंतोष वाढत होता. मात्र चेंबर ऑफ डेप्युटीजचा पाठिंबा असलेल्या मंत्रिमंडळाने निष्क्रियतेचे धोरण स्वीकारले. मतदानाची पात्रता वाढविणे व संसदीय पध्दती अंमलात आणणे यासाठी चळवळ सुरू झाली. त्यात समाजवादी व प्रजासत्ताकवाद्यांचा महत्त्वाचा सहभाग होता. इ.स. १८४७ मध्ये सुधारणांची मागणी करण्यासाठी विरोधकांनी विशेष समारंभ भरविण्यास सुरूवात केली. राजनिष्ठांनीही राजाच्या धोरणाला विरोध सुरू केला. सुधारणावाद्यांचा एक मेळावा २२ फेब्रुवारी १८४८ रोजी पॅरिस येथे भरणार होता. पण सरकारने त्यावर बंदी घातली. तरीदेखील विद्यार्थी, कामगार व इतर लोकांचा जमाव मेळाव्याला जमला व सुधारणांसाठी घोषणा देण्यात आल्या. २३ फेब्रुवारीला नॅशनल गार्डना सुव्यवस्थेसाठी बोलावण्यात आले मात्र नॅशनल गार्ड आंदोलकांना जाऊन मिळाले. सुधारणा चिरायु होवोत, गिझाँ मुर्दाबाद अशा घोषणा देण्यात आल्या. गिझाँने राजीनामा दिला. प्रजासत्ताकवाद्यांनी गिझाँच्या निवासस्थानापुढे निदर्शने केली. गिझाँच्या सुरक्षारक्षकांनी निदर्शकांवर गोळीबार केला. २३ निदर्शक मारले गेले. प्रजासत्ताकवाद्यांनी प्रेतांची मिरवणूक काढली व लुई फिलीपबद्दल जनतेमध्ये प्रतिकूल मत तयार केले. पॅरिसच्या रस्त्यांमध्ये मोर्चे आले व निदर्शनाचे रूपांतर क्रांतीमध्ये झाले. शेवटी २४ फेब्रुवारी १८४८ रोजी लुई फिलीपने आपल्या नातवास वारस नेमून राज्यत्याग केला व तो इंग्लंडला पळून गेला. अशारीतीने पॅरिसच्या जनतेने पुन्हा एकदा राजेशाही उधळली. प्रजासत्ताकवाद्यांनी व समाजवाद्यांनी फ्रान्समध्ये प्रजासत्ताक राज्याची घोषणा केली. यालाच दुसरे प्रजासत्ताक म्हणतात. लामार्तिन या प्रजासत्ताकवादी नेत्याच्या नेतृत्वाखाली हंगामी सरकार स्थापन करण्यात आले .जुलै १८३० च्या क्रांतीस तुलनेत १८४८ ची क्रांती प्रगतीवादी होती. या क्रांतीने राजेशाही, समाजव्यवस्था व अर्थव्यवस्थेवर कठोर प्रहार केले. १८३० ची क्रांती मध्यमवर्गीयाची क्रांती होती, तर १८४८ ची क्रांती कामगार व समाजवादी नेत्यांनी घडवून आणली

**क्रांतीचे परिणाम:**

१८३० च्या क्रांती प्रमाणे ह्या क्रांतीचेही परिणाम फ्रान्स आणि युरोपभर झाले. फ्रान्समध्ये सत्तेचे स्वरूप अजून समावेशक झाले तर युरोपमधील वेगवेगळ्या राष्ट्रातील क्रांत्यांना प्रेरणा मिळाली. यातून युरोपचा नकाशा बदलला.

**ऑस्ट्रियातील उठाव:**

नेपोलियनच्या पाडावानंतर मेटरनिक नेतृत्वाखाली ऑस्ट्रेयाने युरोपमध्ये आपले वर्चस्व टिकवून ठेवले होते या साम्राज्याला तडा देण्याचे कार्य फ्रान्समधील १८४८ क्रांतीनंतर होऊ लागले ऑस्ट्रियाच्या साम्राज्यातील वेगवेगळ्या ठिकाणी उठाव होऊ लागले यामध्ये हंगेरी, इटली, जर्मनी, बोहेमिया इत्यादींचा समावेश होतो. फ्रान्समधील क्रांतीनंतर मार्च १८४८ मध्ये प्रतिगाम्यांचा बालेकिल्ला असलेल्या ऑस्ट्रियात उठाव झाला. विद्यार्थी व कामगार यांनी मेटरनिकच्या पदच्यूतीची मागणी करत रस्त्यांवर मोर्चे काढले. हे निदर्शक

विधिमंडळातही घुसले. अखेर मेटरनिकने पदत्याग केला व तो इंग्लंडला पळून गेला. मेटरनिकचे पलायन म्हणजे त्याची पध्दती कोसळण्याची निशाणी होती. निदर्शन वाढू लागली तेव्हा ऑस्ट्रियन राजा फर्डिनंड याने एप्रिल १८४८ मध्ये नवीन राज्यघटना जाहीर केली पण त्यामुळे जनतेचे समाधान झाले नाही. राजाला पळून जावे लागले. नवीन घटनासमितीने घटनात्मक राजसत्तेला पाठिंबा दिल्याने राजाला पुन्हा बोलावण्यात आले. फर्डिनडने त्याला एकनिष्ठ असलेल्या सैन्याच्या साह्याने क्राती दडपून टाकली. फ्रान्समधील क्रांतीची बातमी हंगेरीत पोहोचली. हंगेरीतील माम्मार या बहुसंख्य जमातीचा नेता कोनुथ माने ३ मार्च १८४८ रोजी भाषण करून मेटरनिकच्या प्रतिगामी राजवटीवर टीका केली. या भाषणाचे पडसाद ऑस्ट्रियात उमटून मेटरनिकला पळून जावे लागले. व्हिएन्नातील उठावाच्या बातमीने हंगेर उठाव झाले. १५ मार्चला कोसुधच्या प्रभावाखाली हंगेरीच्या विधिनडळाने कायदे संमत करून लोकशाही घटना व सरकार स्थापन करण्यात आले. मात्र ही कांती काही काळ टिकली. ऑस्ट्रियात प्रतिगामी सत्तेची पुनः स्थापना झाली. ऑस्ट्रियाने हंगेरीतील बहुसंख्य क्रोट व स्लाव या अल्पसंख्यांकांना चिथावणी देण्यात आली. त्याच्या संघर्षाचा फायदा घेऊन ऑस्ट्रियाने हंगेरीवर हल्ला चढवला व क्रांती चिरडली. ऑस्ट्रियाच्या ताब्यातील बोहेमियात उठाव होऊन १९ मार्च १८४८ रोजी उदारमतवादी घटनेची मागणी करण्यात आली. बोहेमियाला स्वातंत्र्य मिळाले पण बोहेमियातील बहुसंख्य झेक लोक व अल्पसंख्य जर्मन लोक याच्यात फूट पडली. त्याचा फायदा घेऊन ऑस्ट्रियाने बोहेमियातील उदारमतवादी चळवळ दडपली.

इटली व जर्मनीतील उठाव ऑस्ट्रियाच्या ताब्यातील व्हेनेशिया व लोम्बाडी या इटालियन प्रदेशात उदारमतवादी राज्यघटनेची मागणी करण्यात आली. व्हेनिसमध्ये प्रजासत्ताक स्थापन झाले. मामा, मोदेना, टस्कनी या इटालियन राज्यातही उठाव झाले. मात्र ऑस्ट्रियन सैन्याने हे उठाव दडपले. फ्रान्समधील क्रांतीपासून प्रेरणा घेऊन बर्लिनच्या जनतेने मार्च १८४८ मध्ये प्रशियाच्या राजाविरूध्द उठाव केला व उदारमतवादी घटना मागितली. प्रशियन राजाला जनतेच्या मागण्या मान्या कराव्या लागल्या, जर्मन प्रदेशातील इतर राज्यातही उठाव झाले. जर्मन राष्ट्रीय सभेची फ्रैंकफुर्ट येथे बैठक मरून जर्मन राष्ट्राचे राजेपद प्रशियन राजाला देऊ केले. मात्र ऑस्ट्रियाच्या भितीने प्रशियन राजाने नकार दिला.

**१८४८ च्या क्रांतीचे महत्त्व :**

या क्रांतीमुळे फ्रान्समध्ये मतदानाचा अधिकार विस्तारला १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर किमान तीन वेळेस राजा विरुद्ध उठाव झाले. फ्रान्सची जनता राजेशाही स्वीकारू शकत नाही आणि असलीच तर ती कोणत्याही स्वरूपात अनियंत्रित नसावे हे फ्रान्सच्या जनतेने दाखवून दिले या क्रांतीनंतर युरोपात पुन्हा क्रांती सत्र सुरू झाले यातूनच इटली व जर्मनी येथील एकीकरण चळवळीला बळ मिळाले. फ्रान्स मध्ये कामगार व समाजवाद्याचे महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले फ्रांस मधील मध्यमवर्गात ला कामगार वर्गाचे महत्त्व पटू लागले या क्रांतीने युरोपातील संयुक्त व्यवस्था मोडीत काढण्यास सुरुवात केली.

## ३.८ सारांश

नेपोलियन च्या पतनानंतर युरोप मध्ये मेटरनिक युग सुरु झाले या युगाचे वैशिष्ट्य म्हणजे युरोपातील बडा सत्ता एकत्र येऊन त्यांनी सहकार्याच्या माध्यमातून आपापले हितसंबंध जपण्याचा प्रयत्न केला हे जपत असताना त्यांनी युरोपातील एक राष्ट्रीयत्वाचा चवळी वेगवेगळे उठाव मोडून काढले. नेपोलियनचा पाडाव करण्यासाठी ही राष्ट्रे एकत्र आली होती त्यामुळे नेपोलियन नंतर या राष्ट्रांना जोडून ठेवेल असा दुवा लवकरच नष्ट झाला प्रत्येक राष्ट्र आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्याचा प्रयत्न करत होते यातूनच या राष्ट्रांमध्ये मतभेद सुरू झाले व संयुक्त युरोपची अखेर झाली. या काळातच फ्रान्समध्ये १८३० व १८४८ मध्ये क्रांत्या झाला या क्रांतीने फ्रान्स या जनतेने पुन्हा एकदा सुरुवातीला राजेशाही व नंतर प्रजासत्ताक या दोन्ही प्रयोगाचा अनुभव घेतला. या क्रांतीने युरोपातील इतर देशांना प्रभावित केले हा कालखंड युरोपचा इतिहासाला कलाटणी देणारा ठरला.

## ३.९ प्रश्न

१. व्हिएन्ना परिषदेच्या कामगिरीचे मूल्यमापन करा

२. संयुक्त युरोप या व्यवस्थेच्या कार्याचे परीक्षण करा.

३. १८३० च्या क्रांतीची कारणे लिहा

४. १८४८ च्या क्रांती चा आढावा घ्या.

**टीपा लिहा**

१) पवित्र संघ

२) चतुसंघ

३) लुई फीलीपी

४) ट्रोपाऊची परिषद

## ३.१० संदर्भ


- कॅमेरून एवान अर्ली मॉडर्न युरोप,ऑक्सफर्ड,२००१
- लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५
- डॉ.सौ. वैद्य, सुमन, आधुनिक जग, नागपूर, २००२.
- प्रा. दीक्षित, नी.सी., पाश्चिमात्य जग, नागपूर, जून २००५.
- कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९


*****

munotes.in

# ४

# युरोपातील कृषी क्रांती

**घटक रचना**

४.१ उद्दिष्टे

४.२ प्रस्तावना

४.३ कृषी क्रांतीची पार्श्वभूमी

४.४ कृषी क्रांतीची कारणे

४.५ कृषी क्रांतीचे स्वरूप

४.५.१ सोळाव्या शतकातील कृषी क्रांती

४.५.२ अठराव्या शतकातील कृषीक्रांती

४.५.३ एकोणिसाव्या शतकातील कृषी क्रांती

४.६ कृषी क्रांतीचे परिणाम आणि महत्व

४.७ सारांश

४.८ प्रश्न

४.९ संदर्भ

## ४.१ उद्दिष्टे

१. युरोपातील कृषी क्रांतीची पार्श्वभूमी समजावून घेणे.

२. युरोपातील कृषी क्रांतीच्या कारणांचा मागोवा घेणे.

३. युरोपातील कृषी क्रांतीचे स्वरूप समजून घेऊन तिच्या विविध टप्प्यांचा परामर्श घेणे.

४. युरोपातील कृषी क्रांतीचे परिणाम आणि महत्व यावर चर्चा करणे.

## ४.२ प्रस्तावना

आधुनिक कालखंडाच्या सुरुवातीला युरोपीय समाजाचा मुख्य व्यवसाय शेती होता. युरोपमध्ये सुरू असलेल्या पुनरुज्जीवन चळवळीचे परिणाम शेती क्षेत्रात इंग्लंडमध्ये सर्वप्रथम दिसून आले. कालांतराने इतर युरोपीय देशांमध्ये याचा प्रसार झाला. शेती मध्ये झालेले हे परिवर्तन आकस्मिक झालेले नसून विविध टप्प्यामध्ये ही कृषी क्रांती साकार झालेली दिसून येते. (या ठिकाणी कृषी क्रांतीचा अर्थ रक्तपात किंवा अचानक झालेले राजकीय बदल असा घेण्यात आलेला नसून) कृषी उत्पादन प्रक्रियेत आणि उत्पादनाच्या साधनांमध्ये झालेले मोठे बदल या अर्थाने कृषी क्रांती हा शब्द वापरण्यात आलेला आहे. सोळाव्या शतकापासून अठराव्या शतकापर्यंत युरोपमध्ये कृषी क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल घडून आले. कृषी क्षेत्रामध्ये नवीन मशागतीची साधने व नव्या उत्पादन प्रक्रिया यामध्ये मोठे



munotes.in

संशोधन झाले. त्यामुळे शेतीच्या उत्पादनामध्ये आश्चर्यकारक वाढ होऊन शेतकरी मोठ्या प्रमाणात नफा कमावू लागले. या महत्त्वपूर्ण बदलाला युरोपमधील कृषीक्रांती असे म्हटले जाते. इंग्लंडमधील ही कृषी क्रांती जगाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना आहे. या कृषी क्रांतीचे अनेक आर्थिक, सामाजिक, राजनीतिक आणि सांस्कृतिक प्रभाव दिसून आले ज्यामुळे युरोपचा इतिहासाची दिशाच बदलून गेली. इसवी सन १६०० मध्ये प्रारंभ झालेले कृषी क्षेत्रातील हे बदल सावकाश होते, परंतु सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात अमुलाग्र परिवर्तन होऊन इंग्लंडमध्ये कृषी क्रांती झाली, म्हणून काही विद्वान सतराव्या व अठराव्या शतकास कृषी क्रांतीचा कालखंड मानतात. कृषी क्रांती सर्वप्रथम इंग्लंडमध्ये घडुन आली, नंतर त्याचे परिणाम इतर युरोपीय देशांमध्ये दिसून आले. या कृषी क्रांतीचे मानवी जीवनावर आमूलाग्र व दीर्घकालीन परिणाम दिसून आले. इंग्लंड मध्ये झालेल्या या कृषी क्रांती व औद्योगिक क्रांतीमुळे पुढील काही शतके इंग्लंडने जगावर राज्य केले. अशा या कृषी क्रांतीचे स्वरूप समजून घेण्या अगोदर इंग्लंडमधील शेतीची पार्श्वभूमी माहित असणे आवश्यक आहे.

## ४.३ कृषि क्रांतीची पार्श्वभूमी

मध्ययुगीन काळात शेती हाच युरोपातील जनतेचा प्रमुख व्यवसाय होता. शेती परंपरागत पद्धतीने केली जात असे. अधिक उत्पादन घेण्यासाठी कोणतीही रसायने किंवा खते वापरली जात नव्हती. दरवर्षी शेतीतून पिके घेतल्यास जमिनीचा कस कमी होतो म्हणून एक वर्ष जमीन पडीक ठेवली जात असे. त्यामुळे शेतीतील उत्पानाचे प्रमाणही मर्यादित होते.मध्ययुगीन काळात युरोपीय देशांमध्ये सरंजामशाही व्यवस्था प्रचलित होती. या व्यवस्थेत सरंजामदार व भूदास हे दोन वर्ग होते. जमिनीची मालकी सरंजामदारांकडे होती तर भूदास हे सरंजामदार यांचे कुळ म्हणून शेती कसण्याचे काम करीत असे. सरंजामदार यांच्या नियंत्रणाखालील 'मॅनॉर' म्हणजे एक स्वयंपूर्ण वसाहत असे. या मॅनॉर मध्ये जमिनीची मालकी असणारे सरंजामदार व जमीनदार आणि शेतीत प्रत्यक्ष कष्ट करणारे भूदास या वर्गाचा समावेश होता. सरंजामदार, त्याच्यापेक्षा लहान सरंजामदार, त्यानंतर स्वतंत्र शेतकरी व शेवटी भूदास यांचे परस्पर संबंध त्यांच्या शेती विषयक करारावरच अवलंबून असे. मॅनॉर मधील सर्व जमिनीवर सरंजामदार यांचे नियंत्रण असे. या जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नाचा ठराविक हिस्सा सरंजामदार यांना मिळत असे. मॅनॉरमधील समाजाच्या बहुतांश गरजा स्थानिक पातळीवरच भागवल्या जात असल्याने मॅनॉरमधील समाजाचा बाह्य जगाबरोबर फारसा संबंध येत नव्हता. शेतीतून स्वतःच्या वाट्याला येणाऱ्या अल्पशा उत्पन्नात आपला चरितार्थ चालवणे भूदासानां अशक्यप्राय होत असले तरी परंपरागत बंधनानुसार त्यांना मॅनॉर सोडून जाण्याची परवानगी नव्हती. शेतीतून आलेल्या उत्पन्नावर सरंजामदार चैनीचे जीवन जगू शकत असल्याने शेतीच्या सुधारणेविषयी किंवा उत्पादन वाढीसाठी सरंजामदार कोणतेही प्रयत्न करीत नसे. शहरांच्या झालेला विकास, व्यापारी वर्गाचा झालेला उदय, इतर शहरांबरोबर वाढत गेलेला संपर्क, जमिनीच्या मालकी हक्कात झालेले बदल, भूदासांनी स्वातंत्र्यासाठी सुरू केलेली धडपड, सेवेबद्दल रोख मोबदला घेण्याची सुरू झालेली पद्धत, सरंजामदारांच्या न्यायविषयक अधिकारांचा झालेला संकोच, धर्म युद्धामुळे भूदासांना मिळालेले स्वातंत्र्य, समाजाचा बदललेला दृष्टिकोन अशा विविध घटकांचा परिणाम होऊन नंतरच्या काळात सरंजामशाही पद्धती हळूहळू लयास जाऊ

munotes.in

लागली. सरंजामशाही पद्धतीच्या ह्रासाबरोबरच जुन्या जमीनविषयक संबंधात मोठ्या प्रमाणात बदल घडून येण्यास सुरुवात झाली. मॅनॉरमधील शेतीचे तंत्र मागासलेले होते. मॅनॉर मधील समाजाच्या गरजा भागवण्याच्या उद्देशानेच या काळात शेतीचा व्यवसाय केला जात होता. तथापि नंतर मात्र शेतीकडे एक व्यवसाय म्हणून पाहण्यास सुरुवात झाली. शेतीच्या लागवडीचे तंत्र व उत्पादनाची वैशिष्ट यात बदल झाला. शेती व्यवसायाच्या एकूण स्वरुपात परिवर्तन घडून येण्यास प्रारंभ झाला. या परिवर्तनासच शेती व्यवसायातील क्रांती म्हणून ओळखले जाते. प्रामुख्याने पुनरुज्जीवनाच्या चळवळीचा प्रारंभीच शेतीव्यवसायात घडून आलेल्या या कृषी क्रांतीचे दीर्घकालीन सामाजिक व आर्थिक परिणाम घडून आले.

## ४.४ कृषी क्रांतीचे कारणे

### १. शेतीचे व्यवसायिकीकरण:

मध्ययुगीन काळातील सरंजामशाही पद्धतीत शेती परंपरागत पद्धतीने व केवळ स्थानिक समाजाच्या गरजा भागवण्याच्या दृष्टिकोनातून केली जात असे. शेतीसाठी कोणत्याही नव्या तंत्राज्ञानाचा उपयोग केला जात नव्हता. शेतीचा कस टिकावा म्हणून शेतीचा काही भाग दरवर्षी पडीक ठेवला जात होता. तथापि मध्ययुगाच्या अखेरीस इंग्लंड व इतर पाश्चिमात्य राष्ट्रांमधील समाजव्यवस्थेत आमूलाग्र बदल घडून आले. नवीन शहरे उदयाला आली. नव्या जलमार्गाच्या शोधामुळे व्यापार व उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली समाजात नव्याने उदयास आलेल्या व्यापारी वर्गास व मध्यमवर्गास समाजात महत्व प्राप्त झाले. या बदलामुळे शेतीचे समाजात असलेले मध्यवर्ती व्यवसायाचे स्थान व सरंजामदार वर्गाचे महत्व कमी होण्यास सुरुवात झाली. जमीनमालकांना शेतीकडे व्यवसायिक दृष्टीने पाहण्याची गरज वाटू लागली. केवळ स्थानिक लोकांच्या गरजा भागवणे एवढेच मर्यादित उद्दिष्ट ठेवता शेतीतील उत्पादनातून नफा मिळविण्याचे उद्दिष्ट ठरवले गेले . या व्यावसायिक भूमिकेतून जमीन मालक व स्वतंत्र शेतकऱ्यांनी शेती करण्यास सुरुवात केली. मध्ययुगातील सरंजामदार वर्गाला हा बदल थांबवता आला नाही. शेती संदर्भात या बदललेल्या दृष्टिकोनाने कृषी क्षेत्रात आमूलाग्र स्वरूपाचे परिवर्तन घडून आणले. शेतीच्या व्यवसायिकीकारणामुळे शेती क्षेत्रातील कृषी क्रांतीला गती मिळाली.

### २. कुंपण चळवळ:

पुनरुज्जीवनाच्या काळात ज्याप्रमाणे ज्ञान-विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात संशोधन केले गेले, त्याचप्रमाणे शेतीच्या बाबतीतही व्यवसायिकीकरणाच्या भूमिकेतून काही नवे संशोधन केले गेले. नव्या पद्धती स्वीकारल्या गेल्या. 'कुंपण घालण्याची चळवळ' ही त्यापैकीच एक होय. या कुंपण चळवळीने शेतीतील उत्पादनात फायदेशीर बदल घडवून आणला. शेतीच्या परिवर्तनाला या पद्धतीमुळे चालना मिळाली. सोळाव्या शतकाच्या प्रारंभानंतर इंग्लंडमध्ये व्यापाराला चालना मिळाली. त्यातही लोकरीचा व्यापार अधिक फायदेशीर असल्याने महत्त्वाचा ठरला. त्यामुळेच इंग्लंडमध्ये लोकरीच्या कापडाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाऊ लागले. लोकरीच्या कापडाच्या वाढत्या उत्पादनामुळे लोकरीला मोठ्या प्रमाणावर मागणी येण्यास सुरुवात झाली. सहाजिकच जमीन मालकांनी शेतातून शेती उत्पादने घेण्याऐवजी शेतीला कुंपण घालून मेंढपाळीचा व्यवसाय करण्यास सुरुवात केली.

या काळात अन्नधान्याच्या उत्पादनापेक्षा मेंढपाळीचा व्यवसाय फायद्याचा ठरत होता. एखाद्या वर्षी शेतातून अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर आले तर बाजारात या धान्याची किंमत कमी होत असे. परिणामतः अधिक उत्पादन काढूनही शेतकऱ्यांना निश्चित स्वरूपाचा फायदा होत नसे. म्हणून निश्चित स्वरूपाच्या व अधिक फायदा मिळवून देणाऱ्या मेंढपाळाचा व्यवसायाकडे शेतकऱ्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. शेतीला कुंपण घालून कुरण वाढविण्यास शेतकऱ्यांनी सुरुवात केली केली. या वाढलेल्या कुराणात त्यांनी मेंढ्या पाळण्याचा व्यवसाय सुरू केला. या कुराणांमधून मेंढ्यांची चांगली जोपासना होत असे व त्यापासून मोठ्या प्रमाणावर लोकर व मांस मिळत असे. अन्नधान्याच्या उत्पादना पेक्षा मेंढ्या पाळण्याचा व्यवसाय कमी खर्चाचा, कमी त्रासाचा व जास्त नफा मिळवून देणारा असल्याने इंग्लंडमधील जमीनदार वर्ग मोठ्या प्रमाणावर मेंढा पाळण्याच्या व्यवसायाकडे व शेतीला कुंपण घालण्याच्या चळवळीकडे आकर्षित झाला.

### ३. शेतीची तुकडे बंदी:

सोळाव्या शतकातील शेती क्षेत्रातील क्रांतीने व कुंपण चळवळीने शेतीच्या एकत्रीकरणास चालना मिळाली. शेतीचे लहान लहान तुकडे असल्यास शेती करणे फायदेशीर नसते. या काळात जमीन मालकांनी जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण करून सलग जमिनी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे कुंपण घालण्यासाठी सलग जमीन उपलब्ध होणे शक्य झाले. निरनिराळ्या तुकड्यांना कुंपण घालण्यापेक्षा एकत्रीकरण केलेल्या जमीनीला कुंपण घालने कमी खर्चाचे व उत्पादनाच्या दृष्टीने फायदेशीर ठरत असल्याने या काळात शेतीच्या एकत्रीकरणात चालना मिळाली. एकत्रीकरण केलेल्या जमिनीत कुरण वाढवणे व मेंढ्या पाळण्याचा व्यवसाय करणे सुलभ झाले.

### ४. जमिनीच्या मालकी हक्कात झालेल बदल:

सोळाव्या शतकात सुरू झालेल्या कुंपण चळवळीचे व शेतीच्या एकत्रीकरणाचे दीर्घकालीन परिणाम दिसण्यास सुरुवात झाली होती. मध्ययुगीन काळात सरंजामदार व जमीनदार मोठ्या जमिनीचे मालक होते. त्याचप्रमाणे काही स्वतंत्र शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनी होत्या. तथापि सोळाव्या शतकात या जमीनदार व सरंजामदार यांनी जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण केल्यानंतर त्यांच्याबरोबर उत्पादनाच्या व किंमतीच्या बाबतीत स्पर्धा करणे लहान शेतकऱ्यांना अशक्य बनले. त्यामुळे त्यांनी आपली शेती या मोठ्या जमीनदार वर्गाला विकण्यास सुरुवात केली. सहाजिकच यामुळे जमिनीच्या मालकी हक्कात बदल होण्यास सुरुवात झाली. शेती व्यवसायाचे केंद्रीकरण होऊ लागले. या जमीनदारांनी शेतीवर मजूर लावून त्यांच्याकडून शेती कसण्यास सुरुवात केली. या मजुरांना रोख वेतन देण्यास सुरुवात झाली. त्यामुळे सरांजमशाहीची शेवटची परंपराही नष्ट झाली. जमिनीची विक्री केलेल्या शेतकऱ्यांनी शहरात जाऊन कारखान्यांमध्ये काम करण्यास सुरुवात केली.

### ५. लोकसंख्येतील वाढ:

लोकसंख्येच्या वाढीमुळे खाद्यान्नाची मागणी सतत वाढत गेली. त्यामुळे कृषी क्षेत्रात सुधारणा करणे आवश्यक झाले. खाद्यान्नाच्या अधिकच्या मागणीमुळे शेतीमध्ये नव्या उत्पादन प्रक्रियांचे प्रयोग केले जाऊ लागले. चांगल्या प्रतीचे बी-बियाणे आणि शेती

उपकरणांचा प्रयोग केल्या जावू लागला. त्यामुळे कृषी उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्याचप्रमाणे कृषी उत्पन्नाच्या वाढलेला मागणीला पूर्ण करण्यासाठी जास्तीत जास्त जमिनीवर शेती केली जाऊ लागली. युद्धामध्ये नष्ट झालेल्या जमिनी तसेच दलदली खालील जमीनीवर सुद्धा शेती केल्या जाऊ लागली. परिणामी कृषी उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होण्यास मदत झाली.

**६. उत्पादन पद्धतीतील बदल:**

शेतीच्या परंपरागत उत्पादन पद्धतीमुळे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ शकत नाही याची जमीनदार वर्गास जाणीव झाली होती. नवीन शोधांमुळे विकसित झालेल्या तंत्रज्ञानाचा उपयोग करून शेती केल्यास उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ होते हे लक्षात आल्याने या वर्गाने शेतीमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास सुरुवात केली त्यामुळे शेतीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

**७. गुंतवणुकीस नवे क्षेत्रत्र मिळाले:**

नव्या जल मार्गांच्या शोधांमुळे व इंग्लंडमध्ये स्वीकारण्यात आलेल्या व्यापारवादी धोरणामुळे इंग्लंडचा परराष्ट्र व्यापार वाढत गेला. या व्यापारात मोठ्या प्रमाणावर फायदा होत असल्याने इंग्लंडमध्ये या काळात श्रीमंत व्यापारी वर्ग उदयास आल. नवीन तंत्रज्ञानाद्वारे उत्पादनात वाढ होते व शेती फायदेशीर ठरते हे लक्षात आल्यानंतर श्रीमंत व्यापारी वर्गाने शेतीत भांडवलाची गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. त्यामुळे भांडवल गुंतवणूक करण्यास या वर्गाला एक नवे क्षेत्र मिळाले. यामधून कृषी क्रांतीला चालना मिळाली.

**८. कच्च्या मालाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता:**

पुनरुज्जीवनाच्या चळवळीनंतर करण्यात आलेल्या मोठ्या प्रमाणावरील संशोधनामुळे विविध शोधांना चालना मिळाली. नवनवीन विज्ञान व त्यावर आधारलेले तंत्रज्ञान विकसित झाले. या विज्ञान तंत्रज्ञानाचा उपयोग करून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करता येते याची जाणीव झाल्यावर विविध स्वरूपाचे मोठे उद्योग उभारले गेले. श्रीमंत बनलेल्या व्यापारी वर्गाने भांडवलाचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा करून या उद्योगातील उत्पादनाला चालना दिली. या उद्योगाच्या निर्मितीमुळे कच्च्या मालाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली. या कच्च्या मालाची गरज शेतीतून येणाऱ्या उत्पादनातून भागवणे शक्य झाले. कच्च्या मालाच्या या गरजेतूनच कृषी क्रांतीला गती मिळाली.

## ४.५ कृषी क्रांतीचे स्वरूप

युरोपातील कृषी क्रांती ही आकस्मित घडलेली घटना नव्हती. इसवी सन १६०० नंतर सावकाशपणे कृषी क्षेत्रामध्ये परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. सुरुवातीला ह्या बदलाचे प्रमाण कमी होते, परंतु सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपमध्ये कृषी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन सुरू झाले आणि अठराव्या शतकामध्ये कृषी क्षेत्रामध्ये तीव्र गतीने बदल होऊन कृषी क्रांती झाली. येथे ध्यानात घेण्यासारखी बाब म्हणजे युरोपातील अलग अलग देशांमध्ये कृषी क्रांतीचा कालखंड वेगवेगळा आहे. कृषी क्रांती सर्व प्रथम इंग्लंडमध्ये

१६९० ते १७०० या कालखंडात झाली . तर रशिया आणि स्पेनमध्ये कृषी क्रांतीचा कालखंड १८६० ते १८७० हा मानला जातो. या कृषी क्रांती मध्ये झालेले क्रमिक बदल आणि त्यांचे स्वरूप याचा अभ्यास आता आपण करणार आहोत.

### ४.५.१ सोळाव्या शतकातील कृषी क्रांती:

सोळाव्या शतकात झालेल्या शेतीतील या क्रांतीने शेती व्यवसायाचे स्वरूप बदलून मॅनॉरची व्यवस्था व शेती करण्याची परंपरागत पद्धत पूर्णपणे नष्ट झाली. शेतीकडे व्यावसायिक दृष्टीने व अधिक नफा मिळवण्याच्या भूमिकेतून पाहिले जाऊ लागले. कुंपण चळवळीद्वारे शेती फायदेशीर करण्याचे प्रयत्न सुरू झाले. शेतीचे व्यवसायीकरण हे या काळातील कृषी क्रांतीचे वैशिष्ट्य ठरले. सोळाव्या शतकात शेतीच्या बाबतीत वरीलप्रमाणे क्रांती होऊन उत्पादन प्रक्रियेत बदल केले गेले. शेतीच्या मालकी हक्काचे केंद्रीकरण होऊन व्यावसायिक तत्त्वावर शेती करण्यास सुरुवात झाली. शेती अधिक फायदेशीर व्हावी या दृष्टीने प्रयत्न करण्यास या शतकात प्रारंभ झाला.

सोळाव्या शतकात शेतीच्या क्षेत्रात झालेली क्रांती सतराव्या शतकात गतिमान झाली नाही. या काळात शेतीतील बदलांचे प्रमाण मंद राहिले तथापि अठराव्या शतकात मात्र पुन्हा शेतीक्षेत्रातील प्रगतीला गती मिळाली. या शतकात शेतीमध्ये अनेक मोठ्या प्रमाणात बदल घडून आले.

### ४.५.२ अठराव्या शतकातील कृषी क्रांती:

इंग्लंडमध्ये सोळाव्या शतकामध्ये शेतीचे एकत्रीकरण करून कुंपण घालण्याची चळवळ सुरू झाली होती. या कुंपणामध्ये कुरण वाढवून मेंढपाळीचा व्यवसाय तेजीत होता. परंतु या कुंपन चळवळीला समाजाकडून व शासनाकडून विरोध झाल्याने ही चळवळ सतराव्या शतकात काही काळ थंडावली होती. तथापि अठराव्या शतकात या चळवळीला पुन्हा चालना मिळाली. अन्नधान्याची व कारखान्यांमध्ये लागणाऱ्या कच्च्या मालाची मागणी वाढत गेल्याने शेतीतून मोठ्या प्रमाणावर उत्पादन काढण्याची आवश्यकता निर्माण झाली. परंपरागत पद्धतीने व लहान-लहान शेतीच्या तुकड्यांमधून उत्पादन केल्यास ते किफायतशीर ठरत नाही म्हणून आठराव्या शतकात शेतीतून मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याच्या हेतूने या कुंपन चळवळीला पुन्हा गती प्राप्त झाली. शासनालाही वाढती मागणी लक्षात घेऊन अन्नधान्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढविणे गरजेचे वाटू लागले होते. याकाळात इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये जमीनदारवर्गाचा एक प्रभावी गट निर्माण झाला होता. या गटाचा सहाजिकच कुंपण चळवळीला पाठिंबा होता. जमीनदारवर्गाच्या प्रभावामुळे सरकार या चळवळीला विरोध करू शकले नाही. उलट या चळवळीला चालना देणारे कायदे सरकारला संमत करावे लागले. जमीनदारांचा प्रभावामुळे १७६० पर्यंत २०० कुंपण कायदे तयार केले गेले. तर १७६० ते १८४० या काळात १५०० हून अधिक कुंपण विषयक कायदे संमत करून पार्लमेंटने या चळवळीला प्रोत्साहनच दिले. या काळात शेतीच्या लहान लहान तुकड्यांचे एकत्रीकरण करण्यात येऊन ६० लाख एकर जमिनीला कुंपण घालण्यात आले. शेतीचे एकत्रीकरण केल्यास कुंपन घालणे फायदेशीर ठरते तसेच शेतीतून मोठ्या प्रमाणावर व कमी खर्चात उत्पादन घेणे शक्य होते. लहान आकाराच्या शेतीची मालकी असलेल्या शेतकऱ्यांना शेतीला कुंपण घालने व मोठ्या शेतकऱ्यांबरोबर स्पर्धा करणे

अशक्य बनले. या परिस्थितीत त्यांनी आपली शेती मोठ्या जमीनदारांना विकण्यास व आपल्या चरितार्थासाठी दुसरा मार्ग शोधण्यास सुरुवात केली. त्यामुळे पुढील काळात शेतीच्या मालकी हक्कात बदल होत गेले व शेतीचे केंद्रीकरण घडून आले. कुंपण घालणे, खते वापरणे, यंत्रे वापरणे या बाबींसाठी प्रचंड भांडवलाची गरज होती. त्यामुळे लहान तुकड्यांचे मालक असलेले शेतकरी शेतीत भांडवली गुंतवणूक करू शकले नाहीत. या उलट श्रीमंत भांडवलदारवर्गाने प्रचंड वाढलेल्या किमतीत शेती विकत घेऊन शेतीची एकत्रीकरण करण्यास सुरुवात केली. सलग शेतीमुळे कुंपण घालने, जमीन लागवडीखाली आणणे व यंत्राचा वापर करणे श्रीमंत जमीनदारांना शक्य झाले. लहान शेतकऱ्यांना उत्पादनाच्या बाबतीत तसेच अन्नधान्याच्या किमतीच्या संदर्भातही श्रीमंत जमीनदारांबरोबर स्पर्धा करणे अशक्य बनले. त्यामुळे त्यांनी आपल्या जमिनी विकून शहराकडे जाण्याचा दुसरा मार्ग अवलंबण्यास सुरुवात केली. श्रीमंत जमीनदारांनी शेतीकडे व्यावसायिक भूमिकेतून बघण्यास सुरुवात केली. प्रबोधन काळात सुरू झालेल्या वैज्ञानिक संशोधनातून नवे शोध लागले. विज्ञान व तंत्रज्ञानात प्रगती घडून आली. या तंत्रज्ञानाचा वापस शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणात केला जाऊ लागला. कृषीक्षेत्रातही नवे शोध लागण्यास सुरुवात झाली. या काळात कृषी क्षेत्रामधील नवीन संशोधनाचा थोडक्यात आढावा आपण घेणार आहोत.

**१. रॉबर्ट वेस्टर्न:**

कृषी व्यवसायात शास्त्रीय संशोधन करण्याबाबत पहिले पाऊल १६४५ मध्ये रॉबर्ट वेस्टर्न याने टाकले. आपल्या जीवनाचा अधिकांश काळ त्याने फ्लॅडर्समध्ये व्यतीत करून त्या देशातील कृषी व्यवसायाचे अत्यंत गांभीर्याने सूक्ष्म अध्ययन करून त्याने 'डिस्कोर्स ऑन हस्बंडरी' हे पुस्तक लिहिले. त्याने लवंग आणि टर्निप यासारख्या मुळे धरणाऱ्या पिकांची शेती केल्यास जमिनीची उत्पादनक्षमता वाढते असा आपला अनुभव सांगून असे सुचवले की, मुळे धरणारी पिके घेतल्यास कस सुधारण्यासाठी जमीन पडीक ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही. एवढेच नव्हे तर मुळे धरणाऱ्या पिकांमुळे हिवाळ्यात शेती व्यवसायाशी निगडित असलेल्या जनावरांना जिवंत राहण्यासाठी आवश्यक असलेला गवतचारा उपलब्ध होतो. पूर्वी इंग्लंडमध्ये हिवाळ्याच्या सुरुवातीस जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नसल्यामुळे लाखोच्या संख्येने जनावरांची हत्या करून त्याचे मांस खारऊन उन्हाळ्यातील स्वतःचा खाद्याची जपणूक करण्यात येत असे. जमिनीत मुळे धरणारे पिके घेतल्यामुळे हिवाळ्यात जनावरांना चारा उपलब्ध झाला. त्यामुळे आवश्यकता भासेल तेव्हाच शेतकरी आता आवश्यक तेवढ्याच पशूंची मांसासाठी हत्या करू लागले. रॉबर्ट वेस्टर्नच्या संशोधनामुळे जमीन उपजाऊ बनली, जनावरांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आणि त्यांच्यापासून मिळणाऱ्या मांसातही वाढ झाली.

**२. जेथ्रो टल (१६७४-१७४०):**

बर्कशायर मधील जेथ्रो टल या शेतकऱ्याने १७०१ मध्ये 'ड्रिल' नावाच्या पेरणी यंत्राचा शोध लावला, ज्यामुळे पेरण्यात पद्धतशीर पणा आला. पूर्वी बी हाताला येईल तसे पेरले जाई. नव्या तंत्राने बी एका ओळीत पेरले जाई व त्यामुळे कापणी ही सोपी जाई. शिवाय शेतात खुरपणी करून नको असलेले गवत कापणे सोपे जाऊ लागले. जेथ्रो टलने मुळे, गाजरे,

टर्निप वगैरे कंदमुळे लावण्यास सुरुवात केली. हिवाळ्यात गुरांना टर्निप खावयास मिळू लागल्यामुळे त्यांना हिवाळ्यात मारून त्यांचे मांस उन्हाळ्याकरीता खारवून ठेवण्याची पद्धत बंद झाली. शिवाय माळरानातही ही कंदमुळे येत, त्यामुळे नापिक जमिनीही उपयोगात येऊ लागल्या. जेथ्रो टलने उच्च प्रतीच्या बियाण्यांच्या वापरावर भर दिला. त्याने शेतामध्ये छोट्या नाल्या बनवून रोपांच्या मूळापर्यंत पाणी पुरवठा करण्याबाबत आणि शेतीला खत पुरवठा करण्याबाबत अनेक प्रयोग केले आणि त्यांची निरीक्षणे नोंदवली. ही सर्व निरीक्षणे त्याने १७३३मध्ये 'हॉर्स होईंग इंडस्ट्री' ह्या आपल्या कृषीविषयक संशोधनाच्या पुस्तकात प्रसिद्ध केले.

### ३. जनरल टाऊनशेंड (१६७४-१७३८):

जनरल टाऊनशेंड या लष्करी अधिकाऱ्याने नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर नॉरफोक येथील आपल्या शेतावर अनेक नवे नवे शास्त्रीय प्रयोग करून शेतातील उत्पादन वाढवले. स्वतःच्या शेतात राबण्यात त्यांनी कुठल्या प्रकारचा कमीपणा मानला नाही. अंगमेहनतीची काम करणे कमीपणाचे लक्षण नाही हा नवा दृष्टिकोन कृषिक्रांतीच्या काळात इंग्लंडमध्ये त्यांनी वाढीस लावला. जथ्रो टलच्या शोधाचा टाऊनशेंड याने प्रसार केला. टर्निपचे पिक मोठ्या प्रमाणावर प्रथम त्यांने आपल्या शेतात लावल्यामुळे तो टर्निप टाऊनशेंड या नावाने विख्यात झाला. त्याने असे सिद्ध केले की, त्याच जमिनीत आलटून-पालटून वेगवेगळी पिके घेतली तर जमिनीचा कस जात नाही व ती पडीक ठेवण्याची आवश्यकता राहत नाही. त्याच्या प्रयोगामुळे गहू, टर्निप, गाजरे, बार्ली, घासगवत शेतात पिकवून जमिनीचा कस वाढला व ती जास्त सुपीक झाली. शेतात उत्तम खत घालण्यास व उच्च प्रतीच्या बी-बियाणांचा वापर करण्यास त्याने सुरुवात केली.

### ४. रॉबर्ट बेकवेल (१७२५-९५):

रॉबर्ट बेकवेलने मेंढ्यांबाबत शास्त्रीय प्रयोग करून, त्यांना काय खाण्यास घातले असता लोकरीची वाढ होईल आणि त्याचबरोबर मांसाचीही वाढ होईल या दृष्टीने संशोधन करण्यास सुरुवात केली. त्यांची योग्य निगा राखली तर मेंढ्यां चांगल्या धष्टपुष्ट करता येतात ही गोष्ट रॉबर्टने सिद्ध केली. त्याच बरोबर मेंढीची शास्त्रशुद्ध पैदास करणे यावर त्यांने आपले लक्ष केंद्रित करून मेंढींच्या शास्त्रीय प्रजननाची पद्धती शोधून काढली. रॉबर्ट बेकवेलने न्यू लिसेस्टर नावाची नवी मेंढी जन्मास घातली. पूर्वी सर्वसाधारणतः मेंढीचे वजन २१ पौंड असे तर आता रॉबर्टने उत्पादित केलेल्या नव्या शास्त्रीय मेंढीचे सरासरी वजन ६० पाऊंड होते. रॉबर्टच्या शास्त्रीय प्रजननाच्या शोधाचा धागा पकडून इतर पशू बाबतही संशोधन सुरू झाले. गुरांच्या शास्त्रशुद्ध पैदास करण्याकडे लोकांनी आपले लक्ष केंद्रित केले.

### ५. चार्ल्स कॉलिंग:

चार्ल्स कॉलिंगने बैलांचा वंश सुधारण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. परिणामी शेतीला उपयुक्त असलेल्या प्राण्यांचे शास्त्रशुद्ध प्रजनन सुरू झाले. त्याने बैलाची नवी जात दूष्स शॉर्ट हॉर्न ( Dushs Short Horn) विकसित केली. त्यामुळे १७१० साली ३७९पौंड असणारे बैलांचे वजन वाढून १७९५ मध्ये ८०० पौंड झाले.

### ६. थॉमस कोक:

थॉमस कोक याने शेतीस उत्तम खतपाणी घातले तर उत्तम पीक काढता येते, असे स्वतः जमीन कसून सर्वांना पटवून दिले. त्याने नोरफोक परगण्यात होकहॅम येथे आदर्श जमीन कशी करायची, ते एका ओसाड माळरानाचे रुपांतर एका सुंदर शेतात करून प्रत्यक्ष दाखवले. त्यात गहू, राय वगैरे पिके नव्या पद्धतीने पिकवून सर्वांना थक्क केले. युरोपातील निरनिराळ्या देशातील लोक त्याची सुंदर शेती व प्रयोग पाहण्यास येत.

### ७. इंग्लंडचा राजा जॉर्ज तिसरा:

इंग्लंडचा राजा जॉर्ज तिसरा हा शेतकऱ्यांचा राजा म्हणून प्रसिद्ध होता. त्याने शेतीस अनेक प्रकारे उत्तेजन दिले आणि विंडसर राजवाड्या जवळ स्वतःचे एक आदर्श शेत निर्माण केले. त्याने त्यात अनेक यशस्वी प्रयोग करून त्याची माहिती लोकांना व्हावी म्हणून एक प्रसिद्धी अधिकारी नेमला. तो शेतकी मंडळाचा अध्यक्ष आर्थर यंग हा होय.

### ८. ऑर्थर यंग (१७४१-१८२०):

आर्थर यंग या शेतकी मंडळाचा अधिकाऱ्याने जगातील निरनिराळ्या देशांना भेटी दिल्या. त्या देशांमध्ये शेती सुधारणेबाबत केलेल्या उपाय योजनांची माहिती त्याने संकलित केली. ही माहिती समाजाला देण्यासाठी त्यांनी लेखन केले. शेती करण्याच्या बाबतीत त्याने काही कल्पना विशेष लोकप्रिय बनवल्या. निरनिराळ्या उत्पन्न पद्धतीचा अवलंब करून इंग्लडच्या शेतकऱ्यांनी शेतीतून मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेण्यास सुरुवात केली. अठराव्या शतकातील शेतीव्यवसायातील सुधारणा संबंधीच्या निरनिराळ्या पद्धती व शेतीच्या मशागतीसाठी उपयुक्त असलेले तंत्रज्ञान याविषयी माहिती देणारे 'ॲनल्स ऑफ एग्रीकल्चर' या नावाचे एक मासिकही त्याने चालवले. नवीन पद्धती व योजना यांचा योग्य अवलंब केल्यास मोठ्या प्रमाणात कृषी उत्पादन घेता येते, असा विश्वास त्याने समाजाच्या सर्व घटकांमध्ये निर्माण केला. शेतीच्या आधुनिकीकरणामुळे व व्यावसायिकीकरणामुळे या काळात कृषी क्षेत्रात विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग करून मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्यास प्रारंभ झाला.

### ४.५.३ एकोणिसाव्या शतकातील कृषी क्रांती:

एकोणिसाव्या शतकात इंग्लंडमधील कृषी क्रांतीला अधिकच गती प्राप्त झाली. शेती व्यवसायातील सुधारणेमुळे या काळात शेती व्यवसाय अधिकाधिक फायदेशीर होत गेला. अन्नधान्य व इतर कृषी उत्पादनात अधिकाधिक वाढ होत गेली. या काळात इंग्लंडमधील लोकसंख्या सातत्याने वाढत गेली. त्यामुळे अन्नधान्याची मागणी वाढत होती. या वाढत्या मागणीमुळे अन्नधान्याच्या किमती वाढतच गेल्या. लोकसंख्येच्या मानाने अन्नधान्याचे उत्पादन कमी पडू लागले. या काळातच इंग्लंड व फ्रान्स यांच्यात युद्ध सुरू झाले . नेपोलियनने इंग्लंडची आर्थिक नाकेबंदी केली, त्यामुळे इंग्लंडमध्ये अन्नधान्याच्या किमती वाढत जाऊन त्याचा फायदा मोठ्या प्रमाणावर श्रीमंत शेतकरीवर्गास मिळाला. इसवी सन १८१५ मध्ये इंग्लंड व फ्रान्स यांच्यातील युद्ध संपले, युद्धाच्या समाप्तीमुळे अन्नधान्याच्या किंमती घसरतील अशी श्रीमंत शेतकऱ्यांना भीती वाटू लागली. म्हणून या श्रीमंत शेतकऱ्यांनी पार्लमेंटमधील आपल्या राजकीय प्रभावाचा उपयोग करून अन्नधान्याच्या

किमती कायम ठेवण्यासाठी इसवी सन १८१५मध्ये पार्लमेंटमध्ये एक कायदा संमत करून घेतला. या कायद्यालाच 'कॉर्न लॉ' असे म्हणतात. या कायद्यानुसार इंग्लंडमध्ये धान्याच्या किमतीत विशिष्ट वाढ होईपर्यंत अन्नधान्याच्या आयातीवर पूर्णपणे बंदी घालण्यात आली. प्रचंड प्रमाणावर फायदा मिळवण्याच्या अपेक्षेने ही तरतूद केली गेली. तथापि जमीनदार वर्गाला या कायद्यामुळे अपेक्षित असा फायदा मिळाला नाही. अन्नधान्याच्या किमती मध्ये अनिश्चितता निर्माण झाल्याने जमीनदारवर्ग या कायद्याच्या आधारे नफा मिळवू शकला नाही. सर्वसामान्य समाजाला हा कायदा व त्याद्वारे झालेली अन्नधान्याच्या किमतीतील वाढ त्रासदायक ठरली. समाजातील सर्वच स्तरातून या कायद्याला विरोध झाल्याने शेवटी शासनाला हा कायदा रद्द करणे भाग पडले.

इंग्लंडमध्ये १८५० नंतर या परिस्थितीत मोठ्या प्रमाणावर बदल झाला. यापुढील काळात सुमारे पंचवीस वर्ष अन्नधान्याच्या किंमती सातत्याने वाढतच होत्या. आयात केलेल्या अन्नधान्याची स्पर्धाही फारशी जाणवत नव्हती. शेतीचे यांत्रिकीकरण केले गेल्याने व शेतीत सर्व सुधारित तंत्राचा उपयोग केला गेल्याने अन्नधान्याचे उत्पादन सतत वाढतच होते. या काळात वाहतुकीच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणावर प्रगती झाल्याने देशातील सर्व भागात अन्नधान्य पाठवणे सहज शक्य झाले. या पार्श्वभूमीवर कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेची स्थिती दूर झाली. शेतकऱ्यांना शेतीमालाच्या विक्रीतून मोठ्या प्रमाणावर फायदा होऊ लागला. इसवी सन १८५० ते १८७५ हा कालखंड शेतीच्या दृष्टीने सुवर्णयुगाचा कालखंड ठरला. तथापि ही प्रगती  दीर्घ काळ टिकू शकली नाही. १८७५ नंतर या परिस्थितीत झपाट्याने बदल होण्यास सुरुवात झाली. परदेशातून आयात केलेल्या शेतमालाबरोबर इंग्लंडमधील शेतमालाला स्पर्धा करणे अवघड बनले. शासनाने या काळात खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारल्याने स्पर्धा अपरिहार्य ठरली. याच काळात शेतमजुरांनी शेतीवर काम करण्यापेक्षा कारखान्यांमधून कामगार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. त्यामुळे सहाजिकच शेतमजुरांचा तुटवडा निर्माण झाला. परिणामी या काळात शेतीच्या क्षेत्रात अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले. श्रीमंत शेतकऱ्यांना शेतीचे व्यवसायातून फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक लाभ होऊ शकला नाही. तरीही या काळात शेती उत्पादनाचे प्रमाण स्थिर होते.

## ४.६ युरोपातील कृषी क्रांतीचे परिणाम व महत्व

सोळाव्या शतकात सुरू झालेल्या व अठराव्या शतकात मोठ्याप्रमाणावर गतिमान झालेल्या कृषी क्रांतीचे परिणाम अठराव्या शतकाच्या उत्तरार्धानंतर दिसून येण्यास सुरुवात झाली.

### १. उत्पादन पद्धतीत आमूलाग्र बदल:

कृषी क्रांतीच्या काळात शेती व्यवसाय शास्त्रीय पद्धतीने व व्यावसायिक तत्त्वावर करण्यास सुरुवात झाल्याने शेतीच्या उत्पादन पद्धतीत आमूलाग्र बदल घडून आले. तुकड्यांची शेती तसेच परंपरागत उत्पादन पद्धती फायदेशीर ठरत नाही हे लक्षात आल्यानंतर शेतीचे एकत्रीकरण करण्यास व तिला कुंपण घालण्यास सुरूवात झाली. एकत्रीकरण केलेल्या शेतीत सुधारित उत्पादन तंत्राच्या आधारे उत्पादन करण्यात येऊ लागल्याने शेतीच्या उत्पादनामध्ये प्रचंड वाढ झाली. यामुळे केवळ पिकांचे उत्पादनच वाढले नाही तर इंग्लंड अन्नधान्याने समृद्ध झाला. शास्त्रीय पद्धतीनुसार उत्तम

जातीच्या पशूंची पैदास होऊ लागली. शास्त्रीय पद्धतीनुसार सुरु झालेल्या शेती व्यवसायामुळे धान्य उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढले आणि शास्त्रीय प्रजनन पद्धतीनुसार उत्तम जातीच्या धष्टपुष्ट पशूंची पैदास होऊ लागल्यामुळे त्यांच्यापासून मिळणाऱ्या मांसाच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली. परिणामी इंग्लंडच्या वाढत्या लोकसंख्येच्या जीवनावश्यक गरजा भागवणे सहज शक्य झाले.

**२. शेतीचे भांडवलीकरण:**

शेतीचे एकत्रीकरण करून कुंपण घातल्यास आणि प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास शेती फायदेशीर ठरते हे जाणवल्यानंतर शेतीत मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक होण्यास सुरुवात झाली. या काळात इंग्लंडमध्ये परराष्ट्रीय व्यापारात प्रगती केलेल्या व मोठ्या प्रमाणावर नफा मिळवलेल्या श्रीमंत व्यापाऱ्यांचा वर्ग निर्माण झाला होता. या वर्गाने शेतीत गुंतवणूक करून व्यावसायिक दृष्टीने शेती करण्यास सुरुवात केली. शेतीला कुंपण घालण्यासाठी व नवीन यंत्राच्या साह्याने शेती करण्यासाठी तसेच अधिक प्रमाणावर खतांचा वापर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची गरज होती. ती गरज या भांडवलदार वर्गाने भागवली. भरमसाठ दराने या वर्गाने जमिनी खरेदी केल्या. जमिनीवर या श्रीमंत शेतकऱ्यांची मालकी प्रस्थापित झाली. सुधारित साधने, यंत्रे व खते यांचा वापर करून शेती हा फायदेशीर व्यवसाय बनवण्यास त्यांनी सुरुवात केली. आवश्यकतेनुसार शेतीत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केल्याने या काळात भांडवली शेतीस प्रारंभ झाला. तथापि शेतीव्यवसाय भांडवलदारांच्या हाती गेल्याने लहान शेतकऱ्यांचे अस्तित्व धोक्यात आले.

**३. जमिनीची अधिक मागणी वाढली:**

शेतीचे भांडवलीकरण झाल्याने शेती करण्यासाठी जमिनीची मागणी वाढली. जमिनीची मागणी वाढण्यामागे आर्थिक आणि राजकीय अशी दोन कारणे होती. काही श्रीमंत लोकांना शास्त्रीय पद्धतीने व्यापारी तत्त्वावर अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणून प्रचंड उत्पादन घेऊन अधिक धनवान होण्याची तीव्र महत्त्वाकांक्षा निर्माण झाली होती. राजकीय क्षेत्र धनवान लोकांना आपल्याकडे आकर्षित करीत होते. त्यांच्यात इंग्लंडच्या पार्लमेंटचे सदस्य बनण्याची ऊर्मी जागृत झाली. तत्कालीन कायद्यानुसार एका निश्चित भूभागावर मालकी असलेली व्यक्तीच पार्लमेंटचे सदस्य बनू शकत असे. याचाच अर्थ केवळ बड्या जमीनदारांनाच पार्लमेंटचे सदस्य होता येत असे. सहाजिकच राजकारणात प्रवेश करण्याच्या ओढीने धनवान लोकांनी खेड्यातील जमिनी विकत घेण्याचा सपाटा सुरू केला. काही श्रीमंत व्यक्तींना जस्टिस ऑफ पीस बनण्याची महत्त्वाकांक्षा होती. तत्कालीन कायद्यानुसार ज्यांच्या जमिनीचे वार्षिक उत्पन्न कमीत कमी १०० पौंड असेल तीच व्यक्ती जस्टीस ऑफ पीस पद प्राप्त करू शकत असे. परिणामी कृषी क्रांती नंतर जमिनी विकत घेण्याबाबत भांडवलदार लोकांमध्ये तीव्र चढाओढ निर्माण झाली आणि इंग्लंडमध्ये बड्या जमीनदार वर्गाचा उदय झाला .

### ४. शेती उत्पादनात प्रचंड वाढ:

पुनरुज्जीवनाच्या चळवळी अगोदर प्रचलित असलेली शेती करण्याची पद्धत सोळाव्या शतकात बदलायला लागली. शेतीचा कस वाढविण्यासाठी शेती पडीक ठेवण्याची गरज नसून शेतजमिनीत पिकांची फेरपालट केल्यास तिचा कस कायम टिकतो व उत्पादनात वाढ होते हे सिद्ध झाले. शेतीचे यांत्रिकीकरण करण्यास सुरुवात झाल्याने मोठी सलग शेती करणे शक्य झाले. शेतीच्या सुधारणेसाठी व नवीन तंत्राचा अवलंब करण्यासाठी आवश्यक ते भांडवल उपलब्ध झाले. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

### ५. बेकारी वाढली:

कृषी क्रांतीमुळे छोट्या शेतकऱ्यांच्या व शेतमजुरांच्या बेकरीच्या समस्येने उग्ररूप धारण केले. पूर्वीच्या पारंपरिक पद्धतीच्या शेती व्यवस्थेत छोट्या शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्य शेतीच्या कामात गुंतलेले असल्यामुळे खेड्यामध्ये कोणतेही व्यक्ती बेकार नसे. परंतु आता यंत्राच्या साह्याने व शास्त्रीय पद्धतीने व्यापारी तत्त्वावर कृषी व्यवसाय सुरू झाल्यामुळे पूर्वी इतक्या मोठ्या प्रमाणावर मजुरांची आवश्यकता राहिली नाही. माणसांची जागा यंत्राने घेतली. पूर्वी निर्धन शेतकरी गावातील वसाड जमिनीवर शेती करून जमेल तशी स्वतःची उपजीविका करत असे. परंतु कृषी क्रांती नंतर खेड्यांमधून अशा प्रकारची कोणतीही सामाईक जमीन अस्तित्वात राहिली नाही. परिणामी छोट्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचे पट्टे विकून, तसेच निर्धन शेतकऱ्यांनी व शेतमजूर यांनी खेड्याला रामराम ठोकून पोट भरण्यासाठी शहरातील कारखान्यांकडे धाव घेतली.

### ६. वर्गसंघर्ष निर्माण झाला:

युरोपात सुरू झालेल्या या कृषी क्रांतीने सामाजिक जीवनात मोठ्या प्रमाणावर बदल घडून आला. एका बाजूस मोठ्या प्रमाणात नफा मिळवणाऱ्या श्रीमंत शेतकऱ्यांचा वर्ग तर दुसऱ्या बाजूस आर्थिक संकटात सापडलेला दयनीय शेतकरी व शेतमजुरांच्या वर्ग अशी समाजरचना अस्तित्वात आली. श्रीमंत शेतकऱ्यांनी लहान शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेतल्या व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण करण्यास सुरुवात केली. याउलट लहान शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकून उपजीविकेचा दुसरा मार्ग शोधत शहरात जाऊन कारखान्यांमध्ये कामगार म्हणून काम करण्यास सुरुवात केली. तर शेतमजुरांना कमी वेतनात शेतीवर राहणे आवश्यक ठरले. परस्परविरुद्ध संबंधामुळे या दोन वर्गात संघर्ष निर्माण झाला व जसजशी आर्थिक दरी वाढत गेली तसतसा हा संघर्ष अधिक तीव्र होत गेला.

### ७. औद्योगिक क्रांतीस चालना मिळाली:

युरोपमध्ये कृषिक्रांती मुळे शेतीच्या उत्पादनात प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढ झाली. औद्योगिक क्रांतीमुळे यंत्रांच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात पक्क्या मालाचे उत्पादन सुरु झाल्यामुळे या कारखान्यांना कच्चा मालाची आवश्यकता भासू लागली. हा कच्चामाल कृषी क्रांतीमुळे वाढलेल्या शेतीच्या उत्पादनातून प्राप्त झाल्यामुळे औद्योगिक क्रांतीस मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. या क्रांतीतूनच पुढे साम्राज्यवादाचा जन्म होऊन इंग्लंडने संपूर्ण जगावर वर्चस्व निर्माण केले.

## ४.७ सारांश

सोळाव्या शतकामध्ये युरोपात सर्वप्रथम इंग्लंडमध्ये कृषी क्रांतीला सुरुवात झाली. जमिनीवर आधारलेली मध्ययुगीन सरंजामशाही व शेतीतील परंपरागत उत्पादन पद्धती यांचा ऱ्हास होऊन शेती क्षेत्रामध्ये आमूलाग्र परिवर्तन घडायला सुरुवात झाली. शेतीचे व्यावसायिकीकरण होऊन व्यापारी दृष्टिकोनातून नफा मिळवण्यासाठी शेती व्यवसाय केला जाऊ लागला. त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानामुळे शेतीमध्ये नवनवीन प्रयोग केले जाऊ लागले. या दोन्ही घटकांमुळे शेती उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. सतराव्या शतकामध्ये कुंपन चळवळीला विरोध झाल्याने कृषी क्रांती मध्ये अवरोध निर्माण झाला. परंतु अठराव्या शतकामध्ये कृषी क्रांती पुन्हा तीव्र वेगाने वाटचाल करू लागली. अनेक शास्त्रज्ञांनी शेतीमध्ये नवनवे प्रयोग करून शेती उत्पादन आणि पशुधन यांचा विकास घडवून आणला. या क्रांतीचे परिणाम अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून दिसण्यास सुरुवात झाली. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व भांडवल गुंतवणुकीमुळे शेती व्यवसाय खर्चिक बनला. त्यामुळे शेती व्यवसायात श्रीमंत जमीनदारांची मक्तेदारी निर्माण होऊन लहान शेतकरी व शेतमजूर यांच्या अस्तित्वाला धोका पोहोचला. या श्रीमंत जमीनदारांची शासन दरबारी आपले वजन वापरून शेती व्यवसायात नफा कमवायला मागेपुढे बघितले नाही. त्यातूनच युरोपमध्ये बेरोजगारी व वर्गसंघर्ष यासारखे प्रश्न निर्माण झाले. असे असले तरी कृषी क्रांतीतून मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्याने औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली व वाढलेल्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करता आल्या, हा सकारात्मक पैलूही महत्वाचा आहे.

## ४.८ प्रश्न

१. युरोपातील कृषी क्रांतीची पार्श्वभूमी सांगून कारणांचा आढावा घ्या ?

२. सोळाव्या शतकातील कृषी क्रांतीचे स्वरूप स्पष्ट करा ?

३. अठराव्या शतकात झालेल्या कृषी क्रांतीतील बदल आणि नवनवीन प्रयोगाची माहिती द्या ?

४. कृषी क्रांतीचे १९व्या शतकातील स्वरूप स्पष्ट करून त्याच्या परिणामांची चर्चा करा ?

## ४.९ संदर्भ

१. पाश्चात्य जग – डॉ. धनंजय आचार्य

२. आधुनिक जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे – डॉ. एस एस गाठाळ

३. आधुनिक जगाचा इतिहास – डॉ. अनिरुद्ध व गजानन भिडे

४. विश्व इतिहास - अखिल मूर्ति

*****

# ५

# औद्योगिक क्रांती

**घटक रचना**


५.१ उद्दिष्टे

५.२ प्रस्तावना

५.३ औद्योगिक क्रांतीची व्याख्या आणि अर्थ

५.४ औद्योगिक क्रांतीची कारणे

५.५ औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का झाली?

५.६ औद्योगिक क्रांतीची वाटचाल

५.७ औद्योगिक क्रांतीचा विस्तार

५.८ औद्योगिक क्रांतीचे परिणाम

    ५.८.१ आर्थिक परिणाम

    ५.८.२ सामाजिक परिणाम

    ५.८.३ राजकीय परिणाम

    ५.८.४ वैचारिक परिणाम

५.९ सारांश

५.१० प्रश्न

५.११ संदर्भ


## ५.१ उद्दिष्टे

१. औद्योगिक क्रांतीच्या कारणांचा मागोवा घेणे.

२. औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का झाली यावर चर्चा करणे.

३. औद्योगिक क्रांतीसाठी कारणीभूत ठरलेल्या वैज्ञानिक शोधांचा आढावा घेणे.

४. औद्योगिक क्रांतीची वाटचाल व विस्तार समजून घेणे.

५. औद्योगिक क्रांतीचे परिणाम विषद करणे.

## ५.२ प्रस्तावना

औद्योगिक क्रांतीपूर्वी उत्पादन कार्यासाठी मनुष्य आणि प्राणी शक्ती यांचा उपयोग केल्या जात असे. औद्योगिक क्रांतीमुळे यंत्रे चालवण्यासाठी कोळसा, वीज, खनिज तेल इत्यादी नव्या ऊर्जा साधनांचा वापर होऊ लागला. वस्तूंच्या उत्पादनात यंत्राचा वापर वाढत्या प्रमाणावर होऊ लागला. हातांच्या बोटांची कौशल्ये यांच्यापेक्षा यंत्र शक्ती अधिक उत्पादन

munotes.in

कार्य करू लागल्यामुळे यंत्रयुग सुरू झाले. उत्पादन क्षेत्रातील मूलद्रव्य किंवा कच्चामाल यांच्यात बदल झाला. यापूर्वी उत्पादनासाठी लाकूड किंवा काही स्थानिक पदार्थ वापरले जात होते. औद्योगिक क्रांतीनंतर लोखंड व पोलाद यांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जाऊ लागला. औद्योगिक क्रांतीपूर्वीचे बहुतेक उद्योग व कारखाने घरगुती स्वरूपाचे होते. त्यामध्ये सुसूत्रता नव्हती. लहान यंत्रे हाताने चालवली जात व पारंपरिक उत्पादन पद्धती होती. औद्योगिक क्रांतीमुळे ही परिस्थिती बदलत गेली. पूर्वी उत्पादन प्रक्रिया विकेंद्रित होती व कारागीर एखादी वस्तू बऱ्याचदा संपूर्णपणे स्वतः बनवत असे. या क्रांतीनंतर उत्पादन पद्धतीचे केंद्रीयकरण झाले. सर्व मजूर आता कारखान्यात एका छताखाली काम करू लागले. वस्तूंच्या उत्पादनात श्रमविभागणीचे तत्व वस्तू निर्मितीच्या प्रारंभिक टप्प्यापासून अखेरच्या टप्प्यापर्यंत तपशीलवारपणे व शेवटच्या टोकापर्यंत अमलात आले. या नवीन उत्पादन पद्धतीला 'कारखाना पद्धत' असे म्हणतात. उत्पादनात यंत्राचा वापर वाढल्यामुळे उत्पादन प्रचंड प्रमाणावर वाढले.

प्रबोधन युगात वैज्ञानिक प्रगतीला चालना मिळाली. या पार्श्वभूमीवर उत्पादन क्षेत्रात क्रांतिकारक परिवर्तन घडून आले. औद्योगिक क्रांतीत वैज्ञानिकांची महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी नवी यंत्रे आणि तंत्र निर्माण केले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात व त्यानंतरच्या काळात विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या क्षेत्रात अनेक शोध लागले आणि त्यामुळे वेगाने विकास होऊ लागला. या शास्त्रीय विचारांचा व तंत्रज्ञानाचा व्यवहारात आणि औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उपयोग होऊ लागला. वाहतुकीच्या व दळणवळणाच्या साधनांत यांत्रिकीकरण होऊन त्यात क्रांतिकारक बदल झाले. रस्ता बांधण्याचे तंत्र शोधून काढले, त्यामुळे अनेक नवीन रस्ते बांधण्यात आले. वाफेवर चालणारे इंजिन, मोटारी, विमाने, वाफेच्या इंजिनावर चालणारी जहाजे यामुळे प्रवास व मालवाहतूकची सोय झाली. तसेच तारायंत्रे रेडिओ, टेलिफोनचा शोध लागल्यामुळे संदेशवहनाच्या सोयी उपलब्ध झाल्या.

औद्योगिक क्रांतीने शेती क्षेत्रात प्रचंड परिवर्तन झाले. पारंपरिक अवजारे मागे पडून नवी यंत्रे व नवी तंत्रे शेतीसाठी वापरण्यात येऊ लागली. धान्याचे उत्पादन, साठवणूक, वाहतूक, संरक्षण इत्यादी बाबतीत परिवर्तन घडून आले. शेतीच्या उत्पादनात मोठी वाढ झाली. व्यापारी क्षेत्राची अत्यंत वेगाने व आश्चर्यकारक भरभराट होऊ लागली. उत्पादनाच्या, वितरणाच्या व श्रमविभागणीच्या नव्या पद्धतीचा वापर होऊ लागला. व्यापारी केंद्राचा उदय व विकास होऊन व्यापाराच्या क्षेत्रात नवीन कायदे अस्तित्वात आले. नव्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या उदय झाला. देशांतर्गत व परराष्ट्रीय व्यापाराचे नवे कायदे अस्तित्वात येऊ लागले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मक्तेदारीस उत्तेजन देण्यात आले. अर्थव्यवस्थेचे स्वरूप अतिशय वेगाने बदलू लागले.

औद्योगिक प्रगतीमुळे आधुनिक समाजाच्या गरजा बदलू लागल्या. दळणवळणाच्या नवीन विकसित पद्धतीमुळे ग्रामीण समाजाचा विकास होऊन त्याचे नव्या शहरी समाजात रूपांतर होऊ लागले. शहरीकरण व कामगार वर्गाच्या उदयामुळे जीवनमानाच्या व राहणीमानाच्या नव्या पद्धती अमलात येऊ लागल्या. त्याचबरोबर नवे ज्वलंत सामाजिक प्रश्नही निर्माण होऊ लागले. राजकीय विचार व शासन पद्धती या क्षेत्रात नव्या कल्पना उदयास येऊ लागल्या. उद्योगधंदे व शेती यांच्यातील नव्या तंत्रामुळे समाजस्थितीचे स्वरूप बदलू लागले.

सामाजिक वर्गवारी आणि संबंधातही बदल दिसू लागले. अर्थात हे बदल अगदी संथ गतीने पण निश्चितपणे होत होते. औद्योगिक क्रांती ही सर्वकष क्रांती होती. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर या क्रांतीचा ठसा उमटला. या क्रांतीमुळे मूलभूत स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक बदल होऊन समाजाचा अमुलाग्र कायापालट झाला.

औद्योगिक क्रांतीचा पहिला टप्पा १७५० ते १८५० या अवधीत पूर्ण झाला. या कालखंडात औद्योगिक क्रांतीचा प्रभाव इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आदी यूरोपीय देशात झाला. औद्योगिक क्रांती दुसरे पर्व १८५० ते १९५० या शतकात पूर्ण झाले. या काळात हिंदुस्थान, जपान, रशिया आणि पूर्व युरोपात औद्योगिक क्रांती घडून आली. औद्योगिक क्रांतीचे तिसरे पर्व १९५० पासून सुरू झाले असे म्हणता येईल.

## ५.३ औद्योगिक क्रांतीची व्याख्या आणि अर्थ

औद्योगिक क्रांती हा शब्दप्रयोग प्रथम जेरोम ए ब्लॅन्की फ्रेंच अर्थशास्त्रज्ञाने उपयोगात आणला आणि त्यानंतर इंग्लंडमधील विख्यात ब्रिटिश इतिहासकार ऑर्नाल्ड टॉयन्बी याने तो रूढ केला. टॉयन्बीने इंग्लंडमध्ये सन १७५० ते १८५० या काळात जो औद्योगिक विकास झाला त्याला उद्देशून इसवीसन १८२० मध्ये 'औद्योगिक क्रांती' हा शब्द प्रथम वापरला. या शब्दाचा नेमका अर्थ समजून घेण्यासाठी काही व्याख्या आणि त्याचा अर्थ आपण पाहू.

१. उत्पादनाचे पारंपारिक तंत्र आणि साधनांचा त्याग करून नवीन तंत्र व साधनांचा वापर करून उत्पादनाच्या क्षेत्रात घडवून आणलेली प्रचंड प्रगती म्हणजे औद्योगिक क्रांती होय.

२. अठराव्या शतकापर्यंत प्रचलित असलेल्या घरगुती उद्योगधंद्यांऐवजी यंत्राच्या सहाय्याने कमी वेळात जास्त उत्पादन करणाऱ्या क्रियेस औद्योगिक क्रांती म्हटले जाते.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, मागील सुमारे अडीचशे वर्षात निरनिराळ्या वैज्ञानिक व शास्त्रीय शोधांमुळे आणि त्याद्वारे बनविण्यात आलेल्या उत्पादन निर्मितीच्या यंत्रामुळे जगात जे प्रचंड परिवर्तन घडून आले, त्यास औद्योगिक क्रांती असे म्हणतात.

सुमारे चार दशके चाललेले एखाद्या प्रक्रियेस क्रांती मानता येणार नाही असे काही इतिहासकारांचे मत आहे. क्रांती या शब्दाचा अर्थ प्रस्थापित राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक यापैकी कोणत्याही एका क्षेत्रात अचानकपणे मूलभूत स्वरूपाचे बदल घडून येणे होय. अशा मूलभूत स्वरूपाच्या बदलाचा परिणाम जनतेवर पडतो, या अर्थाने विचार केलास जगात आधुनिक कालखंडामध्ये अनेक क्रांत्या झाल्या. फ्रेंच राज्यक्रांती, रशियन राज्यक्रांती, अमेरिकन राज्यक्रांती इत्यादींना क्रांती असे म्हटले जाते. तसेच क्रांतीचा कालखंड हा दोन ते चार वर्षांचा असतो. हे सर्व निकष आपण १७५० पासून सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीला लावले तर औद्योगिक क्रांतीला क्रांती म्हणावी की नाही हा प्रश्न उद्भवतो. कारण या क्रांतीत राजकीय सत्ताबदल, हिंसाचार, वित्त हानी व मनुष्य झाली नाही. तसेच ही क्रांती हा २५० वर्षापासून चालू आहे. पुढेही मानवी जीवनापर्यंत चालूच

munotes.in

राहणार आहे. यास उत्क्रांती मानणे योग्य ठरेल. कारण क्रांती घडून आली व दोन चार वर्षात संपली असे झाले नाही. तर औद्योगिक क्रांती प्रदिर्घ काळापर्यंत चाललेली प्रक्रिया आहे. पण औद्योगिक क्रांतीने मानवी जीवनात जे मूलभूत क्रांतिकारी भौतिक बदल घडवून आणले. त्यानुसार या औद्योगिक बदलास क्रांती असे म्हटले जाते.

## ५.४ औद्योगिक क्रांतीची कारणे

१७५०च्या सुमारास इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती सुरू झाली. त्यापूर्वी प्राचीन काळापासून घरगुती हस्तउद्योग व कुटीर उद्योगामार्फत समाजातील मानवाच्या गरजा भागवल्या जात होत्या. परंतु अठराव्या शतकापासून हे चित्र बदलले. कारण आठराव्या शतकापासून मालाची मागणी वाढली त्यास प्रामुख्याने खालील गोष्टी कारणीभूत होत्या.

### १. पुनरुज्जीवन आणि धर्मसुधारणा चळवळ:

पुनरुज्जीवन आणि धर्मसुधारणा चळवळीने आधुनिक युगाची सुरुवात झाली. भौतिक आणि तार्किक विचारांच्या प्रगतीने विज्ञानाच्या विकासात सहाय्य प्राप्त झाले. विज्ञानाच्या विकासाने तांत्रिक आणि औद्योगिक विकास झाला. पुनरुज्जीवन चळवळीने भौगोलिक संशोधन प्रसिद्ध केले. ज्यामुळे युरोपातील लोकांना भौतिक संशोधनाचे एक विशाल भंडार प्राप्त झाले.

### २. व्यापारावाद:

व्यापारवादाने व्यापार आणि आर्थिक क्रियाकलापामध्ये योगदान दिले. ज्यामुळे यूरोपातील व्यापाऱ्यांकडे मोठी धनसंपदा जमा झाली. ह्या अतिरिक्त भांडवलाचे औद्योगिक भांडवलामध्ये व्यापाऱ्यांनी रूपांतर केल्यामुळे औद्योगिक विकास झाला .

### ३. लोकसंख्येतील वाढ:

युरोपातील लोकसंख्या वाढल्यामुळे दैनिक उपयोगाच्या वस्तूंमध्ये मोठी वृद्धी झाली . ज्याचा पुरवठा कृषी मधुन होणे शक्य नव्हते . परिणामी मोठ्या प्रमाणावर वस्तू उत्पादन करण्यासाठी यंत्रे आणि कारखाना आधारित उद्योगांना अनुकूल वातावरण तयार झाले.

### ४. फ्रेंच राज्यक्रांती:

१७८९मधील फ्रेंच राज्यक्रांतीने औद्योगिक क्रांतीच्या वाढीमध्ये मोठे योगदान दिले. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्यापूर्वी अनुकूल राजनीतिक व्यवस्था उपस्थित होती. त्यामुळे इंग्लंडमध्ये औद्योगिक विकास होण्यास कोणताही राजनीतिक विरोध झाला नाही. फ्रेंच राज्यक्रांतीने संपूर्ण युरोपमध्ये उदारवादी आणि लोकशाही शासन पद्धती लोकप्रिय झाली. इतर युरोपियन देशांमधील निरंकुश सामंतशाही व्यवस्थेचा रास झाल्यामुळे बदललेल्या राजकीय परिस्थितीने औद्योगिक क्रांतीला साहाय्य केले.

**५. राष्ट्रवादाचा उदय:**

१७व्या शतकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना प्रखरतेने समोर आली. भौगोलिक शोध, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उपलब्धी, आंतरराष्ट्रीय व्यापाराद्वारे स्पर्धात्मक आणि तुलनात्मक समृद्धीने एखाद्या राष्ट्राच्या शक्तीचे आकलन केल्या जावू लागले. जेव्हा इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि युरोपामध्ये आपली सर्वश्रेष्ठता स्थापन केली. तेव्हा युरोपातील अन्य देशांमध्ये राष्ट्रवादी भावना वाढीस लागून औद्योगिक विकासासाठी चढाओढ सुरू झाली.

**६. कारखाना पद्धतीचा विकास:**

औद्योगिक क्रांतीच्यापूर्वी इंग्लंडमध्ये हस्तउद्योगावर आधारित उत्पादन पद्धती अस्तित्वात होती. या व्यवस्थेअंतर्गत भांडवलदार वर्ग कारागिरांना कच्चामाल देऊन त्यांच्याकडून पारंपारिक पद्धतीने तयार झालेला पक्का माल खरेदी करत असे. आता मात्र भांडवलदारांनी आपल्या सुविधेसाठी सर्व कारागिरांना एका छताखाली एकत्र करून उत्पादन करण्यास सुरुवात केली. त्यातूनच कारखाना पद्धतीचा जन्म झाला. ज्याने औद्योगिक क्रांतीला आधारभूत ढाच्या उपलब्ध करून दिला. कारखाना पद्धतीमुळे श्रम विभाजन आणि कार्यक्षमता वाढली, त्यामुळे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले.

## ५.५ औद्योगिक क्रांतीची सुरुवात इंग्लंडमध्येच का झाली ?

साधारणपणे असा प्रश्न मनात येणे स्वाभाविक आहे की, औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का सुरू झाली. कारण औद्योगिक क्रांतीच्या वेळी युरोपातील अन्य देशांमध्येही भांडवल आणि संशोधन पात्रता उपलब्ध होती. हॉलंड भौगोलिक शोध, व्यापार आणि आर्थिक क्रियाकलापामध्ये अग्रेसर होता. तेथे औद्योगिक क्रांतीची का सुरुवात झाली नाही. त्याचप्रमाणे फ्रान्स उद्योग व व्यापारामध्ये इंग्लंड पेक्षा पुढे होता. ज्याची लोकसंख्या इंग्लंड पेक्षा तीनपटीने मोठी होती आणि त्यांच्या जवळ रेशीम, कोळसा, लोह आणि जलशक्तिचे साधन मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. तरीपण औद्योगिक क्रांतीची सुरुवात इंग्लंडमध्येच का झाली, याच्या कारणांचे विश्लेषन महत्त्वाचे ठरते.

**१. अनुकूल राजनीतिक वातावरण:**

युरोपातील अन्य राष्ट्रांपेक्षा इंग्लंड मधील राजकीय वातावरण औद्योगिक क्रांतीसाठी अधिक पोषक होते. ब्रिटनमधील राजकीय स्थिती स्थिर होती. १६८८च्या ग्लोरियस रिवोल्युशन नंतर इंग्लंडमध्ये लोकशाही प्रजातंत्र मोठ्या मजबुतिने स्थापन झाले. जनतेला उदारमतवादी वातावरणात राजनीतिक अधिकार प्राप्त होते. ज्यामुळे व्यापारिक क्रियाकलापाविषयी उत्तेजन मिळाले. युरोपातील अनेक देशांमध्ये यावेळी निरंकुश सामंतशाही व्यवस्था होती. त्यामुळे राजनीतिक अस्थिरता होती आणि विशेषाधिकारांचा संकोच झालेला होता.

**२. इंग्लंडमधील भौगोलिक स्थिती:**

इंग्लंडची भौगोलिक स्थिती औद्योगिक क्रांतीला सहाय्यक झाली. इंग्लंडच्या सर्व बाजूने समुद्र असल्यामुळे तेथे बंदरांची निर्मिती सोपी झाली. परिणामी व्यापारिक दळणवळणासाठी सुविधा निर्माण झाल्या. दळणवळणाच्या स्वस्त आणि चांगल्या सुविधा प्राप्त झाल्यामुळे अंतर्गत आणि विदेशी दळणवळणाला चालना मिळाली. दळणवळणाच्या अनुकूल सुविधेमुळे औद्योगिक क्रांतीचा तीव्र गतीने विकास झाला.

**३. प्रभावी आरमार शक्ती:**

सोळाव्या शतकापर्यंत युरोपात स्पेन हा देश आरमारी शक्तीबाबत आघाडीवर होता. परंतु स्पेनचे अजिंक्य आरमार नष्ट करून इंग्लंडने आपले प्रभुत्व सिद्ध केले. इंग्लंडच्या आरमारी प्रभुत्वामुळे इंग्लंडचे व्यापारी मार्ग सुरक्षित बनले, त्याउलट इंग्लंडने चाचेगिरीला प्रोत्साहन देऊन त्यातून भरपूर लूट मिळवली. चाचेगिरीचा लुटीतून जो पैसा आला तो भांडवल म्हणून वापरला गेला. त्यामुळे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला हातभार लागला. सोळाव्या शतकात इंग्लंड जवळ ७६ हजार टनांची गलबते होती. तर सतराव्या शतकात ही मर्यादा पाच लक्ष टनांपर्यंत वाढली. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी १२ लक्ष टनाची गलबते निर्माण करून इंग्लडने आपला पूर्वीचा उच्चांक मोडला होता. अशा प्रकारे वाढत्या औद्योगिकरणाबरोबर इंग्लंडने दळणवळणाच्या क्षेत्रातही प्रगती केल्यामुळे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला गती प्राप्त झाली.

**४. भांडवलाची उपलब्धता:**

इंग्लंडमध्ये उपलब्ध असलेल्या अतिरिक्त भांडवलामुळे औद्योगिक क्रांतीला पोषक असे वातावरण तयार झाले होते. १७५० पूर्वी इंग्लंडमध्ये सुती कापडाच्या व्यवसायाची खूपच प्रगती झाल्यामुळे युरोपातील ते एक अग्रेसर राष्ट्र बनले होते. त्यामुळे इंग्लिश व्यापाऱ्यांकडे बरेच अतिरिक्त भांडवल जमा झालेले होते. भारत, अमेरिका, न्युझीलँड, ऑस्ट्रेलिया वगैरे देशांवर आर्थिक निर्बंध लादून वसाहतीमधून इंग्लंडने बराच पैसा मिळवला होता. तंबाखूच्या व्यापाराची मक्तेदारी, मसाल्याच्या पदार्थांची विक्री इत्यादी मार्गांनी अमेरिकेतील ब्रिटिश व्यापाऱ्यांनी बरेच भांडवल उभे केले होते. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीची कारणमीमांसा करताना विख्यात अमेरिकन इतिहासकार ब्रुक ॲडम्स लिहीतो की, " इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीची सुरुवात बंगालमध्ये केलेल्या अमाप लुटीतून झाली आहे. औद्योगिक क्रांतीचा प्रारंभ १७७०च्या सुमारास झाला असे मानण्यात येते. पण केवळ यांत्रिक शोधांनी क्रांती होत नाही. त्यांना गती देण्यासाठी संचित भांडवलाची गरज असते. भारतीय संपत्तीच्या लुटी शिवाय ही गती मिळू शकली नसती. या लुटीवर इंग्लंडला मिळालेला फायदा कल्पनातीत होता. त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. कारण सुमारे अर्धशतक उद्योगप्रधान इंग्लंडला कोणीच प्रतिस्पर्धी नव्हता." या संपत्तीचा उपयोग इंग्लिश व्यापाऱ्यांनी महागडी यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी केला. त्यामुळे व्यापाऱ्यांना नव्या यंत्राद्वारे अधिक जलद गतीने मालाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन वाढविता आले.

### ५. नैसर्गिक साधन संपत्ती:

इंग्लंडवर नैसर्गिक साधनांच्या बाबतीत निसर्गाचे वरदान होते. इंग्लंडमध्ये मोठमोठे कारखाने उभारण्यास आणि मोठ्या प्रमाणावर औद्योगीकरण करण्यास लोखंड-कोळसा इत्यादी खनिज संपत्ती विपुल प्रमाणात उपलब्ध होती. इंग्लडचा उत्तर भाग कोळशाचे आगार असल्याने व तेथे लोखंडाचीही कमतरता नसल्याने इंग्लंड औद्योगिक क्रांतीत अग्रेसर झाले. औद्योगिक क्रांतीच्या काळात लाकडाची यंत्रे मागे पडून बाष्प शक्तीवर चालणारी लोखंडाचे यंत्रे प्रामुख्याने इंग्लंडमधील संशोधकांनी शोधून काढली. या यंत्राचा उपयोग सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्याने औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. बाष्प शक्तीची यंत्रे बनवून सुती वस्त्रांचे उत्पादन अधिक गतीने होऊ लागले.

### ६. दमट हवामान:

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीची सुरुवात ही प्रामुख्याने कापड उद्योगा पासून झाली. कापड उद्योगासाठी दमट हवामान लागते. इंग्लंडमधील दमट हवामानामुळे इंग्लंड अल्पावधीतच कापड उद्योगाचे केंद्र बनले.

### ७. बाजारपेठेची उपलब्धता:

इंग्लंडमधील दरडोई उत्पन्न जगात सर्वाधिक असल्यामुळे कारखान्यात तयार झालेला पक्या मालाला खुद्द इंग्लंडमध्ये मोठी बाजारपेठ उपलब्ध होती. १७०७ मध्ये इंग्लंड व स्कॉटलंडचे एकीकरण होऊन व्यापारासाठी आणखी मोठी बाजारपेठ अस्तित्वात आली. १८०० मध्ये आयर्लंडही त्यांना मिळाला, त्यामुळे अंतर्गत व्यापाराचे क्षेत्र अजून व्यापक झाले. याशिवाय अमेरिका, भारत, आफ्रिका इत्यादी वसाहतींशी इंग्लंडचा व्यापार सुरू होता. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात संपूर्ण जगात इंग्लंडचा व्यापार वाढून इंग्लंडशी स्पर्धा करणारे दुसरे राष्ट्र अस्तित्वात नव्हते.

### ८. बँकिंग क्षेत्राचा विकास:

इंग्लंड मध्ये 'बँक ऑफ इंग्लंड' १६९४मध्ये स्थापन झाली. १७८४पर्यंत इंग्लडमध्ये १०० पेक्षा अधिक प्रांतीय बँका होत्या. १७८४ ते १७९४ या दहा वर्षात इंग्लंडमधील प्रांतीय बँकांची संख्या सहाशे झाली. एकट्या लंडन शहरात शंभर बँका होत्या. उद्योगधंद्यांना आवश्यक तो वित्तीय पुरवठा या बँकांनी केला. त्यामुळे इंग्लंडमध्ये उद्योगधंद्यांच्या विकासास व औद्योगिक क्रांतीस गती आली.

### ९. लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचवला:

१७५०ते १८५० या काळात इंग्लंड ची लोकसंख्या ६० लाखांवरून ९० लाखांवर गेली. या काळात इंग्लंड मधील श्रीमंत लोकांच्या खाण्यापिण्यात आणि वापरात साखर, चहा ,कॉफी, चॉकलेट, रेशीम व सुती कापड वगैरे वस्तू आल्या. एकूणच राहणीमानाचा दर्जा वाढला . लोकांच्या जीवनात सुखवस्तूपणा आला. चैनीच्या वस्तूंची मागणी वाढल्यामुळे सर्वच उद्योगांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा झाला. उद्योगपतीचा नफाही वाढला व तो त्यांनी पुन्हा उद्योग-धंद्यात गुंतवल्याने औद्योगिक प्रगतीला गती मिळाली.

munotes.in

**१०. कृषी क्रांतीचा परिणाम:**

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या पूर्वी सोळाव्या आणि सतराव्या शतकात कृषि क्षेत्रांमध्ये व्यापक परिवर्तन घडून आले. कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानामध्ये मोठे बदल झाले. या अंतर्गत मोठमोठे शेतीफार्म स्थापन होऊन नवीन कृषी यंत्रांच्या आणि उत्पादन पद्धतीचा वापर होऊ लागला. परिणामतः शेतीमधून जमीनदारांना मोठा लाभ मिळाला आणि या लाभातून अतिरिक्त भांडवलाचा संचय झाला. त्याचा उपयोग औद्योगिक क्षेत्रामध्ये भांडवल गुंतवण्यात झाला. या कृषी क्रांतीच्या परिणामामुळे शेतमजूर बेकार झाले परिणामतः वैकल्पिक रोजगाराच्या शोधात त्यांनी शहराकडे धाव घेतली. त्यामुळे कारखान्यासाठी स्वस्त दरात कामगार उपलब्ध झाले. त्याचबरोबर कृषी क्रांतीने कच्चा मालाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे कारखान्यांना कच्चामाल सहज उपलब्ध झाला. या सर्वांची परिणीती म्हणजे औद्योगिक क्रांतीची भरभराट झाली.

**११. वैज्ञानिक शोध:**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला सर्वात जास्त हातभार लावला असेल तर तो वैज्ञानिक शोधांनी. यंत्रे ही मनुष्याच्या कौशल्या पेक्षा अधिक वेगाने आणि अधिक अचूकतेने मोठ्या प्रमाणावर उत्पादन न थकता करू शकतात. इंग्लंडच्या कापडाला जगाच्या बाजारपेठेत सातत्याने वाढती मागणी होती. त्यामुळे सहाजिकच यांत्रिक शोधांची सुरुवात कापड उद्योगात झाली. १७३३मध्ये के नावाच्या संशोधकाने धावत्या धोट्याचा शोध लावला. १७६४ मध्ये हारग्रीव्हजने- स्पिनिंग जेनी या सूत कातणी यंत्राचा शोध लावला. १७६९ मध्ये आर्कराईटने स्पिनिंग जेनी यंत्रात सुधारणा केली. १७७९मध्ये क्रॉम्पटने त्यात महत्त्वाची भर घातली. आर्कराईटच्या सुधारणेमुळे धाग्यांना उत्तम पीळ बसे तर क्रॉम्पटनच्या शोधामुळे पूर्वीपेक्षा अधिक तलम सुत कातता येऊ लागले. १७८५ मध्ये आर्कराईटने यांत्रिक मागाचा शोध लावला. १७९३मध्ये व्हीटने या अमेरिकन शोधकाने कपाशीतून सरकी दूर करून गठ्ठे बांधण्याचे यंत्र तयार केले. या सर्व संशोधकांनी आधुनिक कापड उद्योगाचा विकास घडवून आणला. यंत्रयुगाला पायाभूत असणारी गोष्ट म्हणजे यंत्रे चालवण्यासाठी लागणारी शक्ती होय. १७६५मध्ये जेम्स वॅटने बाष्प शक्तीचा शोध लावला. जेम्स वॅटच्या यंत्रामुळे कापड उद्योगातील यंत्रे चालवण्यासाठी बाष्प शक्तीचा वापर सुरू झाला.१७६५ मध्ये जेम्स वॅट यांनी लावलेल्या बाष्प शक्तीचा शोध इतका महत्त्वाचा आहे की अठराव्या शतकाच्या उत्तरार्धास 'बाष्प शक्तीचे युग' असे म्हणतात. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस विद्युत शक्तीचे साधन उपलब्ध झाले. १८१५मध्ये हम्प्रे डेवी याने सेफ्टी लॅम्प तयार करून खाणीतून कोळसा काढणे अधिक सुरक्षित बनवले. १७६० मध्ये दगडी कोळशाचा भट्टीसाठी उपयोग करून लोखंड शुद्ध करता येईल ही गोष्ट हेन्री कार्ट यांनी दाखवून दिली. अशाप्रकारे इंग्लंडमध्ये विविध शोध लागले आणि नवी यंत्रे तयार करण्यात आली. त्यांनी आपल्या कल्पकतेच्या जोरावर इंग्लंडचे आर्थिक जीवन बदलून टाकले. इंग्लड जगातील अग्रेसर औद्योगिक राष्ट्र बनले. तेथे प्रचंड आर्थिक समृद्धी निर्माण झाली. औद्योगिक क्रांतीच्या काळात इंग्लंड 'जगाचा कारखाना' बनले.

## ५.६ औद्योगिक  क्रांतीची वाटचाल

अठराव्या शतकाच्या प्रारंभापासूनच दैनंदिन वापराच्या वस्तूंची मागणी प्रचंड प्रमाणात वाढली. ती पूर्ण करण्यासाठी वस्तूंच्या उत्पादनाची गती वाढवणे आवश्यक होते .त्यामुळे अनेक बुद्धीवादी व्यक्तींनी आपले सखोल चिंतन व प्रयोगवादी  दृष्टीने उत्पादन करणाऱ्या यंत्रांमध्ये काही मूलभूत सुधारणा करण्यास सुरुवात केली. या नव्या सुधारित यंत्रामुळे काही प्रमाणात उत्पादनाचा वेग वाढला. या नव्या सुधारित यंत्रापासून स्फूर्ती घेऊन अनेक तंत्रज्ञांनी नवनवे शोध लावल्यामुळे उत्पादनाचा वेग प्रचंड वाढला .औद्योगिक क्रांतीमुळे विविध उत्पादन क्षेत्रात जी प्रगती झाली तिचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

### ५.६.१  कापड उद्योग:

कापड निर्मिती मध्ये कापसापासून सूत कातने आणि सुतापासून कापड तयार करणे असे दोन महत्त्वाचे टप्पे असतात. इंग्लंडमध्ये तयार होणाऱ्या कापडास परदेशातून व विशेषतः वसाहतींमधून जबरदस्त मागणी असे. इंग्लंडच्या कापडाला जगाच्या बाजारपेठेत सातत्याने वाढती मागणी असल्यामुळे सहाजिकच यांत्रिक शोधांची सुरुवात कापड उद्योगात झाली.

### १. धावता धोटा:

जॉन के : १७३३मध्ये जॉन के याने कापड विणण्यासाठी धावता धोटा शोधून काढला. त्यामुळे कापड विणण्याचे काम जलद गतीने होऊ लागले. या सुधारित हातमागामध्ये दोन ऐवजी एकच माणूस विणण्याचे काम अधिक गतीने करू शकत होता . त्यामुळे कापड उत्पादन वाढवता आले.

### २  स्पिनिंग जेनी – हारग्रीव्हज:

धावत्या धोट्यामुळे कापड विणण्याचे काम जलद गतीने होऊ लागल्यामुळे सूतकताईचा प्रश्न बिकट झाला. त्याचा परिणाम म्हणून १७६४मध्ये हारग्रीव्हज  याने स्पिनिंग जेनी या नावाचे एक यंत्र तयार करून सूतकताईचा प्रश्न सोडवण्यास मदत केली. या यंत्रावर एकाच वेळी आठ धागे कातले जाऊ लागले. परंतु तयार झालेल्या धाग्यास पक्का पीळ बसत नसे. या यंत्रात ८ चकत्या बसवण्यात आल्या. त्यामुळे या यंत्राच्या साह्याने एक माणूस पूर्वीपेक्षा आठपट सूत जास्त कातू शकत होता. धावत धोटाच्या शोधास हा शोध पूरक ठरल्याने कापड उत्पादनात वाढ झाली.

### ३. वाटर फ्रेम - अर्कराइट:

स्पिनिंग जेनी या यंत्रामुळे सुतास पक्का पीळ बसत नसे, हा दोष नाहीसा करण्यासाठी १७७१मध्ये अर्कराइटने वाटर फ्रेम नावाचे यंत्र तयार केले. हे यंत्र अवजड असल्यामुळे त्याचा उपयोग पाण्यावर होत असल्याने, गृहउद्योग पद्धतीमध्ये हे यंत्र वापरणे अशक्य झाले. वाटर फ्रेम या यंत्राच्या शोधानंतर हस्तउद्योग पद्धती नष्ट झाली आणि कारखानदारी पद्धती अस्तित्वात आली. त्यामुळेच आर्कराईटला कारखानदारी पद्धतीचा जनक  मानण्यात येते.

**४ . स्पिनिंग म्युल - सॅम्युअल क्रॉम्प्टन:**

१७७९ मध्ये सूत कातणीच्या कामात अधिक सुधारणा करण्यासाठी सॅम्युअल क्रॉम्प्टनने म्युल नावाचे एक सुधारित सूतकताई यंत्र बनवले. या यंत्रात हारग्रीव्हजचे स्पिनिंग जेनी आणि कार्टराईटचे वाटर फ्रेम या दोन्ही यंत्रांचे गुणधर्म समाविष्ट करण्यात आले होते. यामुळे एक कामगार हाताने सूतकताई करणाऱ्या दोनशे कामगारांच्या इतके काम करू शकत होता. या यंत्राच्या मदतीमुळे ब्रिटिश विणकरांना भारतातील तलम वस्त्र बनविणाऱ्या विणकरांशी जोरदार स्पर्धा करता आली .

**५. पावरलूम - एडमंड राईट:**

स्पिनिंग म्यूल या यंत्रामुळे सूत कताईचे काम अधिक जलद गतीने होऊ लागले. परंतु कापड विणण्याचे काम मात्र त्या मानाने मागे पडू लागले. सूत कातणे, विणणे या दोन्ही बाबतीत मेळ घालण्याच्या दृष्टीने १७८४मध्ये डॉक्टर एडमंड राईट यांनी पावरलूम नावाचा यंत्रमाग निर्माण केला. यंत्र शक्तीने चालणाऱ्या या मागामुळे विणकरांच्या कामाचा वेग वाढला. आता सूत कातणे - विणणे ही दोन्ही कामे वेगाने व यंत्र शक्तीने होऊ लागली.

**६. कॉटनजीन - व्हिट:**

व्हिट या अमेरिकन संशोधकाने कापसापासून सरकी बाजूला काढण्याचे कॉटनजीन हे यंत्र १७९३मध्ये शोधून काढले. या यंत्राच्या मदतीने एक मजूर दिवसाला १००० पौंड कापसापासून सरकी वेगळी करू शकत होता. त्यामुळे या क्षेत्रात मोठी क्रांती झाली. या यंत्राच्या शोधामुळे कापूस स्वच्छ करण्याचे काम अधिक सुकर झाले. या शोधानंतर मोठमोठे जिनिंगचे कारखाने अस्तित्वात आले.१७८५च्या सुमारास यांत्रिक पद्धतीने कापडाला रंग देण्यास सुरुवात झाली. त्यामुळे वेळेची बचत होऊन रंगीत कापड लवकर तयार होऊ लागले व ठसाने रंग देण्याची पद्धती बंद झाली. या सर्व शोधांमुळे कापूस शुद्धिकरण, सूतकताई, विणकाम ह्या कापड उद्योगातील अवस्थांमध्ये संतुलन साधले गेले. त्यामुळे या उद्योगाचा मोठ्या प्रमाणात कायापालट झाला.

**५.६.२ लोखंड व कोळसा उद्योग:**

इंग्लंडमध्ये लोखंडाच्या खाणी पुष्कळ होत्या. परंतु त्यातून लोखंड वर काढून शुद्ध करण्याकरता साध्या कोळशाचा उपयोग करण्यात येत असे. त्यामुळे जंगले खल्लास होऊन कोळसा मिळेनासा झाला. तेव्हा लोक दगडी कोळशाकडे वळले आणि लोखंडाचा रस करण्याकरता दगडी कोळशाचा उपयोग करू लागले. कालांतराने दगडी कोळसा जाळून त्याचा अवशिष्ट राहणारा भाग म्हणजे कोक उपयोगात आणण्यास सुरुवात झाली . हा शोध अब्राहम डार्बी याणे १७३५ मध्ये लावल्यामुळे लोखंडाचा रस करण्याच्या कामी कोकचा उपयोग होऊ लागला. ज्या ठिकाणी लोखंड व दगडी कोळसा विपुल प्रमाणात सापडतो त्या त्या ठिकाणी लोखंडाचे कारखाने निघाले. या कारखान्यातून लोखंड, पोलाद तयार करणे व त्याचे निरनिराळे यंत्रे तयार करणे इत्यादी कामे होऊ लागली. जेम्स वॅटने १७६९मध्ये बाष्प शक्तीवर चालणारे इंजिन शोधून काढले. त्या इंजिनाचा १७८२पासून लोखंडी कारखान्यांमधून उपयोग होऊ लागला. वाफेच्या इंजिनमधील दोष नाहीसे करून ते अधिक उपयुक्त करण्याचे काम जॉन विल्किन्सन यांनी केले. विल्किन्सनने लोखंडाच्या तोफा

ओतल्या होत्या. बेंजामिनने घडाळ्या सारख्या नाजूक वस्तू करता वापरण्यात येणारे शुद्ध व चिवट पोलाद तयार केले. लोखंड शुद्ध करण्याकरता दगडी कोळशाच्या उपयोग होतो असे समजताच खाणीतून तो वर काढण्याच्या उद्योग जोरात सुरू झाला. परंतु खाणीतून दगडी कोळसा वर काढणे अतिशय धोक्याचे असे. खाणीतील विषारी वायू पासून बचाव करण्यासाठी १८१५मध्ये सर हम्फ्री डेवी याने सेफ्टी लॅम्प चा शोध लावला. त्यामुळे खाणीतून कोळसा काढने अधिक सुरक्षित बनले. ( पाश्चात्त्य जग; डॉ. धनंजय आचार्य : ६२)

### ५.६.३ दळणवळणाच्या साधनांमधील विकास:

कारखान्यातून मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊ लागल्याने ते विकण्यासाठी व त्याच्या वितरणासाठी वाहतूक जलद गतीने होणे आवश्यक होते. ही गरज भागवण्यासाठी तंत्रज्ञांनी नवनवे मार्ग शोधून काढले

#### १. रस्ते:

औद्योगिक क्रांती पूर्वी रस्ते पक्के नव्हते. पक्की सडक तयार करण्याचे श्रेय जॉन मॅकअॅडम यास द्यावे लागेल. इसवी सन १८१८मध्ये त्याने रस्त्यावर खडी टाकून त्यावर रोलर फिरवून पक्का रस्ता तयार केला. या शोधानंतर युरोपात व जगातील सर्व देशात हे तंत्र वापरून पक्के रस्ते मोठ्या प्रमाणावर तयार करण्यात आले.

#### २. जल वाहतूक:

रस्त्यांसाठी खूप पैसा खर्च करावा लागतो . तेव्हा मोठमोठे कालवे काढून बोटीद्वारे वाहतूक सुलभ होते, हे लक्षात येताच कालवे तयार होऊन इसवीसन १७७५ ते १८५० या काळात जलवाहतुकीत विशेष प्रगती झाली. अठराव्या शतकात इंग्लंड अमेरिकेतील बऱ्याच तज्ञांनी वाफेच्या शक्तीवर चालणाऱ्या बोटी बनवण्यावर लक्ष केंद्रित केले. १८१३ मध्ये हेनरी बेल याने तयार केलेली बाष्प शक्तीवर चालणारी पहिले आगबोट तयार केली. अटलांटिक महासागर पार करून जाणारी पहिली आगबोट १८१९मध्ये अमेरिकेहून इंग्लंडला आली .

#### ३. रेल्वे:

कालवे व रस्ते या मार्गाने वाहतूक मंद गतीने होत असे. १८१४मध्ये सर जॉर्ज स्टीफन्सन यांनी रॉकेट हे पहिले रेल्वे इंजिन तयार केले. जॉर्ज स्टीफन्सने बनवलेल्या बाष्प शक्तीवर चालणाऱ्या रॉकेट या रेल्वे इंजनचा साह्याने लिव्हरपुल ते मॅचेस्टर या दरम्यान दर ताशी २९ मैल वेगाने पहिली रेल्वे गाडी चालवली गेली. अशाप्रकारे आधुनिक काळातील रेल्वे वाहतुकीला प्रारंभ झाला. पुढे रेल्वे वाहतुकीच्या क्षेत्रात फार मोठी क्रांती झाली १८७१ पर्यंत जगात एकूण दोन लाख रेल्वेमार्ग टाकले गेले. रेल्वे वाहतूक अधिक जलद, स्वस्त व कार्यक्षम होती. त्यामुळे औद्योगिक उत्पादन, अन्नधान्य व कच्चामाल जलद गतीने प्राप्त होऊ लागला. युरोपियन देशात पुढील दीडशे वर्षाच्या काळात रेल्वेचे जाळे विणले गेले.

#### ४. विमान वाहतूक:

१९०३ मध्ये राइट बंधूंनी पहिले यशस्वी हवाई उड्डाण केल्यानंतर हवाई वाहतूकीस गती प्राप्त झाली.

**५. पेनी पोस्टची स्थापना:**

१८४० मध्ये इंग्लंडमध्ये पेनी पोस्टची स्थापना झाली. त्यानंतर युरोपियन देशात व जगात ही पद्धत रूढ झाली. त्यानुसार अल्पदरात जगात कोठेही पत्र पाठवण्याची सोय उपलब्ध झाली.

**६. तारायंत्र:**

१८३६मध्ये मोर्स यांनी तारायंत्राचा शोध लावला. अलेक्झांडर बेल याने १८७६ मध्ये टेलिफोनचा शोध लावला. याने तयार केलेल्या टेलिफोन मध्ये सुप्रसिद्ध अमेरिकन शास्त्रज्ञ एडिसन याने सुधारणा केल्या. सुधारलेल्या टेलिफोनचा सर्व यूरोपात व जगात स्वीकार झाला. मोर्सच्या तारायंत्राद्वारे सांकेतिक भाषेत संदेश पाठवला जाई. बेल व एडिसन यांनी शोधून काढलेल्या टेलिफोन मार्फत बोलणाऱ्याचे शब्द एका सेकंदात पलीकडे पाठवले जाई.

**५.६.४ बाष्प शक्ती व विद्युत शक्ती:**

जेम्स वॅट यांनी १७६५ मध्ये वाफेचा शक्तीचा ऊर्जानिर्मिती मध्ये उपयोग केला. त्यामुळे औद्योगिक क्रांतीला मोठा हातभार लागला. त्याने बाष्प शक्तीवर चालणाऱ्या इंजिनात वेळोवेळी खूप सुधारणा केल्या. १७८६ पासून बाष्प शक्तीचा उपयोग यंत्रे चालवण्यासाठी होऊ लागला. त्याच्या स्टीम इंजिनचा प्रथम उपयोग खाणीतून कोळसा आणि कच्चे लोखंड बाहेर काढण्यासाठी करण्यात आला. प्रथम ही इंजिने एकाच ठिकाणी ठेवावी लागत. परंतु पुढे त्याचा वापर यंत्रे वर्तुळाकार फिरवण्यासाठी केला जाऊ लागला. त्यामुळे बाष्प शक्तीच्या सहाय्याने चालणाऱ्या इंजिनाच्या मदतीने खूप कामे करता येऊ शकतात हे सिद्ध झाले. १७९५पासून बाष्प यंत्राचा उपयोग व सर्व उत्पादनात क्षेत्रात सुरू झाला. १८०० मध्ये होल्टने कोरडे विजेचे घट तयार केले. हा जगाच्या इतिहासातील पहिला विद्युत गट तयार केला. या शोधामुळे त्याला नेपोलियनने सुवर्णपदक दिले होते. डायनोमा वापरून वीज तयार करण्याचे श्रेय मायकेल फॅरडेला द्यावे लागते. आता विजेचा वापर यंत्रे चालवण्यासाठी होऊ लागला. विद्युत शक्तीमुळे तर कारखान्यातून उत्पन्नाचे प्रमाण कितीतरी पटीने वाढले. १९व्या शतकाचा उत्तरार्ध विद्युत यूग म्हणून ओळखले जाते, कारण यंत्रचालक, प्रकाश निर्मिती व दळणवळण इत्यादीसाठी विजेचा वापर सुरू झाला. विद्युत जनित्र हे अखंड वीज निर्माण करणारे यंत्र फॅरेडे यांनी तयार केले. विद्युत प्रवाह निर्माण करून तिचा वापर अनेक ठिकाणी केला जाऊ लागला. तारायंत्र, विजेचा दिवा, शेगडी, पंखा, इस्त्री, टीव्ही वगैरे आजचे सर्व यूग विद्युत शक्तीवरच चालते असे म्हणावे लागेल.

## ५.७ औद्योगिक क्रांतीचा विस्तार

औद्योगिक क्रांती सर्व प्रथम इंग्लंडमध्ये घडून आली. परंतु ती इंग्लड पुरतीच मर्यादित राहिली नाही. कोणत्याही राष्ट्राने लावलेले शोध हे त्या राष्ट्रात मर्यादित न राहता कालांतराने जगाचे होतात. इंग्लंडमध्ये विविध शास्त्रीय शोध लागले, यंत्र निर्मिती झाली, उत्पादन वाढले दळणवळण वाढले, व्यापार वाढला, व्यापारामुळे इंग्लडचा माल जगभर जाऊ लागला आणि इंग्लंड जगात अत्यंत समृद्ध राष्ट्र बनले. इंग्लडचे नाविक सामर्थ्य

वाढून ते अत्यंत प्रबळ राष्ट्र बनले व त्यामुळेच नेपोलियन बरोबर झालेल्या युद्धात इंग्लंडने यशस्विरीता भाग घेतला आणि शेवटी १८१५ मध्ये नेपोलियनच्या पाडाव करण्यात यश मिळवले. इंग्लंडच्या औद्योगिककरणाचे पडसात युरोपात उमटले. अनेक युरोपियन देशांचे प्रतिनिधी इंग्लंडला जाऊन तेथून कर्ज आणू लागले. १८२५ नंतर ब्रिटिश भांडवला बरोबरच ब्रिटिश यंत्रेही युरोपियन देश आयात करू लागले. सुरुवातीस फ्रान्स, बेल्जियम, जर्मनी या देशांनी इंग्लंडमधून यंत्रे आयात केली. पुढे हॉलंड, स्वीडन, पोलांड, स्पेन, इटली इत्यादी देशातही औद्योगिक क्रांतीचा प्रसार झाला.

**१. फ्रान्स:**

औद्योगिक क्रांती फ्रान्स मध्ये १९व्या शतकात पोहोचली. तेथे नेपोलियनच्या काळात औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली. शेतीचे उत्पादन वाढावे यासाठी फ्रान्समध्ये इंग्लंडमधील शेती उत्पादन पद्धतीच्या नव्या तंत्राचा अवलंब होऊ लागला. फ्रान्समध्ये औद्योगिक क्रांती प्रामुख्याने रेशमी कापडाच्या व्यवसायात व धातू उद्योग व्यवसायात झाली.

**२. जर्मनी:**

१८७१मध्ये जर्मनीचे एकीकरण घडून आल्यानंतर जर्मनीने औद्योगिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती केली. इंग्लंड व फ्रान्स ही राष्ट्र औद्योगिकीकरणात पुढे गेलेली पाहून जर्मन सरकारने औद्योगीकीकरणाला उत्तेजन दिले. जर्मनीमध्ये लोखंडाचे विपुल साठे होते. तेथे प्रथम पोलाद निर्मितीचा व्यवसायास प्रोत्साहन मिळाले. जागतिक व्यापारी स्पर्धेत शस्त्रास्त्र निर्मितीच्या क्षेत्रात जर्मनी आघाडीवर राहिली. बिस्मार्कने जर्मनीला लष्करीदृष्ट्या प्रबळ बनवण्यासाठी लोहमार्गाचा विकास घडवून आणला. औद्योगीकरणाचा उपयोग जर्मनीने प्रामुख्याने लष्करी दृष्टीने केला.

**३. अमेरिका:**

अमेरिकेत युरोपियनांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. उत्पादनाची नवी तंत्रे त्यांना अवगत होती. त्यामुळे अमेरिकेतील शेतीत नव्या उत्पादन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येऊ लागला. मुबलक जमीन, शेतीच्या प्रगत तंत्राचे ज्ञान यामुळे अमेरिकेत प्रथम शेती व्यवसायात क्रांती घडून आली. अमेरिका स्वतंत्र झाल्यानंतर तेथे यंत्र निर्मितीस प्रारंभ झाला. कारखाने निघू लागले. पोलाद, कापड इत्यादी व्यवसायात अमेरिकेने प्रगती केली. अमेरिकेतील औद्योगिक प्रगती अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरू झाली तथापि अमेरीकेची खरी औद्योगिक भरभराट १९व्या शतकात घडून आली.

**४. नेदरलँड:**

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीने नेदरलॅंडमधील औद्योगिकरणास चालना मिळाली. नेदरलँड म्हणजे आजचे हॉलंड व बेल्जियम यांनी मिळून बनलेला भूभाग. हा भूभाग छोटा उद्योगधंद्यासाठी पूर्वीपासून प्रसिद्ध आहे. रशियातील प्रगती त्या मानाने खुपच उशिरा सुरू झाली.

munotes.in

**५. जपान:**

आशिया खंडात औद्योगिक क्रांती प्रथम जपानमधे १९व्या शतकाच्या उत्तरार्धात झाली. जपानचा सम्राटाने जपानच्या औद्योगिकीकरणासाठी परकीय तंत्रज्ञ जपान मध्ये आणले. देशातील अनेक विद्यार्थ्यांना प्रगत तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी पाठवले. त्यामुळे जपानच्या औद्योगिकीकरणास चालना मिळाली. जपानने यंत्र सामुग्रीच्या निर्मितीचे मोठे कारखाने ऊभारले. आज जपान जगात औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असलेले राष्ट्र आहे.

**६.भारत:**

आशिया व आफ्रिका खंडातील बऱ्याच देशांवर साम्राज्यवादी सत्तांची घट्ट पकड होती. त्यामुळे त्यांचा औद्योगिक विकास खुंटला होता. तरीही भारतात ब्रिटिश सरकारचे प्रोत्साहन नसतानाही काही साहाशी भारतीय उद्योजकांनी कारखाने काढण्यास सुरुवात केली. आधुनिक भारतीय वस्त्रोद्योग याचा पाया १९व्या शतकात मुंबईमध्ये घालण्यात आला. विसाव्या शतकात लोखंड, पोलाद, साखर व अन्य उद्योग अल्पप्रमाणात विकसित झाले. दुसऱ्या महायुद्धानंतर पाश्चात्त्य राष्ट्रांच्या साम्राज्यवादाचा वेगाने रास झाला. आशिया आफ्रिका खंडातील देश स्वतंत्र झाले. त्यामुळे स्वतंत्र आशियाई आणि आफ्रिकी देशात औद्योगिकीकरणास वेगाने सुरुवात झाली.

अशा प्रकारे अठराव्या शतकात सुरू झालेली औद्योगिक क्रांती विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात जगाच्या सर्व भागात पोहोचली आणि जागतिक क्रांती बनली.

## ५.८ औद्योगिक क्रांतीचे परिणाम

औद्योगिक क्रांतीचे मानव समाजावर सर्वाधिक प्रभाव टाकला. औद्योगिक क्रांतीने उत्पादन पद्धतीला मोठ्या प्रमाणावर प्रभावित केले. मानवी श्रमाची जागा यंत्रांनी घेतली, उत्पादनांमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक बदल घडून आले, आर्थिक समृद्धी आली, आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला, वसाहतवादी साम्राज्यवादाचा विस्तार झाला आणि समाजात नव्या वर्गाचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीने भांडवलदार वर्गाला भांडवल जमा करण्याची आणि मजुरांचे शोषण करण्याची संधी मिळाली, तर मजूर वर्गाला या शोषणातून बाहेर पडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करावे लागले. परिणामी कामगार चळवळींचा जन्म झाला. इतकेच नव्हे तर या क्रांतीने सांस्कृतिक परिवर्तनाला सुद्धा गती प्रदान केली. नैसर्गिक साधन संपत्ती मोठ्या प्रमाणावर मानवाच्या विकासासाठी वापरली जाऊ लागली. त्यामुळे पर्यावरणाचा असमतोल निर्माण झाला. एकूणच औद्योगिक क्रांतीचे परिणाम खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

**५.८.१ आर्थिक परिणाम:**

**१. उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली:**

औद्योगिक क्रांतीमुळे कारखाना पद्धतीचा उदय होऊन यांत्रिक पद्धतीने पक्क्या मालाचे उत्पादन होऊ लागल्याने उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली. या औद्योगिक उत्पादनांनी अंतर्गत आणि विदेशी व्यापाराला उत्तेजन मिळून औद्योगिक दृष्ट्या पुढारलेले

देश आर्थिक दृष्टीने समृद्ध झाले. इंग्लंडची अर्थव्यवस्था उद्योगप्रधान बनून तेथे औद्योगिक भांडवलवादाचा जन्म झाला. औद्योगिक आणि व्यापारिक संस्थांचा विस्तार झाला. अशाप्रकारे उत्पादनाच्या वाढीमुळे एका नव्या आर्थिक पद्धतीला औद्योगिक क्रांतीने जन्म दिला.

**२. शहरीकरण:**

औद्योगिक क्रांतीमुळे गावांमधील हस्तउद्योग आणि कुटीर उद्योग यांचे पतन झाले. परिणामी रोजगाराच्या शोधामध्ये लोक शहरांकडे धाव घेऊ लागले. कारण शहरांमध्ये मोठमोठे कारखाने निघाल्यामुळे रोजगाराच्या संध्या मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत्या. त्यामुळे स्वाभाविकच शहरीकरणाची प्रक्रिया तीव्र झाली. नवीन शहरे औद्योगिक केंद्रांच्या आसपास विकसित झाली. शहरांचा उदय व्यापारी केंद्र, उत्पादन केंद्र व बंदरे या रुपात झाला. ही शहरीकरणाची प्रक्रिया फक्त इंग्लंड पर्यंतच मर्यादित राहिली नाही तर फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, इटली आदी देशांमध्ये सुद्धा तिचा विस्तार झाला. ही शहरे अर्थव्यवस्थेची केंद्रे बनली.

**३. आर्थिक असंतुलन:**

औद्योगिक क्रांतीने आर्थिक असंतुलन ही आंतरराष्ट्रीय समस्या निर्माण केली. विकसित आणि मागासलेल्या देशांमध्ये आर्थिक दरी रुंदावत गेली. विकसित राष्ट्रे अविकसित राष्ट्रांचे खुलेआम शोषण करू लागली. आर्थिक साम्राज्यवादाचे यूग प्रारंभ झाले. ज्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर वसाहतवादी-साम्राज्यवादी व्यवस्था मजबूत झाली. औद्योगिक क्रांतीनंतर देशादेशांमधील परस्पर संबंध वाढत गेले. ज्यामुळे एका देशाची घटना संपूर्ण जगाला प्रभावित करू लागली. परिणामी आंतरराष्ट्रीय आर्थिक समृद्धी आणि मंदी याचा प्रभाव संपूर्ण जगावर जाणवायला लागला.

**४. बँक आणि चलन प्रणालीचा विकास:**

औद्योगिक क्रांतीने संपूर्ण आर्थिक चित्र पालटून टाकले. उद्योग आणि व्यापार यांमध्ये बँका आणि चलन व्यवस्था महत्वपूर्ण भूमिका निभावू लागली. बँकेमुळे आर्थिक व्यवहार सहज सोपे झाले. धनादेश आणि हुंडी यांचा वापर वाढला. चलनच्या क्षेत्रामध्ये विकास होऊन धातूचा ऐवजी कागदी चलनाचा प्रसार झाला.

**५. हस्तोद्योगांचा ऱ्हास:**

औद्योगिक क्रांतीचा नकारात्मक परिणाम म्हणजे हस्त उद्योगांचा विनाश झाला. परंतु ही गोष्ट ध्यानात घेण्यासारखे आहे की औद्योगिक समृद्धी आलेल्या देशांमध्ये याचे चांगले परिणाम झाले, तर अविकसित देशांमध्ये याचे दुष्परिणाम दिसून आले. पुढारलेल्या देशांमध्ये हस्तउद्योगातील मजुरांना कारखान्यांमध्ये रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या. परंतु अविकसित देशांमध्ये हस्तउद्योगातून बाहेर पडलेल्या मजुरांना रोजगाराच्या संधी निर्माण न झाल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीचे संकट ओढवले. भारताच्या संदर्भात याचे गंभीर परिणाम झाले.

munotes.in

## ५.८.२ सामाजिक परिणाम:

### १. लोकसंख्या वाढ:

औद्योगिक क्रांतीने लोकसंख्यावाढीला हातभार लावला. कृषी क्षेत्रामधील यांत्रिकीकरणामुळे अन्नधान्याचे उत्पादन वाढून लोकसंख्येचे पालनपोषण करणे सोपे झाले. दुसरीकडे दळणवळणाच्या साधनांचा विकास झाल्यामुळे मागणी असलेल्या ठिकाणी अन्नधान्य पोहोचवणे सोपे झाले. चांगल्या पोषण आहारामुळे मानवाचे आरोग्य सुधारले. आरोग्य सेवेमध्ये झालेल्या प्रगतीमुळे मानवाचे सरासरी आयुष्यमान वाढले आणि बालमृत्यू दरामध्ये घट झाली. परिणामी लोकसंख्या वाढ होण्यास मदत झाली.

### २. नव्या सामाजिक वर्गांचा उदय:

औद्योगिक क्रांतीने नवीन सामाजिक वर्गांना जन्म दिला. पहिल्या वर्गामध्ये भांडवलदार आणि व्यापारी यांचा समावेश होता. दुसऱ्या मध्यमवर्गामध्ये कारखान्यांमधील निरीक्षक, दलाल, ठेकेदार, इंजिनीअर, वैज्ञानिक इत्यादी लोकांचा समावेश होता. आणि तिसरा वर्ग श्रमिकांचा होता. या नव्या विभिन्न वर्गांनी सामाजिक असमतोल निर्माण केला. भांडवलदार वर्ग आर्थिक क्षेत्रातच नाही तर राजकीय क्षेत्रामध्येही प्रभावी झाला. त्यांनी ब्रिटिश संसदेमध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करून आपल्याला हवे तसे कायदे पास करून घेतले. मध्यमवर्ग अत्यंत महत्त्वाचाकांक्षी होता, त्यांनी आपल्या हीतसंबंधासाठी श्रमिकांना सोबत घेऊन भांडवलदार वर्गाला नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला. तर, श्रमिक जे कारखान्यांमध्ये काम करत होते. त्यांना कमी वेतनावर जवळजवळ बारा ते पंधरा तास काम करावे लागत. त्यामुळे त्यांचे शोषण वाढले. कारखान्यांमध्ये प्रकाश, हवा आणि स्वच्छता यांचा अभाव असे, त्याचा विपरीत परिणाम श्रमिकांच्या आरोग्यावर होत असे. शिक्षण, निवारा, आरोग्य इत्यादींच्या चांगल्या सुविधा नसल्यामुळे त्यांचे जीवन अत्यंत हलाखीचे बनले होते. परिणामी श्रमिक असंतोषाने कामगार चळवळीला जन्म दिला. त्यामुळे सामाजिक तणाव निर्माण झाला.

### ३. मानवी संबंधांमधील परिवर्तन:

औद्योगिक क्रांतीने प्राचीन काळापासून चालत आलेल्या मानवातील भावनात्मक संबंधाची जागा आर्थिक संबंधाने घेतली. ज्या श्रमिकांच्या श्रमावर भांडवलदार वर्ग समृद्ध झाला होता, त्यांना श्रमिकांच्या जीवनाशी काहीही काही घेणेदेणे नव्हते. मानवाचे जीवन कारखान्यांमधील यंत्रांशी जोडले गेले. त्यामुळे माणवा-माणवातील संवेदनशीलता कमी होऊन मानवी संबंध दुरावले गेले. त्याचप्रमाणे औद्योगिक क्रांतीने एकत्रकुटुंब पद्धतीचा विनाश होऊन एकल कुटुंब पद्धतीचा विकास झाला. कृषीवर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये एकत्र कुटुंब पद्धतीला महत्व असते. परंतु औद्योगिकरणानंतर व्यक्तीचे महत्त्व वाढीस लागून घरातील व्यक्ती दूर जाउन कारखान्यांमध्ये काम करू लागल्यामुळे व्यक्तिगत विकासाला चालना मिळाली.

munotes.in

### ४. नैतिक मूल्यांची घसरण:

नव्या औद्योगिक समाज निर्मितीमुळे नैतिक मूल्यांची घसरण झाली. कारखान्यांमध्ये अधिक वेळ काम करावे लागत असल्यामुळे कामगार थकवा घालवण्यासाठी दारूच्या व्यसनाच्या आहारी जाऊ लागले. त्याचप्रमाणे औद्योगिक वसाहतींमध्ये वेश्याव्यवसाय फैलावू लागला होता. चंगळवादी प्रवृर्ती वाढल्यामुळे भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी वाढीस लागली.

### ५. शहरी जीवनातील समस्या:

औद्योगिकरणामुळे कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी आलेल्या कामगारांमुळे शहरातली लोकसंख्या वाढली. त्यामुळे अन्नधान्य, पाणी, निवास व्यवस्था यांची कमतरता निर्माण झाली. औद्योगिक वसाहतींच्या भोवती कामगारांच्या वस्त्यांचा विस्तार होऊन तेथे घाणीचे साम्राज्य निर्माण झाले. परिणामी आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊन कामगारांच्या स्वास्थ्यावर प्रतिकूल परिणाम होऊ लागले.

### ५.८.३ राजकीय परिणाम:

### १. लोकशाहीची मागणी:

औद्योगिक क्रांतीच्या परिणामामुळे प्रजासत्ताक लोकशाही प्रणाली अधिक लोकप्रिय होऊ लागली. ज्यामध्ये व्यक्तिस्वातंत्र्य आणि राजकीय उदारमतवाद सामील होता. युरोपातील बहुतेक देशांमध्ये सरंजामशाही व्यवस्थेवर आधारित निरंकुश राजेशाही शासन प्रणाली अस्तित्वात होती. जी भांडवलदार वर्गांच्या हिताच्या विरुद्ध होती. नव्याने उदयाला आलेला औद्योगिक भांडवलदार वर्ग आणि मध्यमवर्ग आपल्या हितसंबंधांसाठी राजकारणाला प्रभावित करू लागला होता. हा वर्ग आपल्या आर्थिक आणि बौद्धिक समृद्धीच्या जोरावर शासन व्यवस्थेला आपल्या नियंत्रणाखाली आणू इच्छित होता. उच्च वर्गाच्या विरुद्ध भांडवलदार, मध्यमवर्ग आणि कामगारांनी संघटित होऊन लोकशाहीचा मार्ग प्रशस्त केला. त्याचाच परिणाम म्हणून १९व्या शतकात इंग्लंडमध्ये अनेक संसदीय सुधारणा केल्या गेल्या. अशाप्रकारे औद्योगिक क्रांतीने निर्माण झालेल्या नव्या वर्गांनी राजनीतिक सत्ता जमीनदारांच्या हातातून मुक्त केली.

### २. आंतरराष्ट्रीय राजकारणातील बदल:

औद्योगिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या देशांनी आपल्या साम्राज्यवादी आवश्यकतेसाठी आंतरराष्ट्रीय राजनीतिला व विदेशनीतीला प्रभावित केले. आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक देशांचे संघ तयार होऊ लागले. आपले आर्थिक हितसंबंध सुरक्षित ठेवणे हे आंतरराष्ट्रीय राजनीतीचे मुख्य ध्येय बनले. यातून अनेक युद्ध होऊन साम्राज्यवादाच्या स्पर्धेमध्ये अनेक देशांनी भाग घेतला. त्याची परिणिती पहिल्या महायुद्धात झाली.

### ३. कामगार चळवळींचा उदय:

कामगारांनी आपले वेतन आणि कामाच्या ठिकाणी पिळवणूक थांबवण्यासाठी कामगार संघटना स्थापन केल्या. या संघटनेच्या मार्फत कामगारांनी एकीकडे कारखानदारांकडून आपले कामाचे तास, वेतन, आरोग्य, शिक्षण यात सुधारणा घडवून आणण्यात यश

munotes.in

मिळवले, तर दुसरीकडे सरकारवर दबाव टाकून कामगार कल्याणासाठीचे अनेक कायदे करण्यास भाग पाडले.

### ५.८.४ वैचारिक परिणाम:

**१. व्यापारवाद:**

व्यापारवादाचे तत्त्वज्ञान ॲडम स्मिथ या अर्थशास्त्रज्ञाने मांडले. त्यानुसार औद्योगिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये सरकारने कमीत कमी हस्तक्षेप करून व्यापाराला उत्तेजन दिले पाहिजे असे त्याने सांगितले. सरकारचे कार्य संपत्तीचे रक्षण करणे आणि कायद्याचे पालन करायला लावणे आहे. नव्या भांडवलदार वर्गाला या आर्थिक तत्त्वज्ञानाने खूपच प्रभावित केले त्यामुळे नफा मिळवणे हे व्यापारवादाचे अंतिम ध्येय बनले.

**२. समाजवादी विचारधारा:**

औद्योगिक क्रांतीमुळे कामगारांची स्थिती हालाखीची बनली. जिथे भांडवलदार वर्गांची स्थिती दिवसेंदिवस चांगली होत गेली, त्याउलट कामगारांची स्थिती दिवसेंदिवस खालावत गेली. भांडवलदार वर्ग नफा मिळवण्यासाठी कामगारांचे शोषण करू लागला. परिणामी काही विचारवंतांनी कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी नवीन समाजवादी विचारधारेची मांडणी केली. त्यानुसार उत्पादनाच्या साधनांवर एका व्यक्तीची नाही तर संपूर्ण समाजाची मालकी असायला हवी असे त्यांनी प्रतिपादन केले. या संदर्भात इंग्लंडमधील उद्योगपती रॉबर्ट ओवेन, सेंट सायमन व लुई ब्लॉक हे विचारवंत महत्त्वाचे ठरतात. १८४८ मध्ये कार्ल मार्क्स आणि एंजेल्स यांनी साम्यवादाचा जाहीरनामा प्रकाशित करून वैज्ञानिक समाजवादाची मुहूर्तमेढ रोवली. औद्योगिक कामगारांना नाहिरे ही संज्ञा दिली. कारण या कामगारांजवळ गमावण्यासारखे काहीच नव्हते उलट जिंकण्यासाठी सर्व जग होते.

## ५.९ सारांश

युरोपमध्ये अठराव्या शतकात औद्योगिक क्रांती घडून आली. मानवी समाजात या क्रांतीने मूलभूत बदल केल्यामुळे अठराव्या शतकातील औद्योगिक परिवर्तनास औद्योगिक क्रांती असे म्हणतात. इंग्लंडमधील संशोधकांनी कापड उद्योग, कोळसा आणि लोखंड उद्योग, दळणवळणाची साधने, बाष्प शक्ती व विद्युत शक्ती या क्षेत्रात संशोधन करून नवीन यंत्रसामुग्री निर्माण केल्याने हस्त उद्योगांची जागा यंत्रांनी घेऊन कारखाना पद्धतीचा विकास झाला. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढले. इंग्लंडमध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैसर्गिक दृष्ट्या पोषक वातावरण मिळाल्यामुळे सर्वप्रथम इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती घडून आली. त्यामुळे इंग्लंड हे जागतिक स्तरावर आर्थिक आणि सामारिक दृष्ट्या समृद्ध राष्ट्र बनले. त्याचा प्रभाव इतर युरोपियन देशांवर पडून, त्या देशांमध्येही औद्योगिक क्रांतीस चालना मिळाली. आशिया खंडात सर्वप्रथम जपान आणि ब्रिटिशांचे प्रोत्साहन नसूनही भारतात थोड्या प्रमाणात का होईना औद्योगिक विकास घडून आला.

औद्योगिक क्रांतीने मानवी जीवनात आर्थिक समृद्धी आणली. त्याचप्रमाणे तिचे मानवी जीवनावर आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि वैचारिक परिणामदेखील दिसून आले.

आर्थिक दृष्ट्या विचार करता उत्पादनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली, औद्योगिकरणामुळे शहरीकरण झाले, आर्थिक असमतोल निर्माण झाला, विनिमय पद्धतीत बदल झाला, त्याचप्रमाणे हस्त उद्योगांचा रास होऊन उद्योगप्रधान राष्ट्रांमध्ये त्याचे चांगले परिणाम झाले तर भारतासारख्या अविकसित राष्ट्रांमध्ये औद्योगिक क्रांतीचे वाईट परिणाम घडून आले. सामाजिक दृष्ट्या औद्योगिक क्रांतीमुळे मानवी जीवनात सुधारणा होऊन लोकसंख्येमध्ये वाढ झाली. समाजामध्ये नवीन वर्गांचा उदय झाला. मानवी संबंधांमध्ये परिवर्तन होऊन नैतिक मूल्यांची घसरण झाली. राजकीय दृष्ट्या समृद्ध राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांवर वर्चस्व प्रस्थापित करून वसाहतवाद आणि साम्राज्यवादाला प्रोत्साहन दिले. त्यातून जागतिक महायुद्धांचा भडका उडाला. वैचारिक दृष्ट्या व्यापारवाद, जागतिकीकरण, उपयोगितावाद, समाजवाद यासारख्या विचारधारांचा जन्म औद्योगिक क्रांतीमुळे झालेला दिसून येतो.

## ५.१० प्रश्न

१. औद्योगिक क्रांतीची कारणे स्पष्ट करून औद्योगिक क्रांती इंग्लंडमध्येच का झाली याचा आढावा घ्या ?

२. औद्योगिक क्रांतीची वाटचाल होताना लागलेल्या वैज्ञानिक शोधांचा मागोवा घ्या ?

३. औद्योगिक क्रांतीचा विस्तार कसा झाला यावर चर्चा करा ?

४. औद्योगिक क्रांतीचे आर्थिक, राजकीय, सामाजिक आणि वैचारिक परिणाम विशद करा?

## ५.११ संदर्भ

१. पाश्चात्य जग – डॉ. धनंजय आचार्य

२. आधुनिक जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे – डॉ. एस एस गाठाळ

३. आधुनिक जगाचा इतिहास – डॉ. अनिरुद्ध व गजानन भिडे

४. विश्व इतिहास - अखिल मूर्ति

*****

# ६

# समाजवादाचा उदय आणि विकास

**घटक रचना**

६.१ उद्दिष्टे

६.२ प्रस्तावना

६.३ आदर्शवादी समाजवाद

६.४ वैज्ञानिक समाजवाद

- ६.४.१ कार्ल मार्क्स- परिचय
- ६.४.२ मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद
- ६.४.३ ऐतिहासिक भौतिकवाद
- ६.४.४ वर्ग संघर्षाचा सिद्धांत
- ६.४.५ अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत
- ६.४.६ मार्क्सवादाचे मूल्यांकन

६.५ सारांश

६.६ प्रश्न

६.७ संदर्भ

## ६.१ उद्दिष्टे

१. समाजवादाचा उदय कसा झाला याचा मागोवा घेणे .

२. आदर्शवादी समाजिक विचारवंतांच्या विचारांचा आढावा घेणे.

३. कार्ल मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवादचा सिद्धांत समजून घेणे.

४. कार्ल मार्क्सच्या सिद्धांताचे मूल्यांकन करणे.

## ६.२ प्रस्तावना

औद्योगिक क्रांतीचा वैचारिक परिणाम म्हणून समाजवादी विचारधारेच्या उदय अठराव्या शतकात झाला. इंग्लंडमध्ये सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीचा १९व्या शतकाच्या अखेरच्या दशकांमध्ये युरोपातील इतर देशांमध्ये विस्तार झाला. औद्योगिक क्रांतीचा सामाजिक परिणाम म्हणून समाजामध्ये नवीन वर्गांचा उदय झाला. त्यामध्ये पहिला म्हणजे भांडवलदार वर्ग ज्याची उत्पादन साधनांवर मालकी होती आणि नफा मिळवण्याच्या दृष्टीने ते कामगार वर्गाची प्रचंड प्रमाणात पिळवणूक करत असे. कामगार हा नाहिरे वर्गामध्ये मोडत होता. भांडवलदार वर्ग आपल्या आर्थिक स्वार्थासाठी कामगार कल्याणाकडे दुर्लक्ष करीत असे. त्यामुळे कामगारांचे जीवन खूपच हालाखीचे बनले होते. त्यांची आर्थिक आणि

munotes.in

सामाजिक स्थिती खूपच खालावली. उत्पादन प्रक्रियेत सामील असलेल्या हा वर्ग उपासमारीच्या उंबरठ्यापर्यंत पोचला होता. कामाचे अधिकचे तास, कामाच्या ठिकाणी दमट वातावरण, राहण्यासाठी गलिच्छ वस्त्या, शिक्षण आणि आरोग्याचे प्रश्न इत्यादी समस्या त्यांच्यासमोर होत्या. कामगारांमध्ये आशा परिस्थितीविषयी असंतोष निर्माण झाला. परिणामी कामगार वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी काही विचारवंत समोर आले आणि ज्यांनी एका नवीन विचारधारेचे प्रतिपादन केले. त्यालाच 'समाजवादी विचारधारा' असे म्हणतात. यांनी कामगारांच्या समस्या पुढे आणण्याच्या प्रयत्न करून भांडवलशाही व्यवस्था नष्ट करण्यासाठी कामगार वर्गाला संघटित करण्याचे देखील प्रयत्न केले. ह्या विचारवंतांमध्ये रॉबर्ट ओवेन, सेंट साइमन, चार्ल्स फ्युरिए, कार्ल मार्क्स इत्यादी महत्वाचे विचारवंत होते. समाजवादावर चिंतन करणाऱ्यापैकी जे विचारवंत कार्ल मार्क्सच्या अगोदर होऊन गेले त्यांना सामान्यतः आदर्शवादी समजण्यात येते. कारण ते उच्च दर्जाच्या उदात्त उद्दिष्टांनी प्रेरित झाले असले तरी त्यांचे तत्वज्ञान किंवा त्यांची वैचारिक बैठक, त्यांच्या कृती योजना, वास्तव समाजातील सामाजिक समस्या यांना आधार घेऊन बनवण्यात आल्या नव्हत्या. कार्ल मार्क्सच्या विचारांना वैज्ञानिक समाजवाद म्हणतात. समाजवादाचा अभ्यास करताना त्याचे दोन भाग करावे लागतात. पहिला आदर्शवादी समाजवाद जो सुरुवातीच्या समाजवादी विचारवंतांनी काल्पनिक आदर्शावर उभा केला होता. तर दुसरा कार्ल मार्क्स यांचा शास्त्रीय समाजवाद आहे. जो इतिहासाच्या वास्तव्य स्थितीवर उभा असून त्याने वैज्ञानिक पद्धतीने समाजवादाचे विश्लेषण करून मांडणी केली. त्यालाच आपण साम्यवाद असेही म्हणतो . कार्ल मार्क्स याने ऐतिहासिक भौतिक वादाची मांडणी करून भविष्यकालीन वाटचालीची दिशाही स्पष्ट केली.

## ६.३ आदर्शवादी समाजावाद

कार्ल मार्क्सच्या पूर्वी विचारवंतांनी प्रतिपादित केलेल्या समाजवादी विचारधारेला 'आदर्शवादी समाजवाद' अशी संज्ञा दिली जाते. कारण यांनी मांडलेले विचार वास्तव परिस्थितीला धरून नव्हते. या विचारवंतांनी तत्कालीन परिस्थितीचा संदर्भात काल्पनिक आदर्श समाजाची रचना कशी असावी यासंदर्भात काल्पनिक विचार मांडले. त्यांनी मांडलेल्या काल्पनिक विचारांच्यानुसार भांडवलदार आणि कामगार यातील भेद नष्ट होऊन कोणीही श्रीमंत आणि गरीब राहणार नाही. सर्व समाजाची उत्पादनाच्या साधनांवर समान मालकी राहील, अशी या विचारवंतांनी कल्पनारंजक आदर्शवादी समाजाची कल्पना केली. परंतु त्याला वास्तवामध्ये कसे उतरावायचे याबद्दल कोणतीही उपायोजना सुचवली नाही. म्हणून याला कल्पनारम्य आदर्शवादी समाजवाद म्हणतात. याचे प्रवर्तक सेंट सायमन, चार्ल्स फ्यूरिए, रॉबर्ट ओवेन आणि लुई ब्लॅक यांच्या विचारांचा थोडक्यात आढावा आपण आता घेणार आहोत.

**१. सेंट सायमन (१७६०-१८८५):**

सेंट सायमन हा १९व्या शतकाच्या सुरवातीचा फ्रान्समधील सामाजिक तत्वज्ञ आणि सुधारक होता. त्याने आपल्या 'द न्यू क्रिश्चियनिटी ' (The New Christianity) या ग्रंथात आपले समाजवादी विचार प्रतिपादित केलेले आहे. सेंट सायमन याने दोन प्रमुख सामाजिक वर्गांची ओळख करून दिली. यातील पहिला हा उत्पादक किंवा कारखानदार आणि दुसरा

त्याच्या आधारावर जीवन जगणारा परोपजीवी म्हणजेच कामगार होय. सेंट सायमनने भविष्यकालीन समाजाची कल्पना वर्गविहीन समाजाच्या रूपात केली नाही, तर त्यांने असे विचार मांडले की, भांडवलदार, मध्यमवर्ग आणि नाहिरे म्हणजेच कामगार हे सर्व समान पद्धतीने उत्पादक वर्गाचे सदस्य राहतील आणि भविष्यात उत्पादन पद्धतीचे समान लाभधारक होतील. तसेच हे सर्व सरंजामशाहीच्या विरोधी संघर्षातील नैसर्गिक सहयोगी असतील. सेंट सायमन याने श्रमिकांच्या हितांच्या रक्षणासाठी "कार्यानुसार मोबदला आणि क्षमतेनुसार काम", या सिद्धांताचे प्रतिपादन केले. ज्यानुसार कामगारांना त्यांच्या क्षमतेनुसार कार्य करावे लागेल आणि त्या कार्याच्यानुसार त्यांना पर्याप्त प्रमाणात मोबदला मिळेल. असे झाल्यानंतर वर्ग संघर्षाचे वातावरण आपोआप समाप्त होऊन जाईल आणि भांडवलदार व कामगार यांचे मैत्रीपूर्ण संबंध तयार होतील. सेंट सायमनच्या या विचारून स्पष्ट होते की, त्याचा विरोध सरांजामशाहीला होता, भांडवलशाहीला नाही. सेंट सायमन औद्योगिक वर्गाला समाजामध्ये सर्वाधिक महत्वाचे स्थान देऊ इच्छित होता. त्यानुसार भांडवलदार वर्गाने समाजाचे नियंत्रण करायचे होते. त्यांने अशा समाजाची कल्पना केली की, जो कोणत्याही प्रकारच्या शोषणापासून मुक्त असेल. ज्यामध्ये सर्व लोक आपापल्या क्षमतेनुसार योगदान देईल आणि आपल्या योग्यतेनुसार मोबदला घेईल.

### २. चार्ल्स फ्यूरिए (१७७२-१८३३):

चार्ल्स फ्यूरिए हा फ्रांसमधील समाजवादी विचारवंत आणि समाजवादाचा विश्लेषक होता. त्याने आपला ग्रंथ 'द सोशल डेस्टिनी' (The Social Destiny) म्हणजेच मनुष्याची सामाजिक नीती यामध्ये मनुष्याच्या मुक्तीसाठी आपली योजना प्रतिपादित केली. त्याने आपल्या सामाजिक विश्लेषणामध्ये न्यूटनच्या मेकॅनिक्सचा आधार घेऊन आकर्षणाची यंत्र व्यवस्था (Mechanism of Attraction) या सिद्धांताचा उपयोग केला. त्याने विचार मांडले की आदर्श समाजव्यवस्थेमध्ये सामंजस्य (Harmony) आणि सहकार्याची (Association) भावना पूर्ण उत्कर्षावर असेल. त्याने मनुष्यामधील कामाचे विभाजन 'आवडीचे काम' सिद्धांताच्या अनुसार केले. अर्थात जे काम ज्याच्या आवडीच्या असेल ते त्याला सोपवले जाईल. उदाहरणार्थ ज्याला गुलाब आवडतात तो गुलाबाची शेती करेल. ज्याला धूळ आणि माती आवडते तो धूळ आणि मातीचे कामे करील. अशाप्रकारे या व्यवस्थेच्या अंतर्गत कोणत्याही शासन पद्धतीची आवश्यकता राहणार नाही. सर्व समाज स्वाभाविक प्रेरणेतून संघटित होईल. सहकार्याने राहिल्याने समाजातील गरीब आणि श्रीमंत यातील भेद नष्ट होईल.

चार्ल्स फ्यूरिए ह्याचा समाजवादी तत्वज्ञानाचा प्रभाव हा मर्यादित राहिला असला तरी त्याचे मुख्य योगदान वैचारिक भूमिकेत आहे. फ्रान्स आणि अमेरिकेमध्ये त्याच्या वैचारिक धारणेनुसार ग्रामीण भागात अनेक प्रयोग केले गेले .

### ३. रॉबर्ट ओवेन (१७७१-१८५८):

रॉबर्ट ओवेन हा ब्रिटिश उद्योगपती, मानवप्रेमी तसेच सहकार चळवळीचा अग्रदूत होता. त्याने १८३० सुमारास सर्वप्रथम समाजवाद शब्दाचा प्रयोग केल्याने त्याला पहिला समाजवादी विचारवंत मानले जाते. त्याने आपले सिद्धांत 'द न्यू व्ह्यू ऑफ सोसायटी' तसेच 'द बुक ऑफ न्यू मॉरल वर्ल्ड' या आपल्या ग्रंथात स्पष्ट केले आहे. रॉबर्ट ओवेन याने

स्कॉटलंड मधील नूलानार्क या शहरामध्ये एक 'आदर्श सुती मिलची' स्थापना करून हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला की, कामगारांना चांगला मोबदला देऊन आणि कामाच्या ठिकाणी कामगारांना चांगल्या सुविधा देऊनही व्यवसायिक सफलता प्राप्त करता येऊ शकते. त्याने स्पर्धात्मक व्यापारवादाचे खंडन करून सहकार प्रणालीचे समर्थन केले. ज्यामध्ये एका व्यक्तीचा लाभ दुसऱ्या व्यक्तीला हानी पोचवणार नाही. ज्यामध्ये स्वस्थ आणि चांगल्या वातावरणामध्ये व्यक्तीच्या चरित्राला आदर्श समाजाच्या आवश्यकतेनुसार घडवले जाईल. रॉबर्ट ओवेन असे मानत होता की, श्रमिकांना चांगल्या सुविधा देऊनही उत्पादन वाढवता येऊ शकते. कामगारांना चांगली निवास व्यवस्था देऊन, कामाची वेळ कमी करून आणि चांगले वेतन देऊनही नफा कमावला जाऊ शकतो हे त्याने सिद्ध करून दाखवले. अशाप्रकारे तो या निष्कर्षावर पोहचला की, कामगारांना चांगल्या सुविधा देऊन त्यांना संतुष्ट केले तर कामगार आणि भांडवलदार यांच्यामध्ये बंधुभावाचे अतूट नाते निर्माण होऊन निकोप आदर्श समाजव्यवस्था अस्तित्वात येईल व कामगारांच्या समस्यांचे निराकरण होईल.

### ४. लुई ब्लॅक (१८१५-१८८१):

लुई ब्लॅक हा फ्रांस मधील एक प्रभावशाली विचारवंत आणि नेता होता. त्याने 'ऑर्गनायझेशन ऑफ लेबर' या ग्रंथामध्ये आपले समाजवादी विचार प्रतिपादित केले. त्याने आर्थिक क्षेत्रामध्ये व्यक्तिगत स्वातंत्र्याला विरोध करून राज्यामध्ये कामगारांना कामाचा अधिकार मिळाला पाहिजे आणि त्याच्या प्राप्तीसाठी राष्ट्रीय कारखाने व सामाजिक कार्यशाळांची निर्मिती केली पाहिजे अशी मागणी केली. त्याने बेरोजगारांच्या सहाय्यासाठी सामाजिक कार्यशाळांच्या स्थापनेचे महत्त्व प्रतिपादित केले. या सामाजिक कार्यशाळांना भांडवलदारांच्या अंताचे साधन मानले. 'राज्य समाजवादच्या' उदयाचे श्रेय लुई ब्लॅक याला जाते. त्याच्या म्हणण्यानुसार प्रत्येक स्वस्थ मनुष्याला कार्य करण्याचा अधिकार आहे, म्हणून सरकारने त्याच्या अधिकारानुसार त्याला काम दिले पाहिजे. हे सर्व कार्य करण्यासाठी सरकारचे संघटन पूर्णतः लोकशाहीच्या आधारावर झाले पाहिजे. या सर्वांचा उत्कर्षबिंदू स्वतंत्रता आणि समानता असेल.

लुई ब्लॅकच्या अशा विचारांमुळे फ्रान्सच्या नाहिरे वर्गामध्ये चेतना आणि जागृती निर्माण झाली. परिणामी १८४८ मध्ये सम्राट लुई फिलिप याच्याविरुद्धच्या क्रांतीमध्ये नाहिरे वर्गाने सक्रिय सहभाग नोंदवला.

अशाप्रकारे वरील कल्पनारम्य समाजवादी विचारवंतांनी व्यवहारिक भूमिकेमध्ये समाजवादाची स्थापना केली नाही, तरीही समाजवादी चेतना आणि विचारधारेची त्यांनी जी मुहूर्तमेढ रोवली त्यांच्या या भूमिकेला कमी लेखता येणार नाही. पुढे चालून ज्या वैज्ञानिक समाजवादाची स्थापना कार्ल मार्क्स द्वारे केली गेली, त्याची पृष्ठभूमि निर्माण करण्याचे कार्य या समाजवादी विचारवंतांनी केले. याच समाजवादी चेतने मधून इंग्लंडमध्ये चार्टिस्ट आंदोलनाचा उदय झाला. ज्याने कामगारांची सामाजिक आणि आर्थिक दशा सुधारण्यासाठी प्रयत्न केले तसेच फ्रान्समध्ये समाजवादी विचारधारेचा प्रसार होऊन कामगार संघटनांचा उदय झाला.

## ६.४ वैज्ञानिक समाजवाद / साम्यवाद / मार्क्सवाद

आपण पूर्वी बघितल्या प्रमाणे कल्पनारम्य समाजवादी विचारवंतांनी आदर्श समाजाची संकल्पना मांडली. परंतु ती संकल्पना वास्तवामध्ये कशी उतरवायची यासंबंधी चर्चा केली नाही. म्हणून यांचा समाजवाद कल्पनेपुरता मर्यादित राहिला. परंतु कार्ल मार्क्स आणि एंजेल्स यांनी शास्त्रीय अर्थात वैज्ञानिक पद्धतीने समाजवादाचे विश्लेषण करून या विचारधारेला प्रत्यक्षात समाजामध्ये कसे प्रस्थापित करायचे याबद्दल सविस्तर प्रणाली विशद केली, म्हणून कार्ल मार्क्स यांच्या समाजवादी विचारांना वैज्ञानिक समाजवाद किंवा भौतिकवादी समाजवाद किंवा साम्यवाद किंवा मार्क्सवाद असे म्हणतात. कार्ल मार्क्स यांनी इतिहासाचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून इतिहासाची भौतिकवादी व्याख्या प्रतिपादित केली आणि मानवाचा सर्व इतिहास हा वर्ग संघर्षाचा इतिहास राहिलेला आहे असे सांगितले. मार्क्सच्या मतानुसार आर्थिक स्थिती हीच समाजातील इतर घटकांना चालना देते. म्हणजेच समाजातील प्रत्येक घडामोडीसाठी आर्थिक स्थिती कारणीभूत असते असे त्याने प्रतिपादन केले. मार्क्सने ज्या साम्यवादी समाजाच्या स्थापनेसाठी वैचारिक पृष्ठभूमि तयार केली होती, त्यासाठी वास्तववादी उपाय सुचवले. त्यानुसार कामगारवर्गाने संघटित होऊन भांडवलदार वर्गाच्या विरुद्ध क्रांती करून उत्पादनाच्या साधनांवर कामगारांची मालकी प्रस्थापित करावी असे त्याचे म्हणणे होते. असे झाल्यास समाजातील वर्गभेद नष्ट होऊन वर्गविहीन समाज अस्तित्वात येईल व साम्यवादी समाजाचा मार्ग प्रशस्त होईल अशी त्याने मांडणी केली.

### ६.४.१ कार्ल मार्क्स-परिचय (१८१८-१८८३):

थोर समाजवादी विचारवंत म्हणून कार्ल हेनरिक मार्क्सचा उल्लेख केला जातो. ५ मे १८१८ रोजी कार्ल मार्क्सचा जन्म जर्मनीतील ट्रेवेस या गावी एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. मार्क्स याचे शिक्षण जर्मनीतील बर्लीन व बॉन विद्यापीठात झाले. तेथे मार्क्स हेगेल च्या तत्त्वज्ञानापासून विशेष प्रभावित झाला. १८४१ मध्ये त्याने पीएचडी पदवी मिळवली. त्याची बॉन विद्यापीठामध्ये प्राध्यापक म्हणून काम करण्याची इच्छा होती. परंतु क्रांतिकारक विचारांमुळे त्याला ती संधी मिळू शकली नाही. 'व्हेनिस टाइम्स' या वृत्तपत्राचा संपादक म्हणून त्याने काही दिवस काम केले. तिथूनही त्याच्या क्रांतिकारक विचारांमुळे व लिखाणामुळे त्याला जर्मनी सोडून जावे लागले . १८४३ मध्ये तो फ्रान्समध्ये आला. फ्रान्सला येण्यापूर्वी १८४१ मध्ये त्याचा जेनी नावाच्या मुलीशी प्रेमविवाह झाला होता. फ्रान्समध्ये त्याने समाजवादाचा अभ्यास केला. तिथे त्याचा संपर्क एंजेल्स याच्याशी आला. आर्थिक समस्यांवर या दोघांचे विचार मिळतेजुळते होते. एंजेल्स हा मार्क्सचा सहयोगी, त्याच्या ग्रंथांचा संपादक तसेच स्वतंत्र लेखकाच्या रूपात मार्क्सवादाच्या विकासामध्ये त्याने अमूल्य योगदान दिले. १८४९ मध्ये तो इंग्लंडला गेला. त्याचे तेथे एकूण ३४ वर्ष वास्तव्य होते. जगातील शोषित वर्गाचे आर्थिक प्रश्न सोडवण्यासाठी तत्त्वज्ञान मांडणाऱ्या मार्क्सला स्वतःच्या जीवनातील आर्थिक प्रश्न मात्र सोडविता आले नाही. त्याची आर्थिक परिस्थिती हालाखीची होती.

मार्क्सचे सर्वाधिक प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे कम्युनिस्ट मॅनिफेस्टो (१८४८) अर्थात साम्यवादाचा जाहीरनामा आणि दास कॅपिटल(१८६७) होय. ज्यामध्ये त्याने आपले साम्यवादी विचार

मांडलेले आहे. कार्ल मार्क्सचे समाजवादी सिद्धांत द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, वर्ग संघर्षाचा सिद्धांत आणि अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत या मुद्द्यांच्या आधारे समजून घ्यावे लागतात.

### ६.४.२ मार्क्सचा द्वंद्वात्मक भौतिकवाद ( Dialectical Materialism):

मार्क्सने द्वंद्वात्मक भौतिकवादाची व्याख्या करण्यासाठी हेगेलच्या द्वंद्वात्मक सिद्धांताचा आधार घेतला. हेगेलच्यानुसार सामाजिक विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून तिची मूळ प्रेरणा चेतना अर्थात विचार आहे. त्याच्यामते विचार हे सृष्टीचे मूळ तत्व आहे. म्हणून येथे सामाजिक विकासाची संपूर्ण प्रक्रिया विचारांच्या उदयाची आणि अस्ताची कहानी आहे. त्याचे मूर्तस्वरूप सामाजिक संस्थांच्या उदय आणि अस्तामध्ये पाहायला मिळते. सर्व सामाजिक परिवर्तन आणि विकास परस्पर विरोधी विचारांच्या संघर्षाचा परिणाम आहे. एकूण या सर्व पद्धतीला द्वंद्वात्मक पद्धती म्हटले जाते. हेगेलच्यानुसार सामाजिक विकासाची ही प्रक्रिया वाद (Thesis), प्रतिवाद (Antithesis) आणि संवाद (Synthesis) तीन अवस्थांमध्ये पूर्ण होते. सुरुवातीला एकदा वाद अर्थात विचार समोर येतो. परंतु तो पूर्णतः सत्य नसतो . म्हणून कालांतराने त्याला विरोध म्हणून प्रतिवाद निर्माण होतो. तो ही पूर्ण सत्य नसतो. या दोन्ही मध्ये परस्पर संघर्ष निर्माण होऊन यांच्यामधील असत्याचा अंश नष्ट होतो आणि त्यातून संवाद म्हणजेच सत्याच्या अधिक जवळ जाणारे विचार तयार होतात. अशाप्रकारे सामाजिक परिवर्तनाचे एक चक्र पूर्ण होते. हा नवीन संवाद अर्थात विचार देखील पूर्ण सत्य आणि स्थिर नसतो. म्हणून परत त्या विरोधात प्रतिवाद तयार होतो आणि दोन्हीच्या संघर्षातून संवाद निर्माण होतो. अशी ही सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया निरंतर चालू असते. यालाच हेगेलचा द्वंद्वात्मक सिद्धांत असे म्हणतात. कार्ल मार्क्स यांने हेगेलच्या या द्वंद्वात्मक सिद्धांताचा आधार घेऊन आपल्या द्वंद्वात्मक भौतिकवादाची व्याख्या केली. त्याने हेगेलच्या तत्वज्ञानाचे मूळ सूत्र चेतना अर्थात विचार बाजूला करून त्याजागी आपले भौतिकवादाचे तत्व स्थापित केले. मार्क्सच्या म्हणण्यानुसार माणसाचे जीवन चेतना वर आधारित नसून भौतिक म्हणजेच आर्थिक स्थितीवर आधारित आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास आर्थिक स्थितीच्या परिवर्तनामुळे मानवाच्या विचारांमध्ये परिवर्तन होते. म्हणून मार्क्स म्हणतो की, “हेगेलचा द्वंद्वावाद डोक्यावर उभा होता त्याला मी सरळ करून पायावर उभा केला.” मार्क्स प्रामुख्याने भौतिक जगाचाच विचार करतो. मार्क्सच्या मते, जग आणि त्यातील भौतिक पदार्थ हेच खरे सत्य होय. मार्क्स आदर्शवादी विचारवंतांच्या भावनेस महत्व देत नाही. भौतिकवादाच्या मार्गानेच विश्वाचे खरे ज्ञान होऊ शकते असे तो म्हणतो. त्याच्यामते, समाज परिवर्तनाचा मूळ आधार आर्थिक आहे. उत्पादन पद्धतीत परिवर्तन झाले तर समाजात परिवर्तन होते. मानवी जीवनात आवश्यक असणाऱ्या वस्तूंची उत्पादन पद्धती मनुष्याच्या राजकीय, सामाजिक, बौद्धिक क्षेत्रातील क्रिया निश्चित करते, मार्क्सने हेगेलच्या द्वंद्वावादाचे भौतिकीकरण केले. मार्क्स म्हणतो, मानवी जीवनाचा विकास हा सरळ मार्गाने झालेला नसून गुंतागुंतीच्या मार्गाने आणि किचकट अशा प्रक्रियेतून झाला आहे. मार्क्सने इतिहासाचे स्वरूप गतिमान असल्याचे सांगून विश्वाला त्याने परिवर्तनशील मानले आहे. भांडवलशाही अर्थव्यवस्था केवळ इतिहासक्रमाची एक अवस्था आहे. खालच्या वर्गातील लोकांचा विकास होऊन त्यांचे शोषण थांबल्यावर मानवी जीवनाच्या विकासाची अंतिम अवस्था निर्माण होईल, असे मार्क्स सांगतो.

### ६.४.३ ऐतिहासिक भौतिकवाद:

कार्ल मार्क्सने आर्थिक घटक हा समाजाचा पाया असून समाजाचा इतिहास म्हणजे उत्पादन पद्धतीचा इतिहास होय हे सूत्र मांडले. त्याच्या मते इतिहासाचा आधार भौतिकवाद आहे. समाजाच्या सामाजिक-आर्थिक संघटनांमध्ये जो बदल आणि विकास होतो, तोच इतिहासाचा आधार असतो अशी मार्क्सची ऐतिहासिक भौतिकवादाची मीमांसा आहे. त्याच्यामते, “आजपर्यंतचा संपूर्ण समाजाचा इतिहास म्हणजे वर्ग संघर्षाचा इतिहास होय.” शोषक व शोषित या दोन वर्गात सतत संघर्ष चालू असतो. उत्पादन पद्धतीमुळे समाजात दोन वर्ग निर्माण होतात. त्यापैकी एका वर्गाकडे उत्पादनाच्या साधनांची मालकी असते. त्या वर्गाला 'आहे रे' (Haves) म्हणतात, तर दुसऱ्या वर्गाकडे उत्पादनाची साधने नसतात त्या वर्गाला 'नाही रे' (Have Not) असे म्हणतात. या दोन वर्गात अनादी काळापासून संघर्ष चालू आहे.

मार्क्सच्या सिद्धांतानुसार मानवामानवांतील सर्व प्रकारचे सामाजिक, राजकीय व बौद्धिक संबंध, सर्व धर्म व न्यायालयीन कायदे पद्धतीत ऐतिहासिक काळात निर्माण झालेल्या सर्व तात्विक विचारप्रणाली या मानवाच्या भौतिक जीवनातूनच निर्माण झाल्या आहे. उत्पादनाची साधने व त्याची मालकी या मूलभूत पायावर सर्व समाजरचना व कायदे पद्धती आधारलेली आहे. राज्यसंस्था ही सुद्धा मानवाच्या भौतिक गरजातून निर्माण झाली आहे. एखाद्या समाजातील सामाजिक व राजकीय संस्था, धर्म, रूढी, समाजरचना, कायदे, कला, तत्त्वज्ञान, नीतिमत्ता या विशिष्ट पद्धतींचा का असतात याचे स्पष्टीकरण भौतिक साधनांच्या उत्पादनाची मालकी कोणाकडे आहे, यावरून सांगता येते, म्हणून मार्क्स असा निष्कर्ष काढतो की, “उत्पादन पद्धतीत बदल झाला असता संपूर्ण समाज रचना बदलते.”

कार्ल मार्क्सने हेगेलच्या द्वंद्ववादाचे भौतिकीकरण करून समाज परिवर्तनाचा मूळ आधार आर्थिक आहे आणि या भौतिक जगात नेहमी परिवर्तन होते. म्हणून मार्क्सने उत्पादन पद्धती, उत्पादनाची साधने आणि उत्पादन संबंध यांच्यामधील परस्परसंबंधाचे विश्लेषण करून इतिहासाच्या पाच अवस्था मानून मानवी समाजाचे अध्ययन केले.

**१. प्राचीन साम्यवाद:**

हा कालखंड म्हणजे मानवी विकासाची प्रारंभिक अवस्था आहे. या अवस्थेत मनुष्य कंदमुळे, फळे व प्राण्यांची शिकार करून आपली उपजीविका करत होता. या कालखंडात नैतिक कल्पना जन्मास आल्या नव्हत्या. या कालखंडात वर्ग भेद नव्हते, त्यामुळे वर्ग संघर्ष ही नव्हता. या कालखंडात उत्पादनाची साधने ही अविकसित होती व जी काही उत्पादनाची साधने होती ती सामुहिक मालकीची होती. खाजगी मालमत्ता हा प्रकार अस्तित्वात आलेला नव्हता. असा हा कालखंड अश्मयुग असून या काळात मानव रानटी अवस्थेत होता. मार्क्सने या कालखंडाला प्राचीन साम्यवादाचा कालखंड असे म्हटले आहे.

**२. गुलामगिरीचा कालखंड:**

जसजसा काळ पुढे गेला तसतसे प्राचीन साम्यवादात बदल होत गेले. हळूहळू लोकसंख्या वाढली. मानव शेती करू लागल्यामुळे स्थिर जीवनास प्रारंभ झाला. शेतीमधून अतिरिक्त अन्नधान उत्पादित होऊ लागल्याने खाजगी मालमत्तेचे तत्व समाजात अस्तित्वात आले.



munotes.in

उत्पादन, विक्री, नफ्याची प्रेरणा, संपत्ती या गोष्टींनी समाजात मूळ धरले, ज्याच्याकडे अधिक शेती, पशुधन, घरेदारे आहेत तो समाजात प्रतिष्ठित मानला जाऊ लागला. ज्याच्याकडे अधिक संपत्ती त्याची शक्ती मोठी हे आता स्पष्ट झाले. यातूनच मालक व दास म्हणजेच गुलाम हे वर्ग समाजात अस्तित्वात आले. गुलाम मालकासाठी कष्ट करत. उत्पादनाच्या साधनांवर मालकी असणारा एक वर्ग व त्या वर्गाकडे अत्यल्प वेतनावर काम करणारा गुलामांचा वर्ग असे दोन वर्ग समाजात अस्तित्वात आले. या युगात मालक व गुलाम यांच्यात संघर्ष होत राहिला. या कालखंडाला मार्क्स गुलामगिरीचा कालखंड असे म्हणतो.

### ३. सरंजामशाहीचा कालखंड:

मार्क्सच्या मते, गुलामगिरीच्या यूगातून समाजाने सरांजामशाहीच्या युगात प्रवेश केला. या कालखंडात जमिनीची मालकी ही प्रामुख्याने सरंजामदार व जमीनदारांकडे होती. शेती करण्याचे काम कुळे करीत. जमिनीचे मालकी राजाकडून मिळाली म्हणून सरंजामदार राजांना आर्थिक व लष्करी मदत करत. हे सरंजामदार शेतमजूर-कुळे यांना आपल्या जमिनीत राबवून घेत. त्यामुळे या कालखंडात पून्हा दोन प्रमुख वर्ग समाजात दिसून येतात. एक सरंजामदार यांचा व दुसरा कुळांचा. कुळांना अन्याय व शोषणाची जाणीव झाली. म्हणून त्यांनी सरंजामदार या शोषक वर्गाविरुद्ध उठाव केले. कुळ (भूदास) व सरंजामदार या दोन वर्गात संघर्ष होत राहिला.

### ४. भांडवलशाही कालखंड:

भांडवलशाहीच्या कालखंडात हस्तचलित यंत्रणा ऐवजी बाष्पशक्तीवर चालणारी यंत्रे आली. पुर्वीचा जो सरंजामदार वर्ग होता, त्या वर्गाने पैशाच्या जोरावर उत्पादनाची साधने आपल्या हाती घेउन कारखानदारी सुरू केली. या कारखान्यातून काम करणारा कामगारांचा वर्ग हा पूर्वीच्या व्यवस्थेतील भूदासांचा वर्ग होता. या कालखंडात आता भांडवलदार व कामगार या दोन वर्गात संघर्ष सुरू झाला. भांडवलदार कामगारांना त्यांच्या श्रमाचा योग्य तो मोबदला देत नसत त्यांच्या श्रमाचे शोषण होई, त्यामुळे कामगारांची स्थिती दयनीय बनली. मार्क्सने थेअरी ऑफ सरप्लस व्हॅल्यू (Theory of surplus value) हा सिद्धांत मांडून भांडवलदार हे मजुरांना श्रमाचा कमी मोबदला देऊन श्रमिकांच्या श्रमाची चोरी करतात असे म्हटले. म्हणून जगातील कामगारांनी एकत्र येऊन भांडवलशाहीच्या विरुद्ध लढले पाहिजे. त्यात त्यांचा निश्चित विजय होणार आहे, असे मार्क्सने सांगितले. भांडवलशाही विरुद्धच्या लढ्यात कामगारांना यश येऊन कामगारांची हुकुमशाही प्रस्थापित होईल, असे मार्क्स म्हणतो.

### ५. साम्यवादी समाजरचनेचा कालखंड:

मार्क्सच्या मते, मानव समाजाची ही सर्वात प्रगत अवस्था आहे. या अवस्थेत उत्पादनाच्या साधनांवर समाजाची मालकी प्रस्थापित होउन भांडवलदार वर्गाचे अस्तित्व संपुष्टात येईल व वर्गभेद नष्ट होउन सर्व समाज एकजिनसी होईल. वर्गकलह संपल्याने राज्याचीही आवश्यकता भासणार नाही. अशा तऱ्हेने वर्ग विरहित समाज व्यवस्था निर्माण होऊन साम्यवादी समाजाची स्थापना होईल. अशी भविष्यवाणी मार्क्स यांने केली होती.

### ६.४.५ वर्ग संघर्षाचा सिद्धांत:

मार्क्सने इतिहासाला परस्पर विरोधी वर्ग संघर्षाच्या रूपात पाहण्याचा प्रयत्न केला. हा संघर्ष दोषपूर्ण उत्पादन पद्धतीमुळे निर्माण होतो. ज्यामध्ये समाजातील भांडवलदार वर्ग उत्पादनाच्या साधनांवर मालकी प्रस्थापित करून नफा मिळवण्यासाठी कामगारांचे शोषण करतो. यामुळे श्रीमंत (आहे रे) आणि गरीब (नाही रे) असे दोन वर्ग समाजात अस्तित्वात येतात आणि त्यातून समाजात शोषक आणि शोषित या दोन वर्गामध्ये संघर्ष निर्माण होतो. मार्क्सच्या मते शोषक आणि शोषित वर्गांमधील हा संघर्ष सामाजिक इतिहासामध्ये प्राचीन साम्यवादाचा रास झाल्यानंतर सुरू झाला. हा वर्ग संघर्ष कामगार वर्ग जो पर्यंत उत्पादनाच्या साधनांवर मालकी प्रस्थापित करीत नाही तोपर्यंत सुरूच राहणार आहे. उत्पादनाच्या साधनांवर कामगारांची मालकी प्रस्थापित झाल्यानंतर समाज शोषण, वर्गभेद आणि वर्गसंघर्ष या पासून मुक्त होईल.

मार्क्सच्या म्हणण्यानुसार आधुनिक भांडवलशाहीचा कालखंड वर्ग संघर्षाची सर्वोच्च अवस्था आहे. कामगारांमध्ये जागृती निर्माण होवून आपल्या मोठ्या संख्येच्या बळावर शोषित वर्ग भांडवलशाहीला नष्ट करून समाजातील असमानता दूर करील आणि वर्ग विरहित साम्यवादी समाजाची स्थापना होईल. त्याच बरोबर शासनव्यवस्थेची गरज संपून जाईल. जेथे हेगेल राष्ट्रराज्याला विकासाची सर्वोच्च अवस्था मानतो तेथे मार्क्स सामाजिक समानतेसाठी राष्ट्रांच्या सीमा नाकारतो. मार्क्स शोषक वर्गाच्या अंतासाठी संपूर्ण जगातील कामगारांना एकत्र येण्याचे आव्हान करतो. अशाप्रकारे मार्क्स इतिहासिक परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये वर्ग संघर्षाच्या भूमिकेवर विशेष लक्ष देऊन वर्ग विरहित व शासन विरहीत समाजाच्या स्थापनेचे लक्ष निर्धारित करतो.

### ६.४.५ अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत (Theory of surplus value):

मार्क्सच्या अनुसार कामगार जितके श्रम करतात, त्यापेक्षा कमी मोबदला कामगारांना मिळतो. कामगारांचे अतिरिक्त श्रम नफ्याच्या स्वरूपामध्ये भांडवलदार वर्गाकडे जमा होते. यालाच मार्क्स 'अतिरिक्त मूल्य' असे म्हणतो. जे भांडवलशाही काळातील वर्ग संघर्षाचा मूळ आधार आहे. भांडवलदारांचा नफा, कामगारांचे वेतन कमी करूनच वाढवला जाऊ शकतो. यामुळेच कामगार आणि भांडवलदार यांचे संबंध परस्पर विरोधी होत जातात.

अशाप्रकारे या समस्यांचे समाधान करायचे असेल तर उत्पादनाच्या साधनांवरील खाजगी मालकी समाप्त करावी तसेच उत्पादन व्यवस्थेतून नफ्याचे उद्दिष्ट काढून टाकावे. असे केल्यानंतरच उत्पादन विशिष्ट लोकांच्या नफ्यासाठी न राहता समाजाच्या हिताच्या दृष्टीने होईल. त्यामुळे शोषक वर्ग आपोआपच नष्ट होऊन वर्ग विरहित समाजाचा उदय होईल. ज्यामध्ये व्यक्तीगत हितसंबंध आणि समाजाचे हितसंबंध यात कोणतेही अंतर राहणार नाही आणि हे काम कामगार वर्ग पूर्ण करेल असे मार्क्सने प्रतिपादित केले.

### ६.४.६ मार्क्सच्या साम्यवादाचे मूल्यांकन:

१. केवळ आर्थिक किंवा भौतिक घटक हेच इतिहासाच्या बदलास कारणीभूत असतात हे मार्क्सचे म्हणणे पूर्णतः बरोबर नाही. त्याने आपल्या आर्थिक भौतिकवादात आवश्यकतेपेक्षा जास्त महत्व आर्थिक परिस्थितीला दिले आहे. इतिहासाच्या

घडणीमध्ये आर्थिक कारणांशिवाय सामाजिक, धार्मिक, राजकीय व सांस्कृतिक हे घटकही तितकेच महत्त्वाचे असतात. मानवातील काम, क्रोध, लोभ, द्वेष वगैरे भावनाही इतिहासाच्या प्रवाहास निर्धारीत करत असतात. उदाहरणादाखल पाकिस्तानच्या निर्मितीला केवळ आर्थिक घटक कारणीभूत नव्हते. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर जे अनेक देश स्वतंत्र झाले त्यास फक्त आर्थिक घटक कारणीभूत नव्हते, दुसऱ्या जागतिक महायुद्धास आर्थिक घटकांपेक्षा आक्रमक राष्ट्रवाद अधिक कारणीभूत होता. मध्ययुगात मुस्लिम व ख्रिस्ती यांच्यात धर्मयुद्धे झाली त्यास आर्थिक कारण नव्हते. या सर्व उदाहरणावरून हे सिद्ध होते की, इतिहासाच्या विकासामध्ये कोणताही एक घटक कारणीभूत नसतो, तर अनेक घटकांच्या परस्पर संबंधातून घटना घडत जातात, याकडे कार्ल मार्क्स दुर्लक्ष करतो.

२. व्यक्तीच्या अस्तित्वाला व जाणिवेला मार्क्स इतिहास निर्मिती मध्ये महत्त्व देत नाही, तर सामाजिक अस्तित्व व सामाजिक जाणीव यांना तो अधिक महत्त्व देतो. व्यक्ती इतिहास घडवत नाही तर समाजातील वर्ग संघर्ष इतिहास घडवतात असे मार्क्स म्हणतो. माणसेच आपला इतिहास घडवतात, पण मानवास इतिहासाला स्वतःच्या इच्छेनुसार वाटेल तशी दिशा देता येत नाही. अनेक शतकांपासून निर्माण झालेल्या भोवतालच्या परिस्थितीचा आधारे माणसे इतिहास घडवतात. काही विचारवंत व्यक्तीला केंद्रबिंदू मानून इतिहासाची मांडणी करतात हे चूक आहे, असे मार्क्सवाद सांगतो. राजे-महाराजे, लढाया, कट-कारस्थाने, राजकीय नेतृत्व इत्यादी गोष्टींत ऐतिहासिक गरज म्हणून बदल घडून येतात. माणसाच्या जानिवेवर हे बदल निर्भर नसतात, असे त्याचे म्हणणे आहे. हे त्याचे म्हणणे पूर्णपणे सत्य नाही, कारण माणसेच इतिहास घडवतात व समाजात बदल घडवून आणतात. रशियन क्रांती लेनिनच्या नेतृत्वाखाली शिवाय होऊ शकली नसती हे मत मार्क्सवादात बसणारे नाही. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर नेपोलियनचा उदय झाला, त्याला केवळ आर्थिक कारण कारणीभूत नाही. शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले, त्याला आर्थिक कारण कारणीभूत नव्हते.

३. मार्क्सच्या इतिहासाच्या भौतिकवादी सिद्धांतात धर्मास गौण स्थान दिले आहे. धर्म ही आफुची गोळी आहे असे तो म्हणतो. गरीब लोकांना धर्माच्या नांदी जाणीपूर्वक लावून त्यांना फसवले जाते असे तो म्हणतो. परंतु साम्यवादी देशांमध्ये समाज औद्योगिक व आर्थिक उन्नतीच्या शिखरावर जाऊन पोहोचेल, पण व्यक्तीच्या उच्चतम अध्यात्मिक मूल्यांसाठी धर्म हाच एकमेव आधार असतो. रशियात सरकारतर्फे व्यक्तीच्या मनातील धार्मिक भावना नष्ट करण्याचे अनेक प्रयत्न झाले, पण तेथे धर्मांचा अंत होऊ शकला नाही. त्यावरून व्यक्तीला भौतिक सुखा बरोबरच अध्यात्मिक उन्नतीही हवी असते हे स्पष्ट होते.

४. इतिहास म्हणजे दुसरे तिसरे काही नसून वर्ग संघर्ष होय हे मार्क्सचे म्हणणे ऐतिहासिक दृष्ट्या बरोबर नाही. प्रत्येक समाजात वर्ग हे असतातच परंतु ते सर्वस्वी आर्थिक पायावरच आधारलेले असतात, हे म्हणणे पटणारे नाही. समाजाची विभागणी अगदी काटेकोरपणे दोनच वर्गात भांडवलदार व कामगार यांच्यात करता येणे सर्वस्वी अशक्य आहे. आज जगातील सर्वच देशात एक नवीन मध्यमवर्ग निर्माण झालेला आहे

munotes.in

आणि या मध्यमवर्गाच्या वैचारिक पार्श्वभूमीतून फ्रेंच, रशियन क्रांत्या तसेच भारतीय स्वातंत्र्याचा लढा अशा घटना घडून आलेल्या आहे.

५. भांडवलदार व कामगार यांच्या संघर्षात कामगार वर्गाचाच विजय होईल हे मार्क्सचे विधान कोणत्याही शास्त्रीय निकषावर टिकत नाही. भांडवलदार जरी नष्ट झाले तरी तंत्रज्ञांच्या, प्रशासकांच्या व विशिष्ट क्षेत्रातील तज्ञांचा एक नवा वर्ग निर्माण होतो. तसेच राजकीय नेतृत्वाच्या स्तरावरही एक वर्ग निर्माण होतो व त्या वर्गाच्या हाती समाजाची सूत्र राहतात. असा साम्यवादी देशांचाही अनुभव आहे. भारतासारख्या शेतीप्रधान देशामध्ये कामगारांपेक्षाही शेतकरी वर्गाची संख्या मोठी आहे, म्हणून मार्क्सचे सूत्र भारताला पूर्णपणे लागू करता येत नाही.

६. मार्क्सने ऐतिहासिक विकासाच्या अंतिम अवस्थेमध्ये एक वर्गहीन व राज्यहिन साम्यवादी समाज अस्तित्वात येईल असे भाकीत केले होते. परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. कारण रशियामध्ये १९१७ ते १९९१ पर्यंत श्रमजीवी वर्गाची हुकूमशाही प्रस्थापित झाली होती. परंतु तेथे राज्यव्यवस्था नष्ट झाली नाही. त्यामुळे मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद प्रत्यक्षात अजून तरी अस्तित्वात येऊ शकला नाही.

अशाप्रकारे मार्क्सचा, इतिहास काळात मानवाचा विकास कसा झाला हे सांगणारा सिद्धांत आज पूर्णपणे मान्य करता येत नाही. भौतिक साधनांची मालकी व उत्पादन पद्धती याचा परिणाम समाजावर होतो एवढे मात्र नक्की. पण इतिहासात घडणाऱ्या प्रत्येक घटनेला मार्क्सचा भौतिकवादी सिद्धांत लावता येईल असे नव्हे, तरीही मार्क्सने प्रतिपादित केलेला ऐतिहासिक भौतिकवाद मानवाची ऐतिहासिक वाटचाल कशी झाली याचे स्पष्टीकरण चांगल्या प्रकारे करतो हे नाकारता येत नाही. मार्क्सच्या भौतिकवादी तत्त्वज्ञानाने प्रत्येक क्षेत्रात आपला प्रभाव टाकला. आज कोणत्याही विचारवंताला एक तर मार्क्सवाद नाकारावा लागतो किंवा स्वीकारावा तरी लागतो. आधुनिक काळामध्ये मार्क्सवादा इतका प्रभाव दुसऱ्या कोणत्याही तत्त्वज्ञानाने टाकला नाही हे विसरून चालणार नाही.

## ६.५ सारांश

औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून समाजवादी विचारधारेचा जन्म झाला. भांडवलशाहीच्या निर्मितीमुळे कामगारांची दयनीय स्थिती झाली होती. कामाचे अधिकचे तास कामाच्या, ठिकाणी आरोग्याला हानिकारक असलेले वातावरण, गलिच्छ वस्त्या शिक्षणाचा अभाव इत्यादी समस्यांनी कामगारांना ग्रासून टाकले होते. कामगारांच्या या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने समाजवादी विचारधारा पुढे आली. परंतु सुरुवातीच्या समाजवादी विचारवंतांनी कोणताही वैज्ञानिक आधार न घेता कल्पनारम्य आदर्शवादी समाजवादी विचारधारेची मांडणी केली. परंतु त्याला वास्तवामध्ये कसे उतरवायचे यावर उपाय सांगितला नसल्यामुळे या समाजवादी विचारवंतांच्या विचारधारेला आदर्शवादी समाजावाद अशी संज्ञा दिली जाते. तरीही यांचे महत्त्व कमी लेखून चालत नाही, त्यांनी समाजवादी विचारधारेची पार्श्वभूमी तयार करण्याचे महत्त्वाचे काम केले.

जर्मनीमध्ये जन्मलेल्या कार्ल मार्क्स याने हेगेलच्या द्वंद्वात्मक सिद्धांताचा आधार घेऊन आपला द्वंद्वात्मक ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत मांडला. त्याला साम्यवाद किंवा

मार्क्सवाद म्हटले जाते. त्याने उत्पादन पद्धती, उत्पादनाची साधने आणि उत्पादन संबंध यांच्यामधील परस्पर संबंधांचा अभ्यास करून इतिहासाच्या प्राचीन साम्यवाद, गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही आणि साम्यवादी कालखंड आशा पाच अवस्था सांगितल्या. यामध्ये वर्ग संघर्ष आणि अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांताला त्याने विशेष महत्त्व देऊन असे सांगितले की, उत्पादनाची साधने बदलली असता समाज व्यवस्था बदलते. परंतु मार्क्सने मानवाच्या प्रत्येक जडण-घडणीमागे आर्थिक तत्व काम करते असे प्रतिपादित केल्याने त्याचा सिद्धांत मानवाच्या प्रत्येक क्रियेला लागू करता येऊ शकत नाही. तरीही त्याने प्रतिपादित केलेल्या ऐतिहासिक भौतिकवादामुळे मानवाची ऐतिहासिक वाटचाल कशी झाली हे चांगल्या प्रकारे समजू शकत. म्हणूनच आधुनिक काळामध्ये साम्यवादा इतका प्रभाव दुसऱ्या कोणत्याच विचारधारेने टाकला नाही.

## ६.६ प्रश्न

१. समाजवादी विचारधारेची पार्श्वभूमी सांगून आदर्शवादी समाजवादी विचारवंतांनी मांडलेले विचार स्पष्ट करा ?

२. कार्ल मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादी विचारांचा आढावा घ्या ?

३. कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारधारेचे मूल्यांकन करा ?

## ६.७ संदर्भ

१. पाश्चात्य जग – डॉ. धनंजय आचार्य

२. आधुनिक जागतिक इतिहासातील स्थित्यंतरे – डॉ. एस एस गाठाळ

३. आधुनिक जगाचा इतिहास – डॉ. अनिरुद्ध व गजानन भिडे

४. विश्व इतिहास - अखिल मूर्ति

५. इतिहासलेखनशास्त्र - डॉ. एस एस गाठाळ

*****

munotes.in

# जर्मनी आणि इटलीचे एकीकरण

**घटक रचना**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ जर्मन राज्यांवर नेपोलियनच्या विजयाचे परिणाम

७.३ १८४८ ची क्रांती

७.४ झोल्व्हेरिन किंवा कस्टम युनियन

७.५ बिस्मार्कचा उदय

७.६ डेन्मार्क बरोबर युद्ध १८६४

७.७ ऑस्ट्रो - प्रशियन युद्ध १८६६ (सात आठवड्यांचे युद्ध)

७.८ फ्रँको प्रशियन युद्ध १८७०-७१

७.९ इटलीचे एकीकरण

७.१० पीडमोंट मधील घडामोडी

७.११ पुनर्जागरण

७.१२ जोसेफ मॅझिनी

७.१३ काव्हूरचा मुत्सद्दीपणा

७.१४ क्रिमियन युद्ध (१८५३-५६)

७.१५ ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध १८५९

७.१६ जोसेफ गरीबाल्डी

७.१७ व्हिक्टर इमॅन्युएलने एकीकरण पूर्ण केले

७.१८ सारांश

७.१९ प्रश्न

७.२० संदर्भ


munotes.in

## ७.० उद्दिष्टे

१) जर्मनी आणि इटलीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी समजून घेणे.

२) जर्मनी आणि इटलीच्या एकीकरणाकडे नेणाऱ्या घटनांचा मागोवा घेणे.

३) जर्मनीच्या एकीकरणात बिस्मार्कची भूमिका जाणून घेणे.

४) इटलीच्या एकीकरणात काव्हूरची भूमिका जाणून घेणे.

## ७.१ प्रस्तावना

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जर्मनी आणि इटली राजकीयदृष्ट्या एकसंध नव्हते. स्वतंत्र देश म्हणून ते अस्तित्वात आले नव्हते व ते अनेक छोट्या अनियंत्रित सत्ताधीश असणाऱ्या राज्यांमध्ये विभागले गेले होते. बहुतेक राज्ये ऑस्ट्रियाच्या ताब्यात होते. ऑस्ट्रियाचा पंतप्रधान मेटर्निच याने उदारमतवाद आणि सुधारणांचे सर्व प्रयत्न निर्दयपणे चिरडले. ऑस्ट्रिया व्यतिरिक्त,इंग्लंड आणि डेन्मार्कचा जर्मन राज्यांवर राजकीय प्रभाव होता. डाएट ही एक अशी राजकीय संस्था होती ज्यात सर्व राज्यांचे प्रतिनिधी होते. मात्र डाएटने जनतेच्या हितासाठी कधीही काम केले नाही. राज्यकर्त्यांनी यथास्थित परिस्थिती ठेवणे पसंत केले. त्यांनी एकीकरणाच्या प्रक्रियेबाबत कधीही विचार केला नाही. जर्मन देशभक्तांनी ऐक्यासाठी प्रयत्न केलेपण ते यशस्वी होऊ शकले नाहीत. प्रशिया या राज्यांमधील सर्वात बलवान सत्ता होती आणि जर्मन देशभक्तांना आशा होती की केवळ तीच एकीकरण चळवळीची जबाबदारी घेवू शकते.

## ७.२ जर्मन राज्यांवरील नेपोलियनच्या विजयाचे परिणाम

नेपोलियनच्या प्रशासकीय ऐक्याने राष्ट्रवाद आणि एकीकरण शक्तींना प्रोत्साहन दिले. त्याने सरंजामशाही आणि गुलामगिरी दूर केली. तथापि,नेपोलियनच्या पराभवामुळे देशभक्तांच्या आशा धुळीस मिळाल्या. प्रतिगामी व विघटनकारी शक्तींनी व व्हिएन्ना येथील शांतता समझोत्याने जर्मनीला डाएटसह ३९ राज्यांच्या मोकळ्या संघात पुन्हा एकदा विभागले. ऑस्ट्रियाने पुन्हा एकदा इटली व जर्मन प्रांत विभागले. सर्व राज्यकर्त्यांनी पुन्हा हुकुमशाहीला सुरुवात केली. देशभक्तांनी केलेले बलिदान विसरले गेले. जेना विद्यापीठाने मूलगामी विचारांचे केंद्र म्हणून काम केले. विद्यापीठातीमुळे क्रांतिकारी प्रवृत्तींना प्रोत्साहन दिले असा आरोप ऑस्ट्रिया नेहमी करत असे. विद्यार्थ्यांनी गुप्त संघटना स्थापन केल्या. ऑस्ट्रियाने १८१९ मध्ये कार्ल्सबाड सनद संमत करून विद्यार्थी आणि शिक्षकांच्या कृतिंवर नियंत्रण ठेवण्यासाठी समित्या नेमल्या गेल्या. मुद्रण स्वातंत्र्यावर गदा आणली. संशयास्पद व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले.

## ७.३ १८४८ ची क्रांती

व्हिएन्ना काँग्रेसने लादलेल्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेबद्दल वाढत्या नाराजीमुळे जर्मन राज्यांमध्ये मार्च क्रांतीचा १८४८ मध्ये उद्रेक झाला. जर्मन राज्यांमध्ये १८४८ च्या सुमारास घडलेल्या घटना प्रामुख्याने १८४८ च्या क्रांतीचा भाग होते. जर्मन एकतेचे उद्दीष्ट असलेल्या क्रांतींने झोलवेरीन चळवळीद्वारे त्यांनी एकत्रीकरणाची इच्छा दर्शविली.

**फ्रँकफर्ट संसद १८४८-४९:**

१८ मे १८४८ रोजी फ्रँकफर्ट येथे एक राष्ट्रीय सभा बोलावली गेली. त्यामध्ये १८४८ च्या क्रांतीमध्ये समाविष्ट व उल्लेखनीय जर्मन व्यक्तींचा समावेश केला गेला. या संसदेचे अध्यक्ष हेनरिक व्हॉन गॅगर्स होते. जर्मनीच्या राजकीय एकीकरणाची योजना करणे हा त्याचा हेतू होता. प्रशियाचा राजा फ्रेडरिक विल्यमने विशिष्ट जर्मन राज्यांचा संघ स्थापन करण्याचा व

एक राजकीय पर्याय देण्याचा प्रयत्न केला, परंतु ऑस्ट्रियाने ओलमुत्झ (१८५०) च्या कराराद्वारे त्याच्या प्रयत्नांना आळा घालण्याचा प्रयत्न केला. ऑस्ट्रियाने जर्मन महासंघाची कॉन्फेडरेशनची पुनर्स्थापना केली. फ्रँकफर्ट संसदेने तयार केलेल्या संविधानाचा १८६६मध्ये उत्तर जर्मन महासंघावर प्रभाव पडला.

## ७.४ झोल्व्हेरिन किंवा कस्टम युनियन

वेगवेगळ्या जर्मन राज्यांमध्ये व्यापारासाठी वेगवेगळे नियम होते. सीमेवर कर संकलन संघ स्थापित केले गेले होते. त्यांच्यातील आंतरराज्य व्यापार करपात्र होता. ही व्यवस्था व्यापारासाठी हानिकारक होती. प्रशियाने जर्मन राज्यांचे आर्थिक एकीकरण आणण्यासाठी नेतृत्व प्रदान केले. प्रशिया व्यापार आणि व्यावसायिक बाबींबाबत परदेशी देशांशी जोडलेला होता. या घडामोडींनी जर्मन राज्यांमध्ये समृद्धी आणली. यामुळे नवीन व्यापारी आणि भांडवलदार वर्गाला जन्म मिळाला,ज्यांना बाजारपेठा विस्तृत करायच्या होत्या. हे केवळ मजबूत आणि स्थिर सरकारद्वारे शक्य होऊ शकते. हा नवा आर्थिक वर्ग शासक वर्गाला बळकट करण्यासाठी तयार होता. ज्यामुळे राष्ट्रवाद आणि देशभक्तीची लाट निर्माण झाली. ऑस्ट्रियाचा पराभव करण्यासाठी मजबूत सैन्य आवश्यक आहे हे लोकांनाही समजले. या कार्यात राजाला जर्मन एकीकरणाचे अग्रगण्य नेता ओटो व्हॉन बिस्मार्क याने पुढे मोलाची भूमिका बजावली.

## ७.५ बिस्मार्कचा उदय

बिस्मार्कचा जन्म १८१५ मध्ये प्रशियाच्या एका सुखवस्तू कुटुंबात झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर तो नागरी सेवेत रुजू झाला, परंतु बेशिस्तीच्या कारणावरून त्याला काढून टाकण्यात आले. तो उदारमतवाद्यांविषयी सहानुभूतीशील नव्हता आणि राजेशाहीला अनुकूल होता. त्याच्या या विचारसरणीमुळे प्रशियन राजाने त्याला राजनैतिक सेवेत घेतले. त्याने प्रथम ऑस्ट्रियाच्या प्रशासनाचा अभ्यास केला. नंतर तो रशिया आणि फ्रान्समध्ये प्रशियाचे राजदूत होता. तो दोन्ही देशांच्या कमकुवतपणा आणि शक्तींची गणना करण्यास सक्षम होता. या ज्ञान आणि अनुभवाचा त्याने नंतरच्या कारकिर्दीत उपयोग केला. संसदेचे बहुसंख्य सदस्य हे उदारमतवादी होते ज्यांनी लोकशाही प्रजासत्ताकाची बाजू घेतली. जेव्हा त्याने सैन्य बळ वाढवण्याचा प्रयत्न केला तेव्हा या सदस्यांनी राजेशाही आणि हुकुमशाहीला विरोध केला. बिस्मार्कने राजाचे मनापासून समर्थन केले आणि त्याला आश्वासन दिले की तो राजाच्या मागे समर्थपणेउभा राहून एकीकरणाची योजना प्रत्यक्षात आणेल. एकीकरण प्रक्रियेत प्रशियाच्या राजाने बिस्मार्कच्या सर्व योजनांना पाठिंबा दिला.

**बिस्मार्कचे लोह आणि रक्त धोरण (Iron and Blood Policy):**

बिस्मार्कचे दोन महत्वाचे उद्देश होते. १) प्रशियाने जर्मन एकीकरणाचे नेतृत्व स्वीकारणे. २) प्रशियाने तिची ओळख जर्मनीमध्ये विलीन करू नये. त्याऐवजी प्रशियाने जर्मनी राज्ये जिंकली पाहिजे आणि प्रशियन संस्कृती आणि सभ्यतेचा प्रसार केला पाहिजे. शांततेच्या मार्गाने आपले ध्येय साध्य होऊ शकत नाही हे त्याला माहीत होते. परिणामी त्याने लोह आणि रक्त धोरण अंगिकारले. या धोरणात प्रथम प्रशियाने मजबूत सैन्य तयार करणे

आवश्यक होते. दुसरे म्हणजे जर्मन प्रश्नातील परकीय हस्तक्षेपाचे सर्व धोके दूर करणे अगत्याचे होते. बिस्मार्कला फ्रान्स, इंग्लंड किंवा रशियाने ऑस्ट्रियाला मदत करू नये याची काळजी घ्यायची होती. या हेतूने त्याने आपले डाव कुशलतेने खेळले. त्याने १८६३ मध्ये पोलिश विद्रोहात रशियाला प्रशियन मदत देवू केली आणि भविष्यात ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात संघर्ष झाल्यास झारकडून तटस्थतेचे आश्वासन मिळवले. त्यानंतर त्याने देशातील उदारमतवादी सदस्यांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून सैन्य उभे केले व जर्मन एकीकरण साध्य केले. ऑस्ट्रियाचा पराभव केल्याशिवाय ते साध्य होऊ शकत नाही याची जाणीव बिस्मार्कला होती. पण बलाढ्य ऑस्ट्रियाला आव्हान देण्यापूर्वी प्रशियन सैन्यबळाची चाचपणी करण्यासाठी त्याने डेन्मार्कशी युद्ध केले.

## ७.६ डेन्मार्क बरोबर युद्ध १८६४

बिस्मार्कने दोन हेतूंसाठी डेन्मार्कशी युद्ध केले. त्याला प्रशियन सैन्याच्या पराक्रमाची चाचणी घ्यायची होती. दुसरे म्हणजे, त्याला ऑस्ट्रिया विरूद्ध युद्ध करण्याची संधी शोधायची होती, शेलस्विग आणि होल्स्टीन हे दोन्ही प्रांत जर्मन होते, परंतु डेन्मार्कच्या शासकाद्वारे नियंत्रित होते. होल्स्टीनचे लोक जर्मन वंशज होते, परंतु शेल्सविगमध्ये बरेच डेन्मार्कचे रहिवाशी होते. १८५२ मध्ये झालेल्या करारानुसार डेन्मार्कने प्रांतांना विलीन करणे अपेक्षित नव्हते. असे असूनही डॅनिश राजाने शेल्सविग प्रांताचे विलीनीकरण घोषित केले. त्याच वेळी ऑस्ट्रियाने होल्स्टीन घेतला. बिस्मार्कने डेन्मार्कवर युद्ध घोषित केले. डेन्मार्कचा पराभव झाला. प्रशियाने शेल्सविग काबीज केला. पुढे बिस्मार्कने ऑस्ट्रियाशी युद्धाची तयारी केली.

## ७.७ ऑस्ट्रिया - प्रशियन युद्ध १८६६ (सात आठवड्यांचे युद्ध)

१८६६ मध्ये झालेलं युद्ध हे प्रशियाचा एक जबरदस्त विजय होता. नेपोलियनच्या पराभवापासून युरोपियन राजकीय परिस्थितीत आमूलाग्र बदल केला. प्रशियाची बरीच प्रतिस्पर्धी राज्ये ऑस्ट्रियाला सामील झाली होती आणि पराभूत झाली होती. या युद्धाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१) झोल्व्हेरिन व्यापारासाठी फायदेशीर ठरले. ऑस्ट्रियाला त्यात सामील होण्याची इच्छा होती,परंतु बिस्मार्कने ऑस्ट्रियाला त्यात प्रवेश देण्यास नकार दिला.

२) हेसल या जर्मन राज्याच्या शासकाने नवीन संविधान दिले,पण त्यात उदारमतवादी तत्वे नसल्यामुळे लोकांनी विरोध केला ऑस्ट्रियाने लोकांचे समर्थन केले,तर बिस्मार्कने हेसेलच्या शासकाची बाजू घेतली.

३) बिस्मार्कच्या मुत्सद्देगिरीने युद्धसदृश्य स्थिती तयार केली. त्याला ऑस्ट्रियाला मुत्सद्दीपणाने वेगळे करायचे होते. इंग्लंडने प्रशियाच्या मुक्त व्यापाराला समर्थन दिले आणि ऑस्ट्रियाच्या प्रतिक्रियावादी धोरणांचा विरोध केला. बिस्मार्कने पोलिश विद्रोहात रशियाला मदत करून झारची मर्जी संपादन केली. झार आधीच ऑस्ट्रियावर रागावला होता,कारण त्याने क्रिमियन युद्धादरम्यान झारला मदत केली नाही. फ्रान्सचा राजा नेपोलियन यालादेखील ऑस्ट्रिया आणि प्रशिया यांच्यात युद्ध हवे

munotes.in

होते,जेणेकरून दोन्ही देश कमकुवत होतील आणि त्याला आपले साम्राज्य वाढवण्याची संधी मिळेल. बिस्मार्कने अनेक देशांची तटस्थता निर्माण करून आपली बाजू सुरक्षित केली. मग त्याने इटलीशी करार केला आणि प्रशियाला लष्करी मदतीच्या बदल्यात इटालियन लोकांनी व्हेनेशिया मिळवण्याच्या कार्यात पाठिंबा देण्याचे आश्वासन दिले. अशा प्रकारे बिस्मार्कने ऑस्ट्रियाला राजनैतिकरित्या वेगळे केले.

४) युद्धाचे तात्काळ कारण ऑस्ट्रियाच्या अधिपत्याखाली असलेल्या होल्त्सेन या प्रांताने दिले. बिस्मार्कने आरोप केला की ऑस्ट्रियाने या क्षेत्राचे योग्य व्यवस्थापन केले नाही. तेथील जर्मन लोकांचे सरंक्षण करण्यासाठी म्हणून बिस्मार्कने ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध घोषित केले.

हे युद्ध सात आठवडे चालले. काही प्रांतांनी ऑस्ट्रियाला मदत केली,पण कोणतेही युरोपियन राज्य तिच्या मदतीला आले नाही. पहिल्या तीन दिवसात प्रशियाने ऑस्ट्रियाचा पराभव केला आणि उत्तर जर्मनीतील भाग प्रशियाला जोडला ३ जुलै,१८६६ रोजी सडोवा येथे मुख्य लढाई लढली गेली. ऑस्ट्रिया पराक्रमाने लढला, पण शेवटी लढाईत पराभूत झाला. या मोहिमेत जवळपास ४०,००० सैनिक ऑस्ट्रियाने गमावले. फ्रान्समध्ये नेपोलियन तिसरा याच्यावर ऑस्ट्रियाला मदत न केल्याबद्दल टीका झाली. युद्धानंतर एक मजबूत आणि शक्तिशाली प्रशिया तयार झाला.

**प्रागचा करार:**

हा करार बिस्मार्कच्या मुत्सद्दीपणाचे द्योतक होता. त्याने कराराच्या अटी शिथिल ठेवल्यान अन्यथा फ्रान्स हस्तक्षेप करण्याची शक्यता होती. कराराच्या अटी पुढीलप्रमाणे होत्या -

१. जर्मन राज्यांचे कॉन्फेडरेशन रद्द करण्यात आले; अशा प्रकारे जर्मनीमध्ये ऑस्ट्रियाचा प्रभाव संपुष्टात आला.

२. ऑस्ट्रियाला युद्ध भरपाई द्यावी लागली.

३. ऑस्ट्रियाला व्हेनेशियाला इटलीला आणि होल्त्सेनला प्रशियाला सोपवावे लागले.

४. प्रशियाने जर्मन प्रांतांना एकत्रितरीत्या जोडले

५. इतर राज्ये स्वतंत्र ठेवली गेली.

करारामधून उत्तर जर्मन कॉन्फेडरेशन तयार झाले. प्रशियाचा राजा त्याचा अध्यक्ष झाला. त्यानुसार एकीकरणाची अर्धी प्रक्रिया पूर्ण झाली. हे युद्ध प्रशियासाठी अत्यंत फायदेशीर होते. त्याची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढली व त्याचे लष्करी वर्चस्व युरोपमध्ये मान्य केले गेले.

## ७.८ फ्रँको प्रशियन युद्ध १८७०-७१

फ्रान्सवर बोनापार्ट नेपोलियनचा पुतण्या नेपोलियन तिसरा राज्य करत होता. त्याच्याकडे नेपोलियनचे तेज किंवा लष्करी कौशल्य नव्हते. चतुर राजनैतिक डावपेचांच्या आधारे बिस्मार्क नेपोलियनला प्रशियावर युद्ध घोषित करण्यास प्रवृत्त करू शकला आणि फ्रान्सच्या या आक्रमक हालचालीमुळे ब्रिटनसह इतर युरोपियन शक्तींना फ्रान्सच्या बाजूने सामील होण्यापासून रोखले. संपूर्ण जर्मनीमध्ये फ्रेंच विरोधी भावना निर्माण झाली तेव्हा बिस्मार्कने प्रशियाच्या सैन्याला युद्धासाठी सज्ज केले. हे युद्ध फ्रेंचांसाठी विनाशकारी होते. सप्टेंबर १८७० मध्ये जर्मन सैन्याने विशेषतः सेदान येथे दैदिप्यमान विजय मिळवला. या पराभवाने नेपोलियनला इंग्लंडमधील निर्वासनात त्याच्या आयुष्यातील शेवटची वर्ष घालवावी लागली.

**युद्धाची कारणे:**

१) जर्मन एकीकरण प्रयत्नात फ्रेंच हस्तक्षेपाचा धोका होता. बिस्मार्कच्या मुत्सद्देगिरीने पुन्हा एकदा काम केले. इंग्लंड आणि फ्रान्समध्ये कटुता निर्माण करून त्याने इंग्रजांची तटस्थता कायम ठेवली. बिस्मार्कने रशिया आणि इटलीला तटस्थ राहण्यास राजी केले. ऑस्ट्रिया कमकुवत झाला होता आणि फ्रान्सला मदत करणार नव्हता. या घडामोडींमुळे नेपोलियन एकाकी पडला.

२) नेपोलियन तिसरा १८६४च्या मेक्सिको मोहिमेत अपयशी ठरला. ऑस्ट्रिया-प्रशिया लढाईनंतर तो निराश झाला होता,कारण प्रशिया त्याच्या अपेक्षांविरुद्ध मजबूत बनला होता. यामुळे दोन्ही देशांमध्ये वैर निर्माण झाले.

३) नेपोलियन तिसरा महत्वाकांक्षी होता. बिस्मार्कने ऑस्ट्रो-प्रशियन युद्धादरम्यान त्याला सुमारे ८८ प्रदेश देण्याचे वचन दिले होते. पण त्याने आपला शब्द पाळला नाही. फ्रेंचांना हा वाद मिटवण्यासाठी युद्ध हवे होते.

४) युद्धास तात्काळ कारण स्पेनमुळे मिळाले. दोन्ही देशांनी स्पॅनिश उत्तराधिकार प्रकरणात हस्तक्षेप केला. दोन्ही देशांमध्ये एकमेकांविरुद्ध सार्वजनिक द्वेष होता. शेवटी युद्ध जुलै १८७० मध्ये घोषित करण्यात आले. युद्धादरम्यान १६ राज्यांनी प्रशियाला मदत केली.

प्रशियन सैन्याने फ्रान्सवर आक्रमण केले. प्रशियाने अनेक लढाया जिंकल्या आणि फ्रान्सला पराभूत केले. तिसरा नेपोलिअनने पराभव मान्य केला पण पॅरिसमधील लोक चार महिने लढत राहिले. अखेर निरुपाय झाल्याने ते प्रशियाला शरण गेले.

**फ्रान्सच्या पराभवाची कारणे:**

१) फ्रेंच अति-आत्मविश्वासू होते आणि त्यांना वाटले की त्यांना प्रशियाचा पराभव करण्यात अडचण येणार नाही. फ्रान्सला युरोपची सर्वात मजबूत लष्करी शक्ती मानली जात असे.

२) फ्रेंच लोकांनी त्यांच्या चेसपॉट रायफल्सच्या श्रेष्ठतेवर विश्वास ठेवला होता पण प्रशियन तोफखान्याच्या श्रेष्ठतेमुळे हा विश्वास कमाल दाखवू शकला नाही.

३) प्रशियन सैन्याच्या वेगवान हालचालीने फ्रेंचांना आश्चर्यचकित केले.

४) सेडानमधील आपत्तीजनक पराभव हा लष्कराप्रमाणेच मानसशास्त्रीय पराभव होता. नेपोलियन तिसरा पकडला गेला आणि फ्रेंच सैन्याचा पूर्णपणे पराभव झाला. फ्रेंच मनोबल कधीच सावरले नाही.

५) फ्रान्स राजनैतिकरित्या अलिप्त होता. बिस्मार्कने हुशारीने फ्रान्सला आक्रमक बनवले होते आणि त्यामुळे फ्रान्सला इतर कोणत्याही मोठ्या शक्तींकडून कोणतीही मदत मिळाली नाही.

फ्रंकफर्टच्या करारावर स्वाक्षरी झाली ज्यानुसार फ्रान्सला अल्सेस आणि लॉरेन या समृद्ध प्रांतांना जर्मनीला द्यावे लागले. फ्रान्सने प्रचंड युद्ध नुकसान भरपाई देण्याचे मान्य केले. नुकसान भरपाई देईपर्यंत जर्मन सैन्याने फ्रान्सच्या एका भागावर कब्जा मिळवला. फ्रान्सला प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. युद्धादरम्यान दक्षिण जर्मन राज्ये प्रशियामध्ये सामील झाली. एक तडजोड करण्यात आली आणि राज्यांनी जर्मन युनियनमध्ये सामील होण्याचे मान्य केले. फ्रेंच - प्रशियन युद्धाच्या समाप्तीपूर्वी १८ जानेवारी १८७१ रोजी जर्मन एकीकरणाचे कार्य पूर्ण झाले. जर्मन साम्राज्य अस्तित्वात आले. प्रशियाचा राजा जर्मनीचा राजा म्हणून घोषित झाला. बर्लिनला राजधानी बनवण्यात आले. बिस्मार्कच्या चतुर मुत्सद्देगिरीमुळे जर्मनीचे एकीकरण झाले.

## ७.९ इटलीचे एकीकरण

नेपोलियन बोनापार्टने ऑस्ट्रियन राज्ये जिंकली तेव्हा एक नवीन युग सुरू झाले. त्याने अनेक राज्ये एकत्र आणली. नेपोलियनने इटलीला प्रशासनाची एकसमान व्यवस्था दिली. इटालियन लोक स्वातंत्र्य,समानता आणि बंधुत्व या फ्रेंच विचारांनी प्रभावित झाले. त्यांना स्वराज्य आणि स्वातंत्र्य यासारख्या संकल्पनांची ओळख झाली. यामुळे त्यांच्या देशभक्तीची भावना तीव्र झाली. नेपोलियनच्या पराभवानंतर युरोपच्या नकाशाची पुनर्रचना करण्यासाठी १८१५ मध्ये व्हिएन्ना काँग्रेसला बोलावले गेले. इटालियन लोकांच्या राष्ट्रीय भावनांकडे दुर्लक्ष केले गेले आणि पुन्हा जैसे थे स्थिती कायम ठेवण्यात आली. इटली पुन्हा एकदा विभागली गेली. ऑस्ट्रियन आणि फ्रेंच राजांनी पुन्हा इटालियन राज्ये काबीज केली. इटलीचे विभाजन त्यानुसार केले गेले

१) फ्रेंच राजपुत्राच्या अधिपत्याखाली नेपल्स आणि सिसिलीचे राज्य

२) लोम्बार्डी आणि व्हेनेशिया ऑस्ट्रियाचे भाग बनले

३) पर्मा,टस्कनी,मडेना ऑस्ट्रियाच्या राजाच्या नातेवाईकांकडे राहिले

४) पोप अंतर्गत रोम

५) केवळ पिडमोंट हे स्वतंत्र राज्य राहिले

## ७.१० पिडमोंट मधील घडामोडी

इटलीच्या देशभक्तांनी गुप्त संस्थांची व संघटनांची स्थापना केली. त्यांचे ध्येय इटालियन एकता हे होते. यापैकी सर्वात प्रसिद्ध संघटना कार्बोनारी ही होती. त्याचे मूळ नेपल्समध्ये होते. इटलीतील सर्व असंतुष्ट घटक त्यांच्यात सामील झाले. त्यांना परदेशी लोकांना इटलीतून बाहेर काढायचे होते. कार्बोनारी या क्रांतिकारी सोसायटीने नेपल्समध्ये १८२० मध्ये राजा फर्डिनांड याच्या विरोधात बंड केले. लोकांनी उदारमतवादी राज्यघटनेची मागणी केली. राजाने सहमती दर्शविली, परंतु नंतर मागणी मोडून काढण्यासाठी गुप्तपणे ऑस्ट्रियाकडून मदत मागितली. ऑस्ट्रियन सैन्य आले आणि बंड दडपले. दुसरा विद्रोह पिडमोंटमध्ये सुरु झाला. पिडमोंटच्या राजाने त्याचा भाऊ चार्ल्स अल्बर्टसाठी सिंहासनाचा त्याग केला. पुन्हा ऑस्ट्रियाने हस्तक्षेप करून बंड मोडून काढले. १८३० च्या फ्रेंच क्रांतीचा इटालियन राज्यांवर प्रभाव पडला. मोडेना आणि पर्मा येथे बंड झाले,परंतु ऑस्ट्रियाने सर्व उठावांना चिरडले. यामुळे देशभक्तांना एक धडा मिळाला की सर्व राज्यांचा समान शत्रू ऑस्ट्रिया होता. त्यामुळे ऑस्ट्रियन प्रभाव आणि दडपशाहीपासून मुक्त होणे आवश्यक होते.

### १८४८ ची क्रांती:

१८४८च्या क्रांतीने संपूर्ण इटालियन द्वीपकल्पात राष्ट्रवादी भावना वाढण्याचा मार्ग मोकळा केला. त्या वर्षी अनेक इटालियन शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्रोह सुरु झाला. डॉक्टर, वकील, दुकानदार यासारखे व्यावसायिक वर्ग तसेच विद्यार्थी यांनी लोम्बार्डी-व्हेनेशिया आणि मिलान येथील ऑस्ट्रियन राजवटीविरुद्ध बंड करण्याचा प्रयत्न केला. पिडमोंट-सार्डिनिया राज्याने बंडाला पाठिंबा देण्यासाठी सैन्य पाठवले असले तरी जुलै १८४८ मध्ये ऑस्ट्रियाच्या मदतीमुळे बंड चिरडले गेले. इटालियन बंड अपयशी ठरले आणि १८४९ पर्यंत जुन्या राजवटी पुन्हा एकदा अस्तित्वात आल्या.

### रीसोर्जीमिंटो:

प्रचलित परिस्थितीच्या विरोधात इटलीमध्ये अनेक उठाव झाले आणि हजारो लोकांना तुरुंगात डांबण्यात आले किंवा निर्वासित करण्यात आले. स्वातंत्र्यविषयक विचार आणि भावनांनी रीसोर्जीमिंटो चळवळीला प्रेरित केले. रीसोर्जीमिंटो म्हणजे पुनरुज्जीवन किंवा पुनरुत्थान. ही चळवळ एक स्वतंत्र आणि संयुक्त इटलीच्या आदर्शांवर आधारित होती. तसेच इटालियन लोकांना त्यांच्या पूर्वीच्या महानतेची आठवण करून देत होती. ऑस्ट्रियन वर्चस्वाचा निषेध आणि एकतेची मागणी त्यांनी केली होती. ते उदारमतवादी आणि लोकशाहीवादी होते. संसदीय स्वरूपाचे सरकार,अभिव्यक्ती स्वातंत्र्य,चर्चचे अधिकार कमी करणे आणि प्रजासत्ताक स्थापनेची मागणी त्यांना अभिप्रेत होती. इटलीच्या मध्यमवर्गीयांनी आर्थिकदृष्ट्या स्वतःला विकसित करण्याची इच्छा व्यक्त केली.

## ७.१२ जोसेफ मॅझिनी

मॅझिनीचा जन्म १८०५ मध्ये जिनोआ येथे झाला. त्याचे वडील जिनोआ विद्यापीठात प्राध्यापक होते. तरुण वयातच मॅझिनी कार्बोनारीचा सदस्य झाला. त्याने १८३० च्या बंडात जोमाने भाग घेतला. त्यासाठी त्याला काही दिवसांसाठी हद्दपार करण्यात आले.

१८३१ मध्ये सुटल्यानंतर त्याने "यंग इटली" नावाची संघटना स्थापन केली. तरुणांना राष्ट्रीय चळवळीसाठी संघटित करणे हा त्यांचा हेतू होता. युवाशक्तीवर त्यांचा अपार विश्वास होता. त्यांनी तरुणांना कारागीर,कामगार,कामगार आणि शेतकऱ्यांशी संवाद साधा आणि त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यास सांगितले. त्याला इटलीला राष्ट्र बनवायचे होते. कार्बोनेरी संघटनाच्या कार्य पद्धतीवरील त्याचा विश्वास उडाला. त्याने एक मजबूत राष्ट्रीय कृती करण्याचे ध्येय ठेवले. त्याच्या राष्ट्रवादी प्रचाराने इटालियन लोकांचे राजकीय क्षितिज विस्तृत केले.

## ७.१३ कॅव्हूरचा मुत्सद्दीपणा

पिडमोंट - सार्डिनियाच्या माध्यमातून कावूरने इटलीच्या एकीकरणात मध्यवर्ती भूमिका बजावली. कावूर उदारमतवादी होता आणि मुक्त व्यापार,मतस्वातंत्र्य आणि धर्मनिरपेक्ष राजवटीवर विश्वास ठेवत होता. परंतु प्रजासत्ताकवादी आणि क्रांतिकारकांचे मार्ग त्यांना पसंत नव्हते. कावूरने संसदेच्या चर्चेत भाग घेतला होता पण पंतप्रधान असताना त्यांनी वापरलेल्या विवादास्पद पद्धतींमुळे त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका केली गेली. त्याच्या आधुनिकीकरण प्रकल्प,विशेषत: रेल्वे आणि लष्कर आणि नौदलाच्या उभारणीवर मोठ्या प्रमाणावर खर्च केल्यामुळे राष्ट्रीय कर्ज वाढले. जेव्हा कावूर पंतप्रधान झाला तेव्हा पिडमोंटला ऑस्ट्रियाकडून नुकताच मोठा पराभव सहन करावा लागला होता,परंतु जेव्हा तो मरण पावला,तेव्हा व्हिक्टर इमॅन्युएलच्या द्वितीयच्या हाती युरोपच्या महान शक्तींमध्ये स्थान असलेल्या एक राज्य आले. त्यामध्ये कावूरचा सिंहाचा वाटा होता.

## ७.१४ क्रिमियन युद्ध (१८५३-५६)

ब्रिटन आणि फ्रान्सच्या सहयोगी शक्तींनी पिडमाँट राज्याला क्रिमियन युद्धात सहभागी होण्यास सांगितले. इटलीच्या एकीकरणाच्या पिडमाँटच्या पुढाकाराला मित्रपक्ष पाठिंबा देतील अशी आशा असलेल्या कावूरने १० जानेवारी १८५५ रोजी ब्रिटन आणि फ्रान्सला पाठींबा दिला आणि युद्धात प्रवेश केला म्हणून सहमती दर्शविली. १९ व्या शतकाच्या मध्यात ऑस्ट्रिया हे शक्तिशाली राष्ट्र होते,ज्यांच्याकडे लोम्बार्डीचा मोठा आणि समृद्ध प्रदेश होता. पिडमाँट- सार्डिनिया हे ऑस्ट्रियन लोकांना स्वतःहून पराभूत करू शकत नाही हे जाणून कावूरने १८५० च्या दशकाच्या मध्यात फ्रान्स, इंग्लंड आणि ऑटोमन साम्राज्याच्या बाजूने क्रिमियन युद्धात प्रवेश करून राजकीयदृष्ट्या फायदा उठवण्याचा प्रयत्न केला आणि तो पुरेपूर यशस्वी झाला. दरम्यान, कावूरने पिडमाँट-सार्डिनिया आणि त्याचे प्रदेश आधुनिकीकरणद्वारे सुसज्ज करण्याचा प्रयत्न केले. सार्डीनियात रेल्वेमार्ग तयार करणे आणि सैन्य प्रबलीकरण सुरु ठेवले.

ऑस्ट्रियाला नमवण्यासाठी पीडमाँटला प्रबळ मित्रांची गरज होती. त्याने फ्रान्सबरोबर युती करण्याचा निर्णय घेतला. फ्रेंच राजा नेपोलियन तिसरा हा पूर्वी कार्बोनारीचा सदस्य होता त्यामुळे इटालियन राज्यांबद्दल सहानुभूती बाळगणे अपेक्षितच होते. १८५५ मध्ये कावूरने क्रिमियन युद्धात इंग्लंड आणि फ्रान्सला मदत करून राजनैतिक पाऊल उचलले. त्याचे रशियाशी कोणतेही वैर नव्हते,पण त्याला आंतरराष्ट्रीय राजकारणातून फायदा घ्यायचा होता. इटली एकीकरणात हे महत्वाचे पाऊल होते. जेव्हा इटालियन सैन्याने क्रिमीय

युद्धाबद्दल तक्रारी मांडल्या, तेव्हा तो म्हणाला "क्रीमियाच्या या चिखलातून एक नवीन इटली जन्माला येईल." युद्धानंतर,कॅव्होरला पॅरिस शांतता परिषदेसाठी बोलावण्यात आले. त्याने तिथे जाऊन इटालियन राज्यांच्या समस्या मांडल्या. नेपोलियन तिसरा इटलीला मदत करण्यास तयार झाला. त्यांनी कावूरची भेट घेतली आणि तपशीलांवर चर्चा केली. ऑस्ट्रियाला लोम्बार्डी आणि व्हेनेशियामधून बाहेर काढण्यासाठी त्याने पिडमोंटला मदत करण्याचे आश्वासन दिले. त्याबदल्यात फ्रान्सला सेव्हॉय आणि नाइस प्रांत मिळणे अपेक्षित होते.

## ७.१५ ऑस्ट्रिया विरुद्ध युद्ध १८५९:

फ्रान्सशी युती केल्यावर, पिडमाँट-सार्डिनियाने ऑस्ट्रियाविरुद्ध १८५९ मध्ये युद्ध घोषित केले. ऑस्ट्रियाचा विरोध करण्यासाठी कावूरने लोम्बार्डीच्या सीमेवर सैन्य तैनात केले. ऑस्ट्रियाने पिडमाँटला सैन्य मागे घेण्यास सांगितले पण कावूरने नकार दिला. त्यामुळे ऑस्ट्रियाने युद्धाची घोषणा केली गेली. करारानुसार नेपोलियन तिसरा याने वैयक्तिकरित्या फ्रेंच सैन्याला कावूरला मदत करण्यासाठी आज्ञा दिली. लोम्बार्डीवर सार्डिनियाचा ताबा प्रस्थापित  झाला. जेव्हा हे स्पष्ट झाले की ऑस्ट्रिया व्हेनेशियाला गमावेल तेव्हा नेपोलियन तिसरा याने अचानक युद्ध थांबवले व तो  मागे हटला. त्याने ऑस्ट्रियाबरोबर व्हिलाफ्रांकाचा करार केला. यामुळे कावूर निराश झाला आणि त्याने राजीनामा दिला. परंतु विक्टर इम्यनुएलने तो स्वीकारला नाही. इटालियन लोकांनी पर्मा, मोडेना आणि टस्कनीच्या शासकांना नाकारले. या कामात त्यांना इंग्लंडकडून नैतिक पाठींबा मिळाला. ब्रिटिश पंतप्रधानांनी जाहीर केले की लोकांना त्यांचे राजे बदलण्याचा अधिकार आहे. तीन राज्यांतील लोकांना पिडमाँटमध्ये सामील होण्याची इच्छा होती. ही एक महत्त्वाची पायरी होती. सार्डिनिया - पिडमाँट एक मोठे आणि प्रमुख राज्य बनले.

## ७.१६ जोसेफ गरीबाल्डी

जोसेफ गरीबाल्डीचा जन्म १८०७ मध्ये नाईस येथे झाला. तो मॅझिनीचा समर्थक होता आणि यंग इटलीचा सदस्य होता. त्याने रेड शर्ट नावाची त्यांच्या अनुयायांची संघटना स्थापन केली. पोपच्या अधिपत्याखालील रोमची मुक्तता करण्यासाठी त्याने रोमकडे मोर्चा वळवला. मात्र फ्रेंच सैन्याने पोपच्या बचावासाठी धाव घेतली. गॅरिबाल्डी ही लढाई हारला आणि पुन्हा अमेरिकेत निघून गेला. काही वर्षांनी तो इटलीला परतला आणि एका छोट्या बेटावर शेतकऱ्याचे आयुष्य व्यतीत करू लागला. १८५४ मध्ये कावूरने त्याला पीडमोंटचा राजा व्हिक्टर इमॅन्युएलच्या नेतृत्वाखाली एकीकरण पूर्ण करण्यासाठी त्याची मदत मागितली. गॅरिबाल्डीने प्रजासत्ताकवादाचे समर्थन केले असले तरीही, त्याने आपल्या देशाच्या एकीकरणासाठी इमॅन्युएलचे नेतृत्व स्वीकारले. उत्तर इटालियन राज्यांनी १८५९ आणि १८६० मध्ये निवडणुका घेतल्या आणि पिडमोंट-सार्डिनिया साम्राज्यात सामील होण्यासाठी मतदान केले एकीकरणाच्या दिशेने एक मोठे पाऊल होते. पिडमोंट-सार्डिनिया यांनी सॅवॉय आणि नाइस हे प्रांत फ्रान्सकडे सोपवले. दक्षिणी इटालियन राज्यांना एकीकरण प्रक्रियेत आणण्यात गॅरिबाल्डी यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. १८६१ च्या सुरुवातीला एक राष्ट्रीय संसद बोलावली आणि इटलीच्या राज्याची घोषणा केली गेली आणि त्यात व्हिक्टर इमॅन्युएल दुसरा याची इटलीचा राजा म्हणून निवड करण्यात आली.

munotes.in

गरीबाल्डीने आपल्या अनुयायांना १८५९ मध्ये ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध लढण्यास प्रेरित केले. १८६० मध्ये सिसिलीच्या देशभक्तांनी फ्रेंच राजा फ्रान्सिस पहिला याच्या विरोधात बंड केले. त्यांनी गॅरिबाल्डीकडे मदतीची विनंती केली. गरीबाल्डी हजार अनुयायांसह मार्सलाच्या किनाऱ्याकडे निघाला. त्याने व्हिक्टर इमॅन्युएलच्या नावाने संपूर्ण सिसिलीवर कब्जा केला. विजयानंतर,त्याने इटलीच्या मुख्य भूमीत प्रवेश केला आणि नेपल्स गाठले. गारीबाल्डीने १८६० मध्ये नेपल्सवर कब्जा केला. त्याने रोमवरील मोर्चाची तयारी सुरू केली. कॅव्हूरसाठी ही परिस्थिती धोकादायक होती. रोम हा प्रांत पोपच्या अधिपत्याखाली होता. हे फ्रान्सच्या अधिपत्याखाली होते. नेपोलियन तिसरा कॅथोलिक होता आणि पोपला त्रास होऊ नये अशी त्याची इच्छा होती. कावूरच्या ध्यानात आले की रोमवरील हल्ल्याचा अर्थ फ्रान्सशी युद्ध होईल. कावूरने गॅरिबाल्डीला थांबवण्याचे धोरण आखले. त्याने नेपोलियन तिसरा याला आश्वासन दिले की रोमवर हल्ला होणार नाही,परंतु इतर छोट्या राज्यांचा भाग व्हिक्टरने काबीज केला.  लोकांनी त्याला आपला राजा म्हणून स्वीकारले. गरीबाल्डीने राजाला अभिवादन केले व संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी तो आपल्या गावी गेला व राजकारणातून निवृत्त झाला.

## ७.१७ व्हिक्टर इमॅन्युएलने एकीकरण पूर्ण केले

व्हिक्टर इमॅन्युएल हा चार्ल्स अल्बर्ट या सार्डिनिया – पिडमोंटच्या राजाचा मुलगा होता. एकीकरणाच्या कामात त्याला काउंट कावूरकडून राजकीय मार्गदर्शन लाभले. त्याने एकीकरणाचा मार्ग निर्देशित करण्यासाठी कावूरला पूर्ण अधिकार दिला. १८६१ पर्यंत व्हेनेशिया आणि रोम वगळता सर्व क्षेत्रे एकीकरणाच्या बाहेर होती. व्हेनेशिया हा प्रांत ऑस्ट्रियाच्या तर रोम पोपच्या ताब्यात होता. १८६६ मध्ये ऑस्ट्रिया आणि प्रशिया दरम्यान युद्ध झाले. व्हिक्टरने प्रशियाशी युती केली. त्यातील अटींनुसार जर इटलीने प्रशियाला ऑस्ट्रियाविरुद्ध मदत केली तर त्या बदल्यात इटलीला वेनेशिया ताब्यात घेण्यास प्रशिया मदत करेल. प्रशियाने युद्ध जिंकले आणि ऑस्ट्रियाला व्हेनेशियाला इटलीला दिले गेले. १८७० मध्ये फ्रान्स आणि प्रशिया यांच्यात युद्ध झाले. नेपोलियन तिसरा याला रोममधून फ्रेंच सैन्य मागे घेण्यास भाग पाडले गेले. व्हिक्टरने या संधीचे सोने केले. सप्टेंबर १८७० मध्ये इटालियन सैन्याने रोमच्या दिशेने कूच केले. पोपने आपले बस्तान व्हॅटिकनमध्ये हलवले. रोमच्या नागरिकांनी एकीकरणात सामील होण्यासाठी मतदान केले.

## ७.१८ सारांश

१८६० पासून १८९० पर्यंत बिस्मार्कने जर्मन आणि युरोपियन राजकारणावर वर्चस्व गाजवले. शांततेच्या मार्गाने आपले ध्येय साध्य होऊ शकत नाही हे त्याला माहीत होते. त्याने लोह आणि रक्त धोरण अंगिकारले.या  धोरणात प्रथम प्रशियाने मजबूत सैन्य तयार करणे आवश्यक आणि अगत्याचे होते. राजनैतिक मार्गाने फ्रान्सला वेगळे करून आणि युद्ध जिंकून जर्मनीला एक महान राष्ट्र म्हणून स्थान मिळवून दिले. व्हीक्टर इमॅन्युएलचा राजा म्हणून स्वीकार केल्यावर इटलीचे एकीकरण पूर्ण झाले. हे इटालियन देशभक्तांच्या व्यापक प्रयत्नांमुळे होते. रोमला संयुक्त इटलीची राजधानी म्हणून घोषित करण्यात आले. मॅझिनीचा

राष्ट्रवाद,कॅव्होरची मुत्सद्दीपणा,गरीबाल्डीचे बलिदान आणि राजा इमॅन्युएलचे शहाणपण यामुळे दीर्घ काळचे एकीकरणाचे स्वप्न साकार झाले.

## ७.१९ प्रश्न

१) १८६६ च्या ऑस्ट्रो प्रशियन युद्ध आणि १८७०-७१ च्या फ्रँको प्रशियन युद्धाचे वर्णन करा.

२) जर्मनीच्या एकीकरणाच्या प्रक्रियेची चर्चा करा.

३) जर्मनीच्या एकीकरणात बिस्मार्कचे योगदान स्पष्ट करा.

४) इटलीच्या एकीकरणाकडे नेणाऱ्या घटनांची चर्चा करा.

५) इटालियन एकीकरणात ऑस्ट्रिया १८५९ विरुद्ध युद्धाची पार्श्वभूमी आणि परिणामांचे वर्णन करा.

६) जर्मनीच्या एकीकरणात कावूरची भूमिका स्पष्ट करा.

## ७.२० संदर्भ

१. कॉर्नेल आर.डी., वर्ल्ड हिष्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९

२. लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५

३. टेलरचे ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४

४. कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९

५. ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५

६. टेलर ए. पी. जे., द स्ट्रगल फोर माश्तरी इन युरोप, (१८४८-१९१८), ओक्फोर्ड

७. थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.

*****

munotes.in

# ८

# ग्रीक स्वातंत्र्य युद्ध

**घटक रचना**

८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाची पार्श्वभूमी

८.३ ग्रीक लोकांकडून स्वातंत्र्याची घोषणा

८.४ ग्रीससंदर्भात प्रमुख युरोपियन शक्तींचे धोरण

८.५ ग्रीसच्या स्वातंत्र्याला मान्यता

८.६ सारांश

८.७ प्रश्न

८.८ संदर्भ

## ८.० उद्दिष्टे

१) ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाची पार्श्वभूमी समजून घेणे

२) ग्रीक स्वातंत्र्ययुद्धासंदर्भातील घटनांचा अभ्यास करणे

३) ग्रीक स्वातंत्र्यात युरोपियन शक्तींची भूमिका समजून घेणे

## ८.१ प्रस्तावना

सुमारे एक दशकभराच्या क्रांतीनंतर ऑट्टोमन साम्राज्यापासून स्वातंत्र्य मिळवणारे ग्रीक हे पहिले राष्ट्र होते. तुर्कांविरुद्धच्या ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाला अनेक घटक कारणीभूत ठरले. पंधराव्या शतकापासून ग्रीक लोक ऑट्टोमन राजवटीअंतर्गत होते. ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चला त्यांचे धर्मकार्य करण्याची परवानगी दिली गेली आणि ग्रीक लोकांना त्यांच्या इच्छेनुसार उपासना करण्यास आणि त्यांची संस्कृती आणि भाषा टिकवून ठेवण्यास स्वातंत्र्य देण्यात आले. ग्रीक लोक ऑट्टोमन तुर्कांना आपल्यापेक्षा कनिष्ठ मानत होते आणि त्यांना प्राचीन ग्रीसच्या वैभवाचा अभिमान होता. युरोपमध्ये ग्रीक अभिजात साहित्य आणि भाषा या दोन्ही क्षेत्रांमध्ये नव्याने रुची निर्माण झाल्यामुळे ग्रीक लोकांमध्ये राष्ट्रीय चेतनेचे पुनरुज्जीवन झाले. १८१४ मध्ये चार ग्रीक व्यापाऱ्यांनी ओडेसा येथे स्थापन केलेली फिलीके हेटेरिया (मित्रांची संघटना) ही सर्वात प्रसिद्ध गुप्त संघटना होती. १८२० पर्यंत त्याची सदस्यसंख्या २,००,००० झाली होती. फ्रेंच राज्यक्रांतीने प्रेरित स्वातंत्र्य आणि राष्ट्रवादाच्या कल्पना ग्रीकांनाही प्रेरित करत होत्या.



munotes.in

## ८.२ ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाची पार्श्वभूमी

ग्रीकांना स्वातंत्र्याची दीर्घ परंपरा होती. तुर्कांची दडपशाही असूनही ग्रीकांना ऑट्टोमन साम्राज्यातील इतर ख्रिश्चन प्रजेपेक्षा जास्त राजकीय स्वायत्तता आणि विशेषाधिकार मिळाले होते. त्यांच्या खेड्यातील समुदायांमध्ये ग्रीक लोकांमध्ये उत्साही स्थानिक जीवनाचे घटक होते जे त्यांच्या प्रतिभेला अनुकूल होते. ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चमध्ये त्यांच्याकडे समान राष्ट्रीयतेच्या अर्थाने एकत्र बांधण्यासाठी आवश्यक असलेली संघटना होती. भूतकाळात ग्रीक लोक तुर्की सरकार आणि नौदल या दोन्हीमध्ये विशेष सामील झाले होते. अनेक ग्रीकांना तुर्कांनी नागरी प्रशासनात काम दिले होते. स्वातंत्र्ययुद्ध सुरू होण्याच्या खूप आधी एजियन आणि एड्रियाटिकमधील श्रीमंत ग्रीक व्यापाऱ्यांचा समुदाय ऑट्टोमन साम्राज्यात विशेष स्थान मिळवून होते. ग्रीकांना ऑट्टोमन सुलतानला वार्षिक खंडणी आणि खलाशांना शाही नौदलात सेवेसाठी पाठवावे लागत असे. ग्रीकांना शिक्षणाच्या क्षेत्रात मर्यादित स्वायत्तता देण्यात आली होती. त्यांनी शाळा आणि विद्यापीठे स्थापन केली होती. फ्रान्स आणि इतर देशांतील बौद्धिक चळवळींशी घनिष्ठ संबंध निर्माण केले होते. ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चचे प्रमुख यांचे तुर्कीच्या सुलतानशी चांगले संबंध होते. अधिक स्वायत्ततेची फळे चाखल्यानंतर ग्रीकांना ऑट्टोमन साम्राज्याच्या नियंत्रणातून मुक्त व्हायचे वेध लागले होते. ऑट्टोमन राजवटीविरुद्धच्या बंडाने सर्बियाला १८१३ मध्ये अर्ध-स्वायत्तता दिली आणि यामुळे ग्रीकांना प्रोत्साहन मिळाले. ग्रीकांचा असा विश्वास होता की रशियन त्यांना ऑट्टोमनच्या नियंत्रणातून मुक्त होण्यास मदत करेल. त्यानंतर १८१४  मध्ये रशियातील ओडेसा येथे भरभराट होत असलेल्या ग्रीक समुदायाच्या केंद्रस्थानी ग्रीक निर्वासितांनी ग्रीसमध्ये सशस्त्र बंडखोरीसाठी पायाभूत काम करण्यास सुरुवात केली.

**ग्रीक विद्रोह:**

१८२१ मध्ये पेलोपोनेशियन द्वीपकल्पातील ग्रीक लोकांनी तुर्क राजवटीविरुद्ध बंड केले. मोल्डावियामध्ये उठाव झाल्याच्या बातमीने ते प्रेरित झाले. काही रशियन लोकांसह ग्रीकच्या नेतृत्वाखालील एक लहान गट सीमा ओलांडून मोल्डेव्हियामध्ये गेला होता जिथे त्यांनी ग्रीक स्वातंत्र्याचा ध्वज उंचावला होता आणि अपेक्षा केली होती की मोल्डेव्हियाचे रोमानियन आणि बल्गेरियन त्यांच्या स्वत: च्या स्वातंत्र्यासाठी त्यांच्याबरोबर उठतील. मोल्डावियातील बंड दडपले गेले परंतु पेलोपोनीजमधील बंड वेगात पसरले. पेलोपोनीजमधील बंडखोरांकडे चांगले संघटन, रणनीती आणि शिस्त नव्हती. कट्टर ख्रिश्चन गट त्यांच्या शत्रूंना दया न करता मारत होते. काही नेत्यांनी संयम ठेवण्याचा आणि लूटमार थांबवण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचा फारसा परिणाम झाला नाही. मार्च १८२१ मध्ये पेलोपोनीजमध्ये राहणारे पुरुष,स्त्रिया आणि मुले यांच्यासह सुमारे २०,००० मुस्लिम एका आठवड्यांत मारले गेले. कॉन्स्टँटिनोपलमध्ये ऑट्टोमन सुलतान महमूद दुसरा याने कॉन्स्टँटिनोपलचा ग्रीक नेता ग्रेगोरियोस पाचवा याला अटक करण्याचा आदेश दिला.

ग्रेगोरियोसवर बंडखोरीचा कट रचल्याचा आणि देशद्रोह केल्याचा आरोप करण्यात आला. ग्रेगोरियोससह इतर दोन बिशपांना फाशी देण्यात आली. सुलतान महमूद दुसराचा असा विश्वास होता की फाशीचा आदेश दिल्यामुळे हे बंड मोडले जाईल. युरोपातील ख्रिश्चनांना पेलोपोनीजमधील उठावाची जाणीव होती परंतु क्रांतिकारकांच्या कारवाईची त्यांना जाणीव

नव्हती त्यामुळे ग्रेगोरियोसच्या फाशीमुळे त्यांना धक्का बसला. एप्रिल १८२१ मध्ये पेलोपोनीजचे बंड कॉरिंथच्या इस्थमसमध्ये उत्तरेकडे मध्य ग्रीस आणि अथेन्सच्या दिशेने पसरले.

ग्रीक बंडखोरांनी तुर्कांच्या ताब्यातील अनेक शहरे व नगरे काबीज केली. ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळी ग्रीक आणि तुर्कांनी त्यांची क्रूरता प्रकट केली. ग्रीक बंडखोरांनी मोठ्या प्रमाणात मुस्लिमांची कत्तल केली तर तुर्कांनी कॉन्स्टँटिनोपल येथे ख्रिश्चनांची कत्तल केली. ग्रीक लोक नौदल क्षेत्रात प्रवीण होते. ते अनुभवी नाविक होते आणि ऑट्टोमन जहाजांवर काम करणाऱ्या ग्रीक खलाशांनी ती तुर्की नोकऱ्या सोडून दिल्या आणि त्यामुळे तुर्कांना अननुभवी मजूर आणि शेतकरी यांना नौदलात भरती करावे लागले. तुर्क नौसेनेत कमकुवत झाला. १८२२ मध्ये ग्रीकांनी पेलोपोनीजकडून इस्थमसच्या उत्तरेकडे आणि पश्चिमेकडील किनारपट्टीचा प्रदेश घेतला आणि पूर्वेला अथेन्स आणि थेबेस काबीज केले. पश्चिम आणि पूर्व-मध्य ग्रीस तसेच एजियन बेटांवर मात्र ग्रीकांचे नियंत्रण नव्हते.

## ८.३ ग्रीकांकडून स्वातंत्र्याची घोषणा

१८२२ मध्ये ग्रीकांनी स्वातंत्र्य घोषित केले व उदघोषणा केली की आम्ही हेलासच्या ज्ञानी आणि थोर लोकांचे वंशज आहोत. आम्ही युरोपमधील प्रबुद्ध आणि सुसंस्कृत राष्ट्रांचे समकालीन आहोत. कायद्याच्या बाबतीत चार शतकांहून अधिक काळ आपल्यावर ऑट्टोमन सत्तेच्या क्रूर राजवटीचा भार आता सहन करणे शक्य नाही. ग्रीससंदर्भात प्रमुख युरोपियन शक्तींचे धोरण

ग्रीक बंडाच्या वेळी प्रबळ युरोपियन शक्तींचे प्रतिनिधी लायबॅच १८२१ च्या कॉंग्रेसमध्ये होते. ऑस्ट्रियाच्या चांसलर मेटर्निकच्या दृष्टीने ग्रीक हे हे ऑट्टोमन सरकारच्या कायदेशीर सार्वभौमत्वाविरुद्ध बंडखोर होते आणि त्यामुळे दोषी होते. ऑस्ट्रियाची बाजू घेवून इंग्लंडने इतर देशाच्या कारभारात हस्तक्षेप न करण्याच्या सिद्धांताचे काटेकोरपणे पालन केले. इंग्लंडचे प्रतिनिधी कॅसलरेघ आणि आणखी कॅनिंग यांचा असा विश्वास होता की इतर राज्यांच्या अंतर्गत बाबींपासून अलिप्त राहणे हे इंग्लंडचे कर्तव्य आहे. इंग्लंड आणि ऑस्ट्रिया यांनी राजकीय स्वयंसिद्धतेच्या परिघात ऑट्टोमन साम्राज्याची अखंडता महत्वाची मानली. ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाचे यश हे ऑट्टोमन साम्राज्याच्या अंताची सुरुवात असेल याची त्यांना पूर्वकल्पना होती. अशाप्रकारे इंग्लंड आणि ऑस्ट्रिया या दोघांनीही ग्रीक बंडखोरी दूर करण्यासाठी आणि युरोपीय संघर्षात विकसित होण्यापासून आपली सर्व शक्ती पणाला लावली. काही काळ हे धोरण यशस्वीपणे पाळले गेले. यामुळे झार अलेक्झांडर पहिला द्विधा मनस्थितीत होता. सामान्य रशियन लोकांना ग्रेगोरियोसच्या मृत्यूचा बदला घ्यायचा होता परंतु झारला इंग्लंडचा विरोध आणि इतर बाबी विचारात घ्यायच्या होत्या. त्याने विरोधाचे प्रतिक म्हणून कॉन्स्टँटिनोपलमधून आपला राजदूत मागे घेतला. अशा प्रकारे ग्रीकांकडून अपेक्षा असूनही झार त्यांच्या बंडखोरांना पाठिंबा देण्यात अयशस्वी ठरला आणि ग्रीक स्वातंत्र्याच्या चळवळीला मोठा धक्का बसला. पहिल्या सहा वर्षांत (१८२१-२७) युरोपियन शक्तींनी ग्रीक स्वातंत्र्ययुद्धात हस्तक्षेप केला नाही. बाहेरील हस्तक्षेप टाळण्यासाठी आणि हा वाद तुर्कस्तान आणि ग्रीसमधील खाजगी बाब मानण्यात आला. या काळात रशिया, ऑस्ट्रिया आणि इंग्लंडने ऑट्टोमन साम्राज्य आणि ग्रीक

स्वातंत्र्ययुद्धाबाबत समान धोरण अवलंबले. ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाच्या सुरुवातीच्या काळात ही परिस्थिती होती. तरीही या टप्प्यावरही युरोपियन शक्तींना हस्तक्षेप करण्यापासून परावृत्त करणे कठीण होत गेले. विशेषतः रशियाने आपली नाराजी व अस्वस्थता. दर्शविली. झार हे विसरू शकत नव्हता की तो ऑर्थोडॉक्स चर्चचा पाठीराखा होता आणि म्हणूनच त्याला तुर्क विरुद्ध ऑर्थोडॉक्स चर्च अशा धर्मयुद्धाचे स्वरूप असलेल्या युद्धात विशेष रस होता. शिवाय दक्षिणे युरोपमध्ये राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे हे रशियाचे पारंपारिक धोरण होते. इंग्लंड आणि ऑस्ट्रिया हे दोन्ही देश अजूनही तुर्कांशी शत्रुत्व टाळण्यास उत्सुक होते आणि त्यांनी ग्रीक बंड शमविण्यासाठी सुलतानला काही सवलती देण्याची विनंती केली. त्याचा परिणाम काही काळ शांतता प्रस्थापित झाली.

### मेहमेत अली याचा हस्तक्षेप:

जेव्हा ओटोमन सुलतानने इजिप्तच्या पाशा मेहमेत अलीला ग्रीक बंड दडपण्यासाठी मदत करण्यासाठी बोलावले तेव्हा परिस्थिती बदलु लागली. मेहमेत अलीचा मुलगा इब्राहिमच्या आगमनाने आणि अथेन्स ताब्यात घेतल्याने (१८२७) ग्रीकांचा प्रतिकार कोसळला. संपूर्ण युरोप आणि अमेरिकेत ग्रीक संघर्षाबद्दल सहानुभूती उसळली. रशियाने स्वत:ला ऑर्थोडॉक्स ख्रिश्चनांचा संरक्षक असल्याचा दावा केल्यामुळे रशियन देखील राष्ट्रीय आणि धार्मिक भावनांनी प्रेरित झाले.

### रशिया, इंग्लंड आणि फ्रान्सचा हस्तक्षेप

१८२६-२७ मधील ग्रीक विद्रोह इब्राहिमच्या जोरदार लष्करी कारवायांमुळे कोसळण्याच्या टप्प्यावर होता. रशियाचा नवीन झार निकोलस पहिला याने ग्रीक संघर्षात हस्तक्षेप करण्याचा निर्धार केला होता. यावेळी इंग्लंडचे परराष्ट्र मंत्री जॉर्ज कॅनिंग यांनी ठरवले की युद्ध टाळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे इंग्लंडने रशियासोबत ऑट्टोमन साम्राज्यावर दबाव आणणे. मार्च १८२६ मध्ये झारने मोल्डाविया आणि वालाचिया येथून तुर्की सैन्य मागे घेण्याचे आवाहन केले. एप्रिल १८२६ मध्ये ड्यूक ऑफ वेलिंग्टनला पुढील योजनेसाठी रशियाला पाठवण्यात आले. ४ एप्रिल १८२६ रोजी इंग्लंड आणि रशियाने एका निर्णयावर स्वाक्षरी केली. या निर्णयाद्वारे ऑट्टोमन साम्राज्याच्या सुलतानाला ग्रीकांशी युद्धविराम करण्यास आणि त्यांना स्वातंत्र्य देण्यास दबाव आणण्यात आला. जुलै १८२७ मध्ये इंग्लंडचे पंतप्रधान कॅनिंग यांनी रशिया आणि फ्रान्सच्या प्रतिनिधींची लंडनमध्ये बैठक बोलावली. लंडनच्या बैठकीनुसार या तिन्ही शक्तींनी मान्य केले की तुर्कींच्या अधिपत्याखाली एक स्वायत्त ग्रीक राज्य स्थापन केले जावे. तीन शक्तींनी युती करण्यासही सहमती दर्शविली आणि जर तुर्कांनी युद्धविराम नाकारला तर ते ग्रीक स्वातंत्र्य सुरक्षित करण्यासाठी त्यांनी एकत्र येण्याचे ठरवले. ऑस्ट्रिया आणि प्रशियाने या सत्तांच्या योजनेत सामील होण्याचे नाकारले

### नवरिनोची लढाई:

तुर्की सुलतानने मध्यस्थी आणि प्रस्तावित युद्धविराम नाकारल्यामुळे इंग्लंड आणि फ्रान्सच्या सहयोगी सैन्याने ऑक्टोबर १८२७ मध्ये नवारीनो येथे तुर्को-इजिप्शियन नौसेनेवर हल्ला करून तिचा नाश केला. नवारीनोच्या लढाईचे परिणाम महत्त्वपूर्ण होते.

सुलतानने ख्रिश्चन शक्तींविरुद्ध धार्मिक युद्धाची घोषणा केली आणि अलीकडेच रशियाशी केलेला अनाक्रमण करार रद्द केला. यामुळे रशियाला तुर्कस्तानमध्ये हस्तक्षेप करण्याचे निमित्त मिळाले. दरम्यान वेलिंग्टन इंग्लंडचा पंतप्रधान झाला (१८२८). ऑट्टोमन साम्राज्य कमकुवत होईल अशा कोणत्याही हालचालीला त्याचा विरोध होता आणि भूमध्यसागरातील रशियन महत्त्वाकांक्षेविरूद्ध अडथळा म्हणून तुर्क साम्राज्याचे संरक्षण करण्याची त्याची योजना होती.

**रशिया आणि तुर्की दरम्यान युद्ध:**

इंग्लंडने ग्रीक स्वातंत्र्य युद्धातून माघार घेतली आणि त्यामुळे ग्रीक प्रश्न एकट्या रशियाने हाताळला आणि झार निकोलस पहिला याने १८२८ मध्ये तुर्कीविरुद्ध युद्ध घोषित केले. रशिया आणि तुर्की यांच्यातील युद्धाच्या उद्रेकाने इंग्लंडवर दबाव आणला. जर इंग्लंड संघर्षापासून अलिप्त राहिले तर अंतिम तोडग्यात त्यांना फारसे महत्व उरणार नाही हे स्पष्ट झाले. शिवाय रशियन शस्त्रांनी मुक्त झालेले ग्रीस रशियाचे अवलंबित्व स्वीकारेल. अशाप्रकारे इंग्लंडच्या पंतप्रधानांनी मेहेमेट अलीच्या सैन्याला हुसकावून लावण्यासाठी मोरिया येथे मोहीम सैन्य पाठवण्याची फ्रान्सची सूचना मान्य केली. तथापि फ्रेंच सैन्य आगमनापूर्वी इंग्लिश ऍडमिरलने अलेक्झांड्रियाच्या आधी नौदल प्रात्यक्षिक करून मोरियाचे कब्जात घेतला.

**ॲड्रियानोपलचा तह:**

रशियन सैन्य १८२९च्या उन्हाळ्यात ॲड्रियानोपलला पोहोचले. कॉन्स्टँटिनोपलच्या दिशेने रशियन सैन्याची आगेकूच सुरु झाल्याने सुलतानला शरण येण्यास भाग पाडले गेले आणि ॲड्रिनोपलच्या तहाने (१८२९). सुलतानने मोल्डाविया आणि वालाचिया या रियासतांची स्वायत्तता मान्य केली. जरी हे प्रांत नाममात्र ऑट्टोमन अधिपत्याखाली राहिले तरी परंतु प्रत्यक्षात ते रशियाच्या संरक्षणाखाली आले.

## ८.५ ग्रीसच्या स्वातंत्र्याला मान्यता

ग्रीक स्वातंत्र्याचा प्रश्न शेवटी युरोपियन शक्तींनी ग्रीकांच्या बाजूने निकाली काढला. ग्रीक हे एक मांडलिक राज्य असावे अशी रशियाची इच्छा होती. हा मनसुबा इंग्लंडला मान्य नव्हता. तिने ऑस्ट्रियासारखाच अशा राज्याची निर्मिती बाल्कनमध्ये रशियन प्रभाव वाढण्यासाठी कारणीभूत ठरेल असा विचार केला. तुर्कीच्या कारभारात सतत हस्तक्षेप करण्याचे निमित्त करून रशिया बाल्कन प्रदेशात सतत ढवळाढवळ करेल अशी चिंता व्यक्त केली. परिणामी वेलिंग्टन आणि मेटर्निच यांनी ऑट्टोमन साम्राज्याच्या संरक्षणाचे जोरदार समर्थन केले होते. मात्र त्याचवेळेस ग्रीसला एक सार्वभौम आणि स्वतंत्र राज्य म्हणून तुर्की सुलतानाला मान्यता देणे भाग पाडले. अशा प्रकारे लंडनच्या अधिवेशनाद्वारे (१८३२) ग्रीसच्या स्वातंत्र्यास मान्यता देण्यात आली ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाच्या यशाने ऑट्टोमन साम्राज्याला पहिला गंभीर धक्का बसला. यामुळे इतर बाल्कन राज्यांना स्वातंत्र्याची आस लागली.

## ८.६ सारांश

१४५३ मध्ये कॉन्स्टँटिनोपल जिंकल्यानंतर ऑट्टोमन तुर्कांनी सोळाव्या आणि सतराव्या शतकात आग्नेय युरोप आणि आफ्रिकेच्या उत्तर किनाऱ्यावर एक विशाल साम्राज्य स्थापन केले. तुर्कांनी बाल्कन द्वीपकल्पातील बल्गर, ग्रीक आणि रुमानियन लोकांवर विजय मिळवला. ग्रीस हा प्राचीन संस्कृती असलेला देश त्यांच्या ताब्यात दीर्घकाळ होता. फ्रान्सची राज्यक्रांती, कमजोर तुर्की सत्ता व एकोणिसाव्या शतकातील जागतिक घडामोडी यांचा परिणाम होऊन ग्रीसमध्ये स्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. २ मार्च १८२१ रोजी ग्रीकांनी तुर्कांविरुद्ध उठाव केला आणि काही दिवसांतच ग्रीक स्वातंत्र्य जाहीर केले गेले.

## ८.७ प्रश्न

१) ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाच्या पार्श्वभूमीची चर्चा करा

२) ग्रीक स्वातंत्र्ययुद्धाला कारणीभूत असलेल्या घटनांचा मागोवा घ्या.

३) ग्रीक स्वातंत्र्ययुद्धात युरोपियन शक्तींच्या भूमिकेचे परीक्षण करा.

## ८.८ संदर्भ


१. ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५

२. कॉर्नेल आर.डी., वर्ल्ड हिस्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९

३. लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५

४. कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ संचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९

५. थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.


*****

# ९

# क्रिमियन युद्ध आणि रशिया-तुर्की युद्ध

**घटक रचना**

९.० उद्दिष्टे
९.१ प्रस्तावना
९.२ क्रिमियन युद्धाची कारणे
९.३ रशिया-तुर्की युद्ध (१८७७-७८)
९,४ सॅन स्टेफानोचा तह (१८७८)
९.५ बर्लिनचा तह (१८७८)
९.६ सारांश
९.७ प्रश्न
९.८ संदर्भ

## ९.० उद्दिष्टे

- क्रिमियन युद्धाला कारणीभूत असलेल्या परिस्थितीचा आढावा घेणे
- क्रिमियन युद्धात युरोपियन शक्तींनी बजावलेली भूमिका समजून घेणे
- क्रिमियन युद्धाच्या परिणामांचे विश्लेषण करणे
- रशिया-तुर्की युद्धाचा अभ्यास करणे
- रशिया-तुर्की युद्धाच्या परिणामांचे मूल्यांकन करणे

## ९.१ प्रस्तावना

क्रिमियन युद्ध (१८५४-५६) एका बाजूला रशिया आणि दुसऱ्या बाजूने फ्रान्स, इंग्लंड, सार्डिनिया राज्य आणि ऑट्टोमन साम्राज्य यांच्या युतीमध्ये लढले गेले. हा संघर्ष क्रिमियन द्वीपकल्पात घडला. पश्चिम तुर्की, बाल्टिक सागरी प्रदेश आणि रशियन सुदूर पूर्व भागात युद्धाचे पडसाद उमटले. १८५६ मध्ये या युद्धात रशियाचा पराभव झाला. त्यानंतर लवकरच रशिया-तुर्की युद्धापासून रशिया आणि ऑट्टोमन साम्राज्य यांच्यातील युद्धांची मालिका सुरू झाली. या युद्धांमुळे ऑट्टोमन साम्राज्याचा ऱ्हास दिसून आला आणि परिणामी रशियाच्या सीमेचा हळूहळू दक्षिणेकडे विस्तार झाला. या युद्धामुळे रशियाला त्याच्या युरोपीय सीमा दक्षिणेकडे काळ्या समुद्रापर्यंत, नैऋत्येला प्रुट नदीपर्यंत आणि आशियातील काकेशस पर्वताच्या दक्षिणेकडे विस्तारता आल्या.

## ९.२ क्रिमियन युद्धाची कारणे

**बाल्कन द्वीपकल्पात वाढणारी राजकीय आकांक्षा:**

ग्रीसच्या स्वतंत्र राज्याचा अपवाद वगळता संपूर्ण बाल्कन द्वीपकल्पात तुर्कींची सत्ता विस्तारली होती. ओट्टोमन साम्राज्य कमकुवत होत गेले तसतसे निरनिराळ्या वंशाचे, राष्ट्रीत्वाचे आणि धर्माचे आधार घेवून नवीन प्रांत स्वातंत्र्याची आशा बाळगू लागले. ग्रीकांनी आधीच ओट्टोमन साम्राज्य पासून विलग होवून स्वतंत्र सत्ता स्थापन केली होती. त्यांच्या उदाहरणाने बाल्कन द्वीपकल्पातील इतर देशांना राष्ट्रीयत्वांना प्रेरणा दिली. डॅन्यूबच्या पलीकडे मोल्डेव्हिया आणि वालाचियाच्या प्रांतांमध्ये विविध करारांमुळे काही प्रमाणात स्वशासनाचा हक्क होता. रोमानियन लोक सुलतानकडून अधिक सवलती मिळविण्यास उत्सुक होते. सर्बियन लोकांना त्यांच्या गौरवशाली भूतकाळाचा अभिमान होता. बाल्कन द्वीपकल्पात धर्माने खासकरून ख्रिश्चन ओर्थोडोक्स पंथाने महत्त्वाची भूमिका बजावली.

**बाल्कन प्रदेशात मध्ये रशियाचा प्रभाव:**

बाल्कन द्वीपकल्पाच्या कोणत्याही भागात कधीही क्रांती घडून शक्ती संतुलन बिघडू शकते अशी चिंता युरोपियन सत्तांमध्ये होती. त्यानुसार डॅन्यूबच्या उत्तरेकडील युरोपियन शक्तीं ऑट्टोमन साम्राज्यातील घटनांवर नजर ठेवून होत्या. ख्रिश्चन लोकांना एकर ठेवण्यात महत्वाकांक्षा आणि भीती या दोघांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तुर्क हे ऑस्ट्रियाचे पारंपारिक शत्रू असले तरीही ऑट्टोमन साम्राज्याच्या वाढत्या कमकुवतपणामुळे ऑस्ट्रियाला आता तुर्की शक्तीची भीती वाटत नव्हती. पण बाल्कन द्वीपकल्पात तुर्कस्तानची जागा घेणाऱ्या शक्तीची भीती ऑस्ट्रियन साम्राज्याला सतावू लागली. ऑस्ट्रियाला बाल्कन प्रदेशातील रशियाच्या प्रभावाची आणि महत्त्वाकांक्षेची भीती वाटत होती.

**ऑर्थोडॉक्स चर्चबद्दल रशियाची चिंता:**

रशियाचा नेहमीच दावा होता की तिच्याकडे ऑर्थोडॉक्स चर्चच्या वतीने ख्रिश्चन व चर्च बाबतील हस्तक्षेप करण्याचे अधिकार आहेत. हे अधिकार कुठपर्यंत असावेत हा वाद कायम होता. रशिया आणि तुर्कस्तान यांच्यात १७७४ मध्ये तयार झालेल्या तहामध्ये भविष्यातील वादाची दोन कलमे होती. त्यातील एका कलमाद्वारे रशियाला कॉन्स्टँटिनोपलचा एक भाग असलेल्या गालाटा येथे ख्रिश्चन चर्च बांधण्याची आणि ते तिच्या संरक्षणाखाली ठेवण्याची परवानगी देण्यात आली. तुर्कीने तिच्या अधिपत्यातील ख्रिश्चन चर्च आणि धर्माचे संरक्षण करण्याचे आणि रशियन राजदूतांना गॅलाटा येथील चर्चच्या वतीने प्रतिनिधित्व करण्यास परवानगी देण्याचे वचन दिले.

**नेपोलियन तिसरा याची झारबद्दल नापसंती:**

फ्रान्सच्या नेपोलियन तिसऱ्याचा झार निकोलस पहिला याविरुद्ध वैयक्तिक राग होता. झारने त्याला बंधू असा गौरवास्पद उल्लेख न करता केवळ मित्र म्हणून संबोधले तेव्हा त्याला अपमान वाटला. झारच्या अतिरिक्त व्यापारी शुल्कामुळे फ्रेंच व्यापारी नाराज झाले



munotes.in

होते. त्याच्या धार्मिक असहिष्णुतेने फ्रान्समधील कॅथलिकांना चीड आली होती आणि पोलिश उठावाच्या दडपशाहीमुळे फ्रेंच उदारमतवादी संतप्त झाले होते. अशा प्रकारे फ्रेंच लोकसंख्येच्या विविध भागांचा पाठिंबा मिळविण्यासाठी नेपोलियन तिसरा झारशी सामना करू इच्छित होता.

**तात्काळ कारण - पवित्र स्थानांवरील वाद:**

पॅलेस्टाईनमधील पवित्र स्थानांबाबत फ्रँको-रशियन वाद हे क्रिमियन युद्धाचे तत्कालीन कारण होते. पवित्र स्थळांचा प्रश्न जेरुसलेम येथील तीर्थक्षेत्रांच्या व्यवस्थापनाशी संबंधित होता आणि विशेषतः बेथलेहेम येथील चर्चसंदर्भात तो अधिक तीव्र होता. तुर्की सरकारने रोमन कॅथलिक आणि ऑर्थोडॉक्स किंवा ग्रीक आणि रशियन ख्रिश्चनांच्या प्रतिस्पर्धी दाव्यांमध्ये सुव्यवस्था राखण्याचे काम केले. फ्रेंच सरकारला धर्मयुद्धाच्या काळापासून पूर्वेकडील ख्रिश्चनांचे संरक्षक मानले जाण्याचा पारंपारिक अधिकार मिळाला होता. दुसरीकडे रशियाच्या सामर्थ्याचा विकास झाल्यापासून झारने स्वतःचे वेगळे दावे मांडण्यास सुरुवात केली होती. राष्ट्रीय शत्रुत्व आणि राजकीय महत्त्वाकांक्षा बळकट करण्यासाठी अस्सल धार्मिक भावना काम करू लागल्या.

**युद्धातील घडामोडी:**

इतर युरोपीय शक्तींपैकी इंग्लंड हे प्रामुख्याने पारंपारिक परराष्ट्र धोरणामुळे ऑट्टोमन साम्राज्याच्या बाजूने युद्धात ओढले गेले. इंग्लंडचा असा विश्वास होता की भूमध्य समुद्रात रशियन शक्तीचा प्रसार झाल्यास इजिप्त आणि भारत यावरील त्यांच्या अधिपत्याला धोका पोहोचेल. फ्रान्समध्ये नवीन साम्राज्याच्या राजवटीत जनमताने कमी महत्त्वाची भूमिका बजावली. पूर्वेकडील फ्रान्सची प्रतिष्ठा राखण्याची इच्छा, फ्रान्समधील कॅथोलिक पक्षावरील त्याचे अवलंबित्व,या सर्व गोष्टींपेक्षा त्याला नेपोलियन पहिला याचे वैभव आणि विजयापासून देशाला जे अपेक्षित होते ते खेचून आणण्याची इच्छा होती. अशा प्रकारे इंग्लंड आणि फ्रान्स तुर्कीला पाठिंबा देत रशियाविरूद्ध क्रिमियन युद्धात सामील झाले.

ऑक्टोबर १८५३ च्या शेवटी फ्रेंच आणि इंग्रज यांच्या संयुक्त तुर्कीला पाठिंबा देण्यासाठी डार्डनेलेस पार केले. ते कॉन्स्टँटिनोपलच्या जवळअसताना रशियन ताफ्याने ३० नोव्हेंबर १८५३ रोजी सिनोपच्या काळ्या समुद्रातील बंदरावर ऑट्टोमनच्या नौसेनेवर हल्ला करून त्याचा नाश केला परिणामी इंग्लंड आणि फ्रान्समध्ये जनक्षोभ निर्माण झाला. युद्धाची ही नैसर्गिक कृती दोन महान पाश्चात्य शक्तींचा अपमानास्पद वाटली आणि उघड युद्ध अपरिहार्य बनले. मार्च १८५४ मध्ये इंग्लंड आणि फ्रान्सने औपचारिकपणे रशियाविरुद्ध युद्ध घोषित केले. जेव्हा इंग्रज आणि फ्रेंच सैनिक युद्धभूमीवर सहयोगी म्हणून दिसले तेव्हा युरोपीय राजकारणात मोठा बदल झाला आणि विसाव्या शतकाच्या सुरुवातीस नवीन सत्ता समीकरणांची सुरुवात झाली. इंग्लंड आणि फ्रान्स नंतर १८५५ मध्ये सार्डिनियाच्या फौजेनेदेखील इंग्लंड व फ्रांसच्या बाजूने युद्धात उडी घेतली. युरोपमधील शांतता परिषदेत उपस्थित राहण्याच्या उद्देशाने आणि इटालियन एकीकरणात मोठ्या शक्तींची सहानुभूती व मदत मिळवणे हा त्यामागचा उद्देश होता. ऑस्ट्रियाला छोट्या इटालियन राज्यांमधून बाहेर काढून एकीकरण पूर्ण करण्याचा हाच एक मार्ग होता.

**पॅरिसचा तह:**

३० मार्च १८५६ रोजी स्वाक्षरी झालेला पॅरिसचा करार हा रशियाच्या मध्य पूर्व धोरणाला मोठा धक्का होता. रशियाला दक्षिणेकडील बेसराबिया आणि डॅन्यूब प्रदेश ऑट्टोमन साम्राज्याकडे परत करण्यास रशियाला भाग पाडले गेले. मोल्डेव्हिया आणि वालाचिया यांना तुर्कीच्या अधिपत्याखाली स्व-शासनाची हमी देण्यात आली होती. या दोन्ही रियासतांना आणि सर्बियाला रशियन प्रभावापासून दूर ठेवण्यासाठी हा मुद्दा आंतरराष्ट्रीय बनवण्यात आला. काळ्या समुद्राचा प्रदेश तटस्थ घोषित करण्यात आला आणि रशियन लोकांना काळ्या समुद्रावर नौदल ठेवण्यास मनाई करण्यात आली. व्यापारी कार्यांसाठी ते प्रत्येक राष्ट्रासाठी खुले केले गेले. सुलतानने त्याच्या सर्व ख्रिश्चन प्रजेच्या हक्कांचा आदर करण्याची अस्पष्ट आश्वासने दिली. पॅरिसच्या तहाविषयी ए. पी. जे. टेलर म्हणतात की याने रशिया आणि तुर्की यांच्यातील वादाची समस्या तीन प्रकारे सोडवण्याचा प्रयत्न करण्यात आला. तुर्कांनी सुधारणांचे वचन दिले. काळा समुद्र प्रदेश तटस्थ झाला आणि डॅन्युबियन रियासत रशियापासून स्वतंत्र झाली. तुर्कस्तानमधील सुधारणांबाबत सुलतानाने कधीही दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत. काळ्या समुद्राचे तटस्थीकरण ही पॅरिसच्या तहाची एक मोठी उपलब्धी होती.

क्रिमियन युद्धाचा युरोपच्या राजकारणावर दूरगामी परिणाम झाला. बाल्कन आणि काळ्या समुद्रातील रशियन प्रभावाची समाप्ती झाली. तिची डॅन्यूबमधून हकालपट्टी झाली. काळ्या समुद्रातील तिचे लष्करी सामर्थ्य पुढील काही वर्षांसाठी पूर्णपणे संपले होते. मोल्डाविया आणि वालाचिया या दोन स्वायत्त राज्यांच्या निर्मितीमुळे रशिया आणि तुर्की यांच्यात भविष्यात वाद निर्माण झाला. क्रिमियन युद्धात तुर्कीला सर्वाधिक फायदा झाला. तिला युरोपियन शक्तींच्या संरक्षणाखाली एक नवीन जीवन मिळाले. तिच्या प्रादेशिक अखंडतेची हमी देण्यात आली होती आणि तिला प्रथमच युरोपीय समुदायात प्रवेश देण्यात आला.

एकोणिसाव्या शतकातील युरोपच्या इतिहासात क्रिमियन युद्धाला एक विलक्षण स्थान आहे. प्रथमच वाफेच्या शक्तीचा वापर या युद्धात करण्यात आला. परंतु त्यांचे पूर्ण महत्त्व दिले जाणले गेले नव्हते. टेलीग्राफचा वापरही करण्यात आला. सैन्याच्या आहार आणि स्वच्छता या सर्व गोष्टीवाट विशेष भर देण्यात आला. असे असले तरीहीविसाव्या शतकातील संहारक शस्त्रांसारखा उपयोग यात केले नव्हता. आधुनिक सत्रनवीन तंत्रज्ञान किंवा विज्ञानाच्या आधुनिक साधनांच्या मदतीशिवाय लढलेले हे शेवटचे युद्ध होते. क्रिमियन युद्धाच्या रशियावर परिणाम म्हणजे झार अलेक्झांडर दुसरा याला लोकांची नाराजी दूर करण्यासाठी रशियामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यास भाग पाडले गेले. सर्वात महत्वाची सुधारणा म्हणजे भूदासांची मुक्ती. शिवाय युरोपीय बाजूने रशियन विस्ताराला आळा बसल्यामुळे रशियाची नजर आता मध्य आशियाकडे वळली आणि त्याचा परिणाम असा झाला की भारतातील ब्रिटिश सरकारला त्या प्रदेशात रशियाच्या वाढत्या प्रभावाची चिंता वाटू लागली.

## ९.३ रशिया-तुर्की युद्ध (१८७७-७८)

तुर्की सुलतान अब्दुल हमीद दुसरा याला खात्री होती की इंग्लंडने क्रिमियन युद्धात पाठींबा दिला तसा रशियाविरुद्धच्या युद्धात त्यांना पाठिंबा देईल. ब्रिटिश नौदल पथक आधीच बाल्कन प्रदेशात उपस्थित होते. तथापि सुलतानाने राजकीय अपेक्षात चूक केली होती. एप्रिल १८७७ मध्ये रशिया आणि इंग्लंडने तुर्कांसमोर काही संयुक्त मागण्या मांडल्या तेव्हा त्या नाकारल्या गेल्या. तुर्कीविरुद्ध युद्ध अटळ असल्याने रशियाने ऑस्ट्रियाशी करार केला. सर्बिया आणि मॉन्टेनेग्रोच्या स्वातंत्र्याला मान्यता देण्याच्या बदल्यात रशियाने ऑस्ट्रियाला बोस्निया आणि हर्झेगोव्हिनामध्ये मुक्त वाव देण्याचे मान्य केले. रशियाने रोमानिया आणि बल्गेरियामध्ये राजकीय हालचालींमध्ये हस्तक्षेप करण्याचे स्वातंत्र्य मिळवले. या परस्पर सामंजस्याने सुलतानने इंग्लंड आणि रशियाच्या संयुक्त मागण्या नाकारल्यानंतर रशियाने १४ एप्रिल १८७७ रोजी तुर्कीविरुद्ध युद्ध घोषित केले.

रुसो-तुर्की युद्धाच्या उद्रेकानंतर रोमानिया रशियाला सामील झाला आणि सर्बियाने देखील तुर्कीविरुद्धच्या युद्धात उडी मारली. मॉन्टेनेग्रो १८७६ पासून तुर्कस्तानशी आधीच युद्ध करत होता. बल्गेरियन लोकांनीही रशियाला पाठिंबा दिला. रशियन सैन्याने रोमानियाच्या मार्गाने उत्तरेकडून ऑट्टोमन साम्राज्यावर आक्रमण केले आणि जून १८७७ मध्ये डॅन्यूब ओलांडले. रशियाला फक्त दक्षिणेकडील बल्गेरियातील प्लेव्हना येथे उस्मान पाशाच्या लष्करी नेतृत्वाखालील तुर्की सैन्याकडून तीव्र प्रतिकाराचा सामना करावा लागला. जुलैमध्ये आणि सप्टेंबरमध्ये रशियन पायदळांना तुर्की सैन्याने मागे ढकलले. सुमारे पाच महिन्यांच्या प्रतिकारानंतर डिसेंबर १८७७ मध्ये तुर्की सैन्याला आत्मसमर्पण करण्यास भाग पाडले गेले. जानेवारी १८७८ च्या अखेरीस रशियन सेनापती स्कोबेलेव्हने २८ जानेवारी १८७८ रोजी ॲड्रियानोपलचा मार्ग मोकळा केला. रशिया या युद्धात विजयी झाला. अब्दुल हमीदने शांततेसाठी तहाची भूमिका घेतली. ३१ जानेवारी १८७८ रोजी युद्धविराम मंजूर झाला.

रशियाच्या या यशाने इंग्लंडची चिंता वाढली. रशियन सैन्य कॉन्स्टँटिनोपलच्या दिशेने निघाले. याचवेळेस इंग्लंड तुर्कांच्या बाजूने युद्धात उडी मारण्याच्या विचारात होते. रशियाचे सैन्य थकलेले होते. त्यांचा अन्न पुरवठा विस्कळीत झाला होता आणि तिची आर्थिक स्थिती बिघडली होती. नवीन शत्रू किंवा शत्रूंशी संघर्षाचा धोका पत्करणे झारला खूप कठीण होते. अशा परिस्थितीत त्याला जमिनीवर ऑस्ट्रिया-हंगेरीशी तसेच समुद्रावर इंग्लंडशी लढावे लागले असते. परिणामी रशियाने ३ मार्च १८७८ रोजी सॅन स्टेफानो येथे तुर्कांशी स्वतंत्र शांतता करार केला.

## ९.४ सॅन स्टेफानोचा तह (१८७८)

या तहाद्वारे तुर्कीच्या सुलतानाला सर्बिया, मॉन्टेनेग्रो आणि रोमानियाचे पूर्ण स्वातंत्र्य मान्य करावे लागले. सुलतानने रशिया आणि ऑस्ट्रियाच्या संयुक्त नियंत्रणाखाली असलेल्या बोस्निया आणि हर्झेगोव्हिनामध्ये सुधारणांची घोषणा करण्याचे मान्य केले. सॅन स्टेफानोचा तह बल्गेरियाला लाभदायी ठरल्याचे दिसत होते. त्यातून बृहद बल्गेरियाची महत्वाकांक्षा उदयाला आली. ग्रीस आणि सर्बियाने मॅसेडोनियावरील त्यांच्या दाव्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे

याचा निषेध केला. इतर युरोपियन शक्ती देखील वेगवेगळ्या कारणास्तव सॅन स्टेफानोच्या तहास प्रतिकूल होत्या. इंग्लंडने विशेषतः विस्तारित बल्गेरियाच्या प्रस्तावावर आक्षेप घेतला. बल्गेरियाला वाटले की नव्याने उभारलेले बल्गेरिया राज्य कदाचित रशियन प्रांत बनू शकेल आणि यामुळे कॉन्स्टँटिनोपलच्या दिशेने त्यांच्या राजकीय प्रभावासाठी मोकळे रान मिळेल. बाल्कन द्वीपकल्पात रशियन प्रभावाचा प्रसार रोखण्यासाठी डिझरायलीचा निर्धार होता. भूमध्यसागरीय मार्गे भारताकडे जाणाऱ्या सागरी मार्गाच्या सुरक्षेसाठी मजबूत आणि मैत्रीपूर्ण तुर्कस्तान आवश्यक असल्याचे त्यांचे मत होते. ऑस्ट्रियाच्या असंतोषाची वेगळी कारणे होती. त्यानुसार इंग्लंड आणि ऑस्ट्रिया या दोघांनी सॅन स्टेफानोच्या कराराच्या अटींमध्ये सुधारणा करण्यासाठी मागणी केली. रशिया मात्र इंग्लंड आणि ऑस्ट्रियाची संयुक्त मागणी मान्य करायला तयार नव्हता. त्यांना रुसो-तुर्की युद्धातून मिळालेले तिचे फायदे घालवायचे नव्हते. तथापि भारतीय सैन्याला माल्टाकडे जाण्याचा आदेश आणि ब्रिटिश ताफ्याला कारवाईसाठी तयार राहण्याचा आदेश यासारख्या इंग्लंडच्या हालचालींमुळे रशियाला खात्री पटली की इंग्लंड युद्धासाठी सज्ज होता मात्र या परिस्थितीत रशियाला नवीन युद्ध नको होते. त्यामुळे सुधारित कराराच्या पुनरावृत्तीसाठी युरोपियन काँग्रेसच्या अँग्लो-ऑस्ट्रियन मागणीला रशियाने सहमती दिली.

## ९.५ बर्लिनचा तह (१८७८)

जून १८७८ मध्ये बर्लिन येथे युरोपीय सत्तांनी बर्लिन काँग्रेसमध्ये भाग घेतला. त्यात रशिया, तुर्की, ऑस्ट्रिया, इंग्लंड, फ्रान्स, इटली आणि जर्मनी यांचा सहभाग होता. बिस्मार्क हा म्हणून काँग्रेसचे अध्यक्ष होता. तीन सम्राटांचे (जर्मनी,ऑस्ट्रिया आणि रशिया) संरक्षण करणे हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. बर्लिनच्या कॉंग्रेसमधील चर्चेचा परिणाम म्हणजे बर्लिनचा करार होता. ज्याने बृहद बल्गेरियाचे स्वप्न भंग पावले. बल्गेरियाचे नवीन राज्य आता सुलतानच्या अधिपत्याखाली स्वायत्त रियासत म्हणून स्थापित झाले. सॅन स्टेफानोच्या तहाने प्रस्तावित केलेल्या राज्याचा फक्त छोटा तुकडा बल्गेरियाला मिळाला होता. बाल्कन प्रदेशाच्या दक्षिणेकडील प्रदेश,पूर्व रोमेलिया म्हणून ओळखला जाणारा प्रदेश ख्रिश्चन गव्हर्नर-जनरलद्वारे प्रशासित पण ऑट्टोमन सुलतानच्या थेट लष्करी आणि राजकीय अधिकाराखाली साम्राज्यात आला होता.

सर्बिया,मॉन्टेनेग्रो आणि रोमानियाच्या स्वातंत्र्याच्या संदर्भात सॅन स्टेफानोच्या कराराच्या तरतुदींवर बर्लिनमध्ये चर्चा केली गेली नाही. बोस्निया आणि हर्झेगोव्हिना प्रांत आणि नोव्ही-बाजार प्रांत सुलतानचे नाममात्र अधिपत्य कायम ठेवतानाच त्यावर ऑस्ट्रियाचे प्रशासकीय नियंत्रण ठेवण्यात आले. तुर्कीने सायप्रसला इंग्लंडला दिले. रशियाला दक्षिणी बेसराबिया,कार्स आणि बाटम प्रांत राखण्याची परवानगी होती. तुर्कीने तिच्या सर्व प्रजेला राजकीय सुधारणा आणि पूर्ण धार्मिक स्वातंत्र्याचे वचन दिले.

**बर्लिनच्या तहाचा प्रभाव:**

तुर्कस्तानच्या राजकीय प्रभावावर निर्बंध घालणे आणि युरोपियन शक्तींचा वाढता प्रभाव यासाठी बर्लिनचा करार अधिक महत्त्वपूर्ण होता. परराष्ट्र मंत्री लॉर्ड सॅलिस्बरी यांच्यासह बर्लिनच्या काँग्रेसमध्ये इंग्लंडचे प्रतिनिधीत्व करणारे इंग्लंडचे पंतप्रधान डिझरायली यांनी

ही त्यांची सर्वात मोठी कामगिरी मानली. बर्लिनच्या तहामुळे रशियाने सॅन स्टेफानोच्या तहाने मिळवलेले महत्त्वाचे फायदे गमावले आणि बाल्कन द्वीपकल्पातील रशियाचा प्रभाव कमकुवत झाला. बाल्कनमधून थेट तुर्कीवर किंवा अप्रत्यक्षपणे तुर्कस्तानपासून भूमध्य समुद्रापर्यंत कोरलेल्या वासल राज्यांवर प्रभाव गाजवण्याची रशियन योजना साकार झाली नाही. तथापि रशियाने युरोपकडून आशियाकडे विस्तार करण्याचा प्रयत्न केला. १८७८ नंतर रशियाने आशियामध्ये,मंचुरियाच्या सुदूर पूर्वेकडे, पर्शिया आणि अफगाणिस्तानमध्ये दक्षिणेकडे आपला प्रभाव वाढवला.

या कराराने बल्गेरियन राष्ट्रीयत्वाच्या कायदेशीर दाव्यांचे उघडपणे उल्लंघन केले होते. उत्तर आणि दक्षिण बल्गेरियाचे विलगीकरण १८८५ पर्यंत चालू राहिले. जर्मनीने तुर्कीच्या सुलतानची मैत्री सुरक्षित केली आणि भविष्यासाठी त्यांना एक नवीन मित्र मिळवला. दुसरीकडे रशिया मात्र एकाकी पडला. बर्लिनच्या काँग्रेसमध्ये रशियाला अपमानाचा सामना करावा लागला. यामुळे रशियाने तीन सम्राटांच्या लीगमधून माघार घेतली. यामुळे बिस्मार्कला १८७९ मध्ये ऑस्ट्रियाशी युती करणे भाग पाडले. रशियाप्रणीत पॅन-स्लाव्ह चळवळीला मोठा धक्का बसला. ऑस्ट्रियाने बोस्निया,हर्झेगोव्हिना आणि नोवी प्रांतांचा ताबा घेतल्याने बृहद सर्बियाच्या निर्मितीच्या मार्गात अडथळा उभा राहिला. त्यामुळे ऑस्ट्रिया आणि सर्बिया यांच्यातील तणाव वाढला. पॅन-स्लाव्हवाद बाल्कनच्या समस्या सोडवू शकला नाही परंतु बर्लिनच्या करारानंतर राष्ट्रवाद उफाळून आला. १८८१ मध्ये रोमानिया आणि १८८२ मध्ये सर्बिया स्वतंत्र राज्य बनले. १९०८ मध्ये फर्डिनांडला बल्गेरियाचा झार म्हणून घोषित करण्यात आला आणि १९१० मध्ये निकोलस मॉन्टेनेग्रोचा पहिला राजा झाला.

## ९.६ सारांश

क्रिमियन युद्धाचा युरोपच्या राजकारणावर दूरगामी परिणाम झाला. बाल्कन आणि काळ्या समुद्रातील रशियन प्रभावावर अंकुश लावण्यात आला. तिला डॅन्यूबमधून हाकलण्यात आले. काळ्या समुद्रात रशियाची लष्करी ताकद पूर्णपणे संपली होती. बर्लिनच्या तहामुळे रशियाने सॅन स्टेफानोच्या तहाने मिळवलेले महत्त्वाचे फायदे गमावले आणि बाल्कन द्वीपकल्पातील तिचा प्रभाव कमकुवत झाला. बर्लिनचा करार केवळ पूर्वेकडील प्रश्नाच्या इतिहासातच नव्हे तर युरोपियन इतिहासातही एक महत्त्वाची घटना आहे. टेलरच्या मते बर्लिनच्या काँग्रेसने युरोपच्या इतिहासात संकट निर्माण केले. या कराराने बल्गेरियन राष्ट्रीयत्वाच्या कायदेशीर दाव्यांचे उघडपणे उल्लंघन केले. १८७८ नंतर रशियाने आशियामध्ये, मंचुरियाच्या सुदूर पूर्वेकडे, पर्शिया आणि अफगाणिस्तानमध्ये दक्षिणेकडे आपला प्रभाव वाढवला.

## ९.७ प्रश्न

१) क्रिमियन युद्धाच्या (१८५४-५६) कारणांची चर्चा करा. त्याचे परिणाम काय झाले?

२) क्रिमियन युद्ध (१८५४-५६) च्या परिणामी घडलेल्या घटनांचा अभ्यास करा. त्याचे परिणाम काय होते?

३) रुसो तुर्की युद्ध (१८७७-७८) ची कारणे आणि परिणाम स्पष्ट करा.

४) रुसो-तुर्की युद्धाच्या (१८७७-७८) पार्श्वभूमीचे विश्लेषण करा आणि युरोपीय राजकारणावर झालेल्या परिणामाचे विश्लेषण करा.

५) सॅन स्टेफानो आणि बर्लिनचा तह यांच्या महत्वाच्या कलमांची चर्चा करा.

## ९.८ संदर्भ


१. थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.

२. कॉर्नेल आर.डी., वर्ल्ड हिष्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९

३. लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५

४. कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९

५. टेलर ए. पी. जे., द स्ट्रगल फोर माश्तरी इन युरोप, (१८४८-१९१८), ओक्फोर्ड


*****

munotes.in

# १०

# पहिले महायुद्ध

**घटक रचना**


१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ पहिल्या महायुद्धाची कारणे

१०.३ पहिल्या महायुद्धाचे परिणाम

१०.४ पॅरिस शांतता परिषद

१०.५ व्हर्सायिचा तह

१०.६ सारांश

१०.७ प्रश्न

१०.८ संदर्भ


## १०.० उद्दिष्टे

१. पहिल्या महायुद्धास कारणीभूत असणाऱ्या घटकांची जाणीव करुन घेणे.

२. पहिल्या महायुद्धाच्या काळातील दोस्त राष्ट्रांची व त्यांच्या विरुद्ध गटातील राष्ट्रांची भूमिका समजून घेणे.

३. पहिल्या महायुद्धाचे युरोप व जगावर झालेले परिणाम यांचा अभ्यास करणे.

४. शांतता परिषदेसंदर्भात असणाऱ्या अडचणी, त्याची ध्येयधोरणे यांची माहिती मिळवणे.

## १०.१ प्रस्तावना

विसाव्या शतकातील महत्त्वपूर्ण घटना म्हणजे पहिले महायुद्ध होय. बाल्कन युद्धे संपली तरी लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान बनण्याचा प्रयत्न युरोपात चालू होता. साम्राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षेमुळे महायुद्ध पेटले होते. पहिले महायुद्ध २८ जुलै १९१४ रोजी सुरू झाले आणि ११ नोव्हेंबर १९१८ रोजी संपले. हे युद्ध जवळजवळ ४ वर्षे ११ महिने म्हणजे १५६५ दिवस लढले गेले. या महायुद्धात युरोप, रशिया, अमेरिका आणि तुर्कस्तान सामिल झाले होते आणि मध्य पूर्व, आफ्रिका आणि आशियाच्या काही भागांमध्येही लढाईचा विस्तार झाला होता. इतिहासातील सर्वात प्राणघातक संघर्षांपैकी एक म्हणू याचे वारणा केले जाते. अंदाजे ९० लाख लोक या युद्धात मारले गेले, तर ५० लाखांहून अधिक नागरिक बॉम्बहल्ले, उपासमार किंवा रोगराईमुळे मरण पावले. युद्धादरम्याच ऑटोमन साम्राज्याने अर्मेनियात केलेला नरसंहार आणि १९१८ च्या स्पॅनिश फ्लू साथीच्या रोगामुळे लाखो अतिरिक्त मृत्यू झाले.

## १०.२ पहिल्या महायुद्धाची कारणे

### १) बिस्मार्कची गुप्त राजकीय खलबते:

बिस्मार्कने परराष्ट्रीय धोरणात फ्रान्सला एकाकी पाडण्याचा प्रयत्न करताना १८७९ जर्मनी-ऑस्ट्रिया यांच्यात लष्करी व मैत्री करार घडून आणला तर इ.स. १८८२ इटालीला सामील करुन तीन देशांचा मैत्री करार घडवून आणला. याच वेळी रशिया व फ्रान्सची मैत्री होऊन १८९४ मध्ये त्यांनी फ्रान्स-रशिया मैत्री करार झाला. इंग्लंडला आंतरराष्ट्रीय राजकारणात एकाकीपणाचे धोरण जाणवल्याने भीती वाटू लागली. त्याने जर्मनीशी मैत्री करण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना अपयश आले. इ.स. १९०२ मध्ये इंग्लंड-जपान मैत्री होऊन इ.स. १९०४ मध्ये इंग्लंड-फ्रान्स यांच्यात मैत्री झाली तर इ.स. १९०७ मध्ये रशिया यात सामील झाला. त्यामुळे इंग्लंड, फ्रान्स, रशिया व जपान असा एक गट तयार झाला तर दुसरीकडे जर्मनी, ऑस्ट्रिया-हंगेरी, तुर्कस्थान हे देश एकत्र आले. या दोन गटांत परस्पर स्पर्धा व द्वेषभावना निर्माण झाली.

### २) जहाल राष्ट्रवादाची भावना:

आंतरराष्ट्रीय प्रश्न सहकार्याने व शांततेने न सुटल्याचे मुख्य कारण म्हणजे त्याकाळचा आत्यंतिक राष्ट्रवाद होय. राष्ट्राराष्ट्रांच्यातील संघर्ष सोडवण्यासाठी तेव्हा न्यायालये नव्हते. युद्ध सज्ज, शस्त्रास्त्रनिर्मिती आणि युद्ध पेटविण्याचे प्रयत्न इ. स्वतःच्या राष्ट्राचे सत्य व मानवी श्रेष्ठतेपुढे अन्य समाजाला व नागरिकांना तुच्छ मानते. राष्ट्रवादामुळेच फ्रान्स अल्सेस-लॉरेन परत मिळवण्यासाठी धडपड करत होते तर इंग्लंड-जर्मनीचे वैर याच जहाल राष्ट्रवादाच्या भावनेमुळे निर्माण झाले.

### ३) साम्राज्यवादी धोरण:

युरोपमध्ये १८व्या शतकात औद्योगिक क्रांती सुरु झाली आणि १९व्या शतकात तिचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. त्यातूनच वसाहती, बाजारपेठा, कच्चा माल, मिळविण्यासाठी साऱ्या युरोपात स्पर्धा सुरु झाली, यातूनच त्यांच्यात द्वेष निर्माण होऊन तो विकोपास गेला. प्रत्येकाला साम्राज्याची हाव सुटली. त्यातून आर्थिक संघर्षाला सुरुवात झाली. जर्मनीने आफ्रिकेत व अतिपूर्वेकडे वसाहती मिळवण्याचे प्रयत्न सुरु केला त्यामुळे इंग्लंडने त्यास विरोध केला. त्यामुळे जर्मनी-इंग्लंड यांच्यात वैर वाढले.

### ४) कायसर विल्यमची महत्वाकांशा:

त्या काळात जर्मनीचे नेतृत्व कैसर विल्हेम करत होता. तो विलक्षण महत्त्वाकांक्षी सत्ताधीश होता. युरोपात जर्मनीच्या नेतृत्वाखाली जर्मनी, ऑस्ट्रिया हंगेरी, बाल्कन राष्ट्रे, तुर्कस्थान यांचे संघराज्यांचे स्वप्न पाहत होता. तो अतिशय गर्विष्ठ, रागीट स्वभावाचा, जबर महत्त्वाकांक्षी होता. १८७० नंतर नाविक दलाची प्रचंड वाढ करुन इंग्लंडला शह देण्याचा प्रयत्न केला. त्याच्या या महत्त्वाकांक्षेमुळे पहिल्या महायुद्धाच्या खाईत जगाला लोटले.

**५) जर्मनीचे प्रबळ धोरण:**

इ.स. १८७० मध्ये जर्मनीचे एकीकरण करुन जर्मनीचे प्रशियन संस्कृती आपलीशी करुन घेतली, ज्यामुळे मोठा पेचप्रसंग निर्माण झाला. प्रशियाचा युद्धावर खूप विश्वास होता कारण युद्धात जो विजयी होईल त्याच्या बाजूने सत्य असते असे प्रशियन लोकांचे मत होते. युद्ध हीच सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे असे प्रशियाला वाटते. या तत्त्वज्ञानाचा जर्मन तरुणांच्या कोवळ्या मनावर सखोल ठसा उमटला होता. जगातील सर्व प्रश्न पाशवी बळानेच सुटतात ही जर्मन तरुणांत श्रद्धा होती. या तत्त्वज्ञानाची परिणती महायुद्धात घडून आली.

**६) तात्कालिक कारण: ऑस्ट्रियन राजकुमाराचा खून:**

युरोपात स्फोटक वातावरणात भयंकर घटनेची ठिणगी पडली आणि महायुद्धाने पेट घेतला. ऑस्ट्रियन राजकुमाराचा खून हे त्याचे कारण होय. ऑस्ट्रियन सम्राटांचा पुतण्या आर्चड्यूक फ्रान्सिस फर्डिनांड व त्यांची पत्नी हे दोघे बॉस्निया प्रांताची राजधानी साराजेव्होला भेट देण्यासाठी गेले. तेव्हा २८ जून १९१४ रोजी भर रस्त्यात खून झाला, ज्यामुळे मोठा प्रक्षोभ निर्माण झाला. हा वादाचा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर ठेवण्याला सर्बियाने तयारी दर्शविली, पण ऑस्ट्रियाने ती फेटाळून लावली. इंग्लंड, फ्रान्स, रशिया यांनी मध्यस्थी करुन वाद टाळण्याचा प्रयत्न केला, पण ते ऑस्ट्रियाला ते अमान्य होते. फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, इटाली यांच्या संयुक्त बैठकीची मागणी झाली, पण याला जर्मनीने विरोध केला. शेवटी ऑस्ट्रियाने २८ जुलै १९१४ रोजी सर्बियाविरुद्ध युद्ध पुकारले.

**आपली प्रगती तपासा**

१) पहिल्या महायुद्धाची कारणे नमूद करा.

## १०.३ पहिल्या महायुद्धाचे परिणाम

**१) मोठ्या प्रमाणात जीवितहानी:**

हे युद्ध युरोपियन राष्ट्रे, आफ्रिका व आशिया खंडात झाले. तसेच ते जमीन, आकाश, महासागर या तिन्ही ठिकाणी लढले. या युद्धात जगातील २८ देशांनी भाग घेतला होता. मित्र-राष्ट्रंच्या बाजूने ४ कोटी २० लाख तर जर्मनीच्या बाजूने २ कोटी ३० लाख लोक लढले होते. या युद्धात १ कोटी ३० हजार सैन्य ठार झाले. २ कोटी २० लाख लोक जखमी झाले. यातील १/३ लोक कायमचे निकामी झाले. ७० लाख सैनिकांना कैद झाली होती. या युद्धाचा एकूण खर्च ९५० अब्ज पौंड होता, ज्यात एकट्या जर्मनीचे ४ हजार कोटी पौंड खर्च झाले.

**२) आर्थिक हानी:**

युद्धकाळात शेती, उद्योगधंदे बंद पडले. युद्धसाहित्याच्या निर्मितीसाठी पैसा व माणसे खर्ची पडली. आवश्यक वस्तूंचा तुटवडा पडला. त्यामुळे महागाई, चलन फुगवटा मोठ्या प्रमाणात वाढला. परिणामी अमेरिकेकडून पैसा घ्यावा लागत होता. युरोपातील कारखाने, खाणी, रेल्वे, कालवे सर्व उद्ध्वस्त झाले. त्यामुळे उत्पादन क्षमता कमी झाली.

### ३) अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय:

अमेरिकेमुळे मित्र राष्ट्रांचा युद्धात विजय झाला. अमेरिकेने अनेक राष्ट्रांशी व्यापारी करार केले होते. ती रक्कम परत मिळवण्यासाठी ६ एप्रिल १९१७ रोजी अमेरिका महायुद्धात उतरली आणि राजकारणात आपले प्रस्थ बसविले. मित्र राष्ट्रांना मदत करुन अर्थकारणावरही प्रभाव निर्माण केला. प्रत्येक गोष्टीत अमेरिकेशिवाय घडामोडी होत नसे. त्यामुळे अमेरिकेचे स्थान उंचावले. शिवाय ते युरोपला धनधान्य देखील पुरवीत होते. त्यामुळे अमेरिकेने जगाचे नेतृत्व करण्यास प्रारंभ केला.

### ४) युद्धाचा धसका व राष्ट्रसंघाची निर्मिती:

कोणताही प्रश्न संघर्ष युद्धाने सोडविण्यापेक्षा सहकार्याने सोडविण्यासाठी अमेरिकेचा अध्यक्ष विल्सनच्या प्रेरणेने व प्रयत्नांने राष्ट्रसंघाची स्थापना १० जानेवारी १९२० रोजी झाली. कायम स्वरूपाची आंतरराष्ट्रीय संघटना प्रथमच अस्तित्वात आली होती. प्रथम युद्धातील प्रचंड मनुष्यहानी व वित्तहानी याचा धसका सर्वांना बसल्याने राष्ट्रसंघाची स्थापना झाली.

### ५) हुकूमशहांचा उदय:

युद्धानंतर अनेक देशांत हुकुमशहांचा व त्यांच्या नव्या तत्त्वज्ञानाचा उदय झाला. रशियाने बोल्शेव्हिकचे तत्त्वज्ञान सांगितले ज्यात कामगारांची हुकूमशाही अभिप्रेत केली होती. कार्ल मार्क्सच्या तत्त्वाप्रमाणे लेनिनने नवे प्रयोग सुरु केले. नवे राजकीय व आर्थिक सिद्धांत मांडले. सर्वसामान्य लोकांसाठी मार्गदर्शक तत्वज्ञान साम्यवादात असले तरी रशियात प्रत्यक्षात साम्यवादी पक्षाची हुकुमशाहीच होती. इटलीत मुसोलिनीने फॅसिझमचा पाया घातला तर जर्मनीत हिटलरने नाझी पक्षाची हुकूमशाही अस्तित्वात आणले. यातून अनेक संघर्ष निर्माण झाले.

### आपली प्रगती तपासा:

१) पहिल्या महायुद्धाचे परिणाम स्पष्ट करा.

## १०.४ पॅरिस शांतता परिषद

२८ जुलै १९१४ रोजी जागतिक महायुद्धाला सुरुवात झाली. जर्मनी व ऑस्ट्रिया-हंगेरीच्या बाजूने तुर्कस्थान व बल्गेरिया यांनी भाग घेतला तर इंग्लंड फ्रान्स च्या बाजूने त्यांच्या वसाहती, चीन, जपान, इटली, अमेरिका होती. अमेरिकेच्या युद्ध प्रवेशाने युद्धाचे चित्र बदलले. १९ सप्टेंबर १९१८ रोजी बल्गेरियाने, ३१ ऑक्टोबरला तुर्कस्थानाने, ४ नोव्हेंबरला ऑस्ट्रियाने शरणागती पत्करली. विल्सनच्या 'आम्ही जर्मनीला सन्मानाने वागवू' या शब्दांवर विश्वास ठेवून १८ नोव्हेंबर १९१८ रोजी जर्मनीने युद्धबंदी केली. यावेळी जो करार झाला त्यानुसार:

१) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान यांनी जिंकलेला प्रदेश सोडून द्यावा.

२) जर्मनीने ऱ्हाईन नदीपर्यंत फोजा मागे घ्याव्यात.

३) जर्मनीने ताबडतोब मोठी जहाजे, मोठ्या तोफा व युद्धसाहित्य मित्रराष्ट्रांच्या हवाली करावे.

४) जर्मनीने रशियाबरोबर केलेला ब्रेस्ट-लिटोव्हस्क करार रद्द करावा.

**परिषदेचे ध्येये आणि उद्दिष्ट्ये**

१) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थानमधून राजेशाहीचे उच्चाटन करुन साम्राज्ये नष्ट करायचे. तेथील प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार देऊन युरोपची पुनर्रचना करायची.

२) जर्मनी, ऑस्ट्रिया, तुर्कस्थान यांच्या युरोपबाहेरील वसाहतींचे भवितव्य निश्चित करणे.

३) जर्मनी व तिच्या मित्रराष्ट्रांकडून युद्धखंडणी वसूल करणे.

४) सर्व देशांत शस्त्रकपात घडवून आणणे.

५) युद्धानंतरच्या समस्या सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण करणे.

व्हर्साय परिषदेत रशिया व पराभूत राष्ट्रांना प्रवेश नाकारला होता. एकूण ३२ देशांचे प्रतिनिधी हजर होते. निर्णयास विलंब पाहून १० मोठ्या राष्ट्रांनी निर्णय घ्यावे, त्यास सर्व प्रतिनिधींनी मान्यता द्यावी; परंतु पुन्हा विलंब लागला. त्यामुळे अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली व जपान या पाच मोठ्या राष्ट्रांनी निर्णय घ्यावे, असे ठरले. यामध्ये पुढील महत्वाच्या व्यक्तींनी प्रभाव गाजवला. अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन हा सर्वात महत्त्वाची व्यक्ती असून अमेरिका युद्धात पडल्यापासून शांतता तह पूर्ण होईपर्यंत सर्व महत्त्वाची जबाबदारी त्याने पार पाडली. विल्सनला शांततेचा ध्यास असल्याने जगात कायमची शांतता नांदावी यासाठी त्याने १४ कलमी योजना जाहीर केली. मित्रराष्ट्रांनी त्याच्या योजनेतील राष्ट्रसंघाची कल्पना उचलून धरली. राष्ट्रसंघ स्थापन झाला. जर कोणाला न्याय हवा, जर अन्याय झाला तर राष्ट्रसंघाच्या माध्यमातून दूर करता यावे, असा विश्वास होता.

फ्रान्सचा पंतप्रधान क्लेमेंस्की जर्मनीला नमवण्याबाबत अतिशय आग्रही होता. जर्मनीला लष्करीदृष्ट्या अधू बनवावे, जबर युद्धखंडणी लादून आर्थिकदृष्ट्या दुर्बल बनवावे, जर्मनी कधीच स्वतःच्या पायावर उभा राहू नये, असे त्याचे मत होते. तो मुत्सद्दी व राजकारणी डावपेच यात तरबेज होता. लॉईड जॉर्ज इंग्लंडचा प्रतिनिधी लोकशाहीचा चाहता व उदारमतवादाचा भोक्ता होता. साहजिकच जर्मनीला उदार वागणूक मिळेल अशी त्याच्याबद्दल अपेक्षा होती. मात्र 'युद्धखंडणी वसूल करु' या मुद्द्यावर निवडणुका जिंकल्या होत्या. त्यामुळे त्याच्या धोरणात बदल झाला. अमिरेकेचा अध्यक्ष विल्सनने अमेरिका युद्धापासून दूर ठेवण्याचा, युद्ध मिटवण्याचा, शांतता प्रस्थापित करण्याचा युद्धकाळात प्रयत्न केला. दुर्दैवाने या बाबतीत यश आले नाही. एवढेच नव्हे तर अगतिकपणे विल्सनला युद्धामध्ये उतरावे लागले. अमेरिकेच्या युद्ध-प्रवेशावेळी १४ कलमी योजना, चार तत्त्वे, चार युद्ध ध्येय व वैशिष्ट्ये अशा विविध योजना जाहीर केल्या.

### १४. कलमी योजना:

विल्सनने अमेरिकेच्या युद्ध घोषणेनंतर सिनेटपुढे भाषण करताना ८ जानेवारी १९१८ रोजी आपली १४ कलमी योजना जाहीर केली. या योजनेप्रमाणे जगाची आदर्श तत्त्वांवर पुनर्रचना व्हावी, युद्ध कल्पनेला कायमचे तडीपार करता यावे व जगात कायमची शांतता नांदावी, अशी त्याने अपेक्षा व्यक्त केली. त्यानुसार योजनेत तरतुदी केल्या

१) गुप्त राजनीतीचा त्याग

२) सागर संचाराचे स्वातंत्र्य

३) अनिर्बंधीत आंतरराष्ट्रीय व्यापार

४) वसाहतींचे सरंक्षण व त्याची मित्रराष्ट्रांमध्ये विश्वस्त म्हणून न्याय्य वाटणी

५) शस्त्रकपात

६) रशियातून मित्रराष्ट्रांनी फौजा परत बोलावणे

७) बेल्जियमच्या तटस्थतेला सर्वांनी मान्यता द्यावी

८) १८७१ मध्ये फ्रान्सवर झालेला अन्याय दूर करावा

९) राष्ट्रियत्वाच्या तत्त्वांवर इटलीची फेररचना करावी

१०) ऑस्ट्रिया-हंगेरी साम्राज्याच्या प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा

११) सर्बिया, मॉटेनिग्रो व रुमानिया यांना परकियांच्या जोखडातून मुक्त करावे

१२) तुर्की साम्राज्याच्या प्रजेला स्वयंनिर्णयाचा अधिकार द्यावा

१३) स्वतंत्र पोलंडची निर्मिती करावी व तिला समुद्रकिनारा मिळवून द्यावा

१४) राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात यावी

**आपली प्रगती तपासा**

१) विल्सनची १४ तत्त्वे स्पष्ट करा.

## १०.५ व्हर्सायचा तह

युद्धबंदीपूर्वी तह सन्मानाने व वाटाघाटीने करण्याचे आश्वासन विल्सनने दिले होते; परंतु प्रत्यक्षात जर्मन प्रतिनिधीला वाटाघाटासाठी बोलावले नाही. मसुदा जर्मनीला पोचवण्यापूर्वी यातील तरतुदी समजल्याने जर्मनीने दुय्यम दर्जाचे अधिकारी पाठवले. हा मित्रराष्ट्रांना अपमान वाटला. शेवटी जर्मनीच्या परराष्ट्रमंत्री रॅण्ड्यूझ पॅरिसला पाठवला. त्याचा अतिशय अपमान करण्यात आला. युद्धाची सर्व जबाबदारी जर्मनीवर लादली. अखेर नाखुशीने व्हर्सायचा तह जर्मनीने स्वीकारला. या परिषदेत ३२ राष्ट्रांचे एकूण ७० प्रतिनिधी व त्यांचे

सल्लागार मंडळ हजर होते. अखेर २८ जून १९१९ रोजी जर्मनीने तहावर सही करुन युद्ध संपवले.

**व्हर्साय तहाच्या तरतुदी**:

पॅरिस शांतता परिषदेने जर्मनीवर लादलेला हा व्हर्सायचा तह अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण या तहाने जर्मनीवर भयंकर अन्याय केला. त्यामुळे जर्मनी सूडाने पेटली. यातूनच दुसरे महायुद्ध उद्भवले. म्हणूनच दुसऱ्या जागतिक महायुद्धाची बीजे व्हर्साय तहात होती, असे म्हटले जाते. व्हर्साय तह सुमारे १५ भागात २३० पानांचा आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी त्याचे प्रादेशिक तरतुदी, लष्करी तरतुदी, आर्थिक तरतुदी, कायदेशीर तरतुदी व इतर तरतुदी अशा प्रकारे त्यांचे वर्गीकरण केले जाते. व्हर्सायच्या तहाने जर्मनीला पश्चिम, उत्तर, पूर्व सीमेवर फार मोठ्या प्रदेशावर पाणी सोडावे लागले.

**जर्मनीची राजकीय हानी:**

जर्मनी व फ्रान्स या दोन देशांत नैसर्गिक सीमा नव्हती. दोन वेळी जर्मनीने फ्रान्सवर आक्रमण केल्याने फ्रान्सने ऱ्हाइनलॅंड प्रदेशाची मागणी केली व ऱ्हाइन नदी नैसर्गिक सीमा ठरवावी, परंतु १०० टक्के जर्मन असल्याने ते अमान्य केले व फ्रान्सच्या संरक्षणासाठी संरक्षण फळी तयार केली ती पुढीलप्रमाणे:

१) ऱ्हाइन नदीच्या पश्चिमेकडे ५२ किलोमीटर रुंदीचा जर्मन प्रदेश निर्लष्करी बनवावा.

२) या प्रदेशात १५ वर्षांसाठी मित्रराष्ट्रांच्या फौजा ठेवाव्यात, दर पाच वर्षांच्या अंतराने या फौजा काढून घ्याव्यात.

३) ऱ्हाइन नदीवरील पूल व मोक्याच्या ठिकाणी मित्रराष्ट्रांच्या फौजाच्या ताब्यात असावीत.

४) डान्झिग बंदर व परिसरातील सुमारे ७०० चौ.कि.मीचा प्रदेश जर्मनीतून अलग करण्यात आला. हे बंदर आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सर्वांना खुले करण्यात आले. वास्तविक १३व्या शतकात प्रशियाने वसवलेले हे बंदर वांशिक, धार्मिक, सांस्कृतिक ऐतिहासिक सर्वच दृष्टिने हे बंदर जर्मनीचे होते परंतु ते वेगळे करण्यात आले.

५) पोलंडची निर्मिती: या प्रदेशात पोलंड हे सर्वात दुर्दैवी राष्ट्र. प्रशिया, ऑस्ट्रिया व रशिया या तीन मोठ्या सत्तांच्यामध्ये असलेला हा प्रदेश त्यांनी पोलंडचे अनेक वेळा आपापसात वाटणी करुन स्वातंत्र्य नष्ट केले होते. विल्सनच्या १४ कलमी योजनेत पोलंडला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे व पोलंडला समुद्रकिनारा देण्याचे आश्वासन दिले होते म्हणून व्हर्साय तहाने पूर्व प्रशियाचा फार मोठा प्रदेश पोलंडला देऊन स्वतंत्र पोलंडची निर्मिती केली. व्हर्साय तहाने ६ दशलक्ष लोकसंख्या, २५ हजार चौ.मैलाचा प्रदेश जर्मनीला सोडून द्यावा लागला. यामुळे २ लक्ष जर्मन पारतंत्र्यात गेले. या तहामुळे ६५ टक्के लोखंड, ४५ टक्के कोळसा, ७२ टक्के जस्त व ५७ टक्के लोह उद्योगधंदे यास जर्मनीला मुकावे लागले. इ.स. १९१४ पर्यंत जर्मनीने इंग्लंड, फ्रान्सच्या खालोखाल प्रचंड साम्राज्य जिंकले होते. साम्राज्यवादी राष्ट्राकडून शोषण

होते म्हणून त्या वसाहती काढून घ्याव्यात, विश्वस्त म्हणून राष्ट्रसंघाकडे सुपूर्द कराव्यात अशी विल्सनची मूळ कल्पना, जेत्यांनी या कल्पनेचा फायदा घेऊन जर्मनीच्या वसाहती राष्ट्रसंघाने काढून घेतल्या व विश्वस्त म्हणून त्या अन्य देशांना दिल्या त्या पुढीलप्रमाणे - कॅमरून व टोगोलॅंड फ्रान्सला; जर्मनीच्या दक्षिण अफ्रिकेतील वसाहती इंग्लंडला; चीनमधील जर्मन प्रदेश व विषववृत्ताच्या उत्तरेकडील बेटे जपानला मिळाला.

**आर्थिक हानी:**

व्हर्साय तहातील 'युद्धखंडणी' ही तरतुद अतिशय अन्यायकारक व जर्मनीत संताप निर्माण करणारी होती. कारण विल्सनने 'आम्ही कोणावर युद्धखंडणी लादणार नाही', असे जाहीर केले होते. मात्र जर्मनीकडे मित्रराष्ट्रांनी ५ नोव्हेंबर १९१८ रोजी युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला, त्यावेळी मित्रराष्ट्रांमधील नागरिकांची जी हानी झाली ती जर्मनीने भरुन द्यावी अशी सूचना होती. त्यानुसार युद्धाचा सारा खर्च जर्मनीने भरुन द्यावा अशी मित्रराष्ट्रांनी मागणी केली. व्हर्साय तहातील कलम २३७ प्रमाणे मित्रराष्ट्रे व युद्धातील त्यांचे सहकारी युद्धाची जबाबदारी जर्मनीवर टाकत होते जिचा जर्मनीने स्वीकार केला. जर्मनीकडून नुकसान भरपाई घेण्याबाबत मित्रराष्ट्रांचे एकमत झाले. शेवटी जर्मनीने ५०० कोटी डॉलर्स किंमतीचे सोने व वस्तु मित्रराष्ट्रांना द्यावे असे ठरले. मित्रराष्ट्रांतील प्रत्येक देशाच्या नुकसान भरपाईचा आकडा निश्चिंत करण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, इटली, अमेरिका यांचा प्रत्येकी एक व बेल्जियम, डेन्मार्क, चीन, जपान इ. देशांचे पाच प्रतिनिधींचे कमिशन नेमले गेले. त्या कमिशनने ६ अब्ज ७ कोटी डॉलर्स एवढी प्रचंड युद्धखंडणी जर्मनीवर लादली.

**लष्करी हानी:**

जर्मनीने आपल्या लष्करी सामर्थ्याने हे युद्ध पेटवले होते. साहजिकच जर्मनीला लष्करीदृष्ट्या कमकुवत केले तर पुन्हा अशी आपत्ती उद्भवणार नाही म्हणून व्हर्साय तहाने जर्मनीवर पुढील लष्करी निर्बंध लादले:

१) जर्मनीतून सक्तीची लष्करी सेवा नष्ट करावी.

२) जर्मनीच्या खड्या फौजेची मर्यादा १ लाखापर्यंत ठेवावी.

३) या सैन्यातील शिपायाने कमीत कमी १२ वर्ष तर अधिकाऱ्यांनी कमीत कमी २५ वर्षे नोकरी केली पाहिजे.

४) लष्कराबाहेर जर्मनीत कोणतेही लष्करी प्रशिक्षण देण्यात येऊ नये.

५) जर्मनीच्या आरमाराची मर्यादा १५ हजार, तर आरमारी अधिकाऱ्यांची मर्यादा १५०० अशी ठरवण्यात आली.

६) १० हजार टन क्षमतेपेक्षा जास्त अद्ययावत युद्धनौका नष्ट कराव्यात. ६ फुअर्स (नाव) व १२ विनाशिका याव्यतिरिक्त सर्व युद्धसाहित्य मित्रराष्ट्रांच्या हवाली करावे अथवा नष्ट करावे.

(७) जर्मनीच्या पश्चिम किनाऱ्यावर ५० कि.मी. रुंदीचा निर्लष्करी टापू बनवावा.

थोडक्यात जर्मनीच्या लष्कराचे खच्चीकरण करुन दुर्बल बनवले गेले.

**आपली प्रगती तपासा:**

१) व्हर्साय तहातील प्रादेशिक तरतुदी स्पष्ट करा.

**व्हर्साय तहाचे टीकात्मक परीक्षण:**

व्हर्साय तह हा आधुनिक जगाच्या इतिहासातील सर्वात वादग्रस्त तह होय. जर्मनीतील लोकांनी हा तह 'जुलमी, अन्यायी, स्वाभिमानाला धक्का देणारा, विश्वासघात करणारा' असे वर्णन केले तर मित्रराष्ट्रांनी 'युरोपला कायमची शांतता देणारा तह' असे म्हटले आहे. या तहात ध्येयवाद व व्यवहार यांची सांगड घालण्याचा प्रयत्न होता, तरीही या तहाच्या वेळी अनेकांनी या तहावरुन जगात दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल सुरु होईल, अशी भीती व्यक्त केली व पुढे ती भीती योग्य होती.

**१) जर्मनीवर लादलेला तह:**

या तहाचा मसुदा स्वीकारताना व शेवटी तहावर सही करताना जर्मन प्रतिनिधींना फक्त दोनदाच बोलावले यामुळे 'हा तह आमच्यावर लादला' अशी जर्मनीची भावना झाली. यामुळे जर्मनीचा स्वाभिमान दुखावला. युद्ध करणे गुन्हा आहे पण पराभाव पत्करणे गुन्हा नाही. 'परिषद जर्मनीला न्याय देण्यासाठी नाही तर जर्मनीची लूट करण्यासाठी आहे', असे जर्मनीचे मत झाले. साहजिकच जो तह वाटाघाटीने झाला नाही तो पाळण्याचे जर्मनीवर बंधन उरले नाही.

**२) व्हर्साय तह: जर्मनी दुबळा करण्यासाठी**:

युद्धकाळात सर्वसामान्य जनतेने खूप हालअपेष्टा सहन केल्या होत्या. मित्रराष्ट्रांनीही जनतेला अनेक प्रकारची आश्वासने दिली होती. मात्र तह करताना ही आश्वासने यांचा विचार केला नव्हता. मुत्सद्द्यांनी हवी तशी पुनर्रचना केली म्हणून 'तो लोकांचा नव्हे तर मुत्सद्द्यांचा तह होता', अशी टीका केली जाते. जर्मनीवर अन्याय करणारा, कोणत्याही स्वाभिमानी राष्ट्रांनी स्वीकारावा असे हा तह नव्हता. जर मित्रराष्ट्रांनी जर्मनीला सन्मानपूर्वक वागवले असते तर कदाचित जर्मनीने या तहाचे पालन केले असते; परंतु जर्मनीला लष्करीदृष्ट्या कमकुवत बनवले होते, सर्व तऱ्हेने अपमान केला. जोपर्यंत जर्मनी दुबळा होता तोपर्यंत त्याने नाईलाजाने तह पाळला. पण लवकरच जर्मनी तहाच्या चिंधड्या करण्यास तयार झाला.

**३) व्हर्साय तहाने जर्मनीचा विश्वासघात:**

युद्ध समाप्तीपूर्वी 'आम्ही जर्मनीला सन्मानाने वागवू, वाटाघाटीने तह करु', अशी आश्वासने मित्रराष्ट्रांनी दिली होती. पण प्रत्यक्षात जर्मन प्रतिनिधीला वाटाघाटीस बोलावले नाही, अन्यायकारक तह लादला, त्यामुळे 'मित्रराष्ट्रांनी आमचा विश्वासघात केला', अशी जर्मनीची भाषा येऊ लागली. मित्रराष्ट्रांनी बहुतेक वेळा वाटाघाटी, बहुमताचा निर्णय, सार्वमत

यासारखे शब्द वापरून लोकशाहीचा देखावा केला. पण प्रत्यक्षात भाषा लोकशाही तर कृती हुकूमशाहीची होती, असे दिसून येते.

**४) युद्धखंडणीची तरतुदही मित्रराष्ट्रांना हानीकारक:**

जर्मनी मित्रराष्ट्रांना खंडणी देऊ लागला होता. युद्धकाळात अमेरिकेच्या घेतलेल्या कर्जाचे हप्ते या पैशातून भरु लागला. त्यावेळी जर्मनीस युद्धखंडणी देणे शक्य झाले नाही असे स्पष्ट झाले. त्यावेळी फ्रान्सने जर्मनीवर हल्ला केला. यावेळी अमेरिका जर्मनीला अर्थसहाय्य करु लागली. त्यामुळे अमेरिकन पैसा अमेरिकेतच परत येऊ लागला. यामुळे जगात आर्थिक महामंदीचा फटका बसला. थोडक्यात जर्मनीला अन्यायकारक असल्यामुळे व्हर्साय तह पाळण्याची जर्मनीवर नैतिक बंधन राहिले नाही. ज्याप्रमाणे इ.स. १८७०-७१ मध्ये फ्रान्सचा पराभाव व त्यातच फ्रान्स असमाधानी राहिला. त्यामुळे जगाची पहिल्या महायुद्धाकडे वाटचाल सुरु झाली. इ.स. १९१९ मध्ये जर्मनीवर अन्याय झाल्याने 'व्हर्सायच्या तहातच दुसऱ्या जागतिक महायुद्धाची बीजे पेरलेली होती', असे म्हणतात.

**आपली प्रगती तपासा**

१) व्हर्साय तहाचे परिक्षण करा.

## १०.६ सारांश

युरोपियन राष्ट्रांचा महत्त्वाकांक्षी धोरणामुळे २०व्या शतकाच्या प्रारंभीस पहिले महायुद्ध पेटले. या युद्धाला अनेक प्रकारची कारणे जबाबदार आहेत. त्यातील काही कारणे आत्यंतिक राष्ट्रवादाच्या स्वरूपाची होती. या युद्धात सर्व जग उतरले होते व सर्व जगावर अत्यंत वाईट परिणाम झाले. अशा वाईट घटना टाळण्यासाठी युद्ध समाप्तीनंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली. जर्मनीच्या पराभावाने पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला. जागतिक शांततेसाठी फ्रान्समधील पॅरिस येथे शांतता परिषद भरवण्यात आली. या परिषदेमध्ये मित्रराष्ट्रांनी युद्धाची सर्व जबाबदारी जर्मनी व तिच्या दोस्त राष्ट्रांवर टाकली. या शांतता परिषदेमध्ये व्हर्सायचा तह, सेंट जर्मेनचा तह, न्यूलीचा तह करण्यात आला, त्याचबरोबर राष्ट्रसंघाची स्थापनाही केली. राष्ट्रसंघाने राजकीय व अराजकीय कार्य मोठ्या प्रमाणात केले.

## १०.७ प्रश्न

१) पहिल्या महायुद्धाची कारणे स्पष्ट करा.

२) पहिल्या महायुद्धाचे परिणाम सांगा.

३) शांतता परिषदेचा आढावा घ्या.

४) व्हर्सायच्या तहाच्या तरतुदी सांगून तहाचे टीकात्मक परीक्षण करा.

munotes.in

## १०.८ संदर्भ


१) टेलर ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४

२) कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९

३) ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५

४) डॉ.सौ. वैद्य, सुमन, आधुनिक जग, नागपूर, २००२.

५) डॉ. काळे, म.वा., आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २०२१.


*****

munotes.in

# ११

# १९१७ ची रशियन राज्यक्रांती आणि हुकुमशाहीचा उदय

**घटक रचना**

११.० उद्दिष्टे

११.१ प्रस्तावना

११.२ रशियन क्रांतीची कारणे

११.३ रशियन क्रांतीतील महत्वाच्या घटना

११.४ रशियन क्रांतीचे परिणाम

११.५ सारांश

११.६ प्रश्न

११.७ संदर्भ

## ११.० उद्दिष्टे

१) रशियन क्रांतीची कारणे आणि परिणाम समजून घेणे.

२) १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीम महत्वाच्या घडामोडी समजून घेणे.

३) रशियन क्रांतीचे परिणाम समजून घेणे.

## ११.१ प्रस्तावना

अमेरिका व फ्रांसच्या राजकीय क्रांतीनंतर रशियन क्रांती इतिहासातील एक महत्वाची घटना आहे. समाजातील शोषित व वंचित घटकांनी प्रस्थापित भांडवलदार वर्गाविरुद्ध लढा देवून कामगारांचे शासन सत्तेवर आणले. कार्ल मार्क्सचा सिद्धांत या क्रांतीने सत्यात उतरवला. या क्रांतीचे तत्त्वज्ञान जगातील कामगारांमध्ये लोकप्रिय ठरले. त्यामुळे सर्व जगातील कामगारांचे संघर्ष होऊन भांडवलशाही उलथून साम्यवाद पसरवण्याचा या क्रांतीचा प्रयत्न होता. जगभरातील शोषितांन या क्रांतीने मार्ग दाखवला. कार्ल मार्क्सचे तत्वज्ञानानुसार प्रथमच या क्रांतीने राजकीय सत्ता स्थापन केली होती. रशियन राज्यक्रांती ही पहिली साम्यवादी क्रांती ठरली. आर्थिक नियोजनाच्या मार्गाने विकास साधण्याची संकल्पना ही या क्रांतीने जगाला दिलेली देणगी आहे. इ.स. १९१७ च्या फेब्रुवारी महिन्यात पेट्रोग्राड येथे कामगारांनी संप पुकारला. ही रशियन राज्यक्रांतीची नांदी ठरली. त्यानंतर राजधानीतील सैनिकांनीही कामगारांना पाठींबा दिला. हे या राज्यक्रांतीचे पहिले पर्व होते. स्वित्झर्लंडमध्ये अज्ञातवासात असलेला बोल्शेव्हिक नेता लेनिन इ.स. १९१७ च्या एप्रिलमध्ये रशियात परतला, तेव्हा या राज्यक्रांतीचे दुसरे पर्व सुरु झाले. या क्रांतीस पुढील गोष्टी कारणीभूत ठरल्या.

munotes.in

## ११.२ १९१७ रशियन क्रांतीची कारणे

### १) रशियातील सरंजामशाही समाजरचना:

रशियन समाजात दोन वर्ग होते. पहिल्या वर्गात रशियन झार, त्याचे नातेवाईक, सरंजाम सरदार, जमीनदार यांचा वर्ग होता. देशातील उत्पन्नाची सारी साधने या मूठभर लोकांच्या हाती होती. उरलेला सारा समाज दुसऱ्या वर्गात मोडत होता. क्रांतिपूर्व काळात रशियात सरंजामशाही व्यवस्था प्रबळ होती. त्यामध्ये सरंजाम सरदाराच्या, जमीनदाराच्या जमिनीत राबणारे भूदास, छोटे शेतकरी, शेतमजूर, कारागीर इ. समाविष्ट होता. या लोकांकडे उत्पन्नाची साधने नसत. पहिल्या वर्गाच्या मेहरबानीवर या लोकांची गुजराण होत असे. इ.स. १८६१ मध्ये भूदासाची मुक्तता करण्यात आली परंतू झारने या सुधारणेचा प्रयत्न अर्धवट सोडल्याने खऱ्या अर्थाने भूदासांची मुक्तता झाली नाही.

### २) अकार्यक्षम व निरंकुश झारशाही:

रशियात कमालीचे दारिद्र्य होते. हे दारिद्र्य दूर करण्याचे, सर्वसामान्यांचे जीवन सुखी बनवण्याची क्षमता झारशाहीत नव्हती. रशियात सुमारे ३०० वर्षांपासून रोमॅनोव्ह घराण्याची वंशपरंपरागत सत्ता होती. रशियातील सर्वच राजे झार या नावाने ओळखले जात. वंशपरंपरागत राजेशाहीचा एक महत्त्वाचा दोष म्हणजे अपवादात्मक चांगले राजे निपजतात. रशियातील पिटर-दि-ग्रेट याचा अपवाद वगळता सर्वच राजे अकार्यक्षम, दुर्बल, भ्रष्टाचारी होते. क्रांतीकाळातील झार दुसरा निकोलस हा हा कमालीचा अकार्यक्षम होता. त्याने देशात भयंकर अत्याचार केले, जनतेवर अनेक युद्धे लादली, पाश्चात्य विचार रशियात पसरू नये म्हणून वर्तमानपत्राची तसेच जनतेच्या मूलभूत स्वातंत्र्याची मुस्कटदाबी करणारे रानटी उपाय योजले. यामुळे त्यांच्याविरूद्ध संतप्त वातावरण तयार झाले. इ.स. १९०५ मध्ये जपानने रशियाचा पराभाव केला. त्यामुळे झारचा दुबळेपणा उघड झाला. आपल्या अनियंत्रित सत्तेला फाटा द्यावा व लोकशाही प्रस्तावित करावी यासाठी लोकांनी क्रांती केली परंतु यापासून काही बोध घेतला नाही. त्यामुळे अनियंत्रित भ्रष्ट झारशाहीला विरोध होऊ लागला. झारची पत्नी अलेक्झांड्रा (झारीना) हिच्या सल्लयाने झार राज्यकारभार करी. झारीनावर रासपुतीन या चमत्कारी धार्मिक गुरूचा प्रभाव होता. त्याला राज्यकारभाराचे ज्ञान नसताना त्याने कारभारात हवा तसा हस्तक्षेप केला. त्यामुळे देशभर असंतोष निर्माण झाला. झारच्या धोरणामुळेच रशियाचा जपानविरूद्ध युद्धात पराभव झाला.

### ३) रशियातील जनजागरण:

रूसो, व्हॉल्टेयर या तत्त्ववेत्यांनी फ्रेंच राज्यक्रांतीची वैचारिक भूमिका तयार केली. त्याप्रमाणे लिओ टॉल्सटॉय, मॅक्झिम गोर्की, तुर्जेनिव्ह डोस्कोव्होस्को इ. अभिजात लेखकांनी रशियन राज्यक्रांतीची वैचारिक भूमिका तयार केली. या लोकांनी क्रांतीसाठी कधी शस्त्र हाती घेतली नाही; परंतु आपल्या लिखाणातून तत्कालीन शासनसंस्था कशा अधोगतीस पोहचल्या आहेत ते दाखवून दिले. त्यांनी कनिष्ठ वर्गाचे दुःख जगाच्या वेशीवर टांगून क्रांतीची आवश्यकता लोकांना पटवून सांगितली. लिओ टॉल्सटॉयने कादंबरीतून सरंजाम सरदार व त्यांचे विलासी जीवन आणि त्यांच्याकडून भूदासांचे होणारे शोषण याचे चित्र लोकांपुढे मांडले. भूदासांच्या, सर्वसामान्यांच्या दुःखाला वाचा फोडली. तुर्जेनिव्ह याने

झारशाहीचे हिडीस स्वरूप लोकांसमोर मांडले. कामगारांच्या दुःखाला वाचा फोडली. रशियातील अनेक साहित्यिकांनी, विचारवंतांनी रशियन जनतेला जागृत केले. झारशाही, सरंजामशाही उलथून टाकण्यासाठी आवश्यक ती वैचारिक भूमिका तयार केली.

**४) कार्ल मार्क्सच्या विचारसरणीचा प्रभाव:**

रशियन राज्यक्रांतीमध्ये कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानाचे महत्व अनन्यसाधारण आहे. कामगारांच्या शोषणामुळे ते संघटित होऊ लागले होते. मार्क्सने साम्यवादी तत्त्वज्ञान अत्यंत सोप्या भाषेत सांगितल्याने तो कामगारांत अतिशय लोकप्रिय झाला. त्याने इ.स. १८४४ मध्ये कम्युनिस्ट जाहीरनामा हा पहिला ग्रंथ प्रकाशित केला. त्यात त्याने, या संघर्षात तुम्ही काही गमावणार नाही कारण तुमच्याजवळ कामाशिवाय दुसरे काही नाही. तर तुम्ही जिंकला तर तुम्ही कारखान्याचे मालक व्हाल, असे कामगारांना पटवून दिले. मार्क्सचे क्रांतीचे आव्हान रशियात वणव्याप्रमाणे पेटले. यातून रशियाची क्रांतीकडे वाटचाल सुरु झाली.

**५) रशियाचे औद्योगिकरण:**

अठराव्या शतकात युरोपमध्ये औद्योगिक क्रांती झाली. रशिया तसा युरोपियन देशांपेक्षा औद्योगिकदृष्ट्या अप्रगत, मागासलेला व शेतीप्रधान देश होता; परंतु औद्योगिक क्रांतीचे लोण हळूहळू रशियात येऊ लागले. विशेषतः इ.स. १८१४ मध्ये फ्रान्स-रशिया मैत्री करारानंतर फ्रान्सने रशियात प्रचंड भांडवल गुंतवले म्हणून रशियाच्या औद्योगिक क्रांतीला वेग आला. नवे कारखाने उदयास आले. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रात ज्याप्रमाणे कामगारांची वाढती संख्या, कामगारांचे शोषण, कामगारांच्या समस्या या सर्व गोष्टी १९व्या शतकाच्या अखेरीस रशियात दिसू लागल्या, नव्यानेच औद्योगिक क्रांतीस प्रारंभ झाल्याने भांडवलदाराने कामगारांचे शोषण करुन प्रचंड संपत्ती मिळवली. यामुळे भांडवलदार-कामगार संघर्षास प्रारंभ झाला. त्यामुळे कामगार क्रांतीची भाषा बोलू लागले.

**६) साम्यवादी विचारसरणी:**

औद्योगिक क्रांती, कामगाराचा उदय व त्यांच्या समस्या यातूनच युरोपमध्ये साम्यवादाचा उदय झाला. युरोपमध्ये लुई ब्लँक, सेंट सायमन, पायुरिया इ. साम्यवादी नेत्यांनी सर्वच युरोपियन देशांत कामगार संघटित करुन भांडवलदारांविरूद्ध पेटवून दिले. इ.स. १८४८ मध्ये अनेक क्रांत्या झाल्या. त्या प्राथमिक स्वरूपातील साम्यवादी होत्या परंतु त्यांना फारसे यश आले नाही. नव्याने औद्योगिक प्रगती घडून आलेल्या रशियात यादृष्टीने प्रयत्न झाले नाहीत परंतु मार्क्सचे समाजवादी विचार रशियात लोकप्रिय ठरल्याने इ.स. १८९५ मध्ये कामगारांनी 'वर्कर्स डेमोक्रॅटिक पार्टी' स्थापन केली. भांडवलदार विरुद्ध संघर्ष सुरू केला. भूदास, शेतकरी, शेतमजूर यांनी इ.स. १९०० मध्ये 'सोशल रिव्होल्युशन पार्टी' स्थापन केली.

रशियात झारशाही व भांडवलदारांविरुद्ध कामगार व शेतमजूर संघटित होऊ लागले. त्यांनी तीव्र आंदोलन केले परंतु 'बोल्शेव्हिक' (बहुमत वाला) व 'मेन्शेव्हिक' (अल्पमत वाला) असे दोन गट निर्माण झाले. लेनिन हा बोलशेव्हिक नेता होता ज्याला रशियात फक्त कामगारांची क्रांती हवी होती. तो झारशाही उलथून टाकण्यास व क्रांती करण्यास इतर वर्गांचे सहकार्य घ्यायला तयार नव्हता. सहाजिकच बहुमत असूनही लेनिनचा गट काही करू शकला नाही.

याचा फायदा घेऊन झाडने बहुमतवाल्यांना हद्दपार केले व कामगारांचे नेतृत्व मेन्शेव्हिक गटाकडे आले. यांनी इ.स. १९०५ मध्ये जपानने रशियाच्या केलेल्या पराभवाचा फायदा घेऊन रशियात क्रांती केली व लोकशाही निर्माण केली.

**७) रशिया जपान युद्ध:**

इ.स. १९०४-०५च्या युद्धात रशिया जपानकडून पराभूत झाला. यावेळी झारशाही विरोधी धुमसत असलेला असंतोष विकोपाला गेला. सर्व देशभर झारशाही व त्यांच्या लोकांचा धिक्कार केला जाऊ लागला. पराभवाच्या अपमानाने संतापलेल्या पीटर्सबर्गमधील विद्यार्थ्यांनी झारशाहीचा धिक्कार करुन 'झारशाहीचा पदच्युत करा' अशी मागणी करत मोर्चा काढला. यात मॉस्कोतील विद्यार्थी सामील झाले. यापाठोपाठ कामगारांनी संप, हरताळ काढून मोर्च्याला पाठिंबा दिला. अशा परिस्थितीत २२ जानेवारी १९०५ रोजी सेंट पिटर्सबर्गमधील कामगारांनी फादर गॅपॉनच्या नेतृत्वाखाली प्रचंड मोर्चा काढला. झारने या लोकांच्या मागण्या मान्य न करता या मोर्च्यावर आपले घोडदळ सोडले. निःशस्त्र कामगारांची प्रचंड प्रमाणात हत्या झाली. रशियाच्या इतिहासात रक्तरंजित रविवार या नावाने ओळखला जातो. या हत्यांमुळे जनता संतापली, सारा देश संप वा हरताळांनी पेटून उठला. त्यामुळे झारने ऑगस्ट १९०५ मध्ये जनतेच्या प्रतिनिधींची 'ड्यूमा' बोलावली जाईल, अशी घोषणा केली. इंग्लंडच्या धर्तीवर रशियात राजेशाही सुरु केली; परंतु झारने इ.स. १९०५ नंतर कामगारांत फूट पाडून आपल्या अनियंत्रित सत्तेचे पुनरुज्जीवन केले.

वरील कारणांमुळे क्रांतीवी पार्श्वभूमी तयार झाली. जनता झारशाही उलथून टाकण्यास तयार झाली. परंतु झारने लष्कराच्या जोरावर चिरडून टाकली. अशा परिस्थितीत इ.स. १९१४ मध्ये पहिले जागतिक महायुद्ध सुरु झाले. युद्ध आघाडीवर रशियाचा पराभाव होऊ लागला. युद्धकालीन समस्या, पराभावाचे दुःख यातून मार्च १९१७ मध्ये झारशाहीचा शेवट करुन रशियन क्रांती घडून आली.

**आपली प्रगती तपासा**

१) रशियन राज्यक्रांतीस कारणीभूत घटकांची चर्चा करा.

## ११.३ रशियन क्रांतीतील महत्वाच्या घटना

**पेट्रोग्राडची क्रांती:**

रशियाने जागतिक महायुद्धात उडी घेतली. भ्रष्ट, अकार्यक्षम झारशाहीमुळे जीवनावश्यक वस्तूंचा सर्वत्र तुटवडा निर्माण झाला. अपुऱ्या युद्ध-साहित्यामुळे सैनिक युद्ध आघाडीवरुन पराभूत होऊ लागले. झारशाहीविरुद्ध भयंकर वातावरण तापले. ८ मार्च १९१७ रोजी पेट्रोग्राडच्या १ लाख कामगारांनी तर मॉस्कोतील २५ हजार कामगारांनी प्रचंड मोर्चा काढून झारशाही उलथून टाकण्याची मागणी केली. झारने मोर्चा चिरडून टाकण्याचे लष्कराला आदेश दिला. लष्कराने दिलेला आदेश न मानता कामगारांशी हातमिळवणी केली. अशा परिस्थितीत जमिनीसाठी, कारखान्यांच्या मालकीसाठी, भाकरीसाठी देशभर दंगली झाल्या. झारने ड्यूमा बरखास्त केल्याची घोषणा केली. ड्यूमाने विसर्जित होण्यास नकार दिला. राजकुमार जॉर्जी लव्होव्ह या समाजवादी नेत्याच्या नेतृत्वाखाली रशियात हंगामी



munotes.in

सरकार स्थापन झाले. अशाप्रकारे ८ मार्च १९१७ रोजी झारशाहीचा शेवट होऊन रशियात प्रतिनिधी राजवट सुरु झाली.

**हंगामी सरकार:**

निकोलसच्या राजत्यागानंतर ड्यूमाने समितीची निवड करुन हंगामी सरकार स्थापन केले. त्यांनी सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता करण्याचा आदेश दिला. युद्धाबाबतचे नवीन धोरण जाहीर केले. ज्यू लोकांवरील सर्व नियंत्रणं रद्द केले. 'रशियाकरिता नवीन घटना बनिवण्यात येईल' असे जाहीर करुन उदारमतवादींनी मानवतावादी कार्य केले; परंतु त्यांच्या कारभाराला अंतर्गत विरोध होऊ लागल्याने मे १९१७ मध्ये जॉर्जी लव्हॉवने राजीनामा दिला आणि केरेन्सकीने सत्ता हाती घेतली. केरेन्सकीने मे ते नोव्हेंबर १९१७ पर्यंत अस्थिर परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याला असंतोष नष्ट करता आला नाही. भांडवलदार-कामगार यांच्यात ऐक्य तयार करता आले नाही. जर्मनीशी शांतता करण्यास विरोध केल्याने सैन्यात बेशिस्त वातावरण निर्माण झाली. युद्धातील सततच्या पराभावांमुळे अपमान झाला व जनतेने युद्ध थांबवावे ही मागणी केली. पण केरेनस्कीने मागणी अमान्य केली याचा फायदा लष्कराने व लेनिनने घेतला.

**बोल्शेव्हिक क्रांती - ७ नोव्हेंबर १९१७:**

केरेन्सकीचे धोरण लेनिनला अमान्य होते. त्यातच रशियन सैन्यात कमालीची अस्वस्थता, शेतकरी जमिनी जबरदस्तीने ताब्यात घेत होते तर बोल्शेव्हिक पक्षाने रेड गार्डसमध्ये कामगार जास्त संख्येत भरती केले. लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा सिद्धांत मांडला. ट्रॉटस्कीच्या सहकार्याने ७ नोव्हेंबर १९१७ रोजी बोल्शेव्हिक पक्षाने लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांतीचा निश्चय केला. कामगारांनी व क्रांतिकारकांनी एकदम उठाव करुन सर्व राज्यकारभाराची केंद्रे ताब्यात घेतली. रक्तपात न होता राजधानी बंडखोरांनी ताब्यात घेतली. केरेन्सकीचे सरकार नष्ट करुन ८ नोव्हेंबरला लेनिनने नव्या सरकारची सूत्रे अध्यक्ष या नात्याने हाती घेतली.

## ११.४ रशियन राज्यक्रांतीचे परिणाम

रशियात भ्रष्टाचारी व अकार्यक्षम झारशाहीची अनियंत्रित सत्ता असल्याने जनतेचे हाल होत होते. झार औद्योगिक प्रगतीला व नव्या विचारांना विरोध करून आपली हुकूमशाही टिकवण्याचा प्रयत्न करत होता. परंतु औद्योगिक प्रगतीमुळे कामगार वर्ग उदयाला आला. या वर्गाला संघटित व मार्गदर्शन करण्याचे कार्य पूर्वी कार्ल मार्क्सने केले. आता त्याचे वैचारिक वारसदार विविध देशात हे कार्य करू लागले. या राज्यक्रांतीचे परिणाम पुढीलप्रमाणे आहेत.

**१) साम्यवादी तत्वज्ञान प्रभावी बनले:**

कार्ल मार्क्स व लेनिनने साम्यवादाचे नवीन तत्त्वज्ञान मांडले. त्यामुळे निरनिराळ्या विचारप्रणालीत संघर्ष निर्माण झाला. त्याचा अंतरराष्ट्रीय संबंधांवर दूरगामी परिणाम झाला. भांडवलदार वर्गाला धक्का बसला. भांडवलदारांच्या संरक्षणासाठी साम्यवाद विरुद्ध फॅसिझम राष्ट्रांची साखळी तयार झाली. त्यातून संघर्ष निर्माण झाला. रशियन राज्यक्रांतीत

पुरस्कारिलेल्या साम्यवादाने उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही, संसदीय राज्यपद्धती इ. पाश्चात्य कल्पनांना जबरदस्त आव्हान दिले. जगातील सुसंस्कृत, बुद्धिमान वर्गाचे आतापर्यंत पाश्चिमात्य संस्कृती निर्माण झालेल्या ज्या कल्पना उराशी बाळगलेल्या होत्या त्या निरुपयोगी आहेत. त्या साम्यवादी विचाराने खोट्या ठरवल्या.

**२) वसाहतींमधील स्वातंत्र्यलढ्याला बळ मिळाले:**

भांडवलशाहीची शेवटची अवस्था म्हणजे साम्राज्यवाद अशी साम्यवादी शिकवणीमुळे वसाहतीत चाललेल्या स्वातंत्र्यलढ्याला राजकीय संघर्षाचे स्वरूप न राहता सामाजिक आणि आर्थिक न्यायाकरिता लढा असे महत्त्व प्राप्त झाले. कम्युनिस्टांनी वसाहतींच्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा दिला. त्यामुळे या स्वातंत्र्यलढ्यांना जागतिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले. बोल्शेव्हिक राज्यक्रांतीमुळे रशियन साम्राज्यशाहीचासुद्धा शेवट झाला. पोलंड, फिनलंड, जोर्जिया यात रशियन साम्राज्यवाद्याने मोठ्या प्रमाणात दडपशाही चाललेली होती. रशियन राज्यक्रांतीने या दडपशाहीचा शेवट केला आणि त्या राष्ट्रांना स्वातंत्र्य दिले.

**३) नवीन समाज रचना उदयाला आली**:

रशियन राज्यक्रांतीनंतर विषमता लयास गेली. प्रत्येकाने आपल्या शक्तीनुरुप आणि गुणानुरुप काम करावे. त्या आधारावर नवीन समाज उदयास आला. या समाजात गरीब-श्रीमंत भांडवलदार, जमीनदार, व्यापारी, धर्मगुरु त्या सर्वांना काम करावे लागे. कामानुरुप वेतन सर्वांनाच देण्यात आले. रशियात श्रमिकांच्या हातात सत्ता आली. समाजात कामगारांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. साम्यवादाच्या तत्त्वावर समाजाची पुनर्घटना निर्माण केली. समाजातील सर्वात खालचा थर म्हणजे कामगार त्याला सत्ता मिळाल्याने जगातील सर्व कामगारांत समाधान निर्माण होऊ लागले.

**४) रशियाला जागतिक राष्ट्रांत स्थान मिळाले:**

रशिया क्रांतीपूर्वी एक मागासलेले राष्ट्र होते, त्याला सुधारणांचा स्पर्शही झालेला नव्हता. इ.स. १९१७ बोल्शेव्हिक क्रांती घडून आल्यानंतर एक साम्यवादी राष्ट्र म्हणून रशियाचा जागतिक राजकारणात उदय झाला. जगातील लक्षावधी श्रमिक रशियाकडे नेतृत्वाच्या आशेने पाहू लागले. त्यामुळे एक बलशाली राष्ट्र म्हणून मान मिळाला. पाश्चात्य लोकशाही पद्धतीने देशाचा विकास होत नाही हे रशियाला पटल्यानंतर रशियाने पंचवार्षिक योजनेद्वारे एक-एक विभागावर लक्ष केंद्रित करुन विकास होतो हे जगाला दाखवून दिले. त्यामुळे पंचवार्षिक योजनेचे सर्व जगाने अनुकरण केले.

**५) कामगारांन महत्वाचे स्थान मिळाले:**

रशियात राज्यक्रांती होऊन कामगारांची सत्ता स्थापन झाली. त्यामुळे जगातील कामगार जागृत झाले आणि आपल्या हक्कांसाठी प्रचलित शासनव्यवस्थेशी संघर्ष करु लागले. त्यामुळे त्या देशांनी कामगारांच्या हितासाठी व संरक्षणासाठी अनेक कायदे पास करुन त्यांना समाजात महत्वाचे स्थान देण्याचा प्रयत्न केला.

**६) साम्यवादी हुकुमशाहीचा उदय:**

रशियामध्ये साम्यवादी पक्षाने क्रांती घडवून आणली होती. त्यावुर्वी रशियातील झारशाहीला विरोध करण्यासाठी लोकनियुक्त केरेन्स्की सरकार व कामगारांची हुकुमशाहीला समर्थन करणारा बोल्शेविक पक्ष हे एकत्र लढत होते. बोल्शेविक पक्षाचा झारच्या अनियंत्रित सत्तेला विरोध असला तरी पाश्चात्य लोकशाही व्यवस्थेला देखील त्यांचा विरोध होता. पाशाच्य उदारमतवादी लोकशाही व झारची अनियंत्रित हुकुमशाही या दोघांना विरिध करून त्यांनी कामगारांची हुकुमशाही या नावाने प्रत्यक्षात साम्यवादी पक्षाची हुकमशाही प्रस्थापित केली. वरकरणी ती लोकोपयोगी वाटत असली तरी तिचे स्वरूप कट्टर हुकूमशाहीचे होते. नागरिकांना आचार विचार याचे स्वातंत्र्य नाकारण्यात आले. साकारला विरोध करणाऱ्या लोकांना देशद्रोही ठरवण्यात आले. विरोधकांवर नजर ठेवण्यासाठी चेका या गुप्तहेर संस्थेची नेमणूक करण्यात आली.

**आपली प्रगती तपासा**

१) रशियन राज्यक्रांतीचे परिणाम स्पष्ट करा.

## ११.५ सारांश

रशियन राज्यक्रांमुळे रशियात इ.स. १४८० सालापासून चालत आलेल्या झारच्या राजेशाहीचा शेवट झाला आणि तेथे बोल्शेव्हिक कम्युनिस्टांची सत्ता स्थापन झाली. जगाच्या इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती इतकेच रशियन राज्यक्रांतीला देखील महत्त्व आहे. या रशियन राज्यक्रांतीने वर्तमान जागतिक राजनीतीला अत्यंत संघर्षात्मक रुप दिले आहे. रशियन क्रांतीच्या वेळी शेतकरी जमीनदारांच्या तावडीतून सुटला पण तो ग्रामीण अर्थव्यवस्थेशी बांधला गेला. रशियन अस्मितेवर भिस्त ठेवणारा समाजवादी क्रांतिकारक कार्ल मार्कच्या तत्वज्ञानावर भिस्त ठेवणारा मार्क्सवादी गट यांमध्ये जुनी व्यवस्था मोडून टाकण्यासाठी लढा झाला. या दोन्ही गटांनी झारशाहीविरुद्ध असंतोष भडकत ठेवला. या दोन्ही गटांपैकी मार्क्सवादी बोल्शेव्हिक अखेर यशस्वी ठरले व लेनिन याच्या नेतृत्वाखाली साम्यवादी राज्य उदयाला आले.

## ११.६ प्रश्न

१) रशियन राज्यक्रांतीची कारणे स्पष्ट करा.

२) रशियन राज्यक्रांतीचा रशियावर व जगावर झालेल्या परिणामांचा आढावा घ्या.

३) रशियन राज्यक्रांतीमधील महत्वाच्या घडामोडी तपासा.

४) रशियात झालेल्या १९०५ च्या क्रांतीची पार्श्वभूमी स्पष्ट करुन महत्त्व विषद करा.

munotes.in

## ११.७ संदर्भ


१) थोमप्सन डेविड, युरोप सिन्स नेपोलियन, लाँगमन, जयपूर, १९७७.

२) कॉर्नेल आर.डी., वर्ल्ड हिष्री इन ट्वेतिथ सेन्चुरी, लाँगमन, १९९९

३) लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५

४) कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९

५) टेलर ए. पी. जे., द स्ट्रगल फोर माश्तरी इन युरोप, (१८४८-१९१८), ओक्फोर्ड

६) डॉ. आठल्ये, विभा, आधुनिक जगाचा इतिहास, नागपूर, २०१०.

७) डॉ. सौ. वैद्य, सुमन, आधुनिक जग, नागपूर, २००२.

८) डॉ. काळे, म.वा., आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २०२१.


*****

munotes.in

# १२

# दुसरे महायुद्ध

**घटक रचना**

१२.० उद्दिष्टे
१२.१ प्रस्तावना
१२.२ दुसऱ्या महायुद्धाची कारणे
१२.३ दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल
१२.४ पश्चिमेतील महायुद्ध (१९४०-४१)
१२.५ पॅसिफिकमधील महायुद्ध १९४३-४५
१२.६ दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम
१२.७ सारांश
१२.८ प्रश्न
१२.९ संदर्भ

## १२.० उद्दिष्टे

१) दुसऱ्या महायुद्धाला कारणीभूत ठरलेल्या घटनांचे परीक्षण करणे

२) दुसऱ्या महायुद्धाची कारणे व परिणाम जाणून घेणे

३) दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल आणि परिणाम यांचा अभ्यास करणे

## १२.१ प्रस्तावना

दुसरे महायुद्ध हे इतिहासातील सर्वात मोठे आणि प्राणघातक असे युद्ध होते. यामध्ये ३० हून अधिक देशांचा समावेश होता. १९३९ साली पोलंडवर झालेल्या नाझींच्या आक्रमणामुळे हे युद्ध सहा वर्षे चालले आणि १९४५ मध्ये दोस्त राष्ट्रांनी नाझी जर्मनी आणि जपानचा पराभव करेपर्यंत हे युद्ध सुरु राहिले. जेव्हा ब्रिटनचे पंतप्रधान नेव्हिल चेंबरलेन यांनी जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली तेव्हा दुसरे महायुद्ध ३ सप्टेंबर १९३९ रोजी सुरू झाले. दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात जर्मनीने पोलंडवर हल्ला करून केली होती. हिटलरने पोलंडवरील आपले आक्रमण रद्द करण्यास नकार दिल्यानंतर ब्रिटन व फ्रान्सने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. हे विचारांचे आणि पर्यायाने विशिष्ट विचार अंगिकारणाऱ्या राष्ट्रांचेही युद्ध होते.

munotes.in

## १२.२ दुसऱ्या महायुद्धाची कारणे

व्हर्सायच्या कराराच्या अन्यायकारक अटी

व्हर्सायच्या तहामुळे जर्मनी आणि दोस्त राष्ट्रांच्या सत्तांमधील पहिले महायुद्ध संपले. जर्मनीविरुद्ध हा करार अत्यंत कठोर होता. मित्रराष्ट्रांनी केलेल्या युद्धाच्या नुकसानीची जबाबदारी स्वीकारणे तिला भाग पडले. या करारानुसार जर्मनीने नुकसानभरपाई नावाची मोठी रक्कम देणे आवश्यक होते. या कराराची पुष्कळ समस्या निर्माण झाल्या. यामुळे जर्मन अर्थव्यवस्था मोडकळीस आली. लोकांची उपासमार होत होती आणि सरकार दरबारी अनागोंदी माजली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या उद्रेकाला व्हर्सायच्या तहातील अन्याय मोठ्या प्रमाणावर कारणीभूत होता. जर्मनीला वाटाघाटीची कोणतीही संधी न देता हे सर्व केले गेले. निर्धारित शांतता करार स्वीकारण्यास भाग पाडल्यामुळे जर्मनीला खूप अपमानित झाल्यासारखे वाटले. त्यांच्यावर खोलवर अन्याय झाला आहे, असे त्यांना वाटत होते. त्यानंतरच्या आर्थिक समस्यांच्या मालिकेमुळे जर्मन लोकांना मित्रराष्ट्रांबद्दल वाटणारी नाराजी आणखीनच वाढली. त्यांना त्यांच्या आर्थिक समस्यांपासून मुक्त व्हायचे होते. हिटलरने त्यांच्या समस्यांच्या मूळ कारणापासून सुटका करून घेण्याचे वचन दिले आणि व्हर्सायच्या तहाचा अवमान करून त्याने स्वतंत्र धोरणाची सुरुवात केली.

**हिटलरचा उदय:**

जर्मनीत ॲडॉल्फ हिटलर आणि नाझी पक्ष सत्तेवर आला. जर्मनीची अर्थव्यवस्था सुरळीत करून आणि आपला राष्ट्रीय अभिमान परत मिळावा यासाठी जर्मन लोक आतुर झाले होते. हिटलरमध्ये त्यांना आशेचा किरण दिसला. १९३४ मध्ये हिटलरला फुहरर (नेता) म्हणून घोषित करण्यात आले आणि तो जर्मनीचा हुकूमशहा बनला. व्हर्सायच्या तहाने जर्मनीवर घातलेल्या निर्बंधांवर हिटलरने नाराजी व्यक्त केली. जर्मनला प्रबळ सत्ता बनवण्यासाठी व नवीन मित्र जोडण्यासाठी त्याने जर्मनीचे इटलीशी म्हणजेच त्याच्यासारखेच धोरण असणारया मुसोलीनिशी संधान बांधले. जोडले. हिटलरने आपले साम्राज्य वाढवून जर्मनीला राजकारणातील प्रबळ दावेदार बनवण्याचा प्रयत्न केला. १९३८ मध्ये त्याने पहिल्यांदा ऑस्ट्रियाचा ताबा घेतला. जेव्हा लीग ऑफ नेशन्सने त्याला रोखण्यासाठी काहीही केले नाही तेव्हा हिटलरचे धाडस आणखी वाढले आणि त्याने १९३९ मध्ये चेकोस्लोव्हाकियाचा ताबा घेतला.

**लीग ऑफ नेशन्सची (राष्ट्रसंघ) असमर्थता:**

जगातील लोकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यास लीग अपयशी ठरली. जागतिक शक्तींनी स्वत: च्या वैयक्तिक उद्दीष्टांसाठी त्याचा वापर केल्यामुळे ही लीग चर्चा करण्याशिवाय आणखी काही करू शकली नाही. बोल्शेव्हिझमला पर्याय म्हणून ब्रिटनने लीगचा वापर केला. जर्मनीने व्हर्सायच्या तहातील अटी मोडल्या नाहीत ना हे पाहण्यासाठी फ्रान्सने लीगचा वापर केला. युद्धात जिंकलेल्या लुटीच्या जतनासाठी नाझींनी लीगचा वापर केला. १९३१ साली जपानने चीनचा मंचुरियाचा भूभाग ताब्यात घेऊन तेथे कठपुतळी सरकार स्थापन केले. लीगने या कृत्याचा निषेध केला असला तरी १९३३ साली जपान लीगमधून बाहेर पडला. लीगसाठी हा मोठा धक्का होता. हिटलरने व्हर्सायच्या तहाचे पद्धतशीरपणे

उल्लंघन केले आणि नंतर लीग सोडली. १९३५ साली मुसोलिनीने ॲबिसिनियावर हल्ला केला. लीगने इटलीला आक्रमक म्हणून घोषित केले आणि आर्थिक निर्बंध लागू केले. दुर्दैवाने लीगच्या सदस्यांनी हे निर्बंध गंभीरपणे लागू केले नाहीत. ॲबिसिनियावर ताबा मिळवल्यानंतर मुसोलिनीने १९३६ साली लीगमधून माघार घेतली. इटलीची ही कृती लीगचा कमकुवतपणा सिद्ध करणारी ठरली. लीग आपल्या सदस्यांना एकमेकांशी भांडण्यापासून रोखू शकली नाही.

**आर्थिक महामंदी:**

१९२९ च्या आर्थिक महामंदीने जगातील सर्व देशापुढे समस्या निर्माण केल्या. जागतिक महामंदीमुळे हुकूमशाहीच्या उदयासाठी चालना मिळाली. इटलीमध्ये मुसोलिनी भरमसाठ आश्वासने देऊन सत्तेवर आला. रशियामध्ये स्टॅलिनने पंचवार्षिक योजना सुरू केल्या ज्याद्वारे लोकांना त्यांच्या वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मोबदल्यात आर्थिक विकास दिसु लागला. स्पेनमधील यादवी युद्धातून जनरल फ्रँको हुकूमशहा म्हणून उदयास आला. त्याचप्रमाणे पोर्तुगालनेही हुकूमशही सत्तेचे स्वागत केले. अतिपूर्वेत लष्करी सेनापतींनी जपानी सत्ता ताब्यात घेतली. जगातील राजकीय देखावा वेगाने बदलत होता आणि जर्मनीनेही एका महत्त्वाकांक्षी हुकूमशहाला स्वीकारले यात काही आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. या हुकूमशाहीने मायदेशात हिंसेचा वापर केला तेव्हा त्याचा परदेशात वापर करण्यास त्यांना काहीच हरकत नव्हती. आपल्या लोकांवरची त्यांची पकड सुरक्षित करण्याचं आणि बळकट करण्याचं हे एक प्रमुख साधन होते.

**तुष्टीकरणाचे धोरण:**

पहिल्या महायुद्धानंतर युरोपातील राष्ट्रे थकली होती आणि त्यांना दुसरे युद्ध नको होते. इटली आणि जर्मनीसारखे देश आक्रमक झाले आणि त्यांनी आपल्या शेजारील देशांचा भूभाग ताब्यात घेऊन आपले सैन्य तयार करण्यास सुरुवात केली, तेव्हा ब्रिटन आणि फ्रान्ससारख्या देशांनी "तुष्टीकरणाच्या" माध्यमातून शांतता राखण्याची आशा व्यक्त केली. याचा अर्थ त्यांनी जर्मनी आणि हिटलरला रोखण्याचा प्रयत्न करण्याऐवजी जर्मनीचे तुष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यांना आशा होती की त्याच्या मागण्या पूर्ण करून हिटलर समाधानी होईल आणि कोणतेही युद्ध होणार नाही. या धोरणाचा सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे साम्यवादाची भीती. ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिका या देशांना रशियाने जागतिक महासत्ता व्हावे असे वाटत नव्हते. हे धोरणही सत्तासमतोलाच्या काळजीपूर्वक हिशेबावर अवलंबून होते. जर्मनी, इटली, जपान आणि इतर हुकूमशहाही साम्यवादाच्या विरोधात होते आणि साम्यवाद नष्ट करण्यास तयार होते. पाश्चिमात्य सत्तांना जर्मनी, जपान आणि रशिया एकमेकांशी लढताना आणि कदाचित एकमेकांचा नाश करताना पाहायचे होते. ब्रिटनचे पंतप्रधान नेव्हिल चेंबरलेन यांचा असा विश्वास होता की तुष्टीकरणाच्या धोरणामुळे एकतर युद्ध टळेल किंवा किमान ब्रिटन आणि फ्रान्सला युद्धासाठी तयार होण्यास पुरेसा अवधी मिळेल.

**हिटलरचे आक्रमक परराष्ट्र धोरण:**

हिटलरने जर्मनांना जे वचन दिले होते त्यातील एक वचन म्हणजे तो जर्मनीसाठी तिचे गतवैभव परत मिळवेल. जर्मन राष्ट्राबद्दल त्याचा दृष्टिकोन असा होता कि सर्व जर्मन लोकांना एका मोठ्या जर्मन राष्ट्रात समाविष्ट केले जाने क्रमप्राप्त होते. ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया आणि पोलंड या जर्मन लोकसंख्येचा प्रदेश ताब्यात घेण्याचा त्याचा हेतू होता. १९३८ मध्ये हिटलरने जर्मन सैन्य ऑस्ट्रियात पाठवून जर्मनीशी एकरूपता आणली. म्युनिकचा ब्रिटन आणि फ्रान्सशी करार झाल्यानंतर हिटलरला सुडेटेनलँडला अशा अटीवर ताब्यात घेण्याची परवानगी देण्यात आली की, भविष्यात त्याला अधिक भूभाग नको आहे. तथापि त्यानंतर त्याने बोहेमिया, मोराव्हिया व स्लोव्हाकिया जिंकून घेतले.

**युद्धाचे तात्कालिक कारण:**

द्वितीय महायुद्धाचे तात्कालिक कारण म्हणजे जर्मनांचे पोलंडवरील आक्रमण होय. इंग्लंड आणि फ्रान्स यांनी १९३९ प्रमाणेच पोलंडच्या सीमांचे संरक्षण करण्याची हमी दिली होती. जर्मनीने आक्रमण केल्यावर फ्रान्स व इंग्लंडने आपले वचन पाळले व युद्धाची घोषणा केली. हिटलरने डॅनझिगला जर्मनीला जोडण्याची मागणी केली. ही मागणी मान्य करणे इंग्रजांसाठी खूपच नामुष्कीचे होते. चेंबरलेनने आपले तुष्टीकरणाचे धोरण सोडून दिले आणि पोलंडवर हल्ला झाला तर ब्रिटन तिच्या मदतीला धावून येईल असे जाहीर केले. त्याने फ्रान्स व पोलंड यांच्याशी औपचारिक युती केली आणि तिन्ही सत्तांनी एकमेकांच्या स्वातंत्र्याची व प्रादेशिक अखंडतेची हमी देण्याचे मान्य केले. हिटलरने झपाट्याने हालचाल केली आणि रशियाबरोबर दहा वर्षांसाठी अना-आक्रमकता करार केला. ब्रिटन आणि फ्रान्स जर्मनीविरुद्ध युद्धात उतरणार नाही याची हिटलरला खात्री होती. १ सप्टेंबर रोजी जर्मन सैन्याने युद्धाची कोणतीही घोषणा न करता पोलंडवर स्वारी केली. ३ सप्टेंबर रोजी ब्रिटन आणि फ्रान्सने जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली. दुसऱ्या महायुद्धाची ही सुरुवात होती.

## १२.३ दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल

१ सप्टेंबर १९३९ रोजी हिटलरने पश्चिमेकडून पोलंडवर आक्रमण केले. दोन दिवसांनंतर फ्रान्स आणि ब्रिटनने जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर करून दुसऱ्या महायुद्धाची सुरुवात केली. १७ सप्टेंबर रोजी सोव्हिएत सैन्याने पूर्वेकडून पोलंडवर आक्रमण केले. दोन्ही बाजूंच्या आक्रमणामुळे पोलंडची झपाट्याने पडझड झाली आणि १९४० च्या सुरुवातीस जर्मनी आणि सोव्हिएत युनियनने या राष्ट्रावर नियंत्रण ठेवले होते. त्यानंतर स्टॅलिनच्या सैन्याने बाल्टिक राज्ये (एस्टोनिया, लॅटव्हिया व लिथुआनिया) ताब्यात घेण्यासाठी हालचाल केली आणि रुसो-फिनिश युद्धात फिनलंडचा पराभव करून रशियाने पूर्व यूरोपवरील प्रभुत्व सिद्ध केले.

## १२.४ पश्चिमेतील महायुद्ध (१९४०-४१)

फ्रान्सच्या पाडावामुळे जर्मनीशी लढण्यासाठी ब्रिटन एकाकी पडला होता. हिटलरने ताबडतोब ब्रिटनवर आक्रमण करण्याचा निर्णय घेतला. प्रचंड हवाई हल्ले आणि मोठ्या प्रमाणावर ब्रिटिशांची जहाजे बुडवून त्याने ब्रिटिशांचे मनोबल खच्ची करण्याचा प्रयत्न केला.

लुफ्त्वासाने (जर्मन हवाई दल) ब्रिटनच्या औद्योगिक भागात, बंदरांवर आणि खुद्द लंडनवर वर्षभर (ऑगस्ट १९४० - जून १९४१) बॉम्बहल्ला केला. परंतु इंग्रजांनी मोठ्या निर्धाराने याचा प्रतिकार केला. हवाई हल्ल्याच्या खबरदारीची कुशल यंत्रणा त्यांच्याकडे होती. ब्रिटिश रॉयल एअरफोर्सच्या वैमानिकांनी जर्मनांशी लढण्याचे अप्रतिम काम केले. ब्रिटनचे युद्धकालीन पंतप्रधान विन्स्टन चर्चिल यांनी मोठ्या हिमतीने इंग्लंडचे नेतृत्व केले. याच काळात अमेरिकेने ब्रिटनला मोठ्या प्रमाणावर युद्धसाहित्य पुरवले.

**रशियावर आक्रमण - ऑपरेशन बार्बरोसा (१९४१-४२):**

रशिया आणि जर्मनी यांच्यात झालेला अना-आक्रमण करार काही काळासाठीच पाळण्यात आला. स्टॅलिनला बाल्कन प्रदेशावरील जर्मन ताबा आवडला नाही. जर्मनीने युगोस्लाव्हियावर मिळविलेला विजय आणि प्रदेश वाटून घेण्यावरून झालेल्या भांडणामुळे दोन्ही देशांत फूट पडली. जून १९४१ मध्ये हिटलरने सुसंघटित व प्रचंड हल्ला करण्याचे आदेश देऊन रशियावर आक्रमण केले. जर्मन सैन्याने तीन दिशांनी आगेकूच केली. दक्षिणेकडे जर्मनीची प्रगती झपाट्याने झाली होती, पण जसजसे रशियन लोक मागे हटत गेले, तसतसे त्यांनी सर्व पुलांचा, कारखान्यांचा, रेल्वेचा नाश केला. जर्मन लोकांना कोणत्याही प्रकारचा फायदा होऊ नये म्हणून हे दग्धभू धोरण होते. उत्तर भागात जर्मन सैन्याने लेनिनग्राडला वेढा घातला. रशियासाठी हा जीवनमरणाचा प्रश्न होता आणि तिच्या देशभक्त नागरिकांनी तो लढा दिला. अति आत्मविश्वास असलेल्या हिटलरने रशियन हिवाळा विचारात घेतला नाही. रशियन हिवाळ्याने जर्मन सैन्याला चिरडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आणि रशियाची लढाई जर्मनीसाठी मोठी आपत्ती ठरली.

**पर्ल हार्बरवर जपानी हल्ला:**

जपानने ७ डिसेंबर १९४१ रोजी हवाईतील पर्ल हार्बर येथील अमेरिकेच्या नौदल तळावर आक्रमण केले तेव्हा या युद्धाचे जागतिक संघर्षात रूपांतर झाले.तीन दिवसांनंतर त्यांनी दोन ब्रिटिश युद्धनौका बुडवल्या. त्यांनी हाँगकाँग, मलाया, सिंगापूर आणि बर्मा काबीज केले. डच ईस्ट इंडीज जिंकले गेले आणि चार महिन्यांच्या लढाईनंतर फिलिपिन्सने शरणागती पत्करली. ऑक्टोबर १९४२ पर्यंत जपान भारताच्या पूर्व सरहद्दीच्या वेशीवर होता आणि तीस लाख चौरस मैलांहून अधिक लांबीच्या साम्राज्यावर नियंत्रण ठेवू लागला होता.

**दोस्त राष्ट्रांचे विजय:**

१९४३ च्या सुरुवातीपासूनच पश्चिमेकडे मित्रराष्ट्रांची परिस्थिती सुधारली. जनरल माँटगोमेरी यांच्या आधिपत्याखालील सैन्याने जनरल रोमेल या जर्मन सेनापतीविरुद्ध ऐतिहासिक लढाई जिंकली. त्याच वेळी जनरल आयसेनहॉवरच्या हाताखाली एक मोठे ब्रिटिश व अमेरिकन सैन्य वायव्य आफ्रिकेत अल्जिअर्सजवळ उतरले. दोस्त राष्ट्रांचे सैन्य भयंकर लढाईनंतर ट्युनिशियात सामील झाले आणि मे १९४३ मध्ये शत्रू सैन्याला शरणागती पत्करण्यास भाग पाडले. उत्तर आफ्रिकेतील जर्मन संघर्ष संपुष्टात आला. मित्रराष्ट्रांनी पुढे आक्रमण करून सिसिलीला घेतले. तेथून ते रोमकडे कूच करू लागले. मुसोलिनी सत्तेवरून पायउतार झाला आणि इटलीने बिनशर्त शरणागती पत्करली. परंतु

इटलीतील जर्मन सैन्याने कडवा प्रतिकार केला आणि रोमला जून १९४४ मध्येच घेण्यात आले. या आधी मुसोलिनीची फॅसिस्टविरोधी लोकांनी गोळ्या घालून हत्या केली होती.

## १२.५ पॅसिफिकमधील महायुद्ध १९४३-४५

युरोपमध्ये युद्ध संपले असे वाटत असले तरी अतिपूर्वेत त्याचा अंत झाला नव्हता. जपानने मित्रराष्ट्रांच्या सत्तांविरुद्ध लढा सुरूच ठेवला. ब्रिटिश व भारतीय सैन्याने बर्माच्या जंगलात जपानशी सातत्याने लढा दिला तर नैऋत्य प्रशांत महासागरातील जपानी तळांवर अमेरिकनांनी हल्ला केला. ही लढाई भयंकर होती. ओकिनावाच्या लढाईत दोन्ही बाजूंची मोठी जीवितहानी झाली पण अमेरिकनांनी बाजी मारली. त्यानंतर दोस्त राष्ट्रांनी वारंवार सूचना करूनही जपानने शरणागती पत्करली नाही तर जपानचा पूर्णपणे विनाश करण्याची धमकी दिली. जपान सरकारने हा प्रस्ताव फेटाळला. अमेरिकेकडे कोणताही पर्याय उरला नाही आणि त्यांनी हिरोशिमा आणि नागासाकीवर अणूबॉम्ब टाकले. ही दोन्ही शहरे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आणि जपानने परिस्थिती ध्यानात घेवून १४ ऑगस्ट १९४५ रोजी शरणागती पत्करली.

## १२.६ दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम

पहिल्या महायुद्धाप्रमाणे दुसऱ्या महायुद्धाने जगात आर्थिक, सामाजिक व राजकीय बदल घडवून आणले. १९४५ मध्ये मध्य व पूर्व युरोपात सर्वांत तीव्र आर्थिक व सामाजिक बदल घडून आले व तेथे साम्यवादी नियंत्रणाखाली अनेक देशांनी संपूर्ण आर्थिक पुनर्रचना केली. चीन, भारत, ब्रह्मदेश, मलाया आणि इंडोनेशिया या आशियायी देशांमध्ये सर्वात मोठी राजकीय उलथापालथ झाली. दुसऱ्या महायुद्धामुळे मानवजातीच्या इतिहासात अतुलनीय असे विनाशकारी परिणाम घडून येतात.

**जीवितहानी:**

पाच वर्षे दहा महिन्यांच्या युद्धात बारा लाख सैनिक कारवाईत मारले गेल्याचा अंदाज होता. आणखी पंचवीस लाख लोक उपासमारीमुळे आणि रोगराईमुळे मरण पावले. जपानमध्ये अणुबॉम्बमुळे पुष्कळ लोक मृत्युमुखी पडले. या प्रलयंकारी आपत्तीतून वाचलेल्यांची मुले आजही त्वचारोग आणि कर्करोगाने ग्रस्त आहेत.

**संपत्तीचा नाश:**

या युद्धात अमेरिकेने सुमारे ३५० अब्ज डॉलर्स खर्च केले. इतर देशांनी एक ट्रिलियन डॉलर्स (म्हणजे १,००० अब्ज) एवढा खार्ह केला होता. नुकसानीच्या बाबतीत हा खर्च आणखी एक ट्रिलियन डॉलर्स होता. युद्धाच्या शेवटी युरोप पूर्णपणे उद्ध्वस्त झाला होता. जवळजवळ प्रत्येक युरोपियन देशावर जोरदार बॉम्बस्फोट झाले होते. उद्योगधंदे उद्ध्वस्त झाले, बंदरे, रेल्वे, पूल उद्ध्वस्त झाले आणि शहरातील घरेही उद्ध्वस्त झाली. आशिया खंडातील देश युरोपच्या वसाहती असल्याने त्यांच्याही साधनसंपत्तीचा नाश झाला होता.

munotes.in

**सामाजिक समस्या:**

युद्धामुळे जगभरातील लाखो लोकांना यातना भोगाव्या लागल्या. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित झाला होता. अन्नधान्य, रॉकेल, बांधकाम साहित्य आदींची टंचाई होती. किंमती वाढल्या आणि राहणीमानाचा दर्जा एकदम खाली गेला. प्रत्येक देश आर्थिकदृष्ट्या कमकुवत झाला आणि याचा परिणाम राजकीय जीवनावर देखील झाला. युरोपीय राष्ट्रांवर समाजवादी विचारांचा प्रभाव पडला. सर्व मानवतेच्या नैतिक अध:पतनाने जगातील लोक भयभीत झाले होते. माणसाने इतर निरपराध माणसांवर शक्य तितक्या भयंकर क्रौर्य आणि अत्याचार केले होते. नाझींनी लक्षावधी ज्यूंची अत्यंत भयंकर रीतीने कत्तल केली होती. हिरोशिमा आणि नागासाकी यांच्यावर अणुबॉम्ब टाकल्याने माणूस स्वत:च्या प्रजाती नष्ट करण्यास तयार आहे हे सिद्ध झाले. अशा प्रकारच्या कृतींनी नैतिक अधोगतीची पातळी दर्शविली.

**अक्ष शक्तींचा विनाश**:

नाझी जर्मनी, फॅसिस्ट इटली आणि लष्करशाहीवादी जपान या तीन अक्ष शक्तींचा पूर्णपणे चुराडा झाला. जर्मनीचे चार विभागांमध्ये विभाजन करण्यात आले आणि प्रत्येक क्षेत्र अनुक्रमे अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स आणि सोव्हिएत रशियाच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आले. बर्लिन या राजधानीचे शहरही चार विभागांत विभागले गेले. हे झोन १९४५-१९४८ दरम्यान परकीय लष्करी नियंत्रणाखाली होते. इटलीने आपली सर्व वसाहतवादी संपत्ती गमावली. तिला युद्धाची नुकसानभरपाई द्यावी लागली आणि रशियाला इटलीकडून भरपाई म्हणून शंभर दशलक्ष डॉलर्स मिळाले. इटली व इतर अनेक देश आर्थिकदृष्ट्या कोसळले होते आणि मार्शल योजनेने युरोपमधील देशांना आर्थिक अरिष्टातून सावरण्यास मदत केली. जपाननेही कोरिया, मंचूरिया आणि तैवानसह आपले संपूर्ण वसाहतवादी साम्राज्य गमावले.

**इंग्लंड आणि फ्रान्सला धक्का:**

दुसऱ्या महायुद्धामुळे तत्कालीन मित्रराष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय स्थानांमध्येही बदल घडून आले. ब्रिटन आणि फ्रान्सने महासत्ता म्हणून आपले स्थान गमावले आणि अमेरिका व रशिया नवीन महासत्ता म्हणून उदयाला आले. युद्धानंतर ब्रिटन आणि फ्रान्सला देशांतर्गत आणि बाह्य समस्यांना तोंड द्यावे लागले. या दोघांनाही आता आपापल्या वसाहतीवर पूर्वीप्रमाणे अधिराज्य गाजवणे शक्य नव्हते. त्यांच्या अर्थव्यवस्था जवळजवळ दिवाळखोरीत निघाल्या होत्या.

**रशिया (सोव्हिएत युनियन) आणि अमेरिकेचा उदय:**

युद्धाचा एक आश्चर्यकारक परिणाम म्हणजे रशिया आणि अमेरिकेचा महाशक्ती म्हणून उदय झाला. जर्मनीच्या पराभवाला रशियासोबत अमेरिकादेखील अंशत: जबाबदार होती. युद्धाच्या वेळी तिच्या लोकांनी दाखवलेले शौर्य क्वचितच विसरता येईल. अमेरिकेने युद्ध जिंकण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. अमेरिकेला प्रचंड प्रमाणात आर्थिक फायदा झाला होता आणि तिच्या उद्योगपतींनी प्रचंड नफा कमावला होता. युद्धाच्या काळात अमेरिकेने अनेक देशांना कर्ज दिले होते. युद्धानंतर, तिची आर्थिक स्थिती सुरक्षित असल्याने ती युद्धखोर देशांना पैसे उधार देत राहिली. यूएसए आणि यूएसएसआर या दोन नवीन सुपर

पॉवर्सने पूर्णपणे भिन्न विचारसरणीचे प्रतिनिधित्व केले. अमेरिकेने भांडवलशाही गटाचे प्रतिनिधित्व केले आणि रशियाने कम्युनिस्ट गटाचे प्रतिनिधित्व केले.

**वसाहतवादाचा अंत:**

युद्धाचा सर्वांत दूरगामी परिणाम म्हणजे वसाहतवादाचा अंत. ब्रिटन, फ्रान्स व हॉलंड या वसाहतवादी साम्राज्यांतील लोकांनी वसाहतींच्या वर्चस्वाविरुद्ध बंड पुकारले. त्यांनी आपले स्वातंत्र्य मिळवण्याचा निर्धार केला होता. भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश, सिलोन, इंडोनेशिया, भारत-चीन, इस्त्रायल, इराण, सीरिया, इथिओपिया, लिबिया आणि आफ्रिकेतील राज्ये या सर्वांनी युद्धानंतर लगेचच आपले स्वातंत्र्य जिंकले.

**संयुक्त राष्ट्र संघटनेची (UNO) स्थापना:**

संयुक्त राष्ट्रसंघटनेचा (युनो) जन्म १९४५ साली झाला. लीग ऑफ नेशन्स अपयशी ठरली तरीसुद्धा मानवजातीने या जगाला एक सुरक्षित ठिकाण बनवण्याच्या आपल्या आशा सोडल्या नाहीत. सॅन फ्रान्सिस्को येथे संयुक्त राष्ट्रांच्या सनदेवर स्वाक्षरी करण्यात आली होती आणि त्यात शांतता राखण्यासाठी देश एकत्र काम करू शकतील अशी आशा आहे.

## १२.७ सारांश

१९३० च्या दशकाच्या उत्तरार्धात युद्ध सुरू झाले तेव्हा जगाची लोकसंख्या अंदाजे २ अब्ज होती. एका दशकापेक्षा कमी कालावधीत, अक्ष मित्रराष्ट्रांच्या सत्तांमधील युद्धामुळे ८० दशलक्ष लोक मरण पावले होते आणि संपूर्ण जगातील सुमारे ४ टक्के लोक मारले गेले होते. जर्मनी, जपान आणि पूर्वी त्यांनी ज्या प्रदेशावर राज्य केले होते, त्या प्रदेशाचा ताबा घेऊन मित्रराष्ट्रांचे सैन्य आता ताब्यात घेऊ लागले. कारखाने नष्ट होऊन पूर्वीचे नेतृत्व काढून टाकण्यात आले किंवा त्यांच्यावर खटला चालवला जात असल्याने त्या राष्ट्रांच्या युद्धक्षमता कायमच्या नष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला. युरोप आणि आशियात युद्धगुन्हेगारांवर युद्ध खटले दाखल झाले आणि पर्यायाने अनेक जणांना फाशी आणि तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

## १२.८ प्रश्न

१) दुसऱ्या महायुद्धाची प्रमुख कारणे स्पष्ट करा

२) दुसऱ्या महायुद्धाची कारणे व परिणाम यांचे विश्लेषण करा

३) दुसऱ्या महायुद्धाची वाटचाल आणि त्याचे परिणाम यांची चर्चा करा

**४) खालील टिपा लिहा.**

अ) तुष्टीकरण धोरण

ब) दुसऱ्या महायुद्धाची दिशा

क) दुसऱ्या महायुद्धापूर्वी हुकूमशहांचा उदय

## १२.९ संदर्भ

१) लोवे नॉर्मन,माष्टरिंग युरोपियन हिष्ट्री,मॅकमिलन, २००५

२) टेलर ए.जे.पी., द स्ट्रगल फॉर मास्टरी इन युरोप (१८४८-१९१८) – ऑक्सफर्ड, १९५४

३) कोर्नेल आर. डी., वर्ल्ड हिष्ट्री इन ट्वेन्टीथ सेंचुरी, लोंगमन एस्सेक्स, १९९९

४) ग्रांट अंड तेम्परले, युरोप इन नाईनतिन्थ अंड ट्वेन्टीथ सेंचुरी, न्युयोर्क, २००५

५) प्रा. दीक्षित, नी.सी., पाश्चिमात्य जग, नागपूर, जून २००५.

६) डॉ.सौ. वैद्य, सुमन, आधुनिक जग, नागपूर, २००२.

७) डॉ. काळे, म.वा., आधुनिक जगाचा इतिहास, पुणे, २०२१.

८) प्रा. जोशी, पी.जी., अर्वाचीन यूरोप, नांदेड, २००८.

*****

munotes.in